मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावली

A

अष्टम यष्टी

साधुबोध

नामचतुष्टय

१ - साधुबोध २ - विवादार्णवनौका ३ - चातुर्यचंद्रोदय ४ - ज्ञाननंदनसंहिता.

सर्व अधिकार

॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती,

0

दूरभाष -०७२१-२६७६३०७

EŒNÿªumNÿç

१- ईश्वर
२- अवतार
३- ज्ञानविचार
४- भक्ति
५- योग
६- श्रीगुरु
७- महात्मे
८- साधक
९- प्रयत्नवाद व दैववाद
१०- शिक्षण
११- मन विषयक
१२- वरशाप शकुनापशकुन
१३- धर्म विचार
१४- धर्मसंकर
१५- दान
१६- कुलधर्म
१७- वारकरी पंथ
१८- हिंदु धर्म
१९- गीता विश्व धर्म
२०- वेद : अपौरुषेय
२१- बौद्ध संप्रदाय
२२- ख्रिश्चन
२३- इस्लाम
२४- फ्री मेसन
२५- धर्म स्थापक
२६- तत्त्वज्ञान चर्चा
२७- संशयवाद
२८- स्वभाववाद
२९- अज्ञेयवाद
३०- उत्क्रान्तिवाद
३१- नीति शास्त्र
३२- शत्रु-मित्र-शरणागत
३३- प्रेम
३४- मूर्ख लक्षण
३५- आरोग्य
३६- फल ज्योतिष
३७- भाषा विषयक
३८- भाषा संस्कृतनिष्ठ असावी
३९- ग्रंथ लेखन कसे असावे
४०- भाषांतरे
४१- कल्पित कथा
४२- पुराणे
४३- इतिहास कसा लिहावा?
४४- उत्कर्षबोधक इतिहास
४५- काव्यनिर्मिती शास्त्र
४६- संगीत
४७- सुधारणा
४८- सामाजिक
४९- लोकशाही कुठे व कशी
५०- व्यापार
५१- शेती
५२- कुटुंब विषयक
५३- माता पिता
५४- भाऊ बंदकी
५५- सेवक
५६- स्त्री आणि पुरुष
५७- व्यक्तिगत प्रश्नोत्तरे
५८- युक्तीने पटविण्याचा बाणा
५९- यौक्तिक समन्वय
परिशिष्ट - श्रीस्वामी विवेकानंद

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

मधुराद्वैताचार्य ज्ञानेश्वरकन्या श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली - अष्टमयष्टी

साधुबोध

मंगलाचरण

संसारसागरागस्तिं प्रणम्यालंदिवल्लभम् ।
स्वबोधपरिशुद्ध्यर्थं वच्मि साधूक्तिसंग्रहम् ॥१॥
प्रसिद्धार्थे प्रसिद्धांशे विनियोगोऽत्र वर्तते ।
प्रसिद्धे संशयग्रस्ते अप्रसिद्धमुपदिश्यते ॥२॥
अप्रसिद्धं शिरःकृत्य सत्प्रसिद्धं न यस्त्यजेत् ।
असावेवास्य लेखस्य वेत्ता नान्यः कदाचन ॥३॥

(अगस्ति ऋषि होऊन संसारूपी सागराला सहज प्राशन करणाऱ्या आळंदीवल्लभ श्रीज्ञानेश्वरांना प्रणाम करून, स्वतःच्या बोधाची परिशुद्धि करण्यासाठी, हा साधूंच्या उक्तींचा संग्रह मी सांगत आहे. ॥१॥

प्रसिद्ध असलेला साधूंच्या उक्तींचा अर्थ आणि त्यांचा प्रसिद्ध अंश यांची आजच्या संदर्भात 'नवीन योजना' यात आहे. तसेच प्रसिद्ध असून आज संशयग्रस्त असलेल्या त्यातील अप्रसिद्ध अशा भागाचे यात विवरण आहे. ॥२॥

यानुसार येथे सांगितलेल्या अप्रसिद्ध अंशाला मस्तकी धारण करून - प्रसिद्ध असलेल्या उत्तम अर्थाचा, जो परित्याग करीत नाही, तो या लेखनाच्या आशयाला खरा जाणणारा आहे, म्हणजे या ग्रंथाचा अधिकारी आहे ॥३॥)

१.या ग्रंथाचे नांव आपण काय ठेविले आहे ?

ग्रंथजन्मान्वये नामचतुष्टय ते येणेप्रमाणे -

१ - **साधुबोध,** २ - **विवादार्णव-नौका,** ३ - **चातुर्यचंद्रोदय** आणि ४ - **ज्ञाननंदनसंहिता.**

ईश्वर

२. ईश्वर कोठे असतो ?

जेथे ज्याची पूज्यबुद्धि असेल तेथे !

३. ईश्वर कोठे असतो ?

सामान्य स्वरूपाने तो सर्वव्यापक आहे; विशेषस्वरूपाने भक्त हांक मारतील तेथे प्रगटतो. वैकुंठादि लोक भक्तांसह त्याची क्रीडा करण्याची स्थाने होत!

४. परमेश्वर दयाळू आहे तर भक्तांना दुःख कां देतो ?

भक्तांना असा प्रश्नच उत्पन्न होत नाही. प्रेमाचा स्वभावच असा आहे की, प्रियाने कष्टतर काम आपल्यावर न सोपविणे म्हणजे त्याचे प्रेम आपल्यावर नाही, असे प्रेमळास वाटते, त्यामुळे परमेश्वर आपल्यास दुःख देतो अशा प्रकारचा विचार भक्तांच्या मनास शिवणेच शक्य नाही. 'मरण्याच्या कामगिरीवर आम्हांस पाठवा' असे छत्रपतींना त्यांचे सहाय्यक वारंवार विनवीत असत, असे ऐकण्यात आहे.

भक्त तर यापेक्षां कितीतरी देहासक्तिरहित असतो; कारण त्याच्या बुद्धीचा विषय ऐहिक नसतो, म्हणून 'परमेश्वर आपल्याला दुःख देतो' हा विचार त्याला येतच नाही.

आता ज्यांना दुःख भासते त्यांच्या अंतःकरणात प्रेम नाही आणि असले तरी ते चंचल पदार्थावर बसले आहे असे समजले पाहिजे.

५.देव दयाळू कशावरून म्हणावा ?

भक्तावर संतुष्ट होतो यावरून; कारण 'लक्ष्मीच्या लुगडे धुण्याची सुद्धा बरोबरी कोणाला होणार नाही' असे वामनांनी म्हटले आहे.

६.देव दयाळू आहे पण अल्प धारिष्ट्य पाहतो, असे समर्थ रामदास म्हणतात, याचा काय अर्थ आहे ?

पैशाकरिता लोक युद्धात प्राण देतात; बंगालसारख्या देशात बायकोकरिता आत्महत्या करितात; पण देव नुसती आत्महत्या करण्याची भीती घातली की पावतो. यावरून संसाराच्या दृष्टीने देव अल्प धारिष्ट्य पाहत नाही तर काय?

७.आज्ञा मोडली असता देवाला राग येतो असे शास्त्रात सांगितले आहे ते कां ?

देवाला राग येवो किंवा न येवो, परंतु फुकट दया करणाऱ्याची नुसती आज्ञाही पाळू नये, हे मनुष्याला शोभते काय?

८.देव दयाळू आहे तर आम्हाला दुःख कां देतो ?

असे दुःख आपण दुसऱ्याला देऊ नये हा अनुभव दाखविण्याकरिता!

एका राजाने आपल्या मुलाची विद्या पढणे झाल्यावर त्याला सभेत आणून पिटले व सांगितले की, ''तुला जसे लागले तसेच दुसऱ्यालाही लागत असते, हे लक्षात ठेवून दुसऱ्यास शिक्षा करीत जा.''

९.नुसत्या देवावर विश्वास ठेवून प्लेगमध्ये बाहेर न गेलेली अशी पुष्कळ माणसे मेली आहेत; तेव्हा संकटसमयी परमेश्वर रक्षण करतो हे कसे समजावे ?

आपल्या अंगात कार्याविषयीचे सामर्थ्य दिले असताही जो मनुष्य देवावरच पुनः भार घालतो, तो मनुष्य देवावर प्रेम करणारा नसून प्रत्येक कामात देवाची परीक्षा पाहतो असे समजावे. तेव्हा अशाच्या विश्वासाची एखाद्या जन्मात परमेश्वराने परीक्षा पाहिल्यास काही हरकत नाही. शिवाय भक्तिसमाधीत असल्याशिवाय अशा प्रकारचा आग्रह धरणे देहबुद्धि असणाऱ्यांना उचित नाही. जरी देव संकटात प्रसन्न होतो तरी चहूंकडून नाईलाज झाल्यासच!

१०. अहो, प्रारब्धकर्म जर भोगल्यावांचून चुकतच नाही तर संकटसमयी परमेश्वराचा धांवा करण्यातच काय अर्थ आहे?

तीव्र प्रारब्ध जरी भोगल्यावांचून चुकत नसले, तरी मृदु व मध्यम प्रारब्ध परमेश्वरस्मरणाने अवश्य दूर होते, आणि योगसहित परमेश्वरस्मरणाने तर तीव्र प्रारब्धही दूर होते, असे माझे मत आहे.

११.परमेश्वर दयाळू आहे याविषयी प्रत्यय काय ?

याविषयी मला स्वतःलाच अनुभव आहे. माझ्या इतका क्वचितच कोणाला असेल. मी शूद्रजातीत जन्मलो असून लहानपणापासून आंधळा आहे. मी लोकांकडून पुस्तके वाचवून घेतली आहेत; तथापि कोणते पुस्तक मला कोणी वाचून दाखविले असे विचारले तर त्याचे नांव सांगण्याचे मला धैर्य नाही; वाचून दाखविणारेच उलट माझे शिष्य झाले आहेत. तेव्हा हे जे मला विशेष ज्ञान व ऊहसामर्थ्य आले आहे त्याचे कारण माझे पुण्य असेल असे कधीही मला वाटत नाही. कारण

(१) **'प्रारब्धाने'** तर मी आंधळा व शूद्र आहे. (२) **'संचित'** चांगले म्हणावे तर मला कामादिक विकार वाटेल तेव्हा वाटेल त्या ठिकाणी उत्पन्न होतात. (३) **'क्रियमाण'** चांगले म्हणावे तर खोटे बोलणे

व ब्राह्मणांच्या हातून सेवा घेणे हे सर्वांस ठाऊक आहे. तेव्हा इतके **जबरदस्त ऊहसामर्थ्य** परमेश्वराची दया नव्हे तर काय? - मी छातीला हात लावून सांगतो की माझ्यापेक्षा बहुशः लोक चांगले आहेत.

१२.मग आम्ही कितीही कुपात्र असलो तरी परमेश्वर दया करतो?

यात काय संशय ! परंतु समजा, त्याने तुमच्यावर दया केली तर तुम्हाला बोलण्याला तोंड नाही. तुम्ही परमेश्वराला दया करायला लाविले पाहिजे व आपले तोंड उजळ ठेविले पाहिजे.म्हणूनच तुम्हाला सर्व साधू सदुपदेश सांगत आले आहेत. दया ही वृत्तीच शरणागतनिमित्तोद्भावी *(शरणागताच्या निमित्ताने होणारी)* असल्यामुळे तुम्हाला परमेश्वराशी अनन्य झाले पाहिजे.

१३.बरे ईश्वर जरी सर्वाधार आहे तरी सर्वदोषसहित आहे काय?

अरे! सर्व दोष एकत्र झाल्यावर दोषपणाच रहात नाही. कल्पना कर की, आळशीपणा हा एक दोष आहे आणि हिंसा करणे हा एक दोष आहे; तेव्हा अत्यंत आळस व नेहमी हिंसा करण्याचा अत्यंत क्रूर प्रयत्न हे दोन्ही एके ठिकाणी कसे राहूं शकतात? शिवाय परमेश्वर सर्वदोषसंपन्न होईल, तर सर्वकाल हिंसाच होईल, सृष्टि होणार नाही; आणि सृष्टि झाल्यावर अहिंसा गुण येईल.म्हणून **'अल्पशक्तिमंताविषयीच गुणदोषांचा विचार आहे, सर्वशक्तिमंताविषयी नाही.'** भागवतात म्हटले आहे की,

धर्मव्यतिकरोः दृष्ट ईश्वराणां च साहसम् ।
तेजीयसां न दोषाय वह्नेः सर्वभुजो यथा ।।

१४.ईश्वर जर एक आहे तर अनेक मतभेद जगात कां मानले आहेत?

सर्व जीव ईश्वराची लेकरे असून, आई ज्याप्रमाणे मुलांच्या खेळण्यामध्ये- अमुक खेळ की अमुक खेळ खेळू नको, हा पक्षपात करीत नाही; फक्त मुले आपल्याला त्रास करून घेतील अशा प्रकारच्या खेळाबद्दल ती मनाई करिते, त्याप्रमाणे परमेश्वरही जीवांचा तो खेळरूपी मिथ्या मतभेद, त्याविषयी उगीच पक्षपात करीत नाही. जीव ज्याच्यायोगाने दुःखात पडतील अशा निषिद्ध पदार्थांचा मात्र सर्वत्र सर्व धर्मात तो निषेध करितो.

१५.ईश्वराचे नांव घेतल्याबरोबर ईश्वर आपल्यास मिळाला असे जर मनात मानून घेतले, तर हे वेड होणार नाही काय ?

असेलच तर ते शास्त्रीय आहे.**''उन्मादवन् नृत्यति लोकबाह्यः''** हे शास्त्रवचन त्याविषयी प्रमाण आहे. म्हणून ते गर्ह्य नाही.

१६.एखाद्या संकटात परमेश्वरावर अत्यंत भरंवसा ठेवूनही ते संकट दूर न झाले तर काय करावे?

हे शक्यच नाही; म्हणून हा प्रश्नही योग्य नाही. 'आपल्या निश्चयातच चूक असते' म्हणून तसे होते; किंवा - 'या क्षुल्लक फळापेक्षा परमेश्वराला एखादे मोठे फळ द्यावयाचे आहे' असे समजावे.

१७.ईश्वर कसा आहे? कोठे आहे? काय करतो? व कां करतो ?

ईश्वर म्हणाल तसा आहे. स्मराल तेथे आहे. मागाल ते देतो व त्यालाही काहीही जरूर नसल्यामुळे हे सर्व त्याच्या लीलेने घडते.

१८.तर मग ईश्वर उन्मत्ताप्रमाणे चेष्टा करतो काय?

नाही. **जीव यावत्संसार अनादि अनंत आहे** म्हणून परमेश्वराने येथून तेथे त्याला कितीही नाचविले तरी त्याचे स्वरूपतः काही नुकसान होत नाही.आता वृत्तितः जीवाचे नुकसान दिसते खरे, पण त्याबद्दलही परमेश्वराने अमुक करा व अमुक करू नका, असे स्पष्ट शास्त्रात सांगून ठेविले आहे; म्हणून मोल न घेता दुसऱ्याला अक्कल शिकविणारा परमात्मा उन्मत्त ठरत नाही.

असलेल्या स्थितीवर विचार करणे चांगले- नसलेल्या स्थितीचा आरोप करून शंका करणे योग्य

नाही; म्हणूनच शास्त्रावरून व त्याच्या उपदेशावरून दिसणाऱ्या ईश्वरस्वरूपाचा विचार केला पाहिजे.**अमुक असे झाले पाहिजे होते, हे कोणालाही वाटते; पण झाले नाही याला काय करावयाचे?** वस्तू अमक्याच प्रकारची असणे, हे काही आपल्या हातचे नाही.

१९.अहो, पण असे मानणे म्हणजे जीवाच्या दृष्टीने ईश्वराची कृती नेहमी अपूर्णच समजणे आहे ?

हा जीवाचा मूर्खपणा आहे; कारण प्रत्येकाच्या वासना भिन्न भिन्न असल्यामुळे आपापल्या मताप्रमाणे सृष्टी असावी असे वाटणे सहाजिक आहे. ईश्वर सर्वसाधारण असल्यामुळे तारतम्यानेच त्याची सृष्टी होणे योग्य आहे. शिवाय सुतार, लोहाराप्रमाणे परमेश्वर मोल घेऊन काही काम करीत नाही की त्याच्यावर कोणालाही बोल ठेवता येईल!

२०.तर मग परमेश्वर दयाळू कसा ?

दयाळू तर खराच! तुमचे स्वरूपतः तो नुकसान होऊ देत नाही, आणि वृत्तितः आपल्या चुकीने तुम्ही नुकसान करून घेता, त्यातही तो उपदेश करितो. शिवाय तुम्ही काही जड यंत्राप्रमाणे नाही. चेतनाविषयी दयेला काही सीमा असते; नाही तर चेतनाचे स्वातंत्र्यच नष्ट व्हायला पाहते. अतिशय जवळ घेऊन घेऊन लेकराचे पाय लंगडे करणाऱ्या आईला जसे कोणी दयाळू समजत नाही त्याप्रमाणे दया करून जड यंत्रासारखे जीवाला जड करून ठेवणे, हे परमेश्वराच्या दयालुत्वाचे लक्षण नाही.तुमच्या वृत्तीत जोम येईल व तुम्हाला शेवटी तुमचे खरे ईश्वरस्वरूप पाहता येईल, इतकी व्यवस्था त्याने दयेने करून ठेविली आहे.

२१. प्रसंगी विश्वास ईश्वरावर ठेवणे चांगले की आपल्या प्रारब्धावर ठेवणे चांगले?

ईश्वरावर ठेवणे चांगले, कारण प्रारब्धावर कितीही विश्वास ठेविला तरी, प्रारब्ध काही आपले केलेले मोडीत नाही, कारण ते स्वतः जड आहे. ईश्वर चेतन असल्यामुळे, तीव्र विश्वास असला तर या जन्मात किंवा मंद असल्यास पर जन्मात, प्रारब्ध निवटून फल देतो; म्हणून प्रयत्नवादी जो आहे त्याने परमेश्वरावर विश्वास ठेवून प्रयत्न करावा.

२२.सर्वच ब्रह्म आहे तर अनेक देवतांची पूजा कां निषेध केली आहे?

सर्व ब्रह्मात अनेकत्वच नाही आणि अनेक देवतांची पूजा कोणत्यातरी कामनेनेच होत असते; त्यामुळे एका ईश्वरात सर्व सामर्थ्य आहे अशा बुद्धीस प्रतिबंध होतो.

जो भितो त्याचा भगवंतावर विश्वास कमी; हे मात्र ठरलेलेच आहे. साधुसंतही भीत असतात खरे, पण ते मरणास भीत नाहीत तर दुर्मरणसाधक हेतूस भितात.

२३.परमेश्वर आपले सर्व काही ऐकतो असे मानले तर कोणी कोणावरही अत्याचार करील ?

कां? ज्याच्यावर अत्याचार करील, तो परमेश्वराला शरण गेला म्हणजे त्याचे परमेश्वर ऐकणार नाही, असे थोडेच आहे? दोघां भक्तात फार लढा पडला तर जय-विजयासारखी गती आहे, 'तुम्ही दोघेही भक्त असल्यामुळे मला काही बोलता येत नाही; तुमचा शाप तुम्हाला भोगला पाहिजे,' असे जयविजयांना देवाने स्पष्ट उत्तर दिले होते.

अवतार

२४.देव कसा आहे?

त्याला जो जशी हाक मारील तसा !

२५.अवतार कशाला समजावे ?

ज्यावर आपली पूज्यबुद्धी असेल त्याला!

२६.लोकांनी अवताराने काहीच केले नाही असे विचारले असता काय उत्तर द्यावे ?

आमच्या एवढ्याच कार्याकरिता अवतार झाला होता, असे ठासून सांगावे.

२७.अशाने सर्वच अवतार होतील ?

झाल्यास कोणता प्रत्यवाय आहे? पूज्यबुद्धि नसल्यावर प्रत्यक्ष ईश्वराच्याही अवताराचा काय उपयोग ?

२८.अशा अवताराची निंदा होत असते ?

निंदेतून सुटलेला असा कोणताच अवतार नाही.राम-कृष्णांची, निराकार परमेश्वराची निंदा मूर्ख करितात.

२९.अवतार फसविणारा असला तर ?

लोकांस फसविणारा बुद्ध अवतार देखील शास्त्रात सांगितला आहे.

३०.तथापि अवताराचे सामान्य लक्षण काय पाहिजे?

ज्या धर्मात तो उत्पन्न होतो त्या धर्मातील शक्त्यनुसार कार्य करणे.

३१.त्याला आम्ही अवतार कां समजावे ?

तुम्ही ते कार्य करीत नाही म्हणून !

३२.युगायुगाचे ठिकाणी मी अवतार घेतो असे देवांनी म्हटले आहे; मग आमच्याकरिता देव अवतार कां घेत नाही?

घेत असला तरी तुम्हाला त्याची किंमत नाही.कारण 'जे जे उत्कृष्ट सत्त्व आहे ते ते माझी विभूती आहे' असेही परमेश्वराने म्हटले आहे. तिकडे तुमचे लक्ष नाही.

जो जो तुमची आवडती गोष्ट करतो तो तो परमेश्वराचा अवतार नव्हे कशावरून?

शिवाय, परमेश्वर तुमच्याच हृदयात आवेश करून तुम्हाला तो अवतार बनविणार नाही कशावरून? मी तुमच्या ठिकाणी अवतार घेणार नाही, असा काही त्याने तुमच्याजवळ पट्टा लिहून दिला आहे?

३३.मग तो अवतार आमच्या कामाच्या आड कां येतो?

शिशुपालालाही कृष्ण असताना असेच वाटत होते.ती विभूती तुमच्याकरिता नसेल, किंवा तुम्ही त्या विभूतिरूप कृष्णाचे शिशुपाळ असाल, हेच उत्तर!

मी तुमच्यामध्ये अवतरणार नाही, असे ज्याअर्थी परमेश्वराने सांगून ठेविले नाही, त्याअर्थी तुम्ही आपली शुभप्रवृत्ती दाबूं नका.तो परमात्मा कदाचित् तुमच्याच हृदयात अवतार घेईल.

३४.एखादा अवतार जर आपल्याला अनुकूल नसेल, तर कोणताही पक्ष वाढविण्याला अवतार होतो म्हणवयाचे?

होय.देव व दैत्य दोघांचाही पक्ष वाढविणारे अवतार देवांनी घेतले, अशी कथा भविष्योत्तरपुराणात आहे.

३५. एखादा परमेश्वराचा अवतार आहे हे आपल्याला पक्के ठाऊक असल्यास व तो धर्मान्तर करावयास सांगत असल्यास कसे करावे ?

आपल्या उपास्य मूर्तीच्या स्वरूपात तो नसेल तर त्याला बलाने चिरडून स्वर्गात जावे; परंतु त्याच्या आज्ञेने धर्मान्तर करू नये. राधेयोपाख्यान (कर्णाची कथा) हे याविषयी एक मासला आहे.

३६. जो तो उठतो सुटतो आणि अवतार म्हणून पुढे येतो. मुसलमानसुद्धा अवतार म्हणून पुढे येऊन हिंदूंची हबेलंडी उडवितात. तेव्हा अवतार कोणाला समजावे व कोणाला समजू नये?

अवतार शब्दाचा विभूतिरूप गौण अर्थ मागे सांगितला आहे. आतां मुख्य अर्थ सांगतो. व्याकरणात उत्सर्ग व अपवाद असे दोन प्रकार सांगितले असून उत्सर्ग एक वेळ सांगून दिला आहे व अपवाद वारंवार सांगत गेले आहेत. ज्या नियमाविषयी विशेष विधान नसते तो नियम उत्सर्गात जातो. याप्रमाणे अवताराविषयीही सामान्य व विशेष लक्षणे आर्यधर्मात सांगितली आहेत.

(१) ईशपुत्र(ख्रिश्चन), महंमदी, पारशिक, बौद्ध आणि जैन या प्रसिद्ध धर्मात अवतार मानलेले नाहीत.

(२) बौद्ध आणि जैन धर्मात अवताराचा जो आभास आहे, तो देखील ऊर्ध्वगामी लोकांचा अतिशय आहे, अवतार नव्हे.

(३) ब्रह्माभासविद्यावादी (थियॉसफी) लोकांनी असेच उत्क्रांतिवादावर अवतारांचे काही तरी खूळ उभारले आहे. तथापि ते आर्यधर्मामधील अवतारांशी जुळत नाही.

(४) आता आर्यधर्मामध्ये अवतार सामान्य व विशेष रीतीने कसे मानले आहेत ते पहा. 'साधूंचे रक्षण, दुष्टांचा नाश व धर्माचे संस्थापन यासाठी मी युगीयुगी अवतरतो' असे भगवंतानी म्हटले आहे. हे अवतारांचे सामान्य लक्षण असून ज्यांची अवतार म्हणून कंठरवाने नांवे पुराणात आली आहेत ते विशेष अवतार होत.

उठला सुटला तो आता अवतार बनतो. त्याची परीक्षा अशी करून पाहावी की- एक तर तो पुराणात विशेष रीतीने सांपडला पाहिजे. नाही तर अवताराचे जे सामान्य लक्षण गीतेत भगवंतानी केले आहे ते तरी त्याच्या आंगी सांपडले पाहिजे. म्हणजे तो वैदिक धर्माला अनुसरून पाहिजे; वैदिक धर्मासाठी त्याच्या हातून महत्कार्य झाले पाहिजे.

इतर धर्माचा असेल तर त्याला वैदिकधर्मीय अवतार मानण्याचे काही कारण नाही. अलीकडे दत्तात्रेयाचे अवतार झालेले मुसलमान सुद्धा वाटेल त्याला पीराची, झोटिंगाची वगैरे पूजा लोकांना सांगू लागले आहेत.

३७. पण तुम्ही बुद्धाला अवतार समजता ?

अरे, त्याचे नांव पुराणात आले आहे म्हणून समजतो. तथापि तो मूर्खांना मोह करण्याकरिताच झाला आहे असे आम्ही समजतो; व तो वंदनीय असला तरी त्याचे मत विशेषेकरून आम्हाला मान्य नसते,

किंवा त्याचे मत प्रत्यक्ष त्याच्या शिष्यांला समजले नाही, असे तरी आम्हाला म्हणता येते.

पण एखाद्या खानसाम्याचे नांव अवतार म्हणून आम्हाला पुराणात सांपडत नाही; म्हणून त्याला विशेष अवतार मानता येत नाही. आतां **''वैदिक धर्माची स्थापना''** हे सामान्य लक्षण त्याचे ठिकाणी दिसले तरी पाहिजे, ते जर नसले तर अवतार म्हणून आर्यांनी त्याला शरण जाण्याचे काही कारण दिसत नाही.

३८. बौद्ध, ईशपुत्रादि धर्मात बुद्ध ईशपुत्रादिक पुन्हा परतून येतील असे सांगितले आहे म्हणतात?

ते त्यांचा त्यांचा धर्म स्थापन करण्याकरिताच येतील असे सांगितले आहे. वैदिक धर्म स्थापन करण्याकरिता येतील असे सांगितले नाही त्यामुळें वैदिकधर्मी लोकांना त्यांना अवतार मानण्याचे काही कारण नाही.

३९.कांही वैदिक कर्मठादि मिळून धर्माचा प्रसार करीत आहे, त्यांना अवतार म्हणावे की नाही?

धर्मस्थापक व प्रचारक वेगळे असतात. धर्मस्थापकाचे लक्षण वर सांगितलेच आहे.केव्हा केव्हा ते एकही असतात.कपिल वगैरे पहिल्या प्रकारचे आहेत.श्रीकृष्ण, व्यास, शंकराचार्य, तात इत्यादिक पहिल्या प्रकारचे होत; आणि आनंदगिरी आदिक नुसते प्रचारक आहेत.

४०.बरे ते असो, म्लेच्छ योनीत वैदिक धर्माचा उद्धार करणारा एखादा जन्मल्यास तुम्ही त्याला अवतार समजाल काय ?

म्लेच्छापेक्षाही खालच्या कोटीचे जे मत्स्यकूर्मादि जलचर व डुक्कर, सिंहादि पशु त्यांच्यामध्ये झालेले आम्ही अवतार मानीत नाही काय? परंतु वेदधर्मामध्ये भेसळ करणारा मात्र नको; नाही तर निघावयाचा एखादा इसुर्वेद.

४१.अहो पण वर्णाश्रम न मानणारे कबीरादिकही तुम्ही अवतारच मानता ना?

एक तर त्यांविषयी विशेषोक्ती आहे; आणि वर्णाश्रमाविषयी जी वैकल्पिक वाक्ये भारतादिकात आहेत त्यांचाच त्यांनी अंगीकार केला आहे. बाकी हिंदुधर्माच्या मुख्य अंगात त्यांनी भेसळ केलेली नाही. कलियुगीचा जो पौराणिक धर्म तोही त्यांनी बरोबर सांगितला आहे, म्हणून त्यांना अनवतार म्हणण्याचे आम्हाला काही कारण नाही.

महान् धर्म स्थापण्याचे सामर्थ्य नसले तरी युगधर्म स्थापण्याचे त्याच्या आंगी सामर्थ्य पाहिजे.

याप्रमाणे मी केलेली अवतारचर्या जाणून कोणीही आर्य इतःपर फसणार नाही तर माझ्या लिहिण्याचे सार्थक्य झाले, असे मी समजेन.

४२.आपण जे अवताराचे लक्षण सांगितले ते मला पटले.परंतु अलीकडे जे अवतार म्हणून प्रसिद्ध होत आहेत त्यांची वाट काय ?

कार्यापुरते विभूतिमत्व महात्म्यांत असते असे मी तुला पूर्वी सांगितलेच आहे. शिवाय -

लक्षणावाचून भलत्याला अवतार समजण्याचे बंड सकाम लोकांनी माजविले आहे.

या लोकांच्या अवतारमंडळीत शुकाचार्यांचा, कपिलांचा किंवा ऋषभदेवांचा वैराग्यसंपन्न अवतार कोणीच नसतो.बहुतेक काम पुरवणाऱ्या दत्तात्रेयाचेच अवतार फार असतात; व इतर देवतांचे जे अवतार असतात, ते आपल्या पूर्व प्रकृतीशी असंबद्ध असतात.

समर्थ मारुतीचे अवतार म्हणून ते ब्रह्मचारी राहिले; परंतु नुकतेच एक मारुतीचे अवतार निजधामाला गेलेले मी पाहिले.त्यांनी दोन लग्ने केली होती.हल्ली एक दत्तात्रेयाचे अवतार आहेत.त्यांची पूर्वजन्मीची बायको त्यांना हल्ली भेटली आहे म्हणतात! श्रीकृष्णाचे कृष्णचैतन्य अवतार झालेत; परंतु त्यांनीही आपली कृष्णावताराची लीला येथे दाखविली नाही.परंतु लंगोटबंद ब्रह्मचारी जगद्गुरु श्रीदत्तात्रेय व मारुती यांनाही बायको करण्याची कां इच्छा झाली? हे कळत नाही.

बरे, इतकेही करून आम्ही लोकांकरिता तोंड दाबून बुक्यांचा मार म्हणून या अवतारांची अरेरावी सहनच केली पाहिजे तर ''वैदिक धर्मस्थापकत्व व सदुद्धारकत्व हे अवतारांचे गुण अंगी असलेच पाहिजे'' ही आमचीही अरेरावी त्यांनी सहन करून तडजोड केली तरच सारे ठीक होईल.

* अवतार विरक्त असेल तर धार्मिकता व * तो भलकसा वागणारा असेल तर आधिकारिक अलौकिकता, हे दोन गुण त्याचे ठिकाणी असलेच पाहिजेत.''एखाद्या ठिकाणी सार्वत्रिक अबाधित नियम आपल्या सामर्थ्याने करून ठेवणे याला आधिकारिक अलौकिकता म्हणतात.''

अनुक्त अवताराविषयीच हा विचार आहे; पुराणोक्त अवतारात तर हे सर्व असतेच. शिवाय त्यांच्यात पुराणोक्त उपास्यताविशिष्ट लिंग *(चिन्ह)* असते; आणि इतर सामान्य अवतार खरे असले तर त्यांच्यात ते प्रतीतिपूर्वक व्यक्त होते.

४३.धर्मरक्षणाकरिता भगवंताचा अवतार होतो असे गीतेचे वचन आहे, मग धर्म बुडाला तरी त्याविषयी आम्ही प्रयत्न कां करावा?

''अलौकिक प्रतिबंधाने जेव्हा धार्मिक प्रयत्नांचा नाश होतो तेव्हाच भगवंताचा अवतार होतो.लौकिक प्रतिबंधाला भिऊन जो मनुष्य धर्मप्रयत्न सोडून देतो त्याच्याकरिता अवतार होत नाही,''

असे नसते तर चार्वाकांना उद्धरण्याकरिता अवतार झाला असता, कारण - लौकिक प्रतिबंधाला भिऊन धर्मप्रयत्न सोडणाऱ्या मनुष्यांची व विष्ठेतील किड्यांची आलस्यात्मक स्थिती सारखीच आहे.

'बौद्धधर्मांत व म्लेच्छधर्मांतही स्वधर्मरक्षणाकरिता अवतार म्हणजे बुद्धाचे व पैगंबराचे पुनः पुनः येणे' सांगितलेच आहे. लौकिक प्रतिबंध निवारण्याकरिता जर अवतार झाला असता तर कौन्तेयाचे काही काम नव्हते. अवताराचे तत्त्व तर ''मनुष्याच्या सत्प्रयत्नाला परमात्मा साह्य असतो'' या सिद्धान्तात आहे.

भूत, पिशाच व दैत्य, ज्यांना रागद्वेषात्मक अप्रतिबंधी भौतिक शरीरे आहेत, त्यांच्या धर्म बिघडविण्याच्या प्रयत्नाकरिता मात्र परमात्मा अवतार घेत असतो.

ज्ञानविचार

४४.जागृती कोणती ?

ब्रह्मज्ञान.

४५.सुषुप्ती कशास म्हणतात ?

विष्णूच्या मायेने मोहित होण्यास !

४६.स्वप्न म्हणजे काय ?

संसार !

४७.अविनाशी आई कोणती ?

श्रुती (वेद)!

४८.रडणाऱ्यापुढे हांसणे कोणाचे शोभते ?

सर्वच जाणारे आहे असे जो पक्के समजतो त्याचे !

४९.आपण आपल्यास पूर्ण समजावे की अपूर्ण समजावे ?

ब्रह्मज्ञानदृष्टीने पूर्ण समजावे व अंतःकरणदृष्टीने अपूर्ण समजावे. म्हणजे ज्ञान एका ग्रंथाने होवो किंवा एका वाक्याने होवो मग लाखो शास्त्रे जरी ऐकली तरी काही नवे मिळाले असे आश्चर्य होऊ नये.

आणि इतर शास्त्रे शहाण्यापासून जितकी जितकी अधिक ऐकण्यात येतील, तितके तितके अधिक ऐकण्यास मिळाले असे आश्चर्य वाटू देऊन अभिमानाचा परित्याग करीत जावा.

५०.ब्रह्मज्ञानाचा अभिमानही गाळावा असे शास्त्रात आहे; तेव्हा तो कसा गळेल?

वाक्यार्थज्ञानाने व भक्तीने ब्रह्मज्ञानात आश्चर्य वाटूं देणे, हे तरी वाक्यज्ञानाचेच फळ, अभिमानाचे नव्हे !

५१.ज्ञान कोणाकोणाला कसे मिळते ?

१- ईश्वराला ते अखंड असते.

२- योग्याला ध्यानाने मिळते, आणि

३- साधारण मनुष्याला प्रचंड अनुभवाच्या इतिहासाने मिळते.

५२.द्वैत सिद्धांत खरा आहे की अद्वैत ?

अद्वैती जरी असले तरी अहंकाराला काही ईश्वर म्हणत नाहीत, व द्वैती जरी असले तरी अहंकाराला फक्त ईश्वराहून निराळा ठेवितात, असे दिसते. यावरून हा असा वादविवाद करणे तुच्छ आहे.

५३.सर्वाभूती परमेश्वर समजून व्यवहार कसा करावा?

भलतेच विचारलेस! ज्ञान होईल तरच सर्वाभूती परमेश्वर समजेल.

''भावनेने सर्वभूती परमेश्वर समजण्याची खटपट करू नये.''

कारण तसे झाले म्हणजे शौचकूपालाही नमस्कार करण्याची पाळी येणार! सर्वाभूती परमेश्वराची भावना करावयाची तर आपल्याला तरी विसरून गेले पाहिजे, नाहीतर घोटाळा होतो.

५४.सर्वाभूती समता कशाला म्हणतात?

ब्रह्मरूपाने सर्व भूते सम पहावीत, मात्र रूपाने पाहू नयेत. विद्वान, ब्राम्हण, चांडाळ, गाई, हत्ती व कुत्रा याठिकाणी पंडित समान पहात असतात. असे गीतेत सांगितले आहे.तेथे समान शब्दाचा अर्थ ब्रह्मच आहे; तसे न मानले तर कुत्र्याला देखील आपली कन्या देण्याची पाळी येईल व आपला बाप प्रसंगी गाढव होता असेही म्हणावे लागेल! म्हणून जोपर्यंत व्यवहार आहे तोपर्यंत विभूतीभावनाच अपेक्षित आहेत.

५५.शास्त्रात सर्व भूतांना जो नमस्कार सांगितला आहे, तो मग कसा करावा?

युगपत् (एकदम) करावा म्हणजे परमेश्वरास पोहचतो.पृथक् पृथक् करण्याची खटपट करू नये. माणसाच्या प्रत्येक अवयवास नमस्कार करण्याकरिता त्याला नग्न केले तर शोभेल काय? वंदन ही क्रिया असल्यामुळे शिष्ठसंप्रदायसम्मतच ती करावी.

भक्तीने जो वेडा झाला आहे त्याला आमचे काहीच म्हणणे नाही. जेवतां खावतां बरे येते, अशा करताच आमचे हे बोलणे आहे.

भक्ति

५६.भक्ति कशास म्हणतात ?

ईश्वरावर अत्यंत प्रेम !

५७.प्रेम कशास म्हणतात ?

आपण जितके आपणास आवडतो तितका ईश्वर आवडला म्हणजे त्याला प्रेम म्हणावे.

५८.अती काय काय सोडावे ?

भगवत् प्रेमावाचून सर्व काही !

५९.मर्यादा म्हणजे भय असते की प्रेम ?

मर्यादा म्हणजे भय नव्हे प्रेमच आहे पण त्यात उच्छृंखलपणा नाही.

६०.द्वेषाने भक्ती करणे चांगले की नाही ?

नाही, कारण देहसंबंधी वृत्ती असते.

६१.मर्यादाभक्ती श्रेष्ठ की पुष्टिभक्ती ?

ज्याला विकार आहेत, त्यांच्याकरता मर्यादाभक्ती श्रेष्ठ आहे;
व ज्याचे विकार गेले आहेत, त्याला पुष्टिभक्ती श्रेष्ठ आहे.

६२.खऱ्या प्रेमाला भंग केव्हां येत नाही असे समजावे?

भक्तीवाचून सत्य प्रेम उत्पन्नच होत नाही; आणि भक्ती उत्पन्न झाली म्हणजे प्रियाच्या लहानसहान गोष्टीसुद्धा कौतुकार्ह वाटतात.एक गोपी आपला अनुभव यशोदेला सांगते हे तुकाराम महाराजांनी वर्णन

केले आहे-

अवचित माझ्या डोळ्यांत गेला कण । फुंकून काढितां वाटले समाधान वो ।।
बाई हा कानडा शाहणा नारायण । चुंबन घेतां वाटलें समाधान वो ।।

यामुळेच प्रियकराला घडीघडी त्रास देणे त्यांच्याकडून होत नाही.

'आम्हाकरता प्रिय' आहे असे वाटणे, काही भक्ति नव्हे.तर 'प्रियाकरताच आम्ही' आहो असे वाटणेच भक्ति होय.

पण प्रेमाला गुरुशास्त्राचा आधार नसला तर कलह उत्पन्न होतो इकडे मात्र लक्ष दिले पाहिजे.

साधकांचा प्रेम तर सत्त्ववृद्धिपर्यंतच राहू शकतो, हे मी एका पत्रात लिहिलेही आहे.

६३.कोणी म्हणतात भक्तिमार्ग हा शूद्रांच्या उद्धाराकरता आर्य लोकांनी शोधून काढला आहे, हे सयुक्तिक आहे काय ?

मुळीच नाही, कारण गोपालतापनीय, रामतापनीय, नृसिंहतापनीय, कृष्णोपनिषद् यात ज्या उपासना आहेत त्या भक्तिमार्गाच्या असून त्या करण्याची शूद्राला मनाई आहे. शालिग्रामपूजा भक्तिमार्गच आहे, परंतु शूद्राला त्याच्या स्पर्शाची मनाई आहे. शालिग्रामात गोपालमूर्ती, राममूर्ती इत्यादी असतात. शिवाय त्यांचा 'विशेष' पुराणोक्त आहे, असे असताही शूद्रांच्या उद्धाराकरताच भक्तिमार्ग शोधून काढला, हे म्हणणे धाडसाचे नाही काय?

६४.भक्तीत मनुष्य प्रेमळ असला तरी नेभळा दैववादी होतो, हे कित्येकांचे म्हणणे बरोबर आहे काय ?

असे म्हणणाऱ्याला भक्तीचा परिचयच नाही, असे मी म्हणतो. प्रेमाने जितके स्वकर्तव्यधैर्य येते तितके दुसऱ्या कशानेही येत नाही, असे माझे मत आहे.

उलटा, प्रेमरहित पुरुषच ईश्वराने माझ्या कर्मात साह्य करावे अशी नेहमी हाकाटी पिटतो; पण प्रेमळ पुरुष माझ्या प्रियाला कष्ट होऊ नयेत म्हणून आपले कर्तव्य अंगावर घेतो. हे त्याला प्रेमभावानेच वाटते. ईश्वरालाच सामर्थ्य कमी आहे म्हणून वाटत नाही.

वडील स्वतःच काम कां करितात? मला कां सांगत नाहीत? माझ्यावर त्यांचे प्रेम कमी आहे काय? अशी शंका लहानाला आली तर ते प्रेमाचे चिन्ह नव्हे काय? सध्याच्या विवेकानंदादि पुढाऱ्यांना मान्य असणाऱ्या रामकृष्ण परमहंसांनी काय म्हटले आहे तिकडे लक्ष दे -

ज्ञानी व भक्त दोघे रस्त्याने जातांना त्यांना एक वाघ भेटला, तेव्हा ज्ञानी म्हणाला - 'वाघातहि परमेश्वर आहे व आपल्यातहि आहे मग पळून कां जावे?'

भक्त म्हणाला - ''परमेश्वराने आपल्याला सामर्थ्य जर दिले आहे, तर मग त्या दयावंताला आणखी श्रम कशाला द्यावेत?'' असे परमहंस नेहमी उद्गार काढीत असत.

अद्वैतदृष्टीने पाहिले तरी समुद्राच्या तरंगाला समुद्रानेच वाट द्यावी; त्याप्रमाणे एका उपाधीतील परमेश्वराला दुसऱ्या उपाधीतील परमेश्वराशी प्रसंगोचित वागणेच योग्य आहे; म्हणून भक्ताला नेभळे म्हणणारे शहाणे नव्हेत.

६५.भक्ताला प्रेमानेच सर्वव्यापक परमेश्वर कसा कळतो ?

प्रेम एका व्यक्तिवरच बसतो, ही समजच प्रथम चुकीची आहे. 'व्यक्तीवर प्रेम बसला तरी शेवटी ती व्यक्ति सर्वव्यापक होते' पण त्याला प्रेमाने वेडा मात्र मनुष्य झाला पाहिजे.

याविषयी एका पार्शी पुस्तकात लैलामजनूची गोष्ट आहे.ती अशी की

लैला-मजनूची गोष्ट

''मजनूचे लैलावर अतिशय प्रेम होते, पण तिच्या बापाने तिला त्याला न देता दुसऱ्याला तिचे दान

केले; त्यामुळे मजनू वेडा झाला. तो इतका की, एक मनुष्य गवत कापीत होता;

तेव्हा तो म्हणाला, ''अरे हे काय? लैलाचे केस कापतोस?''

इतकी त्याला चहूंकडे लैला दिसत होती. लैलाचेही खरे प्रेम मजनूवरच होते. एक वेळ लैलाला बरे वाटेना म्हणून वैद्याला बोलाविले. तेव्हा तिला बरे वाटण्याकरिता वैद्याने तिचे तुंबडीने रक्त काढले, परंतु तिच्या अंगातून रक्त मुळीच निघाले नाही. मजनूच्या अंगातून रक्ताची धार लागली.

योगवासिष्ठात जे 'कृत्रिम अहल्योपाख्यान' आहे, ते देखील याच धर्तीचे आहे. एकमेकांच्या प्रेमामध्ये गुंग झालेले ते प्रिय-प्रिया अग्नीत सुद्धा जळाले नाहीत.

एक वेळ लैला मजनूला भेटावयाला गेली. तेव्हा तो मजनू पळून गेला कारण सर्व ठिकाणी दिसणारी लैला एकाच ठिकाणी पाहण्याचा त्याला त्रास वाटू लागला.''

आता मुसलमानी धर्मात ही कदाचित् कादंबरी असेल, पण वैदिक धर्मात मात्र तशा गोष्टी घडल्या आहेत; आणि भक्ति व योग यांच्या योगाने तशा गोष्टी करूनही दाखविता येतात. म्हणूनच, सर्वाभूती भगवंत पाहणारा तो उत्तम भागवत, असे एकादश स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायात आर्षभांनी जनकाला सांगितले आहे. कोणी त्या श्लोकांचा अर्थ अद्वैतज्ञानपर करितात. परंतु **'यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः,** या पदाचा अर्थ ते लोक समजत नाहीत. यात 'अनन्यः' हे पद ज्ञानस्वरूपाने एकता दाखविणारे असून 'यत्किंच भूतं प्रणमेत्' हे पद निर्ममस्वरूपाने एकता दाखविणारे आहे; म्हणून 'ज्ञानाने निर्गुण व भक्तीने सगुण सर्वाभूती पाहता येते.'

मूळात ते दोन्ही एकच आहेत हे मी अनेक ग्रंथात सांगितले आहे.

६६. अनेक धर्मात जाऊन अनेक देवांची भक्ती करून सर्व देव प्रसन्न करून घेऊन नंतर एक निर्धार करणे चांगले की नाही? स्वामी रामकृष्ण परमहंसांनी येशू ख्रिस्ताची देखील भक्ती केली होती?

स्वामी रामकृष्णपरमहंस मला पूज्य आहेत. त्यांच्या शिष्यांच्या योगाने बंगाल्यात जोम उत्पन्न झाला आहे, म्हणून त्यांच्याविरुद्ध माझे गरिबाचे बोलणे कोण ऐकणार? पण असे करणे म्हणजे 'एका बायकोने अनेक नवरे करून, शेवटी विषयसुख सर्वांजवळ सारखे आहे' असा निश्चय करणे होय, असे मला वाटते.

शिवाय रामकृष्णांच्या चरित्रात त्यांनी ख्रिस्ताची भक्ती केली असे जसे दाखविले आहे, तशी त्यांनी महंमदाची भक्ती केली असे कोठे स्पष्ट दाखविले नाही. मग मुसलमानी राज्याचा हिंदुस्थानात जोर नाही हे याचे कारण असल्यास न कळे!

एका तऱ्हेने परमेश्वराची ओळख झाली म्हणजे प्रत्येक धर्माचा विधि केलाच पाहिजे, असा आग्रह साक्षात्काराचा सूचक नाही.

(समन्वय-) आतां, रामकृष्ण विष्णूचे अवतार होते असे म्हणतात, तर मग खिस्ताची भक्ती ही एक त्यांची इच्छित लीला झाली; तिचे अनुकरण करण्याची गरज नाही.

६७. ईश्वर नुसत्या प्रेमानेच वश होतो, तर गाणे, नाचणे इत्यादि भजन, गंधपुष्पनैवद्यादि समर्पण पूजन, इत्यादि श्रम आर्यधर्मात व्यर्थ सांगितले आहेत की नाहीत ?

नाही. ज्याचा ज्याला प्रेम असतो तो त्याच्याकरता सामुग्रीचे श्रम करीतच असतो. आपल्या पुत्राच्या प्रेमामुळे आपण मेल्यावरही पुत्राला चांगले सुख झाले पाहिजे, याकरता संसारी लोक श्रम करीत नाहीत काय? मग ईश्वरी प्रेमासाठी सामुग्रीचे सोंग केले तर काय तोटा आहे?

अष्टभावलब्ध ताटस्थ्यात श्रम संभवत नाहीत हे खरे आहे, तथापि तदितर प्रसंगी सामुग्रीश्रम करून त्यात न्यून पडले असता व्याकूळ होऊन पुनः अष्टभाव संयुक्त होणे हे तर ब्रह्मनंदनादिसंमत (श्रीनारदाचार्यादि) सुंदर भक्तीचे लक्षणच आहे

योग

६८.योगशास्त्रात पढतमूर्ख कोण ?

१- यमनियमांवाचूनच आसनप्राणायमादिकांचा अभ्यास करणारा,
२- वैराग्यावांचून अभ्यासाच्या मागे लागणारा,
३- लोकांना फसविण्याकरता मनाची एकाग्रता करणारा,
४- आणि रोज योग्याभ्यास साध्य होऊनही सिद्धींच्या आशेने नवीन धारणा बदलणारा!

हे चवघे शंकरापासून योग शिकत असले, तरी गुरूच्या माथ्यावर अपयशाचे खापर फोडतात.

६९.हठयोग कोणाच्या उपयोगास येत नाही ?

ज्याची कोठूनही एकवेळ निष्ठा उडाली आहे त्याच्या !

७०.दुर्योग कशाला म्हणतात ?

ज्या योगामध्ये मनाचा निरोध नसून केवळ इंद्रियांच्या चमत्कारा-कडेच दृष्टी जाते त्याला! असे योग वाईट गुरू सांगत असतात.

७१.प्राणायामाने आयुष्य वाढते, असे आर्यधर्मात म्हटले आहे ते योग्य आहे काय ?

अवश्य योग्य आहे.घड्याळाप्रमाणे मनुष्यदेह हे एक यंत्र असून नैसर्गिक नियमाने ते चालले आहे. सृष्टीत काही ग्रह स्थिर आहेत व काही ग्रह सतत चालत आहेत, व काही पदार्थास मधून मधून विश्रांती पाहिजे असते.मनुष्यप्राण्याच्या शक्ती मधून मधून विश्रांतीची अपेक्षा करीत असतात, हे आपण व्यवहारात सतत पाहतो.पैकी मनाला तर झोपेत कशीबशी विश्रांती मिळते पण प्राणाला मुळीच विश्रांती मिळत नाही. गतीपेक्षा देखील आपण त्याच्याकडून गैरवाजवी काम घेतो.

तात्पर्य, प्राणाच्या दृष्टीने आपण फाजील व्यायाम करतो.प्राणायामातील कुंभकाने ही उणीव भरून निघत असून झोपेतून उठलेल्या मनुष्याच्या हुशारीप्रमाणे प्राणायाम करून उठलेल्याच्या नाडींना हुशारी येते.

शिवाय, कसरतीने जसे अवयव बळकट करता येतात तशी प्राण कोंडून धरण्याची संवय लागली तर काही रोगाने श्वासाचा निरोध झाला असता, मनुष्य एकाएकी घाबरत नाही.यामुळे अकाली मरण्याच्या वेळी श्वास निरोधाने मनुष्य न घाबरल्यास सृष्टिनियमाप्रमाणे त्याला नवीन जीवित येते.

शिवाय, श्वासोच्छ्वासावर आपला ताबा बसतो.''रोजच्या रोज प्राणायामाच्या वेळी घाम निघून जात असल्यामुळे रोगाचे विष शरिरात बाधूं शकत नाही व परमाणूपरमाणूला व्यायाम घडतो.'' वाफाराच्या चिकित्सेपेक्षा ही चिकित्सा फार चांगली आहे.

नार्वे देशात शंभर शंभर वर्षाच्या म्हाताऱ्यांची लग्ने होत असतात.कारण तशी माणसे तेथे म्हातारी समजल्या जात नाहीत. कारण तेथे आयुष्य स्वभावतःच हवामानाने जास्त आहे, तशी स्थिती प्रत्येक ठिकाणी आम्हाला करून घेता येईल.अशा प्रकारची प्राणायामाची रीती महर्षींनी आम्हाला दाखवून दिली आहे.

प्राणायामाने आयुष्य वाढते ही काही जादू नव्हे तर शास्त्र आहे.

७२.सध्या आर्यावर्तात पुष्कळ प्राणायाम करणारे दिसत असून त्यांचे आयुष्य कां वाढलेले दिसत नाही ?

त्यांचे आयुष्य कधी वाढावयाचे नाही; कारण प्राणाची गती दोन प्रकारची आहे. स्वाभाविक व

ऐच्छिक. नेहमी जो श्वासोच्छ्वास चालतो ती त्याची स्वाभाविक गती होय; आणि रागावले असता जो श्वास चालतो ती त्याची ऐच्छिक गती होय. इच्छेच्या संबंधाने होणारी म्हणून तिला ऐच्छिक म्हणतात.

सध्याचे प्राणायाम करणारे पैशाकरता योगाच्या शाळा काढीत असतात. त्यावरून त्यांच्या इच्छेचे दमन किती झाले आहे हे सहज कळते. असे हे योगीसाधू रागावले म्हणजे साधारण मनुष्याच्या श्वासापेक्षा तर काय पण सर्पापेक्षाही त्यांचा श्वास फार दूर जात असतो. स्वाभाविक श्वासाच्या गतीचा ते निरोध करतात; पण ऐच्छिक गतीचा ते निरोध करीत नाहीत. एकीकडून गती दिल्यामुळे व दुसरीकडून गती न दिल्यामुळे त्यांच्या त्या प्राणायामाने उलटा फुप्फुसांचा चुराडा उडतो. म्हणूनच योगशास्त्रात प्राणायामाला यमनियम अवश्य पाहिजेत, असे म्हटले आहे.

हल्लीच्या आशाबद्ध योगियांचे आयुष्य वाढले नाही तर मोठेसे आश्चर्य नाही, पण लवकर कां मरत नाहीत याचेच मला आश्चर्य वाटते.

शिवाय, मी योगावर व्याख्यान देणारे जेवढे म्हणून साधू पाहिले त्या सर्वांना निश्चयाने प्राणायाम येतच नव्हता. ते साधू आताही जिवंत आहेत. पाहिजे असल्यास त्यांनी माझ्याशी सामना करावा असे मी आव्हान करतो.

थंडीत प्राणायाम केला असता थंडी वाजत नाही हा सर्वांना पाहण्यासारखा सोपा अनुभव आहे. सशास्त्र मेहनत करणाऱ्याला तर महिन्याच्या आतच हा अनुभव येतो.

रोगनिवारण

७३. योगाभ्यास साधलेला असूनही नास्तिक कोण राहतो?

सर्व मानसिक बल शारीरिक रोग निवारण्यातच जो खर्च करतो तो! कारण आपल्यापुढचे ताट सोडून देऊन दुसऱ्या मुलाच्या पुढचे ताट ओढले असता आई ज्याप्रमाणे शिक्षा करते, त्याप्रमाणे, औषधीतील आपली शक्ती परमेश्वराने रोगनिवारणाकरिता ठेवली असतांही योगजशक्तीचा तिकडे उपयोग करतो तो भगवंतास प्रिय होत नाही.

दुसरे असे की, योग जर साधलाच आहे, तर मेल्यानंतर सूर्यमार्ग ठरलाच आहे. पण शरीराची ज्याला चाड आहे अशा मूर्खाचा सूर्यमार्गावर विश्वास नसल्यामुळेच, तो आपली योगज शक्ती शरीराकडे खर्च करतो. म्हणून तो योगी नास्तिक होय.

चक्रे

७४. अलिकडे योगी चक्राला जी नावे ठेवतात ती तुम्हाला पसंत आहेत काय ?

चक्राविषयीच्या व योगाविषयीच्या सर्व गूज गोष्टी आतापर्यंत सर्व साधूंनी गुप्त ठेविल्या आहेत. तथापि तुझे समाधान होईल असे गुप्त या ग्रंथात मला सांगता येते तितके सांगतो -

इंग्रजीमध्ये ज्याला प्लेक्सस म्हणतात त्यालाच अलिकडे योगी चक्र म्हणतात, ते मला पसंत नाही.

एका आधुनिक पुस्तककाराने तर लार्ज बॉवेलला कुंडलिनी म्हटले आहे. परंतु लार्ज बॉवेल जर कुंडलिनी होईल, तर ती चढवावी कशी हा प्रश्न राहतो. कारण लार्ज बॉवेल्स जर मस्तकात चढतील तर बिचाऱ्या योग्याला समाधीच्या ऐवजी मृत्यूस वरावे लागेल.

चक्राची वास्तविक गोष्ट अशी आहे की, शरीराचे काही भाग स्वतंत्र मानसिक बनले आहेत. मनाची भावना झाली की शरीरात न कळताना विकार होतो.

'माझा हात वाळला' अशी भावना झाली तर रक्त बंद होण्याची क्रिया काही प्रत्येक नाडीवर लक्ष देऊन करावी लागत नाही. त्या नाडी आपण होऊनच ते काम करतात.

१- अस्लर साहेबांनी मेडिसिन नांवाचा जो ग्रंथ लिहिला आहे, त्याच्या ११२० व्या पानावर असे म्हटले आहे की, 'हिस्टेरिया नांवाच्या रोगात ११२ ते १२० अंश ताप येत असतो. साधारण ११०

अंशामध्येच मनुष्य वाचूं शकत नाही. स्त्रियांमध्येच तर १२० अंशाच्या वरही ताप येतो. आम्हाला जरी आमच्या नियमाप्रमाणे याचा उलगडा करता येत नाही, आणि अशा केसेमध्ये लुच्चेगिरी होणे जरी शक्य आहे, तरी आमच्या अनुभवाच्या काही केसेस अगदी खऱ्या आहेत असे कबूल करणे भाग आहे.'

२– ज्याकुबीच्या रिपोर्टात १४८ अंश तापाची एक केस झाली म्हणून म्हटले आहे. उमाहा केस तर १७० अंश डिग्री तापाची होती. ही तेवढी केस संशयित आहे असे म्हणतात.

३– सँडो आपल्या पुस्तकात म्हणतो, 'मी स्वतः मनात आणतो तेव्हा माझे शरीर इतके फुगते की, माझ्या पाठीवर लोखंडाचा खांब मारला असता तो मोडून जाईल.

तेव्हा शरीरात असणाऱ्या गुप्त गोष्टी मनाच्या भावनेने प्रगट होतात हे खरे आहे. चक्रे व कुंडलिनी ही तशाच प्रकारची गोष्ट असून, मनाच्या भावनेने ती शरीरात प्रगट होऊ लागते व नंतर तिचे प्रकार शरीरावर प्रत्यक्ष दिसू लागतात; तथापि याच्या नयन साक्षात्काराचा मार्गही एक आहे. तो 'सुरतरू' वरून पहावा. (य११. संप्रदाय सुरतरू : महाराजांचा आकर ग्रंथ)

७५. मनाला तसे वाटू दिल्याने तो एक विकार होत असेल, पण वाटते तसे सर्वत्र असतेच असे नाही ?

वस्तूच्या विरुद्ध जर वाटणे असेल तर ती गोष्ट नसते हे जरी खरे आहे, तथापि वस्तू असेल तसे वाटणे खरे आहे, हीही गोष्ट तितकीच खरी आहे.

गुप्त वस्तू शब्दप्रमाणाने सुचविल्या जातात व नंतर त्या भावनेने प्रगट होतात. योगशास्त्र प्रथम चक्र व कुंडलिनी सांगते व नंतर ते योग्यांचा भावनेने प्रगट होतात; म्हणून गुरुवाक्यानुसार भावनाच करावी.

अलीकडचे योगी ज्या इंग्रजी अवयवांला चक्रांची नावे ठेवितात ते योग्य नाही.

७६. शब्दप्रमाण भावनाजनकच असते ना?

अरे, सर्व शब्दप्रमाण भावनाजनक नसते. 'मावशीला आई समज' हे वाक्य जरी भावनाजनक असले, तरी 'तुझी आई काशीस सुखी आहे' हे वाक्य भावनाजनक आहे काय? एवढ्याकरता शब्दप्रमाणही वस्तुसूचक आहे, हे पक्के लक्षात ठेव. भावनेनुसार क्वचित् शब्दाने वस्त्वाभास होईल, तर तो भ्रम आहे हे सर्वांसच कबूल आहे.

या प्रश्नाने तूं आपल्या पायावर धोंडा पाडून घेतलास, कारण प्लेक्ससला चक्र म्हणावे हे अलिकडच्या गुरूचे सांगणे मात्र भावनाजनक व प्रमाणाभास खरे !

७७. रक्तात चण्याएवढी जरी हवा गेली तरी मनुष्य मरेल असा पाश्चात्य शरीरशास्त्राचा सिद्धान्त आहे, तर शरीरात प्राण-अपान राहतात व ते एकत्र होतात हे कसे समजावे?

जशा प्रकारची हवा बाहेर असते तशाच प्रकारची हवा रक्तात गेली असता मनुष्य मरतो हे खरे आहे. पण तशा प्रकारच्या हवेला प्राण समजणे मात्र मूर्खपणा आहे.

शरीरामध्ये ऑक्सिजन जाऊन तो रक्तावर परिणाम करतो व परतून मात्र कॉर्बन येतो. या श्वसनक्रियेवरूनच काही हवेचे भाग रक्तात जातात हे पाश्चात्य वैद्यांना देखील कबूल करणे भाग आहे.

पाश्चात्य शास्त्राने अडून जाऊन स्वामी विवेकानंदाने फुप्फुसाच्या हालचालीलाच प्राण म्हटले आहे; पण त्याने काय झाले? आर्ययोगशास्त्र न पाहणाऱ्या पाश्चात्य वैद्यांना काही बोलता आले नाही एवढेच; 'पण फुप्फुसाची हालचाल गुदस्थानापर्यंत नेऊन आधारचक्रापासून वर मस्तकात पाठीमागून कशी चढवावी?' याचे, इकडचे योगशास्त्र वाचणाऱ्यांना विवेकानंदाच्या म्हणण्यापासून फार गूढ वाटू लागले आहे.

वायूचे ठिकाणचा स्पर्शगुण प्राणाचे ठिकाणी आहे व प्राण हा वायू आहे, परंतु त्या संवेदना नाडीसच होतात. कार्बन वगैरे, फुलांच्या गंधाप्रमाणे वायूशी मिसळणारे पदार्थ आहेत, हे मी एका पत्रात लिहूनही

ठेवले आहे; म्हणूनच अलिकडचे योगी कितीसे समाधिलाभ करतील याचा मोठा संशय आहे.

कोणी हृदयाची हालचाल बंद करणेच समाधी समजतात. पूर्वी तर पाश्चात्य हे कबूलच करीत नव्हते; तथापि काही मूर्ख हिंदु योग्यांनी तसे करून दाखविल्यामुळेच ते आता कबूल करू लागले आहेत व पुस्तकात लिहू लागले आहेत; तथापि ''हृदयाची हालचाल व नाडीचे ठोके बंद पडल्यावरही दुसऱ्याचे बोलणे ऐकू जाते व मी गोमाजी आहे हा देहाभिमान कायमच असतो.'' अशा प्रकारची परीक्षा मी एका उदररोगी (विठ्ठलपंत नांवाच्या) योग्याची हरद्यास प्रत्यक्ष केली आहे. या वेळी बरीचशी मंडळी होती; आणि असे मला स्वतःवर किंवा दुसऱ्यावर करून दाखविणे थोडेसे कठिण असले तरी फार कठिण नाही.

शिवाय, मी प्राणायाम कोणाला दिसण्यासारखा करीत नसलो तरी सर्व रात्रभर जालंदरबंध करून निजत असतो, हे सर्वांस ठाऊक आहे.

त्यात जो प्राणायाम करावा लागतो, तेवढ्याने समाधी होतो, हे 'जीवन्मुक्तिविवकेात' स्वामी विद्यारण्य म्हणतात, आणि ते खरेही आहे. तेव्हा महायोग्यापुढे जरी मी लेकरू आहे, तरी अलीकडचे योगी चुकतात असे म्हणण्याला मला काही हरकत नाही.

अनाहतनाद

७८. कानात बोटे घालून जो नाद ऐकू येतो, त्या अनाहत नादाची दयानंदाने सत्यार्थप्रकाशात हुर्यो उडविली आहे; तेव्हा नादाने लय होतो, हे म्हणणे काही ठीक नाही?

अरे, कानात बोटे घालून जो नाद होतो त्याला अनाहतनाद म्हणतच नाही. अजपा मंत्राचा कोटी जप झाला म्हणजे जे दहा नाद ऐकू येतात तेच अनाहत होत, हे अमृतनाद श्रुत्यादिकांवरून चांगले समजून घे.

अलिकडचे योगी काही पदार्थ कानात घालावयास देऊन त्या योगाने ऐकू येणाऱ्या नादावरच लक्ष द्यावयास सांगून तो अनाहतनाद आहे असे म्हणतात ती घोडचूक होय.

अनाहतनाद जपावाचूनही ऐकू येतो असे श्रीएकनाथ भागवतात म्हणतात. तो सूक्ष्मनाद देखील कानात बोटे घालून ऐकू येणाऱ्या नादाहून निराळा आहे एकांतस्थानी गुरूपदेशाने तो बोटे घातल्यावाचूनच स्पष्ट होतो.

त्राटकाने जसे सूक्ष्म बर्हिलय साधते तसे याने सूक्ष्म अंतर्लयलक्ष साधते. हा नाद प्राणाचाच असून कुंडलिनीव्युत्थानत्वे कळतो असे तातांनी स्पष्ट म्हटले आहे.

७९. सृष्टीतील गूढे प्रकट होईपर्यंतच आश्चर्यजनक असतात; म्हणून खरे गूढ असे काही नाही?

ठीक आहे. सृष्टीतील जड पदार्थातील गूढे, प्रगट होईपर्यंतच आश्चर्यजनक असतात; पण मानस-गूढ तसे नाही. मन हे इतके गूढरूप आहे की - एकाला त्याच्यातून एक शक्ती मिळाली तर दुसऱ्याला त्यातून दुसरी मिळत असते; म्हणून योगशास्त्र सर्वदा सुलभ असून गूढ राहणाराच आहे.

वासनाक्षयाची नवी युक्ति

८०. योग येत नसेल तर ज्ञान्याने वासनाक्षय कसा करावा ?

वासनांचा क्षय ज्ञानानेच होत असतो, तथापि कोणी न सांगितलेली अशी एक नवी युक्ति सांगतो. माझे मत असे आहे की,

असद्वासनांचा रोधूनच क्षय करावा, आणि

सद्वासनांचा भोगूनच क्षय करावा.

यंत्रापासून काम न घेतले तरी ते बेकाम होते व त्याच्यापासून फार काम घेतले तरी ते बेकाम होते.

शिवाय, रजोगुण चंचल असल्यामुळे त्याचाच रोध होऊ शकतो. सत्त्वगुणाचा रोध कसा करावा, हे योगशास्त्रात सांगितले नाही.

म्हणूनच सत्त्वगुणाचा उपभोगानेच क्षय करावा. परोपकारात आनंद वाटणे इत्यादि सत्त्वगुणाचे उपभोग समजावेत.

या युक्तीने समाधिवाचूनही ज्ञानी जगद्गुरु पदवीस प्राप्त होतो आणि साधक सिद्धपदवीस चढतो.

८१.जेवताना पदार्थाची रुची पाहून खाणे चांगले, की काला करून खाणे चांगले ?

गृहस्थाने रुची पाहून खाणे चांगले, कारण त्याला अतिथीना सुरुचिर भोजन घालावयाचे असल्यामुळे स्वतः रुची समजल्यावाचून त्याला बायकादिकांकडून रुचिर स्वयंपाक करून घेता येणार नाही.

विरक्ताने रुचीकडे दुर्लक्ष करणे चांगले.

८२.ब्रह्मचर्य सिद्ध होण्याचा सुलभ उपाय कोणता ?

संधिविहार किंवा क्षणसमाधीवर लक्ष देणे.

मंत्र व मेस्मेरिझम्

८३.उत्तम मंत्र कोणता ?

अत्यंत निष्ठेने घेतलेले आपल्या उपास्याचे नांव !

८४.मंत्र आणि इच्छविनिमय (मेस्मेरिझम) **एकच आहे काय?**

नाही, कारण मंत्राचा अर्थ ठाऊक नसला तरीही त्याचे फळ होते; आणि (मेस्मेरिझमची) इच्छविनिमयाची भावना जाणून करावी लागते. इच्छविनिमय ही जीवाची इच्छाशक्ती असेल, तर मंत्र ही परमेश्वराची इच्छाशक्ती आहे.

८५.तर मग मंत्रावर श्रद्धा ठेवावी असे कां सांगितले.आहे ?

श्रद्धा न ठेवली तर ईश्वराच्या वाणीवरच अविश्वास होतो म्हणून!

श्रीगुरु

८६.मनुष्याला उपदेशक किती असतात ?

१ - सामान्य धर्मतत्त्वाकरता शास्त्र,

२ - विशेष धर्मतत्त्वाकरता गुरु, आणि

३ - व्यवहाराकरता लोक, हे तीन मनुष्यास उपदेशक असतात.

८७.हे तिन्हीही स्वतंत्र आहेत की यात बलाबल आहे?

बलाबल आहे; म्हणूनच 'गुरुशास्त्रविरोधी लोकव्यवहाराचा त्याग' सांगितला आहे.

८८.असदुपाध्याय कोणास म्हणावे?

आपत्काली संपत् धर्माच्या आधाराने ग्रामण्य करतो त्यास!

८९.सदुपाध्याय कोणास म्हणावे ?

आपद्धर्म व संपद्धधर्म दोन्ही अवगत आहेत व ते आचरण करवितो त्यास!

९०.आचार्य कोणास म्हणावे ?

मुख्य धर्म व प्रासंगिक धर्म शास्त्रातून काढून प्रसंगी जो समन्वयाने पुढे ठेवितो त्यास! मग ते धर्म प्रवृत्तिलक्षण असोत की निवृत्तिलक्षण असोत.

९१.व्यावहारिक गुरु व पारमार्थिक गुरु या दोघांची आज्ञा कशी पाळावी?

स्वार्थसहित व तद्रहित.

९२.एखादी गोष्ट उपदेशाप्रमाणे न झाल्यास काय समजावे?

व्यवहारात नेहमी प्रधान-गौणतेचा नियम लक्षात ठेविला म्हणजे असा प्रश्न उत्पन्न होत नाही.

९३.शास्त्राने जर सर्व काही प्रकाशित केलेच आहे, तर आणखी गुरुजवळ गुह्य काय असते ?

सर्व व्यापार सर्वांना जरी माहीत असले, तरी प्रत्येकाचे क्रियागौप्य निराळे असते, हे तुला मान्य आहे की नाही ?

शिष्य - होय.

गुरु - तर मग प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणे प्रक्रियागौप्य गुरुजवळ असले पाहिजे की नाही?

शिष्य - अर्थात् असले पाहिजे.

गुरु - तुझे तुलाच समजले हे ठीक झाले.

९४.पण सत्पुरुष विशेषेकरून फल गुह्य न ठेवता साधन गुह्य ठेवतात; वेदान्त स्पष्ट सांगून योगाला गुह्य ठेवतात, असे कां?

व्यवहारात असे दिसत नाही काय? व्यापारामध्ये एखादी वस्तू निर्माण करण्याचे साधनच क्रियागौप्यामध्ये जाते.फल क्रियागौप्यामध्ये जात नाही.त्याप्रमाणे पुत्राला कोणी झाकून ठेवित नाही; परंतु पुत्राचे साधन सर्व गुप्त ठेवतात की नाही ?

शिवाय, फल सर्वांना समजणे साधनाकडे प्रवृत्ती होण्याकरता आहे, आणि साधनाचे गौप्य राखणे अधिकारानुसार योग्य आहे.

९५.तर मग साधन-शास्त्राचा काही उपयोग नाही काय ?

अवश्य आहे. साधनाचा आरंभ करणे किंवा विघ्ने दूर झाल्यावर एखादे साधन करणे, एवढे शास्त्रापासून होऊ शकते.पण प्रसंगी,

१- मार्गसंकर, २- साधनव्यावृत्ति व ३- विघ्ननिवृत्ति;

इत्यादि गोष्टी सद्गुरुवाचून होणे शक्यच नाही.

९६.योग्य सांगत असताही आम्हाला काही सांगितले नाही असे उतावीळ माणसे म्हणत असतात, याला कसे करावे ?

काही करू नये.कारण त्यांना ते कोणत्याही संताला म्हणता येईल.विद्यारण्यांनी सांगितलेले **''म्हैसा ब्रह्मज्ञान''** ही काय गुरुयुक्ती? यात काय आहे? असेसुद्धा ते म्हणू शकतील.

''कृष्णा हरिदासापेक्षा तुकारामबोवाने अधिक काय केले?'' असेसुद्धा म्हणणारी माणसे मी पाहिली आहेत.- अशांची समजूत करणारा जो गुरु असतो तो मात्र लोभी व लालची समजला पाहिजे.

९७.गुरु कोण ?

सन्मार्गदर्शक ब्रह्मज्ञान सांगतो तो !

९८.गुरुवाक्य कशास म्हणतात ?

शिष्याची निष्ठा असली तर विवेकाच्या अपेक्षेवाचून आत्मज्ञान करून देणारा शब्दसमूह !

९९.वेद म्हणजे काय ?

श्रीगुरूचे वचन !

१००.गुरुत्वाचा अभिमान कसा गळतो ?

शिष्याचे जे सद्गुण असतील तेही आपल्या अंगी आणण्याची खटपट केल्याने !

१०१.जितुके कां आपणास ठावे । तितुके हळूहळू शिकवावे । शहाणे करूनि सोडावे । सर्व लोकां ।। हे जे समर्थांचे म्हणणे, याविषयी आपणांला कसे काय वाटते?

मला अगदी समर्थ म्हणतात तसेच वाटते परंतु समर्थांनी 'जितुके' असा जो शब्द घातला आहे त्याकडे मात्र सध्याचे असे करणारे दुर्लक्ष करतात हे पाहून वाईट वाटते.'जितुके' म्हणण्यानेच शिक्षकाची अपूर्णता समर्थ सुचवीत आहेत. म्हणून दुसऱ्याला हळूहळू शहाणे करताना आपणही दुसरीकडून शहाणे होण्याचा सपाटा सुरु ठेविला पाहिजे. कारण शिकविणाऱ्याला शिकणाऱ्यापेक्षा दुप्पट जोराने शहाणे होण्याचा पुरवठा दुसरीकडून करून घ्यावा लागतो; नाही तर **'पीतशिष्यांजलिजल'** व्हावे लागते, किंवा शिष्यांना तरी तो गुरु फसवितो.

१०२. पण अशा प्रकारच्या दुसरीकडून शहाणपण घेणाऱ्या शिक्षकांचा शिष्य अपमान करीत नाहीत काय ?

आपला गुरु स्वर्गावरून उतरला पाहिजे असे ज्यांना वाटते तेच अपमान करितात.महात्म्यांना तर आपल्याचकरता शिक्षक श्रम करीत आहेत ह्याचे उलटे वाईट वाटते.

१०३.तीव्र विकार असले तरी ते कोणाला शोभतात?

शास्त्रानुसार लोकांचे हित करण्याची इच्छा करतो त्याला!

''विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभंगव्यसनिनः।।'' *(पुष्पदंतकृत शिवमहिम्न)*

१०४.सर्वच पदार्थांपासून जर गुण घेता येतात तर गुरूचे बंड कशाला पाहिजे ?

अरे, गुरु शिक्षक असतो.सृष्टपदार्थ शिक्षक नसतात; तर त्यातील गुण आपल्याला वेचून घ्यावे लागतात.सृष्टपदार्थापासून गुण घेताना आपल्याच बुद्धीची कुशलता असते.आणि आपली बुद्धी जेथे कुंठित होते तेथे गुरूची कुशलता असते.

ईश्वररूपाने कोणत्याही पदार्थाला नमस्कार केल्याने कोणाचाच काही प्रत्यवाय नाही.परंतु अशी ईश्वरबुद्धी देखील सृष्टपदार्थापासून शिकता येत नसून गुरूपासूनच शिकावी लागते.म्हणूनच सर्व श्रीगुरुनाथांची स्तुती करीत असतात.

समता गाढवापासून व इमानीपणा कुत्र्यापासून शिकावा म्हणून शास्त्रात सांगितले आहे. पण गर्दभस्तवराज व श्वसहस्त्रनाम कोणी रचले नाही.

तात्पर्य, सृष्टपदार्थांच्या कोटीत गुरूला नेऊन बसविणे मूर्खपणाचे आहे. कारण सृष्ट पदार्थांपासून गुण घ्यावेत हीही सूचना गुरु व शास्त्रांचीच होय.

१०५.हल्ली शाळातून कोणत्याही विषयास शिक्षक मिळतात, म्हणून पूर्वीची गुरुसेवा इत्यादी सर्व गतार्थ झाले आहे की नाही ?

मुळीच नाही.खरे आईबाप किंवा औरसपुत्र ज्याप्रमाणे विकत मिळत नाहीत, त्याप्रमाणे खरे गुरूही पैसा-पासरी लागलेले नाहीत

द्रव्याचेनि अभिलाखे । असाधु नेणों काय बके ।
म्हणोनि तयाचेनि मुखें । श्रवण न करावे गा ।।

परमार्थविषय बाजूस ठेविला तरी द्रोणाचार्यांनी जी धनुर्विद्या अर्जुनाला शिकविली, ती आपल्या पोटच्या मुलाला शिकविली नाही.

नुसत्या पगारावर असे निर्लोभी गुरु मिळणे शक्य आहे काय ?

आता 'शिष्यांनी गुरूचे द्रव्यादिकांनी भरण करावे' असे आर्यशास्त्रात म्हटले आहे खरे, परंतु ते पुत्रांनी आईबापांचे पोषण करावे या पद्धतीचे आहे; पगार देऊन बदला फेडावा या पद्धतीचे नाही.

कोट्यावधी रुपयांचा व्यापार जसा एखाद्या मंडळीतील क्षुल्लक गोष्टीवर अवलंबून असतो, तसे

एखाद्याच्या ज्ञानाची अनेक कोडी उगविणे क्षुल्लक युक्तीवर अवलंबून असते, पण तशा युक्ती सांगण्याकरता देखील गुरु व शिष्यात प्रेमच पाहिजे. म्हणून पाल्यपालकसंबंधही परस्परात पाहिजे.

केवळ पगाराने प्रेम उत्पन्न होत नाही व हजारो मुलांना प्रेमाची गोष्ट एकदम सांगताही येत नाही.

यावरून हल्लीच्या शिक्षकांवर माझी टीका आहे असे कोणी समजू नये; परंतु केवढाही पगारी शिक्षकसमुदाय मिळाला तरी कळकळीच्या गुरूची अपेक्षा आहेच, असे माझे मत आहे.

१०६. महाभारतात पित्यापेक्षा आई व आईपेक्षा गुरु श्रेष्ठ कां सांगितला आहे ते मला चांगले समजले नाही?

१- पिता जन्मदाता असल्यामुळे श्रेष्ठ आहे.

२- आई जन्म देणारी असून शिवाय मुलाकरता मृत्युसमान गर्भदु:ख सहन करते म्हणून ती पित्यापेक्षा श्रेष्ठ होय. आता आईबापांचा केवळ जन्मसंबंधच आहे. म्हणून प्रसंगी त्यांच्या हातून पुत्राच्या सद्धर्मप्रवृत्तीलाही प्रतिबंध होण्याचा संभव आहे, व तसे मी पाहिलेही आहे. केवळ जन्म दिल्यामुळेच पुत्रावर आपला हक्क आहे असे आईबाप समजत असतात, पण तसा तो हक्क पशूसही आहे.

३- श्रीगुरूची गोष्ट तशी नाही, कारण त्यांना सद्विद्येमुळेच आपला शिष्यावर हक्क आहे असे वाटत असते 'आपण जर सच्छास्त्राच्या विरुद्ध सांगितलेच तर आपला गुरुपणाचा हक्क नाहीसा होईल' हे ते जाणत असतात, म्हणून त्यांच्या हातून शिष्याच्या सद्धर्मप्रवृत्तीला प्रतिबंध होणे शक्य नाही.

शिवाय, आईबापांचा संबंध इहलोकापुरताच असून श्रीगुरूचा संबंध परलोकांचीही तयारी करून देतो. मागे 'तीन वर्णांना आईपेक्षा बाप श्रेष्ठ' असे जे मी सांगितले ते तरी गायत्र्युपदेशक गुरुत्वास्तवच होय.

आता फसवे गुरु या नियमास अपवाद आहेत. ते गुरु अशा व्याख्येसच पात्र होत नाहीत. शिवाय द्वितीयसंबंधाच्या मागे लागून मुलांना फसविणारे आईबाप मी पाहिले आहेत. अशाप्रकारचे आईबाप व गुरु विचार करण्यायोग्यच नाहीत.

माता, पिता व आचार्य हे तिन्ही देव आहेत असे श्रुतीत सांगितले आहे. धर्मशास्त्रात जेथे ''या तिघांत विरोध असेल तेथे गुरुवाक्यच प्रबल समजावे'' असा महाभारताचा स्पष्ट आशय आहे. अन्यथा गृहस्थाला पितृसेवा केल्यावाचून वैराग्य झाले तर ब्रह्मचर्यातून संन्यासच घेता येणार नाही, व त्यामुळे ''ज्या दिवशी वैराग्य झाले त्याच दिवशी ब्रह्मचर्यातून संन्यास घ्यावा'' इत्यादि श्रुतींचा विरोध येईल. याप्रमाणे पारमार्थिक व धर्मज्ञान सांगणाऱ्याविषयी झाले.

केवळ ऐहिक विद्या सांगणाऱ्या गुरूपेक्षा मात्र आईबापच श्रेष्ठ आहेत, कारण इहलोकापैकी पुरुषांना आईबापांचा व स्त्रियांना पतीचा जितका संबंध आहे, तितका अन्याचा नाही; पण त्यातही सद्गुणलाभ असेल तर ऐहिक गुरु आईबापांपेक्षा श्रेष्ठ होईल.

याप्रमाणे महाभारताचा अभिप्राय मी तुला सांगितला, पण काही मूर्ख 'आम्ही कमावून ठेवलेल्या धनावरच मुलांना, गुरु वगैरेंना पोसता येते' असे म्हणतात. पण ते चुकीचे आहे कारण -

वैराग्यशील दरिद्री महात्म्याला गुरु मिळतात आणि वैराग्यरहित कुबेरालाही गुरूपासून काही फायदा होत नाही.

१०७. दयाळू कोण ?

संशयच्छेत्ता.

१०८. सद्गुरूची साधी परीक्षा कशी करावी ?

योगादि शास्त्रात अनेक प्रकारच्या कठिण परीक्षा सांगितल्या आहेत, परंतु - 'निष्कामाला पाहून अत्यंत द्रवणे व सकामाला पाहून दैवानुसार वागणे' हे सद्गुरूचे सोपे लक्षण आहे.

यांच्या उलट लक्षण असद्गुरूचे आहे.

१०९.''न विश्वसेद् अविश्वस्तेऽपि, विश्वस्तेऽपि न विश्वसेत्'' असे एक वचन असून ''गुरुशास्त्रावर डोळे लावून श्रद्धा ठेवावी'' असे दुसरे वचन आहे?

विश्वास दोन प्रकारचा आहे ; पूज्यतामूलक व मैत्रीमूलक.

स्वतःचे ठिकाणी दौर्बल्य असल्यामुळे पालकादिकांचे ठायी जसा विश्वास उत्पन्न होतो तो प्रथम होय. आणि स्वतःचे ठिकाणी बल असून अधिक बलसाह्यार्थ जो विश्वास ठेवला जातो तो द्वितीय होय. मातेवर बालकाने विश्वास ठेवला नाही तर त्याचे काहीच चालणार नाही.

त्याचप्रमाणे परमार्थात गुरुशास्त्रावाचून शिष्य अत्यंत बालक असतो, म्हणून प्रथम प्रकारचाच विश्वास त्याला ठेवावा लागतो. गुरूवर अत्यंत श्रद्धा ठेवावी हे वाक्य प्रथम विश्वासाविषयी आहे; व व्यवहारात कार्याची योजना करताना द्वितीय प्रकारचा विश्वास ठेवावा लागतो. त्याविषयी 'न विश्वसेत्' इत्यादि वाक्ये आहेत.

११०.गुरु अल्पज्ञानी आहे हे कशावरून ओळखावे ?

जो निरूपणात कसर करतो त्यावरून!

१११.सर्वच ज्ञान गुरुजवळचे संपले तर शिष्य विरुद्ध होण्याचा संभव आहे तर कसे करावे ?

हा प्रश्न मूर्ख गुरूस उत्पन्न होतो.'ज्याचे ज्ञान अनंत शिष्य ब्रह्म होऊनही शेष राहते तोच यथार्थ गुरू होय'.

पाणिनीच्या सूत्रात पाणिनीचे सगळेच ज्ञान प्रगट झाले नाही. कारण काही प्रत्याहारांचेच कार्य सगळ्या व्याकरणात आले असून बाकीचे प्रत्याहार तसेच राहिले आहेत.

मनातील सर्वच अनुभव शब्दात सांगता येत नाही; म्हणून आपले ज्ञान संपून जाईल, या भीतीने जो शिष्यास सांगत नाही तो गुरु नपुंसक समजावा व श्रीगुरूच्या ज्ञानाचा अंत लागला असे ज्या शिष्यास वाटते तो मूर्ख व कृतघ्न समजावा.

परंतु हा सिद्धान्त पारमार्थिक गुरुशिष्यांनाच मात्र लागू आहे.

११२.पारधी कोणास म्हणतात ?

ज्ञान नसताना अनेक शिष्य आपल्या जाळ्यात ओढून फसवितो, अशा गुरूस !

११३.अपगुरु कोणास म्हणावे ?

ज्याच्या अनुयायी-समाजात ज्ञातिनिपात उत्पन्न झाला असता जो निस्पृहतेने तेथून निघून जात नाही त्यास!

११४.गुरूने प्रत्येक शिष्याची बुद्धी अडकवून ठेवावी, की तिला स्वतंत्र होऊ द्यावे ?

कोणीही कोणाची बुद्धी अडकविण्याला पात्र नाही. स्वतंत्र होणाऱ्या शिष्याच्या बुद्धीला गुरूने आळा घालू नये व आपलीही बुद्धी त्याच्या हातात जाऊ देऊ नये.

आमचे गुरुपण लोकांनी जबरदस्तीने कबूल करावे असे ज्यांना वाटते ते लोक उभे जाळले पाहिजेत.

११५.गुरु म्हणून फसविणारा मनुष्य कसा ओळखावा?

पुष्कळ गोष्टीवरून त्याला ओळखता येते. तथापि श्रुतिस्मृतीत ज्या गोष्टी गुह्य म्हणून सांगितल्या नाहीत, अशा फाजील गोष्टींना फसवे गुरु महत्त्व देत असतात.आणि त्या गोष्टी खरोखरच फाजील असून साऱ्या जन्मात त्यांच्या गुह्यांचा शोध केला असता सांपडत नाही.

याविषयी एक उदाहरण सांगतो. - एका गुरुसिंगाचे म्हणणे असे होते की भारताचे पर्व अठरा, भगवद्गीतेचे अध्याय अठरा, दलही अठरा अक्षौहिणी व भारतीय युद्धही अठरा दिवस; तेव्हा या अठराच्या आंकड्यात केवढी जादु भरली आहे बरे!

अहाहा! काय ही उदात्त कल्पना व अचाट गुह्याचा शोध! या गुरुसिंगाच्या तोंडात जर अठरा दिल्या असत्या तर किती बरे बाहेर पडले असते?

११६.तोंडपुजा गुरूचे साधे लक्षण कोणते ?

निष्कामांची उपेक्षा करून इतरास मान डोलविणे.

११७.तोंडपुजे शिष्य कसे असतात ?

तोंडावर गुरूची स्तुती करून पारिक्षक लक्षण, आपण अपूर्ण असून, जे दुसऱ्यावर लावतात आणि गुरुसमोरही कधी कधी त्याचा प्रयोग करतात ते!

११८. 'आम्ही तर तुमचेच आहो' असे म्हणून वारंवार जो चुका करतो त्याला टाकून दिले तर शरणागताला सोडल्याचे पाप होते, तेव्हा कसे करावे ?

त्याची पारमार्थिक सुधारणा होणे शक्य नसते; म्हणून कोणतेही काम न सांगता, सामर्थ्य असेल तर त्याला राहू द्यावे. - आता सामर्थ्य नसेल तर दीन झालेल्या शरणागतांना अभय दिलेच पाहिजे असे काही शास्त्र नाही; कारण कोणीही दीन झाला म्हणजे दुसरा शरण्य पाहण्यासारखी त्याची अवस्था असते.

११९. स्व-संप्रदायभंग करणारा कोणी शिष्य असल्यास त्याविषयी काय करावे ?

महात्म्या बुद्धदेवाने व शंकराचार्यांनी सांगितले ते करावे; कारण त्यांच्याही हयातीत संघभंग करणारे उत्पन्न झाले होते.

१२०. आपल्या गुरूच्या चमत्कारावर भरंवसा ठेवून कित्येक शिष्य कामचोर बनून 'काम कां केले नाही?' असे त्यांना विचारले असता, 'काम आमच्याने काय होणार! आपल्याच सामर्थ्यावर सर्व भिस्त आहे,' म्हणतात.तेव्हा त्यांच्याशी कसे वागावे ?

यथाशक्ती काम करणाऱ्याला सच्छिष्य म्हणत नाहीत, पण काही मूर्ख असे म्हणतात. त्यांना 'जसा मी देव आहे, तसेच तुम्हीही देव आहां, असेच मी तुम्हाला सांगितले होते.म्हणून माझे व तुमचे सामर्थ्य एकच आहे; मग तुम्ही आपल्या सामर्थ्याने काम कां केले नाही?' असे उत्तर द्यावे; आणि 'आम्ही देव बनलो नाही' असे म्हटल्यास 'तुमच्या हातून ते काम व्हावयाचे नाही' असे त्यांना स्पष्ट सांगावे.

शिष्याचा अधिकार

१२१. एखादी गोष्ट विचारली तर 'तुम्ही अधिकारी नाही' असे कोणी म्हणत असतात, ते सर्वथा बरोबर आहे काय ?

ते योग्य असले तरी फसवे गुरु आपल्या शिष्यांना फसविण्या-करताही बहुधा असे म्हणत असतात. म्हणून कोण्या शास्त्रास अधिकारी पूर्वसिद्ध पाहिजे व कोण्या शास्त्रास नको, हे मी येथे सांगून ठेवतो.

१- **वेदान्तास** साधनचतुष्टयसंपन्न पूर्वसिद्ध अधिकारी पाहिजे, तो नसल्यास गुरूवर जबाबदारी नाही;

२- **(योग)** पण योगाची गोष्ट तशी नाही.योगात यम नियम देखील शिक्षेत घातले असल्यामुळे, ते कसे शिकवावे? ही जबाबदारी गुरूवरच आहे.सांगून जर शिष्य करणार नाही, तर मात्र कोणत्याच शास्त्रात गुरूवर जबाबदारी नाही.

३- **पूर्वमीमांसा** शास्त्रात वर्णाश्रमादिनिष्ठ पुरुष अधिकारी पाहिजे.

४- **पण वैद्यक, नीति, ज्योतिष्** इत्यादि शास्त्रात अधिकारी शिष्य गुरूलाच तयार करून घ्यावे लागतात.

सारांश, १- ज्या आर्यशास्त्रातील प्रथमसूत्रांचा **'अथ'** शब्द आनंतर्यार्थक असतो, त्या शास्त्राच्या अधिकाराची जबाबदारी सर्वथा शिष्यावर आहे व विशेष शिकविण्याची जबाबदारी गुरूवर आहे; आणि

२- ज्या आर्यशास्त्रांच्या प्रथम सूत्रातील 'अथ' शब्द मंगलार्थक किंवा आरंभार्थक असतो, त्या

शास्त्रातील जिज्ञासूला अधिकारी करण्याची व विषय शिकविण्याची जबाबदारी गुरूवरच असते.

याप्रमाणे त्या त्या शास्त्रावरील प्रकरणग्रंथासंबंधानेही व्यवस्था समजावी.हे जो जाणतो तो फाजील अधिकाराचा फायदा घेऊन फसविणाऱ्या गुरूंच्या भुलथापीत येत नाही.

१२२. कोणाला थोड्या सेवेने धर्म सांगावा व कोणाला पुष्कळ सेवा केली असताही सांगू नये?

१.जो इंद्रियांचा निग्रह करितो त्याला फार थोड्या सेवेने धर्म सांगावा व २.जो इंद्रियनिग्रह करीत नाही त्याला पुष्कळ सेवा केली तरी धर्म सांगू नये.

१२३. इंद्रियनिग्रह कसा ओळखावा ?

प्रसंगावरून !

१२४. शिष्याने गुरूत कोणता गुण मुख्य पहावा ?

आपल्याला पाहिजे असेल ते ज्ञान !

१२५. गुरूंनी शिष्याची परीक्षा कशी करावी ?

स्वतः दूषित झाल्यासारखे दाखवून !

१२६. कोण्या प्रश्नाचे उत्तर द्यावे ?

विकाराने केलेला नसेल त्याचे !

१२७. प्रश्न विकाराने केला आहे असे केव्हा समजावे?

प्रश्नकर्त्याला संमत असलेल्या वाक्याचाही जो बुद्धिपूर्वक दुसरा अर्थ करतो तेव्हा !

१२८. आपण प्रेमाने सांगितलेले ज्ञान जो विसरतो किंवा भलतेच प्रतिपादन करतो, त्याविषयी काय करावे?

तो विचारील तर मौन राहावे.

१२९. आपण लोभी आहो असे विनाकारण शिष्यास वाटत असल्यास गुरूंनी काय करावे ?

आपले दुर्गुण व दुसऱ्या कोणाचे तरी सद्गुण दुसऱ्याकडून त्याच्या कानावर घालवावे व नंतर त्याला दुसरा गुरु बोटाने दाखवावा.

१३०. ज्ञान घेऊन शिष्य गर्विष्ठ झाला असता कसे करावे?

त्याचेपुढे लाजल्यासारखे व क्षमा मागितल्यासारखे करून त्याविषयी उदासीन राहावे; म्हणजे गुरुद्रोहाने त्याची बुद्धी क्षय पावते व सर्वत्र अपकीर्ती होते.कृतघ्नाला कोणीच चांगले म्हणत नाही;

- आणि तो जर परशिष्यत्व ग्रहण करील, तर पीडाच टळली म्हणून उगे बसावे; परंतु त्याच्याशी प्रत्यक्ष वाद घालू नये.

१३१. बुद्धांच्या शिष्याप्रमाणे शिष्यांत भांडण लागल्यास गुरूंनी कसे करावे?

भांडण स्वार्थाकरता असेल तर, भांडणाऱ्या सर्वासच शिष्य समजूं नये; आणि भांडण गुरुकार्यार्थ असेल तर जो अधिक असेल त्याला उचलून धरून, जातील त्यांची उपेक्षा करावी.

१३२. तर मग गुरूही, आपला तळिराम गार करून घेण्याकरता, परमार्थ झाकून ठेवतात, असे म्हणण्यास काय हरकत आहे?

छे, तसे असते तर गुरूंनी वैराग्याची प्रशंसाच केली नसती.

शिवाय आत्मानुभव अपरोक्ष आहे, तो बहुधा विरक्त पुरुषापासूनच मिळविण्याची खटपट करणे चांगले,

आणि अविरक्त पुरुषापासून जर तो यथार्थ झाला तरीही त्याची काही हानी नसते.परंतु तो अविरक्त देखील अंतर्विरक्तच असतो.

१३३. गुरूला सर्वस्व अर्पण करावे, हे एक वैराग्यप्रशंसेच्या विरुद्ध नाही काय? कारण जर गुरु विरक्त आहे तर शिष्याचे सर्वस्व घेऊन त्याला करावयाचे काय आहे?

ज्याला अनुभव आहे त्याला ह्या शंकाच येत नाहीत, कारण तो साक्षीरूपाने आपल्या प्रारब्धाला पाहत असतो. परंतु ज्याला तसा अनुभव नाही त्याच्या प्रश्नाला आम्ही असे उत्तर देतो की -

शिष्यांनी सर्वस्व अर्पण केले तरी गुरूंनी त्याचा उपभोग घ्यावा, असे कोठे सांगितले आहे?

अथवा गुरु, गृहस्थ आणि धूर्त असेल तर, शिष्याला सर्वस्व अर्पण करण्यास सांगतो असे धरून चालले, तरी त्यानेही आपले कोण्या गुरूला सर्वस्व अर्पण केले असेल की नाही? आणि तशी ती परंपराच चालत असेल तर मग इतर क्रयरहस्याप्रमाणे हाही एक वेदांताश्रित व्यवहार ठरला तर तो तिरस्कार्य काय म्हणून? त्याच्यायोगाने उलटी वेदान्ताची आवश्यकता व दुर्मिळता वाढल्यामुळे अर्थशास्त्राच्या दृष्टीने वेदान्त ही एक जगाची संपत्ति ठरणार आहे; आणि त्याला झाकून ठेवणे हे एक भूषणच होईल.

आता 'वेदान्त तितका दुर्मिळ नाही, पण भोंदू गुरु त्याला दुर्मिळ करतात' असे जर कोणाचे म्हणणे असेल तर मग जी वस्तू दुर्मिळ नाही, तिच्याकरता गुरुजवळ जाण्याची जरूरच नाही. मग भोंदू गुरु परमार्थ झांकतात अशी कागाळी व्यर्थ आहे.

बरे, दुर्मिळ नसलेलीं वस्तू आपल्याच ताब्यात ठेवावयाची अशी जर का त्या गुरुमध्ये शक्ती असेल, तर ती वस्तू त्याच्या ताब्यातून काढून घेण्याचे दोनच उपय ठरतील. एक तर गुरुवर्गाला साफ कापून काढणे; किंवा त्याची प्रार्थना करून मागून घेणे. पहिल्या उपायाने त्याची दुर्मिळता मात्र उलटी अधिक वाढणार आहे. कारण वेदान्त हा जमिनीत रोवलेला काही पदार्थ नसतो, तर तो अंतःकरणात असतो.

पुस्तके लिहिणे किंवा लिहिलेली समजून घेणे देखील अंतःकरणाच्या खुलेपणावर अवलंबून असते.

कापाकापीने हा खुलेपणा अर्थातच राहणे शक्य नाही. बरे, पहिलेपासूनच कापाकापी सुरू झाली तर पुस्तके वाचण्यापुरते व त्यातील परिभाषा समजण्यापुरते तरी ज्ञान कसे शिकता येईल?

शिवाय, औरंगजेबाने जाळले त्याप्रमाणे जर ग्रंथ नष्ट होण्याचा प्रसंग आला, तर माणसाच्या पाठपरंपरेनेच त्यांचे रक्षण होणे शक्य असते. म्हणून (गुरूची) प्रार्थना करणे हा एकच उपाय शेष राहिला. पण प्रार्थना करण्याला अटी कबूल कराव्या लागतात, हेही अर्थशास्त्रदृष्टीनेच ठरलेले आहे.

आता वेदान्त दुर्मिळ असो की सुलभ असो, आम्हाला त्याची आवश्यकता नाही, असे जर कोणाचे म्हणणे असेल, तर तो झांकून ठेवतात अशी कागाळी करण्यात काय अर्थ आहे? ठेवीत ना बापडे! कोणी आपली जीभ झाकून ठेविली तर आपल्याला काय करावयाचे आहे?

परंतु व्यावहारिक सुधारणा कितीही झाल्या तरी भारतरामायणी दैवीयुद्धासारख्या किंवा सध्याच्या आंग्लशार्मण्य मानुषी घोर युद्धासारख्या आपत्ती व त्यांचे मूळ जे चित्ताचे रागद्वेष ते शमविण्याला परमार्थच आवश्यक संपत्ति आहे हे ठरले आहे.

कलकत्त्यास निघणाऱ्या 'पैशाचिक मासिक' पुस्तकात एका रशियन तत्त्ववेत्त्याचे उद्‌गार लिहून आले ते अशा अर्थाचे आहेत :-

'कलाकौशल्याची सुधारणा करण्याकरता ईश्वरावर विश्वास न राहून ते आपसात लढून मरतील.'' व त्याप्रमाणेच हल्लीची स्थितीही आहे. म्हणून ''आपल्या अंगच्या शक्तीचा सदुपयोग होईल व ती कायम राहील इतक्या-पुरतीच जड सुधारणा करून बाकीची सर्व शांतता वेदान्तानेच होणारी आहे.''

म्हणूनच, आर्य राष्ट्राने वेदान्त ही आपली मुख्य संपत्ती ठरवून टाकली आहे; आणि संपत्ती म्हटली की दुर्मिळता, आवश्यकता, शुल्कप्राप्यता, यत्नशक्यता इत्यादि अर्थशास्त्रीय व्याख्या तिला लागू होणारच.

म्हणून 'परमार्थ अधिकाऱ्यालाच सांगणे' हे तत्त्व काही जगद्विलक्षण व भोंदूपणाचे नव्हे हे पक्के लक्षात ठेव.

१३४. शिष्याची बुद्धी विकारी असते म्हणून गुरूची जरूर आहे; पण गुरूची बुद्धी विकारी कशावरून नसते?

गुरुची बुद्धी विकारी असली तरी - 'आपला विकार तिच्यापासून जातो की नाही इतकेच शिष्याला पाहणे आहे.'

गंगा अनेक पुरुषांचे पाप ग्रहण करते, म्हणून ती स्वतः भयंकर पापिणी असेल, या शंकेच्या कोटीतलाच हा तुझा प्रश्न आहे.

एखादा शस्त्रवैद्य शस्त्रधारी आहे, एवढ्यावरूनच त्याला चोर किंवा डाकू समजता येत नाही; तर तो त्या शस्त्राने आपले दुःख दूर करतो, की आपल्यावर प्रहार करतो इकडे लक्ष दिले पाहिजे.

१३५. अहो, पण तुमच्या वैदिक धर्मातले गुरु अतिशय क्रूर असतात. महाभारतात अशी एक कथा आहे की, एका गुरूने आपल्या शिष्याला खाण्यापिण्याची इतकी बंदी केली की, शेवटी तो रुईचे दुध पिऊन आंधळा होऊन विहिरीत पडला.तसेच वैदिक धर्मातील देवही अतिशय क्रूर आहेत.श्रियाळ राजाचा बाळच महादेवाने खाण्यास मागितला !

जिला जेवूं घालण्याची संवय आहे, तीच आई तोंडात थापड मारण्याला समर्थ असते.

'नेभळ्या नपुंसकाची शांती काही सुधारण्याला कारण होत नाही.'

रुईचे दूध पिऊन विहीरीत पडलेल्या शिष्याला त्याच्याजवळ जाऊन गुरूनेच त्याला अश्विनीकुमारांचे स्मरण करावयास सांगितले व डोळे देवविले! श्रियाळाचा मुलगा शंकरानेच आणून दिला.

असन्निहित वाक्ये घेऊन शंका करणे सारसन्निवेशाचे अज्ञान होय. शिवाय ज्या उपाधीला शिक्षा द्यावयाची असते त्या उपाधीत त्रास देणे, हे शिक्षकाचे प्रासंगिक कर्तव्यच आहे. याविषयी लहानपणची एक गोष्ट मी सांगतो.

गोष्ट - लहानपणी माधानास मी रंगोपंताच्या शाळेत जात असे, परंतु तेथे खोड्या फार करीत असे. रंगोपंत वारंवार म्हणत असत की,

'हा गुणासाठी मार खात नाही, पण खोड्यांसाठी मार खातो'

एके दिवशी मी खोड्या केल्या तेव्हा तरवाचे फोक तोडून आणून रंगोपंत म्हणाले, 'काढ रे गुलाब्या आंगरखे' व नंतर आंगरखे काढल्यावर मला तरवडाच्या (तरोटा) फोकाने चांगले झोडून काढले. यावरून काय बोध घ्यावयाचा की, आंगरख्याच्या आत जो माझा देह होता त्याला शिक्षा करावयाची असल्यामुळे आंगरख्याचा उपाधि दूर करून नंतर देहाला झोडून काढले.

याप्रमाणेच परमार्थात मनालाच शिक्षा द्यावयाची असल्यामुळे गुरु हे देह-उपाधीपासून दूर करण्याकरता त्याला त्रास देतात. परंतु परमार्थाकरता मृत्यूसारखाच ज्याचा निश्चय झाला आहे, तो त्या त्रासाविषयी कुरकुरही करीत नाही. तितका ज्याचा निश्चय नाही, त्यालाही सक्तीने शिक्षा देणारे गुरु मात्र लुो खरे!

हल्लीच्या आमच्यासारख्या गुरूत व पूर्वीच्या ऋषीत इतकाच काय तो फरक आहे. बाकी त्या ऋषींच्या क्रौर्याचे आम्हाला भूषणच वाटते व त्यांच्यासारखे आता जे असतील त्यांच्याविषयीही वाटते.

१३६. तर मग गुरु शिष्याला एकदम कापून कां टाकीत नाहीत?

एखाद्या रोगाला कापण्याकरता विष सुंगविणारा वैद्य त्यास एकदम मारूनच कां टाकीत नाही, असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. देहापासून मन व मनापासून आत्मा जो वेगळा करावा लागतो, तो मंथन करून करावा लागतो. मेल्यावर मन महानिद्रेत जाते. त्या ठिकाणी मंथन होऊन लोण्याप्रमाणे ते उपाधीपासून पृथक् करणे शक्य नसते.

'गुरूने दिलेला प्रणव ही वरची अरणी आणि आपला देह खालची अरणी, या दोहोमध्ये ध्यानरूपी निर्मथन केले असता आत्मरूप अग्नी उत्पन्न होतो,' असे श्वेताश्वतर श्रुती सांगते. तेव्हा हे काम जागृतीतच

व्हावयाचे असल्यामुळे अधिकारी शिष्याच्या नाशाचे गुरूला काही प्रयोजन नाही; आणि जो उन्मत्त आहे, ज्याचा अधिकार अन्य जन्मावर अवलंबून आहे, त्याचा शापाने नाश करून अन्य जन्मी दया करण्यासही तपस्वी गुरु समर्थ असतातच. त्याविषयी उपनिषदांतील इंद्राने केलेल्या कोटी संन्याशांच्या वधाची कथा प्रमाण आहे. परंतु यात एक रहस्य आहे, ते हे की,

'गुरुजनांचा वर भयंकर नाही, तसा शापही भयंकर नाही,
पण उपेक्षा मात्र भयंकर आहे'

-कारण या जन्मीच्या अशरणाला अन्यजन्मीही ती तारक होत नाही. सर्व वैदिक ग्रंथांचा असाच सिद्धान्त आहे.

१३७. वेदाने एक खरे सांगितले असता अनेक प्रकारचे ग्रंथ असतांही पुनः गुरु कशाला पाहिजे ?

याविषयी तुला एक गोष्ट सांगतो.-

गोष्ट – एका आईचे मूल सर्वदा खेळण्यामध्ये निमग्न असे. जोपर्यंत खेळगडी जवळ असत, तोपर्यंत जेवण्याची देखील त्याला आठवण राहत नसे. खेळगड्यांपासून दूर झाले म्हणजे ते आपल्या आईच्या म्हणण्याप्रमाणे जेवीत असे. म्हणून त्याच्या आईला खेळगड्यांपासून दूर करून त्याला घरी जेवावयास बोलावण्याकरता रोज नव्या युक्त्या कराव्या लागत असत.

एक दिवस सांगावे लागत असे, 'तुझे बाबा बोलावितात.'

एखादेदिवशी 'तुझ्याकरता भातके आणले आहे' म्हणून सांगावे लागे.

एखादे दिवशी 'आपले घरी चित्रकार आला आहे तो पहा' म्हणून सांगावे लागले.

एक दिवस तर 'तुझी आई आजारी आहे' म्हणून त्याला सांगावे लागले!

एक दिवस 'तुझा बाप मेला' म्हणून त्याला सांगावे लागून, तो रडत घरी आला,

तेव्हा बापाने सांगितले की, 'तूं जेवावयास आला नसतास तर मी खराच मेलो असतो.' जेवण रोजचे भाजीभाकरीचेच होते परंतु खेळगड्या-पासून दूर करण्याकरता रोजच्या नव्या युक्त्या कराव्या लागत असत.

त्याप्रमाणे आपले मन इंद्रियारूपी खेळगड्यांच्या स्वाधीन होऊन अनेक विषयरूपी खेळात नेहमी गुंतले असते.* कधी स्त्रीरूपी माकडाच्या गळ्यात ते आपल्याला बांधून घेते.* कधी कारस्थानरूपी बुद्धिबळ खेळत असते.* कधी ते पदव्यांकरता सारिपाट खेळते. आत्मज्ञान व ध्यानरूपी अन्न जरी एकच द्यावयाचे असते, तरी मनाला इंद्रियरूपी खेळगड्यांपासून निराळे करण्याकरता अनेक ग्रंथांची व नित्य गुरूची अपेक्षा आहेच.

ग्रंथ हे मागे झालेल्या उपाधी निराकरण करणाऱ्या उपायांची उदाहरणे असून सजातीय उपायाकरता प्रमाणभूत आहेत, व गुरूंना विजातीय उपाय सुचविण्याकरता उत्तेजक आहे.

१३८. ''शिष्यादिच्छेत्पराजयम्'' अशा प्रकारचे गुरूचे शील असावे, हे आर्य-नीतीत सांगितले आहे; मग मुरारी मिश्रादिकांनी केलेल्या ग्रंथांना त्यांच्या गुरूंनी शाप कां दिले?

स्वसिद्धांताचीच शिष्य उन्नति करील तर तो पराजय इष्ट आहे!

पण स्वसिद्धांतांचे खंडण करून अन्य सिद्धान्त स्थापन करील तर, तो शिष्यत्वापासून भ्रष्ट होत असल्यामुळे त्यापासून पराजय असणे हे गुरूचे शील होणार नाही. कारण **'स्वसिद्धांतानुकरणत्वं शिष्यत्वम्'** हे लक्षण निर्विवाद ठरलेलेच आहे.

१३९. पण गुरूचे सिद्धांत पूर्वीच चुकले असल्यास ते खंडण करण्यास काय हरकत आहे?

साक्षात्कारविषयात ते तसे होणे शक्य नाही; कारण त्यात कोणत्याही वेळी -

१- शिष्य निदिध्यासनदशेत असतांना गुरूचे वरिष्ठत्व आणि

२ - साक्षात्कारदशेत असताना गुरुसमत्व व

३ - भक्तीत गुरूचे वरिष्ठत्व, अनिवार्य आहे.

१४०. गुरूच्या आज्ञेने शमदमांचा नाश होण्याचा प्रसंग आला असता कसे करावे?

विद्या जर घेतली असेल तर शमदम राखून कृतघ्न होणे हा धर्म नाही. याज्ञवल्क्याप्रमाणे विद्या परत देता येत असल्यास आज्ञाभंग करून शमदम राखल्यास हरकत नाही.याचा विशेष विचार 'सुरतरू' तून पहावा.

१४१. पारमार्थिक गुरूमध्येही दोष दिसल्यास ते कसे उपसाहावे? आणि भर्तृहरीने तर 'क्षमा गुरुजने' असे म्हटले आहे?

विषयांमध्ये गुरुदोषापेक्षा अधिक दोष आहेत असे चिंतन करून उपसाहावे.

१४२. गुरूने शिष्यांच्या अपराधांची क्षमा करावी की नाही?

याविषयी कोठे शास्त्र नसले तरी संपत्साधनप्रतिबंधक अपराधांची क्षमा करू नये व इतरांची करावी असे माझे मत आहे.

१४३ सर्वच आचार्य, गुरु व साधू आपआपल्या मतांचे मंडन करतात, त्यात खरा कोण समजावा?

हा प्रश्न बहुतेकांना सुटला नाही तथापि या विषयाचा ठोकताळा असा आहे की, सांगणारा आपल्या मंडनाला जी कारणे देत असेल ती किती महत्वाची आहेत हे ठरविणे नित्य श्रोतृजनांवरच (अवलंबून) असते, आणि त्यामुळेच दृष्टांताला व हेतूला साधकता येत असते.ज्याप्रमाणे ज्याला ज्या मानाने जी कारणे महत्वाची वाटतात, त्यांचे साध्य सांगणाराचे भाषण त्या मानाने त्याला खरे वाटते. शिवाय असे लक्षण केल्याने वेदांताशी विरोधही येत नाही.कारण त्याने सांगितलेले जे त्रिकालाबाधित सत् त्याच्या विशेषणात सर्व आचार्याचे म्हणणे येत असून ते विशेष्य असते.

१४४. शोधकबुद्धी जर आपल्यामध्ये असली तर उपदेशाप्रमाणे चाललेच पाहिजे असा निर्बन्ध कां?

मला वाटते उपदेश व शोधकबुद्धी यांचा अन्योन्याश्रयच आहे. कसा तो पहा. शोधकबुद्धीवर विकारांचा पगडा असतो.त्यामुळे त्यांच्या बुद्धीतून निघालेले तर्कही वैकारिकच होतात.ज्याला जे आवडते त्याविषयी काही तरी उपपत्ती तो दुसऱ्या जवळ सांगत असतो.

उपदेशावाचून विकाराचा रोध केला तर बुद्धीला तटस्थता येत असते व ती खुंटासारखी उभी राहून कोणीकडेच गमन करीनाशी होते; म्हणून विकार आणि ताटस्थ्य हे दोन्ही वर्ज्य करून बुद्धीची कोणत्याही दिशेने गती होणे ह्याला मी शोधकबुद्धी म्हणतो.

आता अशी गती हिरण्यगर्भादिकांच्या बुद्धीची ईश्वरी प्रेरणेने होत असते. परंतु तुमच्या आमच्या सारख्यांची उपदेशानेच होते.

१४५. आपल्याला बुद्धी असली तर शास्त्रातून निर्भय निवड करण्यास काय हरकत आहे?

होय, खाता आले म्हणजे यथारुचीने अन्न खाण्यास काही हरकत नाही; परंतु खाण्याची शक्ती येण्याकरता काही दिवस आईचे दुध प्याले पाहिजे; त्याप्रमाणे निर्णयबुद्धी उत्पन्न होण्याकता काही दिवस गुरुप्रेमाचा अबाधित संस्कार झाला पाहिजे.

१४६. आईचे दुध प्याल्यावर खाण्याची शक्ती आली असता तिच्याशी विरोध केला तरी ती शक्ती काही कमी होत नाही, तसे ज्ञान झाल्यावर गुरूशी विरुद्ध झाल्यास शक्ती कमी कां व्हावी ?

खाण्याची शक्ती लौकिक दृष्टीने कमी होत नाही, तरी धर्मदृष्टीने आयुःशक्ति कमी होतेच.

त्याप्रमाणेच ज्ञान झाल्यावर गुरूशी विरोध करणाऱ्याची तोंडाळशक्ती जरी कमी होत नाही, तरी

समाधिशक्ती निश्चयाने कमी होते.

शिवाय आईचे दूध सुटल्यावर अन्नच पोषक असते; पण गुरूचा संबंध यावद् विदेहमुक्ति सुटत नसतो, म्हणून दृष्टांतावर व्यर्थ शंका करणे तुला उचित नाही.

१४७. 'बुंदसे गई तो हौदसें नही आती' यावरून एकवेळ बिघडलेला शिष्य पुनः सुधरत नाही असे म्हणावे लागते काय?

ही म्हण लौकिक गुणास लागू आहे, मानस सद्गुणास लागू नाही. नाही तर **'अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्'** ही भगवंताची उक्ती व्यर्थ होईल. दुराचारी असला तरी मला अनन्य भजेल तर तो साधूच समजावा, असा त्या उक्तीचा अर्थ आहे.

१४८. कोणी जर ऐकले नाही तर उपदेश करावा की नाही?

उपदेश बुद्धिपुरःसर करावयाचा असल्यास कोणाची ऐकण्याची अपेक्षा आहे पण ब्रह्मनिष्ठांचा उपदेश स्वाभाविक उद्गाररूप असतो. **'तयाचे विसाट शब्द । ते कां म्हणों ना येती वेद'** असे तातांनी स्पष्ट म्हटले आहे.

१४९. शिष्याची परीक्षा पाहण्याकरता गुरूने आपली बढाई करावी असे आपण मागे सांगितले आहे, त्यात काही तारतम्य आहे काय?

अवश्य तारतम्य आहे;

१– मी कर्मनिष्ठ आहे, अशी बढाई गुरूंनी केली असल्यास आचरून दाखवावे.

२– वसिष्ठांप्रमाणे मी ज्ञाननिष्ठ आहे अशी बढाई केल्यास व सच्छिष्याचा तिच्यावर विश्वास बसल्यास त्याचा उपाधिमोक्ष गुरूंनी केला पाहिजे,

३– पण मी भगवद्भक्त आहे अशा प्रकारची बढाई कोणत्याही गुरूने शिष्याची परीक्षा पाहण्याकरता करू नये; तर मी भगवंताच्या दासांचा दास आहे असा लीनपणा घ्यावा, कारण भगवद्भक्ति क्षणाभिमानाच्याही विरुद्ध आहे.

१५०. ''शिष्यादिच्छेत्पराजयम्'' शिष्यापासून पराजयाची इच्छा करावी, असे जर शास्त्र आहे, तर व्यासांनी जैमिनीला जिंकले, ही जी कथा पुराणात आहे, हिची वाट कशी ?

''शिष्यादिच्छेत्पराजयम्'' हे वाक्य केवळ वादविवादास लागू नाही. कारण, – **विद्या घेऊनि माजे । गुरूसीचि ॥** अशा अज्ञानाचा तातांनी निषेध केला आहे; तर हे वाक्य ज्ञानास व सद्गुणास लागू आहे, सद्गुणाने देखील शिष्यापासून गुरूने पराजयाची इच्छा करावी. अर्थात् गुरूच्या चरणी नम्रता धरणे, हाही सद्गुणातील एक मोठा गुण आहे. तेव्हा तोही आपल्या शिष्याचे ठिकाणी गुरूनी अधिकच पाहिला पाहिजे. याविषयी बाबासाहेब व तात यांची उदाहरणे पाहावीत.

नाही तर बापाशी हुज्जत करून त्याच्या उरावर बसणारा मुलगाच **'पुत्रादिच्छेत्पराजयम्'** या वाक्याचा बरोबर अर्थ समजणारा होईल ! आपण जर गुरूशी हुज्जत केली नाही तर, आपले शिष्यही आपल्याशी हुज्जत करणार नाहीत, हे तत्त्व लक्षात ठेवून शिष्यापासून पराजयाची इच्छा करावी.

विशेषेकरून हे वाक्य नम्रतेस व संप्रदाप्रवर्तनासच लागू आहे.

१५१. अहो पण तुम्ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शिष्य म्हणवता, तर तुम्ही काय त्यांच्यापेक्षा अधिक उजेड पाडला आहे ?

आता सांगितल्याप्रमाणे तात आमच्याकडून पराजयाची इच्छा करतातच. आम्ही ठोंबे निवडलो – त्यांनी काय करावे? त्यांच्या मनात येईल तेव्हा आम्हालां योग्य करतील, असा भरंवसा आहे.

महात्मा

१५२. महात्मा कोणास म्हणावे?

काम, क्रोध व लोभ हे तिन्हीही ज्याने सोडून दिले आहेत आणि जो ब्रह्मज्ञानी आहे त्यास!

१५३. ब्रह्मज्ञान नसून ज्याने कामादि त्रिरिपूंचा त्याग केला आहे, त्याला काय म्हणतात ?

'पुण्यात्मा' !

१५४. कामादि त्रिरिपूंचा त्याग केला नाही; पण जो ब्रह्मज्ञानी आहे. त्याला काय म्हणतात ?

त्याला 'ब्रह्मविद्' म्हणतात.

१५५.वारंवार महात्मे कोण्या धर्मात उत्पन्न होतात व होत नाहीत?

ज्या धर्मात केवळ निर्गुणोपासना असते किंवा केवळ सगुणोपासना असते, व ज्या धर्मात ईश्वराशिवाय कोणी महात्मा मानला जात नाही, त्या धर्मात आचार्याशिवाय कोणीच महात्मा झालेला आढळत नाही.

ज्या धर्मात निर्गुण व सगुण दोन्ही उपासना सांगितल्या असून व अद्वैत असून जीवेश्वरांचे ऐक्यप्रयोजन सांगितले आहे त्या धर्मात वारंवार महात्मे उत्पन्न झालेले दिसत आहेत.पूर्वोत्तर महात्म्यांची समताच ह्याला कारण आहे.

१५६. महात्मे सर्वशक्तिमान् असतात हे कशावरून समजावे?

सर्वशक्तिमान् ईश्वराला ते आपल्या इच्छेने कार्य करावयास लावतात म्हणून !

१५७. एवढे त्यांना इच्छासामर्थ्य कशाने येते ?

खरा लहानपणा मोठ्या परमेश्वरापुढे घेतल्याने; कारण तशा लहानपणातच ज्ञान व भक्ती एकवटलेली असतात.

१५८. खरा लहानपणा कशास म्हणतात ?

ईश्वराच्या सत्यत्वापुढे आपले अस्तित्व देखील तुच्छ वाटण्यास !

१५९. द्वैताद्वैताच्या समन्वयाची किल्ली कशात आहे?

गणितातील बिंदु व आनंत्य जशी एक असतात, तसा खरा लहानपणा व खरा मोठेपणा विरुद्ध नाही, असे समजण्यात !

१६०. खऱ्या मोठेपणाचे लक्षण कोणते?

जगताच्या उत्पत्तीचे, स्थितीचे व लयाचे कारण आपण आहो असे समजणे.

१६१. ढळढळीत पापी मनुष्यही कोणत्या लक्षणाने महात्मा समजला जातो?

आपली वर्तमान दुःखे दाखवून ! मी अमुक पाप केले म्हणून मला ही दुःखे झाली आहेत, असे दुसऱ्याला सांगण्याने !

१६२. सर्वांना सर्वांची जरूर आहे, मग निस्पृह राहणे किंवा विरक्त होणे हे ढोंग नव्हे काय?

नाही.विरक्ताच्या सर्व गरजा परमेश्वरच भागवितो किंवा त्याला हानीचे दुःखही वाटत नसते.

१६३. ज्ञानी व आळशी दोघेही विकारांची उपेक्षा करतात, तर त्यांच्यामध्यें फरक काय आहे?

आळशी अनिष्ट प्रसंगाने घाबरून जातो व ज्ञानी घाबरत नाही.ज्ञानी अनिष्ट प्रसंगाने घाबरल्यासारखा दिसतो, तथापि त्याचे विवेकधैर्य सुटत नाही.

१६४. ज्ञानी पुरुषांच्या व्यवहारात नियम आहे कां नाही?

नाही.

१६५. तर मग त्यापसून लोकांची हानी होईल ?

नाही. कारण त्यांपासून ज्ञान शिकावे असेच शास्त्र आहे. आचरण शिकावे असे शास्त्र नाही.

१६६. प्रसंगी वाटेल तसे वागण्याची मुभा कोणास आहे?

जन्मभर ज्याने सत्कृत्य केले आहे व पुढेही करील त्यास !

१६७. जगाचा व्यवहार पहात असूनही ज्ञान्याचे दुर्लक्ष तिकडे होते कसे?

घाऱ्या डोळ्याचे मांजर बहिरे असते तसे!

१६८. सत्त्वगुणही स्थिर आहे व तमोगुणही स्थिर आहे, तर मग आळशी व साधू यांच्यामध्ये फरक काय?

आळशी मनुष्याच्या आळसाला मोडले असता त्याचा आळसामुळे वर दिसणारा चांगुलपणा लयाला जाऊन पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे तो विकारी होतो व पुनः तो विकार गेल्यावर प्रेतासारखा पडतो.

साधुपुरुषाच्या सत्त्वाच्या कोणी विरुद्ध गेल्यास तो त्याची उपेक्षा करतो, किंवा विचारपूर्वक त्याचा प्रतिकार करतो; आणि प्रतिकार संपल्यावर आपल्या ध्यानादि सत्क्रियेत सावध असतो. हाच या दोहोंमधला मोठा फरक होय.

१६९. साधू आपल्या प्राब्धानुसार कसेही वागतील, असे लोकांचे म्हणणे आहे ते बरोबर आहे काय?

बरोबर आहे, परंतु लोकांना जसे त्यांच्या प्रारब्धामुळे साधूपासून सुखदुःख होते, तसेच साधूच्या प्रारब्धाने लोकांपासून सुखदुःख होणे नियत आहे;

त्यामुळे साधू अशुभ वागल्यास लोकांनी त्याचा प्रतिकार करणे साधूच्या प्रारब्धास अनुसरूनच असल्यामुळे '**मारतेकू मारे, पाप ना पुन**' या न्यायाने लोक अलिप्त राहतात, व साधूनेही ते आपले प्रारब्ध समजून सोसलेच पाहिजे. साधू शुभ वागून जर लोक त्याला त्रास देतील तर त्याचे प्रारब्ध असले तरी कैवारी परमात्मा आहे.त्याविषयी काळजी करावयाचे कारण नाही.

१७०. शंकराचार्यांनी अमरुराजाच्या शरीरात प्रवेश करून त्याच्या स्त्रीशी संयोग केला असताही शारदापीठारोहणाचे वेळी ते पवित्र कसे ठरले?

त्याविषयी तेथेच ''या जन्मामध्ये माझ्या हातून ब्रह्मचर्यभंग झाला नाही.'' असे म्हटले आहे.अन्य शरीरान्तर्गत आत्मा असणे, हे अन्य जन्माचेच स्वरूप आहे.अन्य जन्माचा संबंध या जन्मास लागू नाही. म्हणूनच अन्य जन्माचा पत्नीसंबंध या जन्मामध्ये संस्कारावाचून करून घेता येत नाही.

१७१. तर मग अन्य जन्मातील पांचा इंद्रांची इच्छा करणारी शचि दुसऱ्या जन्मात द्रौपदी होऊन पांच पांडवांना तिने कसे वरले?

श्रीव्यासवचनावरून तिने अग्नीत उडी घालून प्रत्येक पतीकरता एक जन्म घेऊन **'सकामायाः सकामेन'** या रीतीने प्रत्येक पतीशी गांधार विवाहसंस्कार करीत असावे, असे भारतावरून दिसते.

१७२. बरे तर, अन्य जन्मी पुरुष झालेल्या शिखंडीवर स्त्री आहे म्हणून भीष्म बाण कां टाकीत नव्हते?

१- अबलत्वादि स्त्रीधर्म त्याचे शरीरावर प्रत्यक्षच व्यक्त होते म्हणून; **२**- भीष्मालाही आपल्या वसु शरीरात लवकरच जावयाचे होते म्हणून; व **३**- अंबेचे तप सत्य करावयाचे होते म्हणून; आणि मुख्य कारण **४**- पांडवांला राज्य व दुर्योधनाला अपजय आपल्या मरणाने मुद्दाम द्यावा हे होते; कारण भीष्माने स्वतःच आपला अंतकाल अशा रीतीने ठरवून टाकला होता असे महाभारतात म्हटले आहे.

१७३.अहो क्रोधी नसून क्षमाशील असणे हेच समर्थाचे लक्षण आहे ना?

नाही.'तपोबल असून सर्व विकारांचा योग्य उपयोग करणे' हेच समर्थाचे लक्षण आहे.

शास्त्रात, जे अपराध क्षम्य सांगितले आहेत. त्यांचीच क्षमा करावी. सर्वच अपराधांची क्षमा केल्यास महात्म्यास काही पाप नाही; परंतु लोकांचे पाप त्यापासून कमी होत नाही. म्हणूनच जगन्नाथपंडिताने महात्म्याच्या क्रोधाचीही प्रशंसा केली आहे.

विश्वाभिरामगुणगौरवगुंफितानां रोषोऽपि निर्मलधियां रमणीय एव ।
लोकं प्रणैः परिमलैः परिपूरितस्य काश्मीरजस्य कटुताऽपि नितान्तरम्या ॥

लोकांना सुगंधित करणाऱ्या केशराचा कडुपणाही जसा रम्य वाटतो, त्याप्रमाणे गुणवान् व शुद्धबुद्धी अशा साधूंचे रागे भरणेही गोडच वाटते हा भावार्थ.

१७४. महात्मे गुणलुब्ध असतात की दैन्यलुब्ध?

लुब्धच नसतात आणि प्रारब्धामुळे असलेच तर उभयलुब्ध असतात.धनलुब्ध मात्र केव्हाच नसतात. धनवंताच्या पैशामध्ये बांधले असले तर ते त्याकरता प्राण देतात, पण उत्तम सल्ला गुणवंतालाच सांगतात हे भीष्मद्रोणेतिहासावरून कळून येण्यासारखे आहे.

१७५. महात्म्यांच्या रागावण्याने प्रेम नष्ट झाला असे समजावे, की आहे तसाच आहे असे समजावे?

सृष्टीचा नियम असा आहे की, **१**- बाल्यदशेत लालन, **२**- मध्यदशेत सुधारणा व **३**- उत्तरा दशेत स्वातंत्र्य; हे बहुधा मिळत असते.

पैकी मध्यदशेतच महात्म्यांना रागावण्याची पाळी येते.सर्वथा कडेवर बसणाऱ्या मुलाचे पाय ज्याप्रमाणे पक्के होत नाहीत, त्याप्रमाणे मध्यदशेतही लालन केले असता शिष्यांना आत्मविश्वास उत्पन्नच होत नाही. तथापि,

उपेक्षा मात्र अप्रेमाचीच द्योतक आहे, असे आर्षज्ञ म्हणतात.

द्वेष मात्र महात्म्यांना कोठेच नसतो.

१७६. मूर्खाचा प्रेम कशाने जडतो?

भयाने ! **'भयबिन प्रेम न हुए गुसायी'** असे तुळशीदास म्हणतात.

१७७. भागवतात प्रल्हादाने ''मी तुला भीत नाही'' असे देवाला म्हटले आहे, हा याला अपवाद नव्हे काय?

नाही. भगवद्भक्त सर्वदा निर्भयच असतात.पण ते अनन्य असल्यामुळे सविनय असतात. आपले अन्यत्व स्थापन केल्यावाचून दुर्विनीत होऊ शकत नाही म्हणूनच साधुपुरुष प्रेमामुळे झालेल्या दुर्विनीताची गय करीत नाहीत. सनत्कुमार-जयविजय शापवृत्तांतादिक हेच सांगतात.

१७८. जो सतत रडतो त्याला देव भेटतो, असे म्हणतात पण भागवतात कधी कधी भक्त हांसतो, असे म्हटले आहे हे कसे?

तो आपल्या प्रेमभराने हंसतो; संसाराच्या आनंदाने किंवा रडण्याचा कंटाळा येऊन हंसत नाही.

१७९. जगात अजातशत्रू असा कोण राहू शकेल?

निस्पृह असून दयावान् !

१८०. पापी लोकांचा साधूंनी निग्रह केला आहे तेव्हा त्यांना दयाळू कसे म्हणता येईल ?

त्यांचा तो निग्रहच अनुग्रहरूप म्हणून शास्त्रात सांगितला आहे. **'दंडोऽपि तेऽनुग्रह एव संमतः ।'** असे वचन आहे म्हणून दोष नाही.

१८१. अशाने तर कोणाचे गुणदोष कोणाला पाहताच येणार नाहीत?

पहावे म्हणतो कोण? दोष आपलेच पहावेत; दुसऱ्याचे पाहण्यात काही अर्थ नाही, **'कासया मी दोष पाहू आणिकांचे । मज काय त्यांचे उणे आहे ॥'** अशी साधूक्तिही आहे.

१८२.मग महात्म्यांनी दुसऱ्यावर टीका केलेली आढळते, ती कां?

एका व्यक्तीच्या देहात सर्व दोष दाखविणे अशक्य होईल म्हणून समष्टीतून कोठून तरी दोष दाखविले आहेत; ते त्यांचे करणे मूर्खाला दुसऱ्यासंबंधी वाटते. पण तसे नाही; कारण त्या समष्टीत पूज्यही आहेत

तथापि त्यांवर त्यांची टीका नाही. कृष्णावर वैदिक महात्म्याने कधी टीका केली आहे काय?

१८३. महात्मे पुरुषांनी पापी लोकांना द्वेषून टाकावे की नाही?

नाही; द्वेष पापाचा करावा, पापी लोकांचा करू नये.

१८४. विद्वानाने नेहमी अविद्वानाचा अपमान करावा काय?

मुळीच करू नये; कारण विद्या घोकणे जरी आपल्या प्रयत्नाच्या अधीन असले, तरी वेळेवर सुचणे हे परमेश्वर कृपेवरच अवलंबून आहे. कित्येकांना वाईट ठिकाणीच वेदाचे मंत्र आठवतात व यज्ञाचे वेळी आठवत नाहीत! अविद्वानाच्याही मुखातून केव्हा केव्हा समयसूचकतेने उत्तम अशी वाक्ये निघतात.म्हणून कोणाचाही अपमान करणे उचित नव्हे.

१८५. सृष्टीत परमात्मा कसा ओळखावा व जीव कसा ओळखावा? कारण ते दोघेही चेतन असून परमात्मा सर्वव्यापक आहे.परमात्म्याला ओळखले नाही तर त्याचा अपमान होणार व जीवात्म्याला ओळखले नाही तर आपला व्यवहार चालणार नाही?

कथा – महाभारतातील वनपर्वांत अशी कथा आहे की भीम मारुतीला म्हणाला,'तूं मला वाट दे'. तेव्हा मारुती म्हणाला, 'तूं माझ्या शेपटीला ओलांडून जा.' तेव्हा भीम म्हणाला, 'निर्गुण परमात्मा सर्व ठिकाणी व्यापलेला आहे, त्याचा अपमान करणे माझ्याच्याने होत नाही.तूं आडमुठेपणाने वाट देणार नाहीस, तर मी तुला शिक्षा करीन !'यावरून

''नामरूप वर्ज्य करून अस्ति-भाति-प्रियरूपाने जे प्रतीत होते तो परमात्मा; आणि नामरूपाचे ठिकाणी अहंतावृत्तीने जीव दृष्टीस पडतो,''

तेव्हा जीवाशी व्यवहार व परमात्म्याचा अपमान न करणे दोन्हीही सुलभ व शक्य आहेत.परंतु जीवाशी व्यवहारही शास्त्र सांगते म्हणूनच करावा. कारण मारुतीला वाट मागण्यामध्ये देखील कोणालाही वाट द्यावी ही शास्त्राज्ञा आहेच.

१८६. कूपखनन-न्यायाने ज्ञान मिळते की नाही ?

अत्यंत निषेधाच्या विरुद्ध गेल्यास मिळत नाही व विकल्प असेल तर मिळते. दयाळू परमेश्वराने मज गरीबाची व्यवस्था अशीच केली आहे, आणि सिद्धगाथादिक मागचेही इतिहास आहेत. आता त्यात दिलेले माझे बौद्धिक धर्मोद्‌गीरणच कशीबशी गुरुदक्षिणा समजून तो भक्तवत्सल आळंदिवल्लभ संतुष्ट होवो.

१८७. ढोंगी गुरुपणाचा फायदा घेऊन जर शिष्यांना त्रास देऊ लागतील तर कसे करावे ? कारण शिष्यांनी विरुद्ध प्रयत्न केला असता त्यांचे अकल्याण होते असे आपले मत आहे?

शिष्य त्रासले असतील व त्यांच्या मताचे अभिमानी नसतील तेव्हा ''पाचव्या भूमिकेच्या खाली असणाऱ्या साधूने'' तेथे जाऊन त्याचे ते ढोंग बाहेर काढावे; व त्याच्या शिष्यांना जरब देऊन, प्रथम त्याला शिकवून त्याच्या हातानेच त्यांना सन्मार्ग शिकवावा.

आता एखादा शिष्य नुसत्या भावानेच ब्रह्मज्ञानी झाला असेल तर मात्र त्याच्यापुढे कोणाचीही मात्रा चालावयाची नाही.

शिष्य जर त्या ढोंगी मताचे अभिमानी असून दुराचारी असतील तर सर्वांचेच दैव फिरले असे समजून महात्म्याने तेथे जाऊ नये.

१८८.शाप दिले असता तपोनाश होतो असे काही म्हणतात व कित्येक ऋषींनी तर शाप दिले आहेत?

साधकांनी शाप देऊ नये कारण त्यांचे तप खरोखरच नाश पावते.

तपस्वी ब्रह्मज्ञान्यांना शापाचे पाप नाही. तप राहिले काय व नासले काय याची त्यांना काळजीच नसते.आधिकारिक पुरुषांचे तप तर सृष्टिकरताच असल्यामुळे सृष्टीत शापवराची व्यवस्था त्यांचे हातूनच होते; म्हणून त्यांचे तप नाश होतच नाही.

१८९.भीष्मादि महात्मे आधिकारिक ब्रह्मज्ञानी असूनही महाभारतयुद्ध कां बरे निमूटपणे पाहत राहिले? शापानेच कौरवांचा नाश कां केला नाही?

अरे, शापाने झालेल्या नाशापेक्षा धारातीर्थी देहपात झाल्याने अधिक पुण्य आहे; म्हणून 'हे दुष्ट मरणार तर आहेतच, परंतु त्यांना पुण्य तरी मिळो,' अशी दया करून त्यांनी शाप दिला नाही. शिवाय ज्याला धारातीर्थ-पुण्य मिळणे शक्य नव्हते अशा घोर कर्म करणाऱ्या अश्वत्थाम्याला भगवंताने शाप दिलाही आहे.

१९०. तथापि हे महात्मे तेथून उठून न जाता द्रौपदीची विटंबना कशी पाहत राहिले?

पाहत राहिले ही त्यांची खुषी! पण शेवटी रणात मरून त्यांनी त्याचे फळही भोगून टाकले; इतके तुझ्या समाधानाला पुरे आहे.

ते उठून गेले असते तर त्यांच्यात व दुर्योधनातच भांडण लागले असते; पण तसे करणे त्यांना इष्ट नव्हते.कारण दुष्टांच्या अन्नाचा देह राखून ठेवण्यापेक्षा धारातीर्थी त्याला स्नान घालणेच त्यांना बरे वाटले.

१९१.दोघे ईश्वराचे भक्त असल्यास एखाद्या कामात यश कोणाला मिळेल?

जो अधिक असेल त्याला! दोघेही समान असल्यास विरोध उत्पन्नच होणार नाही.मग यशापयशाचा प्रश्न कशाला?

१९२.'महात्म्यांची सात पावली मैत्री' असे म्हटले आहे.आणि 'स्वभाव जर समजला नाही तर परदेशातून आलेल्याशी एकदम मैत्री करू नये' असेही नीतिग्रंथात म्हटले आहे; तेव्हा यात निर्णय कसा करावा?

पहिली वाक्ये विरक्त महात्म्यांविषयी आहेत; कारण त्यांना देण्याघेण्याचे कोणापासून काहीच नसते. दुसरी वाक्ये गृहस्थाविषयी आहेत.कारण त्यालाच फसविण्याचा संभव असतो.याप्रमाणे एक समाधान आहे.

महात्म्यांचीच मैत्री होते, दुरात्म्यांची होत नाही, आणि भाषणावरून संयमी महात्मे तत्काळ मनुष्याला ओळखून घेतात असे दुसरे समाधान आहे.

१९३. ''मृद्घटवत् सुखभेद्यो दुःसंधानश्च दुर्जनो भवति । सुजनस्तु कनकघटवत् दुर्भेद्यश्चाशुसंधेयः॥' अशी सज्जनांविषयी गोष्ट असून दुर्योधनाने मोठ्या प्रेमाने जेवावयाला बोलाविले असता, कां बरे श्रीकृष्ण गेले नाहीत?

अरे कनका-कनकाचा सुखसंधि या श्लोकात सांगितला आहे.कनकाचा आणि मातीचा सांगितलेला नाही.दुर्जनांची मैत्री मातीच्या घटाप्रमाणे लौकर फुटते व पुनः जुळत नाही. सुजनांची मैत्री सोन्याच्या घटाप्रमाणे लौकर जुळते व तुटत नाही असा वरील आर्येचा अर्थ आहे.तथापि हा शुद्धान्तःकरणाच्या पुरुषासच लागू आहे, अत्यंत विरक्त ब्रह्मनिष्ठास किंवा कर्मनिष्ठास लागू नाही.'सर्वसन्मार्गबहिष्कृत आणि दांभिक' - असा दुर्जन शब्दाचा अर्थ समजावा.

१९४ ज्याचे कमी पैशात होते अशा एखाद्या महात्म्याला कोणी त्रास दिल्यास कसे करावे?

समपद्यन्यायाने वागावे.

१९५.सांधूनी विनोद कोठे करावा व कोठे करू नये?

ईश्वराशी विनोद करण्यास साधूस प्रत्यवाय नाही; लोकांशी मात्र त्यांनी विनोद करूं नये.

१९६.एखाद्या साधूजवळ प्रेमाने बायका पुष्कळ (आल्यास) असल्यास त्याने त्यांना कसे वागवावे

''तुमचा प्रेम आहे तर मजजवळ राहा; परंतु तुमच्या निरोधाला माझा उपदेश व तुमचे धैर्य ही दोन्ही कारणे पाहीजेत. शिवाय माझ्या कामवृत्तिदर्शक चेष्टा तुम्हांला दिसून आल्यास आतापासूनच माझी आज्ञा आहे म्हणून तुम्ही जोराने मला प्रतिबंध केला पाहिजे. पण माझा उपदेश सत्य असेल तर त्याचा मात्र अनादर करणे तुम्हास हितावह होणार नाही''

असे त्यांना स्पष्ट सांगावे. याप्रमाणे न वागता जे मूर्ख आपल्या मनाच्या निरोधनावर विश्वास ठेवतात

ते थोर असले तरी सुहिन्यांच्या (सोनकुत्रे) समोर लढणाऱ्या व्याघ्राप्रमाणे फजीत पावतात.

१९७. साधुवृत्ती व वीरवृत्ती एकच आहेत की दोन आहेत?

दोन आहेत, पण त्या दोन्ही एखाद्या व्यक्तीत असतात व एखाद्या व्यक्तीत नसतात.

१९८. या दोहोंत श्रेष्ठ कोणती ?

साधुवृत्तीच यात श्रेष्ठ आहे. तथापि दोहींचे परस्पर प्रसंगी साह्य होते. वास्तविक विचार केला तर साधुवृत्ती एक प्रकारची वीरवृत्तीच आहे. पण त्या दोहोत फरक इतकाच की, लोकांनी एखाद्या गोष्टीबद्दल हिणविले असता शूर त्यावर तुटून पडतो व ते कार्य करून टाकतो; कारण त्याला देहवृत्तीमुळे लौकिकाची चाड असते. पण ही देहवृत्ती ज्ञा आहे.

लोकांनी **''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति''** असे कितीही जरी हिणविले, तरी साधुपुरुषाला त्याबद्दल वाईट वाटत नाही; कारण मी साधु म्हणवून घेण्याचीच त्याला लाज वाटत असते. तथापि अशी वाक्ये दीनांच्या मुखातून निघाली असता मात्र साधूही शूराप्रमाणे शरणागतकार्य करण्यास झटतात. एवढाच साधुवृत्तीत व शूरवृत्तीत फरक आहे. वीरवृत्ती त्या दोहीतही सामान्य आहे, अशी भाषा वापरावी.

१– कामिक लोकांनी, 'आमच्या कामास पडले नसता तुम्ही साधू कशाचे?' असे म्हटले असता ज्याला वाईट वाटते तो साधू नव्हे. ही एक अबाधित खूण आहे. **२**– आणि त्याचप्रमाणे खाणेपिणे योग्य करून, ब्रह्मनिष्ठतेच्या बढाया मारून देहाकडे लक्ष्य देऊन जो शरणागताकडे लक्ष देत नाही, तोही साधू नव्हे. हीही एक अबाधित खूण समजावी.

विदेही मनुष्याला साधू म्हणणे किंवा वेडा म्हणणेही आमच्या खुषीची गोष्ट असल्यामुळे, त्यासंबंधात सांगण्याची जरूर नाही. तथापि विदेही पुरुष साधु असो किंवा वेडा असो, त्याला सरसकट नमस्कार करावा व गृहस्थाश्रमाचे कर्तव्य सोडू नये हेच भल्यांना योग्य आहे.

१९९. मनुष्याचे हक्क आपणास कसे संमत आहेत?

हक्क म्हणजे स्वत्व! हा काही पदार्थ नव्हे; पण जिच्यावाचून जगाचे चालत नाही अशी ती एक बुद्धीची समजूत आहे. ज्याच्याजवळ बल त्याचे सर्वत्र हक्क असतात. सर्वांमध्ये धर्माचे बल अधिक असल्यामुळे धार्मिक पुरुषांना सर्वांना उपदेश करण्याचे हक्क आहेत, काही मूर्ख लोक साधूंनी लोकांना फुकट उपदेश कां करावा? अशी तक्रार करीत असतात, परंतु गरीब बिचारे मासे वगैरे प्राण्यांवर मनुष्याने आपले हक्क कां दाखवावे याचे उत्तर ते लोक सांगत नाहीत. **''बळी तो कान पिळी''** अशीच जर जगाची रीती असेल तर धार्मिक पुरुषांचे हक्क कोठेही जाणे शक्य नाही.

तथापि व्यावहारिक हक्कात व धार्मिक हक्कात इतका विशेष आहे की व्यवहारातील बलवान् आपल्या हक्काला धक्का येत असेल तर दुसऱ्याचा अगदी चुराडा करून टाकतात. धार्मिक हक्कात असे होत नसून आपले हक्क कायम राहून दुसऱ्याला अधिक जोम येतो.

महाभारतात हक्काचा निर्णय करताना –''गाय जशी विकत घेणाराची आहे तशी ती चोराचीही आहे; जो तिचे दूध खाईल त्याची ती आहे' असे म्हटले आहे. याप्रमाणे –

दारावर आलेल्या भुकेल्याचे हक्क गृहस्थाच्या अन्नावर अवश्य आहेत. जो भुकेलेल्या अतिथीला अन्न देत नाही तो चोर समजला पाहिजे.

आम्ही कमाविलेल्या हक्कावर दुसऱ्याने हक्क कां करावा? असे जर या मूर्खाला वाटत असेल तर परमेश्वराच्या पृथ्वीवर यांनी तरी हक्क कां दाखवावा?

तथापि या हक्काचा फाजील फायदा घेऊन आमचे साधू म्हणविणारे कित्येक मूर्ख दुसऱ्याच्या घरात शिरून त्यांना जबरदस्तीने मंत्र देताना मी पाहिले आहेत. परंतु ते योग्य नव्हे. कारण ''लोकांच्या हक्काला जसा कायदा नियामक आहे तसे धार्मिक हक्काला शास्त्र नियामक आहे.''

'माझ्यावर कृपा करा. मला अनुग्रह द्या' असे म्हटल्यावांचून अनुग्रह देण्याविषयी कोठेही शास्त्रात सांगितले नाही.मग कित्येक तोंडाने म्हणतात व कित्येक आपल्या सेवेने व इंगिताने सुचवितात.पण याविरुद्ध वागणारे व घरात धसून मंत्र देणारे राजाच्या आज्ञेने ठार केले पाहिजेत. साधूंचा जो हक्क आहे तो मेघवृष्टिन्यायाने उपदेश करण्याचा आहे. पुढे विशेष कार्याबरोबर विशेष धार्मिक हक्क प्राप्त होतात ते निराळे !

हक्क आणि कर्तव्य

२००. पण असा हक्क असूनही कित्येक साधू उपदेश न करता तपच कां करतात? साधू म्हणवून घेणाऱ्या मूर्खाविषयी माझे काही म्हणणे नाही परंतु शहाणेही असे करतात ते कां?

त्यांची खुषी; कारण हक्क म्हणजे काही कर्तव्य नव्हे.

'आपल्या करता दुसऱ्याला जे केलेच पाहिजे याचे नांव हक्क' व

'जे आपल्यालाच केले पाहिजे त्याचे नाव कर्तव्य.'

कर्तव्य हे परमेश्वराच्या शास्त्ररूपी आज्ञेवर अवलंबून असते,

हक्काची गोष्ट तशी नाही.हक्काला बौद्धार्थ असतो.ते दुसऱ्यावर बजाविले पाहिजेत अशी आपल्याला जबरदस्ती नसते. म्हणूनच हक्कदार स्वतंत्र समजल्या जातो.

समज, तुझ्या घरच्या अन्नावर तुझा हक्क आहे म्हणून तुला इच्छा नसली तरी ते जेवलेच पाहिजे काय? आणि इच्छा नसल्यावरही जर ते जेवावे लागेल तर ते हक्क कशाचे? हक्कात नेहमी स्वातंत्र्य असते. ब्रह्मज्ञान झाल्यावर काही कर्तव्य उरत नाही; पण जीवन्मुक्ति आहे तोपर्यंत हक्क उरतो.म्हणून उपदेश करणे व न करणे त्यांच्या खुषीवर आहे.

शिरोमणि भट्टाचार्यांनी स्वत्व म्हणून एक पदार्थ मानला आहे खरा; परंतु तोही बौद्धार्थच असल्यामुळे आमचा व त्यांचा विरोध येत नाही.

२०१. सत्पुरुषांचे हक्क लोकांवर आहेत परंतु ते कशारीतीने बजाविले जातात?

तपस्वी आपल्या सद्गुणाने किंवा दंडाने बजावून घेतात.ज्ञानी भगवद्भक्तांचे हक्काकडे लक्ष नसते. पण ते लोकांवरून निघून जात असल्यामुळे परमेश्वरच ते बजावून घेतो.

२०२. मग चोराचेही हक्क लोकांवर आहेत म्हणावयाचे?

मुळीच नाही. कारण ''आपल्याच करता सर्व आहे'' अशी चोराची दृष्टी असते.''आपल्याकरताच सर्व आहे व आपण कोणाकरताही नाही'' अशा समजुतीच्या मनुष्याचा हक्क कोणावरही उत्पन्न होत नाही. अशी ज्यांची समजूत झाली आहे ते चोरी करोत किंवा न करोत ते त्याच टोळीतील समजावेत.

२०३. पुराणात अवतारांची कृत्येही सांगितली आहेत, व जीवांची कृत्येही सांगितली आहेत, त्यांचे कोणी असे अनुकरण करावे?

वर्तन श्रुत्यनुसार असेल तर कोणीही कोणाचे अनुकरण करावे.श्रुतिविरुद्ध कोणाचेही कोणी अनुकरण करू नये;

आणि प्रसंग मध्यम असेल तर मुक्तांनी अवतारांचे अनुकरण करावे आणि साधकांनी भक्तांचे अनुकरण करावे.

मुक्ताला देखील चोप द्यावा

२०४. कोणी मी मुक्त आहे असे म्हणून भलते करू लागेल तर कसे करावे?

मुक्त आहे की नाही हे ओळखता येणे शक्य नाही.तथापि असे करणाऱ्याला चोप दिला असता पाप नाही असे मात्र मी शास्त्रबलाने स्पष्ट म्हणतो.

२०५. नुसत्या ज्ञानाने लोकांवर छाप बसते काय?

लोकांवर छाप बसण्याकरता ब्रह्मज्ञान नाही.तथापि लोकांचीही छाप आपल्यावर ब्रह्मज्ञानाने बसत नाही. 'ज्याच्यापासून लोक उद्विग्न होत नाही' असे जे महात्म्याचे लक्षण भगवंतांनी सांगितले आहे ते ब्रह्मज्ञान्यावाचून इतरास लागू पडत नाही.

लोकांवर छाप बसणे हे तपाचे किंवा पुण्याचे फल आहे, ज्ञानाचे नव्हे. शापानुग्रहसामर्थ्य असणे हे तपाचे फळ होय - ज्ञानाचे नव्हे, असे '**पंचदशी**'तही म्हटले आहे. मोठ्या महर्षीच्या आंगी जे दोन्ही प्रकारचे सामर्थ्य दिसत होते त्यात त्यांच्या आंगी ज्ञान व तप हे दोन्ही सामर्थ्य होते.

२०६. पण कर्मठ लोक चमत्कार नसेल तर ज्ञानी पुरुषाची निंदा करतात !

खुशाल करोत. त्यांचीही निंदा करणारे विषयी लोक आहेतच.

शिवाय आपली निंदाच कोणी करू नये अशा प्रकारचा आग्रह धरून बसणे हे ब्रह्मज्ञान नव्हे.

२०७. कोणी म्हणतात ज्ञान्यांनी मान करून घ्यावा, कोणी म्हणतात ज्ञान्यांनी अपमान करून घ्यावा, या दोहोंपैकी कोणते खरे?

ज्याचे जसे प्रारब्ध असेल तेच खरे असे वेदान्त म्हणतो.

२०८. अशा विलक्षण प्रारब्धवान् ज्ञानी पुरुषाला गुरु करावे की नाही?

ब्रह्मज्ञानाकरता शरण जाण्यास कोणतीही अडचण नाही.पण लोकांचे जशा प्रकारचे आग्रह असतील तशा प्रकारे ते वागतात व लोकांना तशा प्रकारचे गुरु पाहिजे असतात.त्यात एखाद्याच्या दैवाने तसे महात्मे मिळतात व मिळतही नाहीत.इकडेही अशी स्थिती आहेच, व या बाबातीत अनेक ग्रंथात मी सांगितलेही आहे. ज्याला जसे वाटेल तसे त्याने वागावे. पण गुरु समजल्यावर मात्र तो बद्ध होतो,

२०९. चमत्कार, सदाचार व ब्रह्मज्ञान यांपैकी लोक कशाला मान देतात?

१- मूर्ख व नीच पुरुष चमत्कारालाच मान देत असतात.

२- मध्यम पुरुष आचाराला मान देत असतात; कारण नुस्ते चमत्कार गारुडीही करतात असे त्यांचे म्हणणे असते.

३- उत्तम पुरुष ब्रह्मज्ञानालाच मान देत असतात.चमत्कार हे बंधन व आचार हे प्रारब्धमूलक आहेत असे त्यांना ठाऊक असते.

तुका म्हणे संत ओळखावे कैसे । आपण व्हावे तैसे तेव्हां कळे ॥

अशी साधूक्तीही आहे.

१- चमत्कार हा इहलोकीच तितक्या वेळेपुरता कामी पडतो,

२- आचार हा लोकांना अनुकरण करण्याकरता उपयोगी येतो, आणि

३- बुद्धी ही ग्रंथरूपाने अजरामर कीर्ती करून ठेविते.

२१०. मोठेपणाची किंमत कोणाच्यापुढे नसते?

ज्यांच्या मनात चमत्काराची अभिलाषा आहे, त्यांच्या मनात मोठेपणाची किंमत नसते. ते एकवेळ श्रीरामासारख्यांवर विश्वास ठेवीत नाहीत, परंतु घरच्या बायकोच्या अंगात येणाऱ्या पिशाचावर विश्वास ठेवतात. त्यांच्या देवपाटात शालिग्रामाच्या बरोबरीने झोटिंगाच्या व पीराच्या मूर्ती असतात !

हे लोक कितीही धार्मिक असले तरी यांच्यावर विश्वास ठेवू नये. कामनेनुसार यांचे धर्म प्रतिदिनी निरनिराळे बदलत असतात. तहानेल्याला पाणी देण्याचा देखील हे बदला इच्छित असतात. यांच्या येथे जेवल्यानेही शहाण्या लोकांची अपकीर्ती होत असते, म्हणून बहुधा त्यांची घरे टाळावीत. रामराम म्हणण्याऐवजी हे लोक दोम्दोम् करीत असतात.

२११. पण योगशास्त्रात चमत्कार पहावेत म्हणून सांगितले आहे ना?

ते मूर्खांच्या स्वमनोनिरोधलज्ञानिदर्शनार्थ आहेत; नाहीतर त्याच शास्त्रात चमत्कारांचा निषेध केला नसता.

२१२. मग चमत्कार सगळे खोटे आहेत काय?

बिलकूल नाहीत; परंतु ते गौण आहेत.''त्यांची आशाच असेल तर आपल्याच इष्टदेवतेपासून ते मिळावेत, नाही तर नकोत'' इतके तरी धैर्य साधारण शाहाण्या धार्मिकाने धरले पाहिजे.

२१३. चमत्कारानेही कोणी फसतात काय?

होय. चमत्काराने फसतातही व चमत्कारीपुरुषांना फसविताही येते. नुसता अंगात देव आणून सासरच्या व माहेरच्या माणसांना फसविणाऱ्या बायका मी पाहिल्या आहेत.

याच आशयाने श्रीरामाने दशरथाच्या हातावर पिण्ड न देतां दर्भावरच ठेवला कारण पिशाच देखील असे चमत्कार दाखवू शकतात.

आतां चमत्कारी लोकांना फसविता येणेही सुलभ आहे.

१- वसिष्ठाला राक्षसाने फसवून भलत्याच राजाला शाप देण्यास लावले, अशी कथा पुराणात आहे.

२- पूर्वजन्माच्या स्मृतीमुळे कर्पूरिका लग्न करीत नव्हती, परंतु नरवाहनदत्ताने दाईकडून हे समजून घेऊन तिचा पूर्वजन्मीचा पती आपण आहो अशा चेष्टा दाखवून तिला वरिले अशी कथासरित्सागरात कथा आहे. मोठ्या मोठ्या देवांना सुद्धा फसविण्याच्या कथा उपलब्ध आहे, म्हणून प्रज्ञावंतापुढे चमत्कार बिमत्कार नमून राहतात.

३- कथासरित्सागरात व बृहत्कथामंजरीत अशी गोष्ट आहे की, एका चोराने चित्रगुप्ताचे आराधन केले व तो यमलोकास गेल्यावर चित्रगुप्ताच्या सांगण्याप्रमाणे 'प्रथम पुण्य भोगतो' म्हणाला; आणि त्यामुळे एक दिवस स्वर्गात जाऊन भोग न करता तो तप करू लागला.त्यामुळे स्वर्गभोगाचा एकएक दिवस वाढत जाऊन व त्यामुळे सर्व पापांचा क्षय होऊन हरिहरांच्या कृपेस तो पात्र झाला.

४- बळीचीही अशी कथा स्कंदपुराणात आहे. त्यानेही थोड्या दिवसांच्या मिळालेल्या स्वर्गाचे शिवप्रीत्यर्थ दान केले होते.

५-गोपीचंदाच्या रक्षणाकरिता जालंदराच्या शापाच्या वेळी गोपीचंदाचे धातूचे पुतळे करून त्याला कानीफनाथांनी वाचविले.

तात्पर्य, युक्तीचाही जोर चमत्कारांवर चालतो. म्हणून ज्ञान, वैराग्य व भक्ती यावाचून सर्व प्रज्ञा व चमत्कार लौकिकच आहेत.

गुरूला बायको अर्पण करणे

२१४. आपण सांगितले ते मला मान्य आहे; परंतु काही वैदिक म्हणविणाऱ्या मतात वाक्याभासाने गुरूला शिष्याच्या बायका अर्पण करण्याचा परिपाट आहे.ह्याविषयी कचेऱ्याकचेरी झाली तरी ते लोक परिपाट मोडू इच्छीत नाहीत.तेव्हा त्याविषयी संकोचक युक्ती तरी आहे काय?

प्रथम तर असे करणे म्हणजे मी चाळे समजतो. पुन्हा, हा धर्म नसून धर्माची थट्टा आहे, असेही मला वाटते; किंवा धर्माच्या नांवाखाली आपला तळीराम गार करण्याची ही एक युक्ती आहे असेही म्हणता येते.

शिवाय असा एक प्रश्न उत्पन्न होतो की, बायकांना आत्मनिवेदन नांवाची भक्ती आहे की नाही? असेल तर, नवऱ्यांना त्यांना अर्पण केल्यावर आत्मनिवेदन करण्याइतके स्वातंत्र्य त्यांना कसे येणार? नसेल तर ईश्वर पक्षपाती ठरणार नाही काय? पतींनाच त्यानी आत्मनिवेदन केले असल्यामुळे तो वागवील तसे त्यांना वागले पाहिजे; असे म्हटले तर **''धर्मे चार्थे च कामे च नातिचरामि''** या वाक्याने पुरुषानेही आत्मानिवेदन तिला केल्यासारखे होत नाही काय? तेव्हा या कृत्यात फाजिलपणा, लबाडी, बुचाडूपणा, लुोपणा सगळे एक झाले आहेत, असे मला वाटते.

तथापि **'अति झाले आणि हसू आले'** या न्यायाने तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करण्याकरता व्यवस्थाच करावयाची म्हटली तर -

''महाराज! मी या जन्मात विवाहित आहे. पुढच्या जन्मात कुमारी होऊन आपणास वरीन'' असे तरी वचन देऊन एक वेळची पिचकाट तोडावी; आणि नवऱ्याला हे रुचत नसेल तर त्याला सोडून द्यावे; आणि बायकोलाच असा व्यभिचार रुचत असेल तर तिने गुरूच्याच घरी रहावे. नवऱ्याच्या घरी येऊन वंश तरी भ्रष्ट करू नये.

रामाला आलिंगनाची इच्छा मुनींनी दर्शविल्यावरून 'कृष्णावतारी गोपिका होऊन मला आलिंगन द्या' हे रामांनी सांगितले, अशी कथा कृष्णोपनिषदात आहे. तेव्हा असला पतिपत्नीप्रेम पिंजऱ्यात अडकलेलाच असला तर तो उत्तर जन्मावर तरी ढकलावा.

जापर जाको सत्य सनेहू । सो तेहि मिलत न कछु संदेहू ।। याप्रमाणे जशी वासना तीव्र-मंद असेल तसे फळ होईल.

२१५. धार्मिक ढोंग उघडकीस आणावे की नाही ?

खऱ्या धार्मिकापुढे उघडकीस आणावे व अधार्मिकापुढे ढोंगी तरी धार्मिक बरा असे म्हणून चालू द्यावे.

२१६. विवेकानंदाने ढोंगी ब्रह्मचारी गृहस्थापेक्षा पुष्कळ बरा असे जे म्हटले आहे, त्याविषयी आपले काय मत आहे?

तसे असले तरी लग्नावाचून पुष्कळ स्त्रिया बिघडविण्याला तो कारण होतो. हे कोणत्याही दृष्टीने वाईटच होय असे माझे मत आहे.

२१७. अधार्मिकापुढे ढोंगी धार्मिकाचे ढोंग उघड होण्याचा प्रसंग आल्यास कसे करावे ?

ज्याला धार्मिक कळकळ आहे, अशाने तेथे जाऊन ढोंगी धार्मिकाला वेगळे करून आपल्या धर्माने तेथेही छाप बसवावी.

२१८. अधिकारी कोणाला म्हणतात ?

जो ज्याची इच्छा करील तो त्या वस्तूचा अधिकारी.

२१९. अधिकारी पुरुषात किती गुण पाहिजे ?

१- वस्तूची इच्छा; २- त्या वस्तुवाचून इतर नको अशी त्यागबुद्धी आणि ३- इष्ट वस्तू मिळविण्याच्या मार्गातील अडचणी सोसण्याचे धैर्य;

हे तीन गुण अधिकारी पुरुषाने अवश्य मिळविले पाहिजेत.

साधकावस्था

२२०. गुरुजवळ जाण्यास अत्यंत पात्र नाही असा कोण ?

मनुष्यभिन्नच नित्य भगवत्स्वरूप असते, असे मानणारा !

२२१. जन्मभर ध्यान केले तरी कोणाला साक्षात्कार होत नाही?

एक वेळ ठेवलेली निष्ठा सोडतां येण्याची ज्याला संवय लागली आहे त्याला !

२२२. कितीही दिवस सज्जनापाशी राहिला असताही कोणाचा फायदा होत नाही ?

साधूजवळ मानीपणा धरून राहतो त्याचा !

२२३. कधी फसत नाही कोण ?

ज्याला सर्वस्व अर्पण करता येते तो; किंवा माझे काहीच नाही असे समजतो तो !

२२४. नित्य फसणारा कोण ?

जो जगात माझे काही आहे असे समजतो तो; किंवा अर्पण करताना ज्याला आपल्याकरता काही राखून ठेवावे लागते तो !

२२५. चंचल कोण ?

ज्याची कोठेही निष्ठा नाही तो !

२२६. निष्ठा कशाला म्हणतात ?

ज्याविषयी विश्वास असेल तोच आपल्या सुखदुःखात मित्र आहे असे वाटणे.

२२७. विश्वास कोणावर ठेवावा ?

आपले थोडेसेही वाईट पाहून ज्याला वाईट वाटेल त्यावर !

२२८. शुद्ध केलेला धर्मही केव्हा पापरूप होतो ?

विपुलाप्रमाणे गुरुजवळ झाकून ठेवला असता ! येथे कैमुतिक न्याय आहे हे लक्षात ठेव.

२२९. अतिपरिचयाने गुरूंची अवज्ञा होण्याचा संभव असतो, तेव्हा त्यांच्याजवळ सतत राहून ज्ञान संपादन कसे करावे ?

गुरूच्या अतिपरिचयापेक्षाही विनयाचा व नमस्काराचा अती परिचय करून घेऊन !

२३०. सच्छिष्य व असच्छिष्याची साधी परीक्षा कशी करावी ?

योगद्वाराने परीक्षा पाहणे कठिण आहे, तथापि सोपी परीक्षा ही आहे की- गुरूने आपली बढाई मुद्दाम शिष्याजवळ करावी. तिचे योगाने सतावर पार्थाप्रमाणे व असतावर दुर्योधनाप्रमाणे परिणाम होतो.

२३१. कुतुष्ट कोण ?

सांप्रदायिक बाह्यचिन्हावर संतुष्ट राहतो तो !

२३२. आरुढपतित कोणास म्हणतात ?

सांप्रदायिक आंतर् चिन्हांचा लाभ झाला नाही म्हणून बाह्य चिन्हांचाही परित्याग करतो तो ! आणि वरचे साधन प्राप्त झाले असता खालचे साधन बलाने करतो तो !

२३३. चावट कोणास म्हणतात ?

जो श्रुतींनी सांगितले ते व गुरूंनी खोलून दिलेले गुह्य बाहेर काढतो त्यास! तो शिष्य करण्यास अगदी नालायक होय.

२३४. शांत कोण ?

मूर्खाच्या बोलण्याला भिऊन जो आपले कार्य सोडून देत नाही तो !

२३५. धीर कोण ?

सुखाने फुगत नाही व दुःखाने रडत नाही तो !

२३६. वीर कोण ?

सत्कर्मामध्ये उत्साह धारण करणारा !

२३७. शूर कोण ?

जो इंद्रिये व मन आवरून धरतो तो !

२३८. मेधा कशास म्हणतात ?

शास्त्रीय गुण कोठूनही उचला येतात त्यास !

२३९. दीन कोण ?

माझ्याप्रमाणे ज्याला आपल्या स्वतःचा संशय येतो तो !

२४०. इंद्रपदासारखे ऐश्वर्य मिळाले तरी काय टाळावे ?

शास्त्राविरुद्ध वर्तन व मूर्खाशी भाषण !

२४१. महामूर्ख कोण ?

वेदान्तदृष्टीने ज्ञान होईपर्यंत सर्वच जरी अज्ञानी आहेत, तरी अज्ञानी असून मी अज्ञानी आहे असे ज्याला वाटत नाही तो महामूर्ख !

२४२. मूर्खाजवळ आपला साक्षात्कार प्रगट करावा की नाही ? प्रगट केल्यास त्रास होतो, नाही तर खोटे बोलण्याचे पाप घडते ?

निस्पृहाने साक्षात्कार प्रगट करू नये.खुशाल नाही म्हणावे; व त्याबद्दल परमेश्वराला क्षमा मागावी.

२४३. नित्य खोटे बोलणे कोणास शोभते ?

आपला चांगुलपणा किंवा साक्षात्कार झांकून टाकतो त्यास !

जातो स्थळ ते सांगेना । सांगितले तरी तेथे जाईना ।
आपुली स्थिति अनुमाना । येवोंचि नेदी ॥

(दासबोध दश.११ समास १० ओवी १०)

२४४. गंभीर कोण ?

आपले पुण्य बाहेर न बोलणारा !

२४५. वासनाक्षय केव्हा झाला समजावा ?

प्रवृत्ती व निवृत्ती समान वाटतील तेव्हा !

२४६. निरहंकार कोण ?

आपल्या हातून भूतांचा अपमान होऊ नये असे ज्यास वाटते तो !

२४७. गर्विष्ठ कोण ?

थोडक्याच ज्ञानाने कर्तव्यशून्य होतो तो !

२४८. श्रवण करून कोण मनन करीत नाही ? श्रवण व मनन करून कोण निदिध्यास करीत नाही ?

१- काव्यरसात बुडी देऊन नित्य ज्याला नवे नवे श्रवण पाहिजे असते, तो श्रवण करूनही मनन करीत नाही.

२- जो एखादा पंथ काढण्याची इच्छा मनात धरून गुरूकडे जातो, तो नित्य श्रवण-मनन करूनही निदिध्यास करीत नाही.

२४९. साधारणतः लोकांचे लक्ष कठिणाकडे जाते, सोपे साधन त्यांना आवडत नाही; असे कां होते?

बुर्खा घातलेल्या स्त्रीला पाहून तिच्याविषयी ज्याप्रमाणे कामी लोकांची ईर्ष्या अधिक वाढते, त्याप्रमाणे मूर्ख मनुष्याचे मन, निष्ठा नसल्यामुळे ज्या गोष्टीला अधिक पडदा असेल अशा साधनाकडे जास्त धाव घेते.

वस्तुतः विचार केला तर - ब्रह्मज्ञानावांचून इतर सर्व क्रिया कर्तृतंत्र व जड असल्यामुळे शास्त्रच त्यांच्याविषयी फलप्रापकत्वाचे बोधक आहे; म्हणून कोणत्याही क्रियेवर निष्ठा ठेवली म्हणजे झाले.

२५०. भगवंताची नांवे घेणाऱ्यास भगवान् लवकर कां पावत नाही?

नांव घेणारा जेव्हा त्याला हांक मारतो, तेव्हा तो येणार नाही असेही त्याला वाटत असते; आणि भक्ताची मनोवृत्ती खरी करणे परमेश्वराचे बिरूद आहे म्हणून तो पावत नाही.

२५१. आमची घटकाभर वृत्ति स्थिर होते ती परमात्मा आला म्हणून की काय ?

होय तो येत असतो परंतु तितक्यात तुम्हीच संशय काढता की तो अझून कां आला नाही म्हणून!

२५२. वृत्ति हठाने स्थिर होते किंवा निष्ठेने ?

निष्ठेने ! निष्ठेने होणारी एका घटकेची जी स्थिरता असते तितकी हठाने करण्याला जन्मच लागतो.

२५३. निष्ठा म्हणजे आग्रह नव्हे काय ?

असे ना बापडा ! ज्ञान वस्तुतंत्र असल्यामुळे त्याच्यामध्ये आग्रह चालत नाही. बाकी क्रियेत व उपासनेत आग्रहाने काही हानी नाही. आग्रह हा दोष असेल पण चंचलता त्याहीपेक्षा मोठा दोष आहे.

विचार कर की घरचा भाऊ चोर आणि कुत्रा इमानी असला तर या दोहोंमध्ये तूं विश्वास कोणावर

ठेवशील !

२५४. परमेश्वरावर सर्व भार टाकून दिल्याने मनुष्य आपल्या कर्तव्यातून मोकळा होतो काय ?

पण भार टाकून देणे हे तरी एक कर्तव्यच आहेना? सर्व भार परमेश्वरावर टाकून द्यावा हे म्हणणे जितके सोपे आहे, तितके ते करणे सोपे नाही.

२५५. केवळ रडणाऱ्याला परमेश्वर मिळतो असे म्हणतात, ते खरे आहे काय ?

होय, खरे आहे; पण त्या रडण्यातही एक प्रकारचे धैर्य पाहिजे. घडीभर हांसणाऱ्याला परमात्मा मिळत नाही. किंवा रडण्याचा कंटाळा येऊन नंतर ते सोडून देतो त्यालाही मिळत नाही.

२५६. अहो पण रडून रडून जन्म गेला व परमात्मा न मिळाला तर मग कसे करावे ?

इतके जन्म जसे परमात्मा न मिळण्यात गेले तसा हाही एक जन्म जाऊ द्यावा पण फुकट गेला असे मात्र समजू नये.

२५७. इतका ज्याला धीर निघत नाही त्याने कसे करावे ?

हे काय विचारतोस? ज्यात त्याला धीर निघत असेल ते करावे. कारण कोणाला कशात, कोणाला कशात तरी धीर निघतच असतो.महात्म्याला तप करण्याला जितके श्रम पडतात तितकेच किंबहुना जास्ती चोराला चोरी करण्याला पडतात. पण प्रत्येकाच्या श्रमाची फळे निरनिराळी आहे व ती ठरलेलीही आहेत.

२५८. पुष्कळ लोक काही वर्षे एखादा नियम करून मग सोडून देतात ते कां ?

ते पूर्वी मनापासून करीतच नाहीत. मनापासून केलेला नियम कधीही सोडता येत नाही. झोपेत दांत खाण्याची संवय देखील मनुष्याला आपल्या इच्छेने सोडता येत नाही. मनापासून केलेला नियम मध्यंतरी सुटला, तरी पुन्हा येऊन जुळतो. याच्याविषयी मीच उदाहरण आहे. माझे बाळपणीचे शैव-नियम लोणीस प्रसंगाने सुटल्यामुळे पुन्हा जसेचे तसेच कायम झाले.

२५९. जो पापी असेल त्याला किती बहिष्कार घालावा ?

फक्त त्याच्यासारखे आपण न करण्याइतका !

२६०. शरीराने केलेल पाप खरे समजावे, की मनाने केलेले ?

जे पाप शारीरिक असते ते पाप सर्वांनी शरीराने घडले असता खरे समजावे, व योगियाने मनाने घडले असताही ते खरे समजून योगसामर्थ्याने त्याची निवृत्ती करावी.

२६१. एखादा विकार प्रबल झाला असेल व तो आपले कार्य केल्याशिवाय रहात नसेल, तर कसे करावे ?

कार्य घडू देण्यापूर्वी आपला विकार लोकांस दाखवून त्यांस हुषार करून द्यावे.

२६२. पण मनात आलेला विकार इतका वेळ पर्यंत राखून ठेवण्याचे ज्यांना सामर्थ्य नाही, त्यांनी कसे करावे ?

त्यांनी वाटेल तसे करावे; आम्हाला विचारण्याची आवश्यकता नाही. भगवान् भास्करनंदन (यमराज) त्याला सांगण्याला समर्थ आहेत.

२६३. वाटेल तसे श्रम पडले तरी काय केले पाहिजे ?

चित्ताचा निरोध !

२६४. रसना आणि उपस्थ जिंकण्याचा प्रथमारंभी उपाय कोणता करावा ?

काला करून जेवण्याचा नियम करणे व स्त्रियांचे ठिकाणी मातृबुद्धी करून त्यांच्याशी भाषण वर्ज्य करणे, हे दोन उपाय प्रथमारंभी, दोहीसही जिंकण्यास उत्तम आहेत. पुढील उपाय शास्त्रात आहेतच.

२६५. सरळ कोण ?

आपले दोष सांगतो तो !

२६६. प्रमत्त कोण ?

वारंवार दोष कबूल करून पुन्हा तेच करतो !

२६७. अतिवादी कोणास म्हणावे ?

१- जो दृष्टान्ताला सिद्धान्ताच्या जोडीने आणून बसवितो, **२**- जो आप्तवाक्यावर शंका घेतो व **३**- जो वेदवाक्यावर शंका घेतो, त्या तिघांस अतिवादी म्हणतात.

२६८. नेहमी शंका कोणाविषयी घ्यावी ?

इंद्रिये व मन यांविषयी !

२६९. इंद्रियरोध होत नसल्यास कसे करावे ?

रोधापेक्षा चांगले काम असेल त्यात मन घालावे.

२७०. रोधापेक्षा चांगले काम कोणते असणे शक्य आहे ?

संतसेवा किंवा भक्तप्रेम !

२७१. कोणाचे शमदम निरर्थक आहेत ?

आळसाने करणाऱ्याचे !

२७२. स्त्रियांचा स्पर्श झाला असता ज्याला कामोत्पत्ती होणार नाही असा कोण आहे ?

शुक; किंवा ज्याच्या मनात भीती भरली आहे तो व षंढ ! तथापि भीती भरलेल्याचा देखील भरंवसा नाही, म्हणून स्त्रियांना स्पर्श न करणे हे उत्तम.

२७३. आपल्या इंद्रियांवर व मनावर विश्वास मागे कोणी टाकला होता काय?

कोण्याही शहाण्याने टाकला नाही.

२७४. सात्त्विक शमादि गुणही कोणाचे ठिकाणी दोषरूप होतात ?

आपत्काली सामर्थ्य असून जो आपणास वर काढून घेत नाही त्याचे ठिकाणी!

२७५. सत्त्व कशाला म्हणतात ?

धैर्याला !

२७६. केवळ शमदमादिकाला सत्त्व कां म्हणत नाहीत?

केवळ शमदमादिक स्वभावाने तामस अशा पशुयोनीतही असतात. गाई वगैरे स्वभावतःच मांस खात नाहीत म्हणून त्यांना अहिंसा धर्माचे फळ मिळते काय? संकल्पाचा जय केल्यावाचून स्वाभाविक सत्त्वगुणानेच जर मोक्ष होईल तर दगडासारखा कोणीच योगी नाही म्हणावयाचा? **''अशक्तः सहजः साधुर्वृद्धा नारी पतिव्रता''** हा उपहास अशा मूर्खाचा नव्हे तर कोणाचा ?

वाईट वृत्ती उत्पन्न होतात परंतु त्यांच्याशी जो नित्य युद्ध खेळत असतो तोच खरा सात्त्विक होय.

२७७. पण अशाने मनुष्याला सुख कसे मिळेल ?

बरे, असे न केल्याने तरी कोणाला सर्व सुख मिळते आहे काय ? खाटकांना बकरी चिरण्यामध्ये जसे सुख वाटते तसे महात्म्यांना ही वृत्तीची चेंदमार करण्यात सुख वाटते, झाले.

२७८.पण ब्रह्मज्ञानी हे वृत्तियुद्ध खेळतात काय?

होय.परंतु त्याला ते क्षात्रयुद्ध समजत नसून बुद्धिबळाचा खेळ समजतात, इतकेच. क्षात्रयुद्धात, सत्य समजल्यामुळे जसा जयपराजयाचा आनंद होतो पण ज्ञानी या वृत्तियुद्धाला मिथ्या समजत असल्यामुळे त्यांचा आनंद जयपराजयावर अवलंबून नाही.

२७९.मग ज्ञानी (वृत्ति युद्ध) **खेळतात कां ?**

प्रारब्धाने दिलेल्या करमणुकीचा द्वेष सत्य वाटू नये म्हणून!

२८०. सत्त्वाची परीक्षा समाधीत होते की व्युत्थानात?

ज्याप्रमाणे शूराची परीक्षा समरात होते, घरात होत नाही, त्याप्रमाणे सत्त्वाची परीक्षा व्युत्थानात होते. समाधी हा भित्र्या लोकांकरता आहे.

२८१. तर मग साधूला सत्त्वामुळे सहजसमाधि प्राप्त झाला तरी त्याने तो सोडून व्युत्थानात यावे?

छे, भलतेच समजलास ! शूराला घरात बसण्याची संधी आली म्हणून त्याने लोकांची घरेदारे जाळून नसते युद्ध उपस्थित करणे जसे योग्य नाही, तद्वत् साधूंनीही मिळालेला सहज समाधी सोडून बुद्धिपूर्वक व्युत्थानात येणे योग्य नाही. आलेल्या युद्धाला शूराने नाही म्हणू नये व उठलेल्या वृत्तींना साधूने तोंड देऊन असावे म्हणजे झाले.

२८२. मनोविकारांचा उपयोग करावा, रोध करावा, की नाश करावा?

विकारांची चौथी दशा तुला समजली नाही. विकारांच्या दशा चार आहेत. **नयन, रोध, उपयोग** आणि **नाश.** नाश सर्वांना संमतच आहे.

१- विकार नाहीसे झाल्यावर पुन्हा न उठणे याचे नांव नाश आहे. तो विदेहमुक्तीतच होतो.

२- विकार दबून राहणे याचे नांव रोध आहे. हा दोन प्रकारचा आहे. **आवृतरोध** व **अनावृतरोध;** पैकी प्रथम निद्रेत होतो व दुसरा समाधीतच होतो.

३- विकार जिकडे नेईल तिकडे वाहत जाणे याला **नयन** म्हणतात. हे कोणाला संमत नाही. सर्वदा झोप घेणे द्वाड समजले आहे.

४- सर्वदा समाधि राहणे शिखिध्वजासारख्यासही कठिण पडले आहे. विदेहमुक्ती तर तत्त्वज्ञानी मेल्यावांचून होत नाही; आणि विकार नेतील तिकडे जाणे तर दुष्टपणाचे आहे; म्हणून समाधी नसेल अशा वेळी व्युत्थानात विकारांचा उपयोगच करून घ्यावा असे माझे मत आहे.

१- परोपकारादि **विहिताची पुष्टी**

२- **निषिद्धाचा परिहार,** किंवा

३- सात्त्विकभूत्यर्थ **जनप्रचालन,**

इत्यादि विकारांचे योग्य उपयोग होत.

२८३. गुरु शत्रुत्व करूं लागल्यास कसे करावे?

मी एवढेच विचारतो की, ज्याने तनमन अर्पण केले आहे, त्याला हा प्रश्न कसा उद्भवतो? कारण, आपले स्वत्व शेष ठेवल्यावाचून शत्रुमित्रत्व संभवत नाही. आतां शिष्याचा आत्मा शेष राहतो, परंतु आत्म्यामध्ये शत्रुमित्रत्वभाव नसतो व गुरुशिष्यभावही अद्वैताला जातात.

आता व्यावहारिक गुरुविषयी जर तुझा प्रश्न असेल, तर तेथे आपली चुकी असल्यास आपण कल्माषपादाप्रमाणे वागावे; व गुरूची चुकी असल्यास अर्जुनद्रोणाच्या इतिहासाचे उदाहरण घ्यावे. - परंतु असे करताना देखील परलोकाची नियत आशा सोडावी.

२८४. शास्त्राला जेथे अडचण येईल तेथे गुरु पहावा; पण गुरूला अडचण येईल तेथे काय करावे?

सच्छिष्याच्या कारकीर्दीत गुरूला अडचण येत नाही. गुरूला अडचण येते असे ज्याला वाटते तो शिष्यच नव्हे.

२८५. मूर्ख लोक धर्माची नेहमी टवाळी करितात, ती ऐकून धर्म सोडून द्यावा असे वाटते ?

कां? कायद्याची टवाळी करणाऱ्या मूर्खांच्या भीतीने कोण्या राजाने आपले कायदे नाहीसे केले आहेत काय?

२८६. तनमनधन गुरूला अर्पण केल्यावर जपतपादिकात किंवा आत्माकारवृत्ती करण्यात स्वातंत्र्य कसे येते?

आज्ञेने, किंवा तदवशिष्ट निवेदित प्रसाद-याचनाने !

२८७. मंत्र, औषधी गुप्त कां ठेवाव्या ?

भोजनाप्रमाणे दृष्ट लागू नये म्हणून !

२८८. मानसपूजेमध्ये जे आपल्याला संशय उत्पन्न होतात.त्यांचे निवारण कसे करावे ?

मनास पुसावे. मनच प्रथमपासून योग्य समजले म्हणजे तसे संशय उत्पन्न होत नाहीत. अथवा सोवळ्या ओवळ्याची मानसपूजेला फार अपेक्षा धरू नये, म्हणजेही संशय उत्पन्न होत नाहीत.

आता अशुचि मानसपूजा हा दोष असेल पण संशय येणे हा त्याहीपेक्षा मोठा दोष आहे. अशुचि ध्यान करण्याचा जो निषेध सांगितला आहे ते ध्यान निराळे आहे.

२८९. कितीही दुःखे आली तरी ती कोण सहन करू शकतो ?

भगवन्निष्ठ !

२९०. संकटसमयी धैर्य कोणास येते ?

परमेश्वर दीनांचा सहकारी आहे, तो मला दूर टाकणार नाही, असे समजून जो त्यास शरण जातो त्यास !

२९१. निष्ठा दृढ कशी करावी ?

समजुतीने किंवा संवयीने !

२९२. समजूत म्हणजे काय ?

ईश्वराश्रयत्ववृत्ती !

२९३. योग्य हठ कशाला म्हणतात ?

उपपत्तिपूर्वक मन भगवन्निष्ठेपासून चळवीत असल्यास त्याला न जुमानण्यास !

२९४. निष्ठेतील मुख्य कठिणपणा व सोपेपणा कोणता ?

बसूं न देणे हा कठिणपणा व बसवून घेणे हा सोपेपणा !

२९५. निष्ठा आपोआप बसते की बसवून घ्यावी लागते ?

आपण होऊनही बसते व शहाण्यांना ठेवताही येते. ज्ञानावर उपपत्तीमुळे आपण होऊन बसते व कर्मादिकांवर ठेवावी लागते.

२९६. निष्ठा न बसेल तर कोठे तरी बसवून घ्यावी की आपोआप बसण्याची वाट पहावी ?

शहाणे तिला कोठे तरी बसवून घेतात; आणि मूर्ख आपोआप निष्ठा बसण्याची वाट पहातात. आपोआप निष्ठा बसण्याची वाट पहाण्याइतके आयुष्य कोणाच्या हातात नाही; व निष्ठेवाचून मेल्यास पुढच्या जन्माची सोय नाही म्हणून शहाण्याचे करणे तुला संमत असू दे.

२९७. भाषण युक्तीचे संमत मानावे की निष्ठेचे संमत मानावे ?

१. केवळ युक्तीचे भाषण कोठेच संमत मानू नये.

२. श्रुतियुक्ति अनुभवसहित भाषण ज्ञानात संमत मानावे.

३. आणि इतरत्र निष्ठेचेच भाषण संमत मानावे.

कारण ज्ञानावांचून सर्व युक्ती विकारात्मक असतात.

एका पुत्राला वैराग्य पाहिजे होते, म्हणून त्याने आपल्या बापाला पुत्रसुखापेक्षा युक्तीने रतिसुखाची श्रेष्ठता पटवून दिली. आणि एकाला पुत्र पाहिजे होता म्हणून त्याने रतिसुखादि सर्व सुखांपेक्षा पुत्रसुखाची श्रेष्ठता एका मुनीला युक्तीने पटवून दिली. अशा दोन कथा आहेत. म्हणून वस्तुनिर्णयाविषयी व्यवहारातही युक्तीची अपेक्षा असली तरी कर्तव्यनिर्णयात निष्ठेचेच महत्त्व अधिक आहे.

२९८. तर मग दुसऱ्याच्या निष्ठेबरोबर आपण वहात जावे काय ?

मुळीच नाही. आपली निष्ठा कायम ठेवून दुसऱ्याच्या निष्ठेला अनुमोदन द्यावे; किंवा तो जर आपली

निष्ठा हाणून पाडण्याचा प्रयत्न करीत असेल तर आपणही त्याची निष्ठा हाणून पाडण्याचा प्रयत्न करावा.

- परंतु हाणून पाडण्याचा हा मार्ग कनिष्ठ आहे, इतके समजून असावे.

२९९. निष्ठा मेल्यावर कायम राहते काय ?

होय. निष्ठा चांगली असो की वाईट असो, तिचा नाश कोणीच करू शकत नाही. धर्माचे वैर दुर्योधनाने नरकात सुद्धा सोडले नाही असे म्हणतात. इंद्रब्राह्मण व अहल्या नांवाची राजाची पत्नी हे दोघे व्यभिचारामुळे पशुयोनीत गेले, तरी आपल्या निष्ठेमुळे पतिपत्नीच झाले, अशी वासिष्ठात कथा आहे. तेव्हा चांगली निष्ठा मेल्यानंतर राहणार नाही हे कसे ?

३००. मोठ्या पाप्याला नरकही भितात. अशी भविष्योत्तर पुराणात कथा आहे. तेव्हा उगीच पुण्याच्या मागे लागून दुःख कां करवून घ्यावे? सारखे पापच करण्यास काय हरकत आहे?

अरे, ज्याच्या पायात जोडा असेल त्याने खुशाल काट्याच्या कुंपणावरून जावे, परंतु मोकळ्या पायाचा तो मार्ग नव्हे. त्याप्रमाणे परमेश्वरावाचून मरणार नाही व यमालाही दाद देणार नाही. इतकी ज्याची शक्ती असेल तो खुशाल वाटेल तसे पाप करो. पण तुझे तोंड तर आम्हाला एका चापटीने फिरविता येते, म्हणून तुझ्यासारख्या दुर्बळाचा तो मार्ग नव्हे. विषाची स्तने भरून पूतनेने पापमार्गाने परमेश्वर मिळविला. पण तू तर त्याच्या वासानेच मरशील ! तेव्हा विहित मार्गानेच जाणे उत्तम !

३०१. मग 'आज्ञा गुरूणां न विचारणीया' असे शास्त्र कां सांगते?

अरे, ते शास्त्र अशा कृत्यापासून पापच होत नाही. असे अभिवचन देते पण पूतनादिकांची गोष्ट अशी नाही. त्यांना पाप झालेच परंतु त्या पापाला त्यांनी आपल्या धैर्याने दाद दिली नाही. ''न विचारणीया'' इत्यादि शास्त्रवचनात तितके धैर्य नसले तरी चालते.

३०२. प्रियनिष्ठा या जन्मातच जर विकारात्मक असली तर दुसऱ्या जन्मात तिचा फायदा होत नाही असे म्हणतात; मग भीष्मादिकांची श्रीकृष्णावर भक्ती असताही त्याचा प्रत्यक्ष विरोध करून त्यांनी भगवंताला स्वर्गात कसे मिळविले ?

अरे शहाण्या! त्यांनी भगवंताशी विरोधबुद्धीने युद्धच केले नाही, तर दुष्टाच्या अन्नाने पाळलेला देह भगवंताच्या समोर सोडून द्यावा, अशा निष्ठेने ते केले.

३०३. कलीत अशी परिस्थिती आल्यास कसे करावे ?

भीष्मकर्णादिकांनी, त्यांना कृष्ण वळवीत असता, 'आम्ही मरून मोकळे होऊन तुला पावणार' असे स्पष्ट सांगितले, तसे सांगावे.

३०३. 'यस्यानुग्रहमिच्छामि तस्य सर्व हराम्यहम्' ज्याच्यावर मी अनुग्रह करतो त्याचे सर्वस्व हरण करतो असे भगवंताने म्हटले आहे.मग सुदामदेवाला सोन्याची नगरी कां दिली?

पण ते देणे, अत्यंत अनुग्रहात एक अडथळाच झाला, असे कोण म्हणत नाही ? रावणापेक्षा बिभीषणाला अडथळा झाला असे सर्वच समजतात.

शिवाय, ज्याची आसक्ति गुंतून पडेल असे असते, अशाचेच सर्व परमात्मा हरण करतो.

३०४. पण तुकारामांनी, पांडुरंगा आम्हाला आता कशाला उपाधीत टाकतोस? असे म्हटले आहे. अशा भक्ताविषयी परमेश्वर कसे वागतो?

त्याचा योग्य तो योगक्षेम चालवितो.

३०५. अहो पण पुष्कळ भक्त दुःखी दिसतात ना?

अरे, तुला दिसतात की ते होऊन सांगतात? पहिल्या पक्षी तुझ्यात कमीपणा असतो व दुसऱ्यापक्षी त्यांच्या भक्तीत कमीपणा असतो.

३०६. अहो पण आर्त भक्त देखील परमेश्वराला पसंत आहेत असे गीतेत म्हटले आहे ना?

आहेत. परंतु एकदम दहापांच देवाचे नवस करणारे नकोत. निष्ठावान पाहिजेत.

३०७. अहो पण एका देवापासून दुःख दूर झाले नाही तर दुसऱ्या देवाकडे जाण्याला काय हरकत आहे?

पुष्कळ प्रतिबंध आहेत.

१- एकतर, देव दोन नाहीत.

२- दुसरे एका देवात सामर्थ्य जर कमी आहे तर दुसऱ्या देवात ते जास्त असेल कशावरून?

३- तिसरे समान गुणाच्या एका पाण्याने तहान जात नाही म्हणून तशाच गुणाच्या एका दुसऱ्या पाण्याकडे धाव घेण्यासारखे ते हास्यापद आहे.

४- आणि शेवटी अशा निष्ठारहितांना कोणताच देव पावत नाही.

३०८. देव जर भक्तांची काळजी घेतो तर तो आमच्या तोंडात घास आणून कां घालीत नाही?

तूं भक्त नाहीस म्हणून. आणि प्रश्न विचारण्याची वगैरे काळजी तूं आपली तूंच करीत आहेत म्हणून.

३०९. शास्त्रात प्रायश्चितच नाही असे पाप कोणते?

कोठेही विश्वास नसणे असा नास्तिकपणा.**''अविश्वासियाचे शरीर सुतकी''** (श्री तुका०) असे साधुवर्याचे वचनही आहे.

३१०. जो कोणावरही विश्वास ठेवतो तो खात्रीने फसतो ना?

जो कोणावरही विश्वास ठेवीत नाही त्याचाहि खात्रीने नाश होतोच; म्हणून परमात्मा व गुरु, वृद्ध यांचे ठिकाणी दृढनिष्ठा ठेऊन तदन्वये व्यावहारिकांवर विश्वास ठेवून असावे.

३११. नास्तिकपणा कशाला म्हणतात व तो किती प्रकारचा आहे?

असत्प्रतीतीला नास्तिकपणा म्हणतात; तो दोन प्रकारचा आहे. प्रधान व गौण.

१- साक्षात् परमेश्वराचा निषेध करणे याला मुख्य नास्तिकपणा म्हणतात.

२- आणि परंपरेने परमेश्वराचा निषेध करणे याला गौण नास्तिकपणा म्हणतात. जसे -

१- कोणी ईश्वर मानतात, परंतु आत्म्याचे नित्यत्व मानीत नाहीत.पण असे मानणाऱ्यांचा ईश्वर, सुखी-दुःखी आत्मे व्यर्थ उत्पन्न करणारा व नीच ठरतो.

२- कोणी ईश्वर मानून जगत् अनादि मानीत नाही, अशांच्या ईश्वराची अवस्था वरीलप्रमाणेच होते.

३- कोणी कर्म व जगत् मानून ईश्वर मानीत नाहीत; ते साक्षात् जडवादी असल्यामुळे नास्तिक होत.

४- कित्येक ईश्वर मानून कर्म मानीत नाहीत त्यांचा तो ईश्वर विषम ठरतो.

वैदिक धर्मात हे सर्वच मानले आहे म्हणून तद्धर्मी आस्तिक होय.

३१२. भयंकर नास्तिकपणा स्थापिता येणे शक्य आहे की नाही?

मुळीच नाही.कारण पूज्यत्व हा एक बुद्धीचा घटक आहे; आणि तो कोणाचाही कोठे ना कोठे तरी राहणारच! आणि जेथे पूज्यत्व राहील; तेथे आपल्यापेक्षा वरिष्ठता आहे असे वाटणारच.

तसे झाले म्हणजे जडात विशेषता आहे असे मानावे लागणार;

मग चेतन परमेश्वरातच विशेषता मानण्यात काय हरकत आहे !

३१३. अहो, नग्न फिरणाऱ्या बायकांची लज्जा जशी नष्ट होते.तसा बुद्धीचा पूज्यपणा हा घटकही नष्ट होणे शक्य आहे?

नाही, कारण नग्न फिरणाऱ्या बायकांना दुसऱ्याने नग्न म्हटले असता वाईट वाटते. ज्ञान होईपर्यंत मनाची एक वृत्ती सोडीन म्हटले तरी सर्व मन नष्ट करण्याची पाळी येते.कारण स्थिरविकार परस्परसंबद्ध आहेत.

३१४. मग नास्तिकाला कोणी शिक्षक नाहीच म्हणावयाचा ?

असे नव्हे. नास्तिकपणा शास्त्रात दोष सांगितला असून त्या कर्माचे फळ त्याला झालेच पाहिजे.

नास्तिक सत्तेचाच अपलाप करतात. भावनेने प्रकाराचा अपलाप होतो सत्तेचा होत नाही. म्हणून नास्तिकाला शिक्षक आहेच.

३१५. तर मग अवतारादिक न मानणाऱ्या नास्तिकांना काही फळ नाही?

पहिलेपासूनच माहीत नसले तर काही फळ नाही. आणि माहीत असून न मानल्याने शास्त्रत्यागजन्य दोषाचे फळ आहेच.

३१६. खरा दुष्ट असेल तर प्रसादाचा त्यावर काय परिणाम होतो?

खऱ्या दुष्टावर केवढाही प्रसंग आला तरी प्रसादाचा काही परिणाम होत नाही. याविषयी एक पुरातन गोष्ट सांगतात. ती अशी :-

कावळ्याची गोष्ट

एक कावळा होता. तो प्रत्येक देवळात जाऊन काही तरी चोरून खात असे. त्यामुळे सर्व देव नपुंसक आहेत असा त्याचा समज झाला होता. पुढे एके दिवशी तो कावळा आजारी पडून मरणोन्मुख झाला.

तेव्हा त्याच्या जाती बांधवांनी त्याला सांगितले की, 'तुम्ही देवाला नवस केला म्हणजे तुमचा आजार जाईल.'

कावळा म्हणाला - 'मी सर्व देवांच्या देवळांवरील कळसावर हागून आलो आहे. तेव्हा कोणी देव मला पावेल असे वाटत नाही.'

तात्पर्य :- दुष्टाला पूर्वील कृत्ये आठवून, आता चांगले केले तर आपले चांगले होईल असे वाटतच नाही, तर आपण पूर्वी असेच केले आहे व पुढेही असेच करणार, असे वाटून तो खाली खाली जात असतो; व साधूचे सांगणे त्याच्यापुढे व्यर्थ होते. '

'आसुरीं योनिमापन्नां ... ततोयान्त्यधमां गतिम्' गीता.

असे आर्यपुत्र वचन आहे, आणि आसुरलोक प्रतिजन्मी मूर्खच राहून मला न मिळता खाली पडतात असा त्या वचनांचा अर्थ आहे.

३१७. बरे, तर मग पाप करून सवरून 'हम तों तुम्हारे ही है' असे जो म्हणतो तो यापेक्षां चांगला काय?

अर्थात् चांगला. पण देवाने क्षमाच केली पाहिजे, अशी त्याने इच्छा करू नये; तर देवाने शिक्षा केली तरी ''हम तो तुम्हारे ही है'' असेच त्याने समजले पाहिजे म्हणजे सर्व ठीक जुळते.

३१८. रागद्वेष गेले हे केव्हा समजावे?

रागद्वेषांचा द्वेष शांत होईल तेव्हा !

३१९. तोपर्यंत कसे करावे?

शुद्ध रागद्वेषांनी अशुद्ध रागद्वेषांचा जय करावा.

३२०. राग श्रेष्ठ आहे की द्वेष श्रेष्ठ आहे ?

तात्काल दुःख देण्यामध्ये द्वेष श्रेष्ठ आहे, आणि

सर्वकाल दुःख देण्यामध्ये राग श्रेष्ठ आहे.

- कारण एक शत्रू मेला म्हणजे द्वेष काहीतरी शांत होतो, पण हजारो विषय मिळाले तरी राग काहीच शांत होत नाही. रागावाचून द्वेष राहूही शकत नाही. म्हणून रागच दुःखमूलक आहे.

३२१. मानस अहिंसा सिद्ध होण्याचा सुलभ उपाय कोणता?

प्रातः काळी उठून, ''हे परमेश्वरा ! माझ्या मनात कारणावांचून किंवा केवळ माझ्याच उत्कर्षाकरिता ज्यांचा द्वेष उत्पन्न होतो परंतु त्यांच्या मनात माझ्याविषयीं काही नाही, अशाचे तूं कल्याण करीत जा; व ज्ञारक्षणाकरतां नीचहिंसा माझ्या हातून घडली तरी त्यांचे तूं रक्षण कर,'' अशी प्रार्थना करण्याने !

प्रयत्नवाद व दैववाद

३२२. दैव थोर की यत्न थोर? यातून मनुष्याच्या हाती काय आहे?

जे ज्या वेळी बलवान असेल ते त्यावेळी थोर ! परंतु मनुष्याच्या हाती दैव नसून यत्नच आहे.

३२३. दैव बलवान असेल तर काय करू शकते व काय करू शकत नाही?

दैव अनुकूल असून बलवान असेल तर थोडक्या यत्नाने पुष्कळ फल देऊन यत्नालाहि ते आपल्यात मिळविते. प्रतिकूल दैव बलवान असल्यास ते फलाचा प्रतिबंध करते; शुभ यत्नाचा नाश करू शकत नाही.

३२४. इच्छा नसूनही काय मिळते?

दुष्कर्माचे फळ !

३२५. वेदान्त प्रयत्नवाद शिकवितो कीं प्रारब्धवाद?

कपाळावर हात देऊन बसणाऱ्याला तो दैववाद शिकवितो आणि निधड्या छातीच्या मनुष्याला आत्मा नित्य आहे म्हणून तो प्रयत्नवाद शिकवितो.

३२६. गंभीर कोणाला म्हणतात?

ज्याची श्रद्धा केव्हाहि परमेश्वराहून ढळत नाही तो गंभीर होय.

३२७. बाणेदार कोणास म्हणावे?

१- जो मनुष्य विपत्तीत परमेश्वराला शरण जाऊन प्रयत्न करतो आणि संपत्तीत परमेश्वरावरच भार टाकून राहतो; २- झालेले कार्य परमेश्वराच्या कृपेने झाले असे समजतो, ३- होणारे कार्य परमेश्वरास स्मरून आपल्या प्रयत्नावर घेतो; आणि ४- कार्य न झाल्यास ईश्वरास दोष देत नाही, तो मनुष्य बाणेदार समजावा.

३२८. परमेश्वरावर भरंवसा ठेवणारे खरोखरच आळशी होतात काय?

मुळीच नाही.ज्यांना ''आम्ही शरण गेलो असता आमच्या प्रयत्नाला परमेश्वर अनुमोदन देणार नाही'' असे वाटते, तेच लोक परमेश्वरावर भरंवसा दाखवून आळशी होतात. त्यांना भक्तसाह्यकारी परमात्मा आहे हे पटलेले नसते. म्हणूनच आळस व भक्ती ही निराळी आहेत.

३२९. वासनात्याग दैववाद्याकडून होतो की प्रयत्नवाद्याकडून?

दोघांनाही वासनात्याग असतो. पण दैववादी वासनात्यागामुळे प्रेतासारखे उताणे पडतात व प्रयत्नवादी वासनात्यागामुळे फलाशा सोडून यंत्राप्रमाणे उपयोगी राहतात.

तथापि 'खरा वासनात्याग प्रयत्नवादीच करू शकतो' असे माझे मत आहे. कारण दैववादी एखाद्या फलाची इच्छा तर करतात, परंतु आळसामुळे त्याच्या साधनाकडे प्रवृत्त होत नाहीत. पण अकस्मात फळ चालून आले तर हे लुो लोक त्या फळाचा 'स्वेच्छेने' देखील स्वीकार करतात.

प्रयत्नवादी मात्र ज्या फळाला एकवेळ सोडतात ते फळ इंद्राने घरी आणून दिले तरी 'स्वेच्छेने' ते महात्मे त्याचा स्वीकार करीत नाहीत.

पुत्र असो अथवा पिता असो; दैवावर भरंवसा ठेवणाऱ्याला नमस्कार करून शहाण्याने त्याच्याशी योग्य वर्तनच ठेवावे; म्हणजे पिता दैववादी असेल तर नमस्कार करण्यापुरताच त्याच्याशी संबंध ठेवावा. बाकी महत्कार्यात त्याला विचारूं नये आणि पुत्र दैववादी असेल तर कायद्याचा अडथळा नसल्यास दत्तक घेणे बरे ! दैववादी बापाजवळ मुलाने आपली बायको ठेवू नये व दैववादी पुत्राजवळ बापाने आपली पत्नी ठेवू नये असे माझे स्पष्ट मत आहे. दैववाद खरा आहे म्हणून प्रयत्न सफळ होत नसला तरी,

रामादपि च मर्तव्यं मर्तव्यं रावणादपि ।
उभयोर्यदि मर्तव्यं वरं रामो न रावणः ॥

या मारिचोक्तीला अनुसरून शहाणे शुभ प्रयत्नाकडेच धांव घेतात. दैव हा अजिंक्य शत्रु असला तरी त्याच्या हातून युद्धात मरावे, म्हणजे स्वर्ग आंदण आहे. 'वाघ्या म्हणून खातो व वाघोबा म्हणूनही जर खातो आहे,' तर त्यांनी त्याला लाथ मारावी, मस्तक लववूं नये.

आता अत्यंत जर कोणी दैववादी असेल तर तो पिटल्याशिवाय रस्त्यावर येत नाही म्हणून त्याच्याशी वादही करू नये **'लाथेचे गाढव शब्दाने समजणारे नसते.'** माझे मत असे आहे की - ज्याला दैवाने स्वर्ग मिळाला आहे त्यापेक्षा प्रयत्नाने पाप करून नरकात जाणारा धन्य होय.

शाबास त्या दुर्योधनाची की धर्माने 'नरकातून बाहेर ये' अशी हाक मारिली असताही, खाली बुडी दिली, पण वर तोंड केले नाही. केवढा हा वासनात्याग! काय बरे चालते येथे यमाचे!

कैमुतिकन्यायाने ही कथा शुभप्रयत्नबोधिनी आहे.

३३०. परमेश्वराच्या भरंवशावर निश्चिन्त व्हावे या म्हणण्याचा अर्थ काय? अजगराप्रमाणे पडून राहणे असाच आहे ना?

होय, तसाच आहे; पण तितका परमेश्वरावर भरंवसा टाकून पडणे हा देखील प्रयत्नच होय. दिवसभर आळस कायम ठेवीन असे म्हणणे देखील प्रयत्नाशिवाय होत नाही; म्हणून हे भित्रे आळशी लोक अत्यंत लबाड असतात. शरणागताच्या प्रयत्नाला परमात्मा अनुमोदन देतोच.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परी तेथे भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥

३३१. ईश्वर दैवास अनूकूल असतो की प्रयत्नास अनुकूल असतो?

१ - संसारी लोकांचे दैव किंवा यत्न जे प्रबल असतील त्यांस अनुकूल असतो आणि

२ - शरणागताच्या प्रयत्नासच अनुकूल असतो .

३३२. ईश्वरावर विश्वास टाकणाऱ्यामध्ये काही प्रकार आहेत काय?

होय.१ - जो शुभ व अशुभ दोन्हीही ईश्वरावरच टाकतो परंतु ते टाकण्यातही त्याचा प्रयत्न असतो आळस नसतो, तो उत्तम होय.

२ - जी अशुभ कर्मे मी केली म्हणतो व शुभ कर्मे परमेश्वराने करविली म्हणतो तो मध्यम होय. व

३ - अशुभ कर्मे परमेश्वराने करविली म्हणतो व शुभ कर्मे मी केली म्हणतो तो अधम होय.

३३३. शुभाशुभ दोन्ही परमेश्वराकडे सोपविणे म्हणजे काय?

उदासीनपणाने त्यांचा साक्षी होणे!

३३४. ईश्वराच्या कृपेचे नांव सांगून जो पोट भरतो तो ढोंगी नव्हे काय?

ढोंगी तर खराच; पण स्वतःच्या प्रयत्नाविषयीच्या गप्पा मारून जो पोट भरतो तो त्याहीपेक्षा लुच्चा समजावा.

कारण ईश्वराच्या कृपेत अघटित सामर्थ्य आहे.म्हणून त्याच्यावर भरंवसा ठेवणाऱ्याची गप्पही प्रसंगी शोभते, पण जीवाच्या अंगी तशी शक्ती मुळीच नसल्यामुळे त्याचे आपल्या भरंवशावर गप्पा मारणे मुळीच शोभत नाही.

३३५. आईने देखील कित्येक वेळेला मूल कापून टाकल्याच्या गोष्टी आपल्या ऐकिवात आहेत !

पण ह्या गोष्टी आईवरच अवलंबून असणाऱ्या मुलांच्या कानावर नसतात, आणि त्यावेळी कानावर टाकल्या तरी त्यावेळी मूल काय करू शकते? तेव्हा अशनिपातादिकांप्रमाणे ते दैविक दुःख आहे असे समजावे लागते.आईप्रमाणे आंगात बळ आल्यावर ह्या गोष्टी ऐकल्यास आपल्या आईने आपल्यास तसे केले नाही असे समजून त्या सोडून द्याव्या लागतात.

याप्रमाणे ब्रह्मज्ञानानंतर काही कर्तव्य उरत नसल्यामुळे अध्यात्मज्ञानदायक गुरुविषयीही समजावे.

३३६. तर मग प्रयत्नाला मार्ग कसा?

एकगतिवृत्तिकाला प्रयत्नोपदेश नाही.बालक हे आपल्या मातेविषयी एकगतिवृत्तिक असते.सच्छिष्य त्यापेक्षा एकगतिवृत्तिक असतो.आई ज्याप्रमाणे मुलांना प्रयत्न करावयास सांगते, त्याप्रमाणे स्वात्मबोधच करावयाचा असल्यामुळे सद्गुरूहि शिष्यास प्रयत्न करण्यास सांगतात; पण प्रयत्नोपदेशवाक्य समजेल तेव्हाच!

३३७. तर मग अज्ञान्याला दैवच मारण्याला समर्थ आहे म्हणावयाचे?

होय, पण ते त्याला पाळण्यालाही समर्थ आहे.

३३८. मग प्रयत्नावर आपला विशेष भर कां?

तो अज्ञान्याकरता नाही; तर अर्धवट ज्ञानी, जबरदस्तीने जो आपल्याला दैवात घुसडून घेत असतो, त्याकरता आहे.

कुटुंबाच्या मोहामुळे जो महत्कार्यात बिकट परिस्थिती आहे असे समजून मागे परततो, तो जिवंत असून मेलेलाच आहे.

३३९. अहो पण मरून देखील सत्कार्य पुरे झाले नाही तर त्यात काय अर्थ? व मग प्रयत्नाची प्रशंसा ती काय?

अरे पण मरून देखील कुटुंबाच्या आशा परिपूर्ण झाल्या नाहीत तर त्यात तरी काय अर्थ? आणि त्या होतच नाहीत.

पुरुषाने दुसऱ्याला सावली देत देत सुकून मरणाऱ्या झाडासारखे सुकून मरणे चांगले, परंतु बिळांतील लठ्ठ उंदिराप्रमाणे वाचणे योग्य नाही.

शिक्षण

३४०. शिक्षण कसे द्यावे?

जुने नष्ट न होऊन नव्याची भर पडेल असे!

३४१. दुसऱ्या जातीतून किंवा कुळातून गुण घेण्याविषयी आपले काय मत आहे?

कोठूनही गुण घ्यावे असेच माझे मत आहे. परंतु तेच गुण आपल्या जातीत किंवा कुळात असले तर त्यांची उपेक्षा करून दुसरीकडून जे गुण ग्रहण करितात, ते मूळ तोडून झाडाला कुंपण घालणाऱ्याप्रमाणे मूर्ख आहेत.

३४२. विद्येविषयी संशय असेल तर तिला कोठे स्थापन करावे?

आपल्या पक्षात !

३४३.जे गुण आपल्याजवळ नाहीतच ते दुसरीकडून घ्यावे की नाही?

अर्थात्.घेतलेच पाहिजेत.

३४४. ज्ञा व नीच सर्व गोष्टी ज्याला पाहिजे आहेत असा कोण आहे?

लोकयात्रा म्हणून घेण्याची ज्याला अपेक्षा आहे तो !

३४५.व्यवहार सर्वांना ठाऊकच आहे, तर त्याचे शिक्षण कशाला पाहिजे?

ठाऊकच असलेल्या गोष्टीतच चुका न होऊ देण्याकरता !

३४६. व्यावहारिक गोष्टी कशाला म्हणतात?

दैनंदिन, मासिक, किंवा वार्षिक ज्या गोष्टींची ऐहिक सुखाकरता नित्य जरूर लागते त्या गोष्टी, शास्त्रीय असोत किंवा लोकांच्या अनुभवाने ठरलेल्या असोत, सर्व व्यावहारिक समजाव्या.यांचा नीतिशास्त्रात समावेश होतो आणि नैमित्तिक गोष्टींची शास्त्रे निराळी आहेत.

वेदान्तात ब्रह्मज्ञानावाचून सर्वांसच व्यावहारिक म्हटले आहे.

३४७. जुने व नवे कोणते चांगले व त्याज्य?

या प्रश्नाचे उत्तर गुंतागुंतीचे आहे; तथापि -

१- संस्काराने ज्या गोष्टी जुन्या होतात त्या सर्व जुन्या चांगल्या, व अवस्थेने ज्या जुन्या होतात त्या सर्व जुन्या वाईट!

२- संस्काराने होणाऱ्या नव्या गोष्टी अविश्वसनीय व अवस्थेने होणाऱ्या नव्या गोष्टी चांगल्या, असे माझे स्पष्ट मत आहे.

औषधीच्या जुन्या-नव्या विषयी वैद्यकशास्त्र प्रमाण आहे, त्याविषयी सांगणे नको.

संस्कार म्हणजे लोकांची समजूत, भावनाविशेष इत्यादि अर्थ समजावा.

३४८. ग्रंथाप्रमाणे मनोवृत्ती बनवावी की मनोवृत्तिप्रमाणे ग्रंथ करावे?

धार्मिक ग्रंथाप्रमाणे मनोवृत्ती बनवावी; म्हणजे प्रत्येक धार्मिक ग्रंथ आपण आपली समजूत करून घेण्याकरता वाचीत आहो अशा समजुतीने वाचावा आणि - काव्य, नाटके वगैरे मनोवृत्ती प्रमाणे वाचावीत, म्हणजे प्रत्येक काव्य नाटकाबरोबर वाहत जाऊ नये तर आपल्याला त्यापासून स्वतंत्र ठेवावे.

३४९. व्यावहारिक विद्या धर्मसापेक्ष असून ती दुर्मिळ असेल तर कशी मिळवावी?

कर्णाने परशुरामाजवळून मिळविली तशी; पण कचाचे अनुकरण करावे.पारमार्थिकी विद्या मात्र अशा रीतीने मिळविली असता नाश होतो.

३५०. विद्या चोरून नेली आहे, असे समजल्यास कसे करावे?

नाथाने इंद्राविषयी जसे केले तसे.ही कथा नवनाथभक्तिसारातून पहावी. इंद्राने चोरलेल्या वाताकर्षक विद्येबद्दल 'नाथपंथीचा छळ न होईल तर ही विद्या फळेल, नाहीतर फळणार नाही' असा नाथांनी इंद्राला शाप दिला.

३५१. महत्त्वाच्या संपादलेल्या विद्येस गुरुकुलशाप मिळाला तर कसे करावे?

स्वतपाने उज्वल राहून कचाप्रमाणे विद्या अन्यास सांगावी म्हणजे फळते.

३५२. एखादी उपयुक्त शास्त्रीय गोष्ट मुलाच्या किंवा मुलीच्या तोंडातून निघाली तर उदाहरणार्थ घ्यावी, की ग्रंथांत नाही म्हणून तिचा त्याग करावा?

त्याग करू नये.अलौकिक आर्षादि प्रत्यक्षामध्ये अकस्मात् योगज उदाहरण देताना -**'यथा कन्यका ब्रवीति श्वो मे भ्राताऽऽगन्तेति हृदयं मे कथयति'** इत्यादि उदाहरणे प्रशस्तपादभाष्यकारांनी व न्यायकंदलीकारांनी आपल्या वैशेषिकशास्त्रात दिली आहेत.याचा भावार्थ असा :-

साधारण माणसालाही एखादे वेळेला त्रिकाल ज्ञान उत्पन्न होते.जशी एखादी मुलगी म्हणते,'माझा भाऊ उद्या येईल असे माझे मन सांगते'.प्रशस्तपादभाष्यात हे उदाहरणच दिले आहे पण वराहमिहिरांनी याचा शास्त्रीयत्वेकरून स्वीकारही केला आहे.

मानसतारायंत्र (टेलीपॅथी) व मनोजगत्, तारायंत्र (टेलेस्थेशिया), मानसचिकित्सा (मेंटल हिलिंग), मानसप्रतिमाग्रहण (सायकोग्राफी), मनसैतिहातिवह (सायकोमेट्री) इत्यादी तिकडील सर्व गोष्टी अशा ज्ञानावरच उभारलेल्या आहेत; तथापि या ज्ञानास ऋषींप्रमाणे सातत्य नाही, असे कंदलीकरांनी म्हटले आहे, तेच बरोबर आहे; म्हणून तिकडील या शास्त्रांनाही योगाप्रमाणे सातत्य नाही.

काही पुराणात व शूद्रकमलाकरादि ग्रंथात 'कलीत प्रत्येकाचे बोलणे शास्त्रच होईल' असा जो उपहास केला आहे, तो धर्म किंवा अध्यात्मशास्त्राविषयी नाही.

३५३. चौसष्ट कलांच्यामध्ये शिवणकाम वगैरे अशासारख्याही काही कला आहेत, त्या शिकण्याची श्रीमंताला आवश्यकता काय?

श्रीमंताने दुसऱ्याच्या गुणाची पारख करण्याकरता विद्या शिकाव्या व गरीबाने पोटाकरता शिकाव्या असे तीर्थस्वरूप कृष्णरावकाका अजनासवाले यांचे म्हणणे मला संमत आहे.

मूर्ख

३५४. मूर्ख प्रेमाने न ऐकेल तर त्याला कसे वाटेवर आणावे?

साध्या मूर्खाला भीती दाखवून व पढत मूर्खाला पिटून !

३५५. विकार व विचार कशाला म्हणतात?

यत्नावाचून अंतःकरणाची वृत्ती उत्पन्न होण्याचे नांव विकार आहे; आणि यत्नपूर्वक अंतःकरणाची वृत्ती उत्पन्न होण्याचे नांव विचार आहे.

३५६. उपदेश कोणाचा ऐकूं नये?

शास्त्रापेक्षा बुद्धी ज्याला वरिष्ठ वाटते त्यापासून !

३५७. बुद्धीने कोठे स्वतंत्र असावे व कोठे परतंत्र असावे?

कलाकौशल्य दाखविण्यामध्ये स्वतंत्र असावे; व
धार्मिक संबंधात नेहमी परतंत्र असावे.

३५८. आपल्या बुद्धीला पटत नाही तर दुसऱ्याच्या वचनावर विश्वास कां ठेवावा?

आईच्या वचनादिकांवर आपण विश्वास ठेवीत आलो आहो व आताही अडले म्हणजे आपण दुसऱ्यास विचारतो म्हणून ! शिवाय, बुद्धि फसवितच नाही असे नाही, आणि विश्वास फसवितोच असेही नाही.

आपण जर पूर्वी दुसऱ्याला फसविले असेल, तर दुसराही आपल्याला फसवील; म्हणून आपले पाप धुऊन गेले असे समजून समाधान मानण्यासही जागा रहात नाही.

पुनः फसविल्यावरही विश्वास ठेवणाऱ्याला पुढे वाट फुटते, याविषयी जसा पुरावा आहे; तसा फसल्यावरहि बुद्धीवर विश्वास ठेवणाऱ्याला पुढे वाट फुटतेच याविषयी पुरावा नाही, तर उलटी त्याची वाट खुंटतेच असा पुरावा आहे. - देव,गुरु,संत इत्यादिक पारमार्थिक जी नाती आहेत, त्यांच्या विषयीच हा नियम समजावा, असा आर्यधर्माचा डंका वाजतो.

कौलिक (कुलासंबंधी), व्यावहारिक नात्याविषयी तर **'शठे शाठ्यं समाचरेत्'** किंवा **''जशास तसे''** हा नियम अबाधित आहे.

३५९. नित्य शृंखला कोणाच्या पायात असते?

लोकांवांचून कोणत्याही कार्यात ज्याला आपली बुद्धि खर्च करिता येत नाही त्याच्या !

३६०. बुद्धीला न पटल्या तथापि काही गोष्टी कराव्यात की काय?

होय. मोठेपणाच्या सर्वच गोष्टी कराव्यात. मग त्या बुद्धीला पटोत की न पटोत.

१- भावालाही सोडून युधिष्ठिर कुत्र्याकरता स्वर्गाला जाण्याचे रहित करीत होता; ही एक मोठपणाची गोष्ट होय.

२- भीष्म, द्रोण हे दुर्योधनाचे पैशाने बांधलेले असूनही त्यांनी युधिष्ठिराला चांगला सल्ला दिला; हाहि मोठेपणाच होय.

३- 'मी या दीनांना सोडून मोक्षाला येणार नाही.' असे जे प्रल्हाद भागवतात म्हणाला, हाही मोठपणाच होय.

४- सूर्यनारायणाने सांगूनही कर्ण युधिष्ठिराला जाऊन मिळाला नाही, हाहि त्याचा मोठेपणाच होय.

तात्पर्य, 'बदला घेण्याची इच्छा नसून ज्यात धीर,वीर व उदार ह्या तीन गोष्टी दिसून येतात त्याला

मोठेपणा म्हणावे.'

३६१. यत्नानेच जर बुद्धि वाढते तर ईश्वरकृपेची किंवा गुरुकृपेची अपेक्षा कां करावी?

अभ्यास यत्नाने होतो, पण समयसूचकता आणि स्मृति ह्या यत्नाने येतात असे म्हणता येत नाही. तसे म्हटले तर स्मृति आणि ध्यान यांमध्ये फरकच राहणार नाही. मोठ्या विद्वानाला देखील समयी समयसूचकता कमी असते.महात्म्या कर्णाला देखील गुरूच्या अवकृपेमुळे प्रसंगी ब्रह्मास्त्र आठवले नाही, असे महाभारतात म्हटले आहे.

सद्वृत्तनिमित्तक स्मृति असते असे कित्येकांचे मत आहे खरे, परंतु एखादे अक्षर आठवल्यास पुढचा श्लोक आठवतो. पण मागचे आठवण्यास फार कठिण जाते असे नित्य आपण पुष्कळांविषयी पाहतो.

कितीही यत्न केला तरी एखादी गोष्ट आठवत नाही. पण झोप झाल्यावर ती आठवते, असे पाश्चिमात्य मानसशास्त्रवेत्ते म्हणू लागले आहेत.

स्मृति आल्यावर ती राखून ठेवणे यत्नाच्या स्वाधीन आहे.पण स्मृति आणणे यत्नाच्या स्वाधीन नाही, असा सर्वांचा अनुभव आहे.

'स्मृति व ध्यान एक नव्हे' असे स्वामीविद्यारण्यहि म्हणतात.

आर्यपुत्रांचेही 'माझ्यापासूनच स्मृती आहे' असे म्हणणे आहे.

(मत्तः स्मृतिर्ज्ञानम् अपोहनं च । गीता)

३६२. पण योगशास्त्रात संस्कारसाक्षात्काराने पूर्वजन्माची स्मृति येते असे मानले आहे ना?

तेथे संयम सांगितला आहे. संयमाला समाधीची अपेक्षा असल्यामुळे, समाधीने प्रसन्न झालेला परमात्माच सर्व काही देतो, असे म्हणण्याला हरकत नाही. शिवाय योग्यांचा गुरूवर व ईश्वरकृपेवर नितांत विश्वास असतो. म्हणून अभ्यास खेरीज करून बाकीचे सर्व ज्ञान गुरु व ईश्वरकृपेनेच येते असे शहाण्यांनी उमजले पाहिजे.

३६३. शास्त्रात बुद्धि चालवावी कोठे?

ज्या गोष्टी शास्त्र जीवाच्या अनुमानावर सोपवून देत असेल तेथे !

(१) जसे आयुर्वेदात सांगितले आहे की रोगाचे नांव माहीत नसल्यास वैद्याने भिऊ नये, तर दोषाची चिकित्सा करावी.

(२) याप्रमाणे धर्मशास्त्रात जी गोष्ट सांगितली नसेल ती दोन शास्त्रवेत्ते ब्राह्मण सांगतील तशी समजावी, असे मुनींनीच सांगून ठेविले आहे. तेव्हा अशा ठिकाणी बुद्धि चालविण्यास प्रत्यवाय नाही.

(३) तथापि बुधजनवितंडा येथेही टाळली पाहिजे.कारण असेच श्री भगवत्पूज्यचरणाचार्यांचे म्हणणे आहे. *(बुधजनैर्वादः परित्यज्यताम्)*

याप्रमाणे धर्माविषयी नियम असून, व्यवहारात तर सामान्य मूलतत्त्वाचा ज्या रीतीने विशेष अनुभव येईल त्या रीतीने बुद्धि वाटेल तशी चालवावी असे माझे स्पष्ट मत आहे.

३६४. दुष्प्रमाण कशास म्हणावे?

एखाद्या शास्त्रातील विशेषांशांना सामान्यभूत झालेली वचने दुसऱ्या शास्त्रास लावणे.

जसे - वैद्यशास्त्रात म्हटले आहे की -'ज्या झाडाचे अंग सांगितले नाही त्याचे मूळ घ्यावे.' या आधारावरून तांदूळ शब्द पाकशास्त्रात आला असता त्याचे मूळ जर कोणी भाताकरता घेईल, तर ते दुष्प्रमाण समजावे. पण सामान्य अर्थान्तरन्यासास ही गोष्ट लागू नाही.मेघाला सांगितलेल्या यक्षनिरोपावरून 'कामाने दीन झालेले पुरुष जडचेतन ओळखत नाहीत' असे जे कालिदासाने म्हटले आहे, तो अर्थान्तरन्यास होय.

३६५. शास्त्रे वाचूनही कोणाला बोध होत नाही?

जो आपली मते पूर्वीच ठरवून टाकून ती सिद्ध करण्याकरता शास्त्रे वाचतो त्याला !

३६६. तर्काची व शास्त्रांची कशी योजना करावी?

१– नास्तिकपणाच्या खंडणाकरताच फक्त तर्काची योजना करावी; आणि २- आस्तिक शास्त्रांवर विश्वास ठेवून डोळे लावून चालावे.

३६७. उद्धट कोण?

१- आपल्या चांगल्या कृत्याची प्रसिद्धी करून वाईट कृत्ये झांकणारा.

२- बुद्धीच्या जोरावर शास्त्रीय विषय समजतो असे म्हणणारा आणि

३- दुसऱ्याच्या दोषाने आपल्या क्रियेचे समर्थन करणारा. हे तीन उद्धट समजावे.

३६८. कोण कोठे युक्तीची अपेक्षा करतो व कोठे करीत नाही?

१- विषयी मूर्ख जन आपल्याला आवडते त्या ठिकाणी युक्तीची अपेक्षा करीत नाही व जे आवडत नाही त्याविषयी युक्तीची अपेक्षा करतो

२- शहाणा आवडते तेथेही युक्तीची अपेक्षा करितो, पण गुरुशास्त्रवाक्याचे ठिकाणी युक्तीची अपेक्षा करीत नाही.

३- नास्तिक सर्वत्र युक्तीची अपेक्षा करतो; आणि

४- जीवन्मुक्त कोठेहि युक्तीची अपेक्षा करीत नाही.

३६९. तीक्ष्ण बुद्धिमान् कोण?

न शिकलेल्याच्याही समयी सुचलेल्या वाक्यातून जो सार निवडतो तो!

३७०. बुद्धिमान् असला तरी नियमाने कोण नरकास जातो?

१-शास्त्रावर वाद करतो तो.

२- सर्व आपले शत्रुच आहेत, त्यांना आपण बुद्धीने पराभूत केले पाहिजे असे समजतो तो.

३- अनुमानावरच विशिष्ट धर्मनिर्णयाची अपेक्षा धरतो तो.

४- बुद्धीमुळेच ऋषींच्या वर्तनातील दोष काढतो तो. व

५- आईबाप मूर्ख म्हणूनच त्यांना जो नमस्कार करीत नाही तो !

हे पाच बुद्धिमान् असले तरी नियमानेच यमाचे पाहुणे होतात.

३७१. आपल्या बुद्धीनेच जर तत्त्व निवडता येते, तर कोण्यातरी गुरूवर कां विश्वास ठेवावा?

१ - आपल्यावर कोणी विश्वास ठेवावा असे जर वाटत असेल तर आपणही कोठे तरी विश्वास ठेवलाच पाहिजे.

२ - आपण जसे वडिलांशी वागलो असूं, तशीच आपली मुले आपल्याशी वागतील यात संशय नाही.

३ - प्रसंगी बैलाने आपले ऐकिले नाही तर आपल्याला बरे वाटत नाही. इकडे लक्ष ठेवून बुद्धीच्या स्वातंत्र्याची घमेंड सोडावी.

३७२. बुद्धीला स्वातंत्र्य अगदीच नाही काय?

अवश्य आहे, पण जे विश्वासाचे काम तिने हाती घेतले असेल ते करण्यातच तिच्या स्वातंत्र्याचा मोठेपणा आहे.

३७३. वेदान्त आपल्याला स्वातंत्र्य शिकवितो की पारतंत्र्य?

वेदान्ताच्या दृष्टीने अतिस्वातंत्र्य व अतिपारतंत्र्य दोन्ही एकच आहेत; कारण -

(१) अतिपारतंत्र्य म्हणजे आपली शक्ति नाहीशी करून जी एक महती शक्ति असेल तिच्यात मिळून जाणे होय; आणि

(२) अतिस्वातंत्र्य म्हणजे सर्वशक्ति आपल्यात मिळवून घेऊन आपणच महती शक्ति होणे होय.

हा स्वातंत्र्यपारतंत्र्याचा भ्रम मधला आहे. मध्यम गोष्ट कधी तत्त्वस्वरूप होत नसते, ती सर्वदा

व्यवहारातच असते, इकडे लक्ष देऊन मध्यम आहे तोपर्यन्त आपली धडपड सोडूं नये.

एखादे काम झाले नाही म्हणजे जे वाईट वाटते, ते परतंत्रतेमुळे वाटत नाही, तर वाईट वाटून घेण्यात आपण स्वतंत्र आहो असे वाटते म्हणून ! कारण तशीच परिस्थिती दुसऱ्याला आली असता वाईट वाटत नाही.

३७४. जो 'वादात आम्ही कुंठित होतो, पण आम्हास पटत नाही' असे म्हणतो, त्यास काय म्हणावे?

'पटवून देण्याकरता तुझा चाकर नाही' असे म्हणून त्यास घालवून द्यावे, किंवा सामर्थ्य असेल तर शाप द्यावा. कारण अशाला शास्त्रात सारस्वतशत्रु म्हणतात.

आपल्या बोलण्याप्रमाणेच कबूल करावे असे या मूर्खाचे म्हणणे असते.

आता मोठ्या विद्वानालाही प्रसंगी अज्ञानी मनुष्य कुंठित करतो, ही गोष्ट खरी आहे; परंतु ज्या रीतीने अज्ञानी मनुष्य विद्वानाला कुंठित करतो, त्या रीतीने तो विद्वान मनुष्य विद्वान नसतो. सर्वच रीतीत मी विद्वान आहे अशा भ्रांतिमुळे या पढतमूर्खाला अज्ञान्यापासून पराभव पावल्याचे वाईट वाटते. षट्शास्त्र-पंडित झाला म्हणून वखर वाहण्यामध्ये कुणब्याला जिंकू शकेल काय? किंवा जोडा शिवण्यामध्ये चांभाराच्यावर उडून जाईल काय? सर्वज्ञ परमात्माच आहे अशी सर्वांनीच जाणीव ठेविली पाहिजे.

विद्येतील उणेपणा नेहमी विनयानेच भरून निघत असतो.

३७५. मनुष्याची बुद्धि प्रारब्धाच्या स्वाधीन आहे काय?

बुद्धी व प्रारब्ध इत्यादी गोष्टी शास्त्रगम्य आहेत; तेव्हा शास्त्रानेच त्याचा निर्णय केला पाहिजे. शास्त्राने बुद्धीला सात्त्विक म्हटले आहे; तेव्हा प्रारब्धानुसार इच्छा उत्पन्न झाली तरी बहुतेक शुभच झाली पाहिजे.

अशुभ कर्मात मनुष्याचा प्रयत्नच प्रधान होईल. अशुभ कर्मात जर प्रयत्नाची प्राधान्यता दिसते, तर शुभ कर्मांत किती प्राधान्यता असेल हे कैमुतिक न्यायानेच सिद्ध होत आहे.

इच्छा जर प्रारब्धाने झाली असती तर दुःख भोगण्याचीही झाली असती, पण प्रारब्धाने दुःख भोगीत असताही इच्छा सुखाचीच होते. अनिष्ट कामे सुद्धा मनुष्य सुखाच्याच आशेने करतो.

आता तो त्याचा भ्रम आहे खरा; पण प्रारब्धाने भ्रम उत्पन्न होत नसतो; उलटे भ्रांतीनेच कर्म निर्माण होत असते; नाही तर अविद्या देखील कर्मजन्य व कर्मनाश्य होईल, ज्ञाननाश्य होणार नाही. म्हणून - ईश्वर शुभच शिकवितो म्हणणे बुद्धीच्या सात्त्विकत्वास्तव बरोबर आहे.

मन विषयक

३७६. मनास प्रसन्न करणाऱ्यांमध्ये मुख्य काय आहे?

१. सज्जनांची मैत्री व २. दुर्जनांची उपेक्षा, ह्या दोन गोष्टी मनास प्रसन्न करणाऱ्यांमध्ये मुख्य आहेत.

३७७. न सहन होणारी अशी आपत्ती कोणती?

मनाचा भयंकर नास्तिकपणा!

३७८. कोणत्या शंका निरर्थक समजल्या गेल्या आहेत?

१ - पुरावा नसता स्त्रियांच्या व्यभिचाराविषयी शंका घेणे, २ - एकाने एकाला फसविले म्हणून आपल्यासही कोणी फसविल असे मानणे, ३- प्रत्यक्ष गोष्टीविषयीही भविष्यकालचा आरोप करून तर्क करणे, ४ - तसेच भविष्यत् चांगल्या परिणामाविषयी वर्तमानकालाचा आरोप करून शंका घेणे; हे चार संशय सर्वथा निरर्थक समजले गेले आहेत.

३७९. मन मस्तकात राहते असे पाश्चात्य म्हणतात व हृदयात राहते असे आपल्याकडे म्हटले आहे, यातील खरे कोणते?

यातील खरे निराळे आहे. एका पाश्चात्य तत्त्ववेत्यानेही मनाचा आशाभाग हृदयात राहतो, असे महाभारताच्या आधाराने म्हटले आहे, याविषयी अदृश्य शास्त्राची मूलतत्त्वे (एलीमेंटस ऑफ मेटॅफिजिक्स-बाय, पॉल ड्यूसन) हा ग्रंथ पहावा. याचे भाषांतर मराठीत नाही. हा ग्रंथ गुरुण्डीत (इंग्रजीत) आहे. आपल्या इकडेही महाभारतात आत्मा मस्तकात असतो, असे धर्मव्याधाने म्हटले आहे.

वास्तविक आत्मा व मन हे मस्तकात किंवा हृदयात नाहीत, वाटेल त्या ठिकाणी शरीरात संचार करण्याचे त्यांच्यात सामर्थ्य आहे.

ध्यान करणे मस्तकाच्या पोकळीत सुलभ नाही. हृदयाच्या पोकळीत सुलभ आहे. मस्तकाच्या पोकळीत ध्यान केले असता मस्तक दुखूं लागून मनुष्य लवकर वेडा होतो. ज्याला फार स्वप्ने दिसतात त्याला कोणता तरी मेंदूचा रोग होऊन तो वेडा होतो, असे पाश्चात्यवैद्यशास्त्राचे म्हणणे आहे.

याप्रमाणे विवादच जर आहे तर आर्यांचे म्हणणे जे हृदयात मन आहे तेच बरोबर आहे. केवळ स्थूल परिणामांवरूनच आर्य बोलत नाहीत, तर सूक्ष्म वस्तूंचा परिणाम पाहून वस्तूची स्थिति ठरवीत असतात.

मुलांना भावनावादापेक्षा सत्तावादच जरूरीचा असतो, म्हणून हृदयात मन आहे हे बरोबर आहे.

वर शाप, शकुन अपशकुन

३८०. कलीतही शाप लागतो असे तुम्ही म्हणता; तर ज्याला कोणी व्यर्थ शाप दिला आहे त्याने कसे करावे?

व्यर्थ असो की सार्थ असो, चित्तास शाप लागत नाही असे योगवासिष्ठात म्हटले आहे. म्हणून शापाचे वेळी चित्त दुसऱ्या सद्‌गुणांनी खंबीर करावे, असे महाभारतातहि सांगितले आहे.

३८१. व्यर्थ शपथेचा प्रतिकार कसा करावा?

उगे न राहता, 'मी मानीत नाही' असे म्हणून ! पण रामायणात वगैरे ज्या शपथा सांगितल्या आहेत त्या मात्र अशा नव्हेत; त्या न पाळल्या असता पातक होतेच; म्हणून संपत्काली त्या होईल तितक्या पाळाव्या.

३८२. दृष्टिदोष वगैरे खरे मानावेत काय?

होय. कारण मनुष्याचा स्वभावच असा आहे की जो विकार मनावर असेल, तसा त्याचा शरीरावर परिणाम होतो. दहापाचजणांनी तुला ज्वर आला आहे म्हटल्यास ज्वर येतो.

३८३. तर मग दृष्टिदोष होऊच नये, कारण हा चांगला आहे असे म्हणण्यामध्ये मनाची अनुकूलताच झाली?

नाही. दृष्ट होते ती अशा प्रकाराने होते की 'इतका हा चांगला न व्हावा, अशी त्यात गुप्त इच्छा न कळत उत्पन्न होते.' नाही तर 'चांगला व्हावा' या चिंतनाचीही दृष्ट लागली असती. किंवा याच्यापुढे चांगला होणे शक्य नाही असे मनाला वाटत असते. त्यामुळे मन खाली धाव घेते; व त्याच्या शरीरावर वाईट परिणाम होतो.

मनाचा परिणाम दृष्टीच्या द्वारानेच कसा होतो याविषयी महाभारतातील सुलभाख्यान व विपुलाख्यान उत्तर देण्याला समर्थ आहे.

३८४. शकुनापशकुन खरे कशावरून? कारण घुबडीला हिंदू अपशकुन समजतात व काही अनार्य त्याला शकुन समजतात?

येथे शास्त्र प्रमाण आहे कारण सर्व विधवा अपशकुनी असल्या तरी माता अपशकुनी होत नसते, असे शास्त्र म्हणते.

शिवाय, ज्या देशात जी समजूत हजारो माणसांची झालेली असते ती वारंवार तशा प्रकारच्या

घडलेल्या गोष्टींवरूनच झालेली असते. अर्थातच तिला एकट्या मनुष्याकडून टोल देणे शक्य नसते.

शिवाय, वारंवार घडणाऱ्या गोष्टीत काही तरी गुप्त नियम असतो. मुंग्यांना पाऊस कसा कळतो हे जरी आपल्यास ठाऊक नसते, तरी त्यांची अंडी व खाद्ये सुरक्षित ठिकाणी ठेवण्याकरता घेऊन जाण्यावरून आपल्याला पाण्याचे अनुमान करता येते; व बहुधा ते खरे ठरतेही. शकुनापशकुनही कलीमध्ये बहुधा खरे ठरतात व केव्हा केव्हा चुकतातही. म्हणून त्यांची योजना अशी करावी :-

शुभकार्यास जाताना शुभ शकुन झाले असता ते सर्व खरे मानावेत, व अपशकुन झाला असता तिकडे लक्ष देऊ नये, व अपशकुनाची निंदाही करीत बसूं नये. कारण तशाने लोकविद्वेष मात्र होतो.

अपशकुनाचे फल झाले तरी शुभकार्याकरता केलेला प्रयत्न व्यर्थ जात नाही हे लक्षात ठेवावे.

नेहमी शुभ बोलावे म्हणजे अपशकुन निवृत्त होतात, अशा कथासरित्सागरात कथा आहे.

अशुभकार्याला जात असता अपशकुन होतील तर ते सर्व खरे समजावे आणि शुभशकुन झाला तरी तिकडे लक्ष न देता घराकडे परत यावे कारण घोर पाप करणाराचे रक्षण करण्याला शुभशकुन समर्थ होत नाहीत.

३८५. वर व शाप खरे समजावेत की खोटे?

खरे समजावेत. कारण कलीतही शाप फळतो असे पुराणात सांगितले आहे; तथापि देणाऱ्याचे बल मात्र सर्वत्रच कारण आहे.

शापाने माझ्या संबंधी लोकांचेच पुष्कळांचे वाईट झालेले मी पाहिले आहे. आता ते वाईट होण्याला कदाचित् आणखी कारणे कोणाला वाटत असतील तथापि इतर दुःखकारणात नव्या एक दुःखकारणाची भर टाकून घेणे शहाण्यास शोभत नाही, कदाचित् सुखही उत्पन्न होईल व कदाचित् दुःखही उत्पन्न होईल असा कारणाचा संशय असल्यास धैर्यवंत त्या कामात प्रसंगी हात घालीत असले तरी, ज्यापासून सुख उत्पन्न होणे शक्यच नाही, झाले तर दुःखच उत्पन्न होईल अशी जी संशयित कारणे, ती टाळली पाहिजे. विषाचा संशय जरी असला तरी लोक टाळत नाहीत काय?

त्याप्रमाणेच ज्यापासून दुःख तर उत्पन्न होतच नाही पण झाले तर सुखच उत्पन्न होईल अशी कारणे संशयित असली तरी ती अंगीकारिली पाहिजेत. सुखासाठी औषधी आदिक प्रयोग करून पाहताना लोक दिसत नाही काय? 'मी आहे' हा व 'मला सुख असावे' हा अनुभव जीवाला त्रिकालाबाधित असून त्याच्याविषयी त्याचा निश्चय आहे; तसाच शास्त्रावरूनही धर्मनिश्चय करणे त्याला योग्य आहे. बाकीच्या गोष्टी अनुभवापर्यंत तो संशयानेच करीत असतो; व त्यात दैवाने एखादा फसला तरी पदार्थांचा संपूर्ण अनुभव होणे हे लक्षण ईश्वराचे आहे. जीवाचे नव्हे.

एवढ्याचकरता एखादा निश्चय व बहुत संशय अशी ही जीवितयात्रा आहे; तथापि धैर्य व शास्त्रीय निश्चय खंबीर असल्यास ती अवश्य पार पाडता येते. म्हणून वर व शाप खरे मानावेत.

३८६. मंगलाचार वगैरे करणे यावरूनच रूढ झाले आहे काय? अरे, जोपर्यंत लोकांचा शास्त्रावर विश्वास होता, तोपर्यंत त्याला निश्चयाचे स्वरूप होते. पण सध्या फाजील बुद्धीचीही वाढ झाल्यामुळे संशयदृष्टीनेही त्यांचा कसा उपयोग करावा; हे मी तुला सांगितले.

मंगलाचारादिकांविषयी सर्वांच्याच समजुती असल्यामुळे व त्याविषयी शास्त्रही असल्यामुळे त्या व्यर्थ होणे संभवनीय नाही. दुर्दैव शत्रु प्रबल असला तरी शास्त्रीय दहापाच कारणांनी त्याला हटविण्याचाच प्रयत्न धीर करीत असतात. शिवाय केलेले शुभकर्म व्यर्थ होत नाही.

३८७. बरे, सर्व लोकांच्या समजुती कशाही असल्या तर काय झाले? त्या काढता येणार नाहीत काय ?

सर्वत्र असतील तर काढता येणे कठीण आहे. उपदेशाने काढूं लागल्यास दुसरा उपदेश करणारा

अवश्य उभा राहतो, आणि कायद्याने काढूं लागल्यास त्या समजुतीत काहीतरी अर्थ आहे असे लोकांना वाटून ते त्या मनाशी अधिक चिकटून धरतात.एवढ्याकरता आपल्यावर दुर्धर प्रसंग येऊ न देता, होईल तितके त्यांना अनुमोदन देणेच बरे!

सुधारणेत नावाजलेल्या पश्चिमेकडे देखील महिन्याच्या तेराव्या तारखेला विमानात बसत नाहीत. कारण बहुतेक विमाने तेरा तारखेलाच मोडून पडली असे त्यांचे म्हणणे आहे, हे मी एका वर्तमानपत्रात वाचले होते.तेव्हा होणाऱ्या सुखदुःखासाठी एखाद्या गोष्टीचा बादरायणसंबंध जर पुष्कळ वेळ जुळून आला, तर त्याविषयी मंगलामंगल बुद्धी होणे हे अशिक्षित व सुशिक्षित लोकात सारखेच आहे.

३८८. संकटांची परंपरा दिसत असल्यामुळे एखाद्याचे चांगले करण्याविषयीचे धैर्य खचते, त्याने कसे करावे?

आपल्यापेक्षा अधिक संकटपरंपरेतील माणसे ध्यानात आणून आपल्या स्थितीत संतोष दृढ केल्यावर, प्रयत्नाची पावले झपाझप टाकावी.

इंद्राची गोष्ट

महाभारतात अशी गोष्ट आहे की,एक मनुष्य प्राण देत असता कोल्ह्याच्या रूपाने इंद्र तेथे येऊन त्याला म्हणाला,''काय सांगावे, तुम्हांसारख्या मनुष्यांना हात असून तुम्ही प्राणत्याग करता. मला हात असते तर माझ्या केसात जी माती जाते ती खाजवून काढून टाकण्याला फार चांगले झाले असते; पण एवढ्याकरता मी जर प्राणत्याग केला तर हात नसलेल्या अशा माझ्यापेक्षाही संकट परंपरेतील काही योनी आहेत. तेव्हा याच देहात कर्म भोगून माझ्या उन्नतीचा प्रयत्न मला केला पाहिजे.'' हे ऐकून तो ऋषिपुत्र उमजला, व त्याने प्राण देण्याचा निश्चय सोडून दिला.तेव्हा त्याला इंद्राने दर्शन दिले.पुढे तो ऋषिपुत्र तपादिकाने विद्यासंपन्न झाला.

फारसी गोष्ट

फारशी भाषेत शेखसादीचा जो 'गुलेस्तांबोस्ता' म्हणून ग्रंथ आहे, त्यात एक अशी गोष्ट आहे की-

एका राजाच्या नौकेवर बसलेला उतारू समुद्राचे पाणी पाहून भीतीने ओरडत असे.तेव्हा राजाने प्रधानास 'कसे करावे' म्हणून विचारिले.'आपली आज्ञा असेल तर मी याची व्यवस्था करतो' असे प्रधान फिरून म्हणाल्यावर राजाने परवानगी दिली.मग लागलीच प्रधानाने त्या उतारूला एकदम समुद्रात बुडविले, व तो घाबरा झाल्यावर वर नौकेत घेतले; तेव्हा त्याचे ओरडणे अगदीच बंद झाले.

याही गोष्टीचे तात्पर्य वरील प्रमाणेच आहे.

प्राणविनिमयात 'पालीला प्रथम उलटे पाडावे नंतर तिला सरळ करावे; म्हणजे तिला वाटते की, याने आपल्याला मोठ्या संकटातून सोडविले! ' त्यामुळे ती वश होऊन आपल्या आज्ञेत राहते. या खेळाचेही तात्पर्य वरीलप्रमाणेच आहे.

परंतु पालीप्रमाणे हा अनाश्रय प्रकार जे सर्वत्र चालवू पाहतात; त्यांचा प्राणविनिमय केव्हा ना केव्हा तरी क्षय पावतोच, म्हणून येथे मात्र जपून असावे; ते इतके की, **१**- मानसिक संकट दूर करणाऱ्याला मुख्यता व **२**- शारीरिक संकट दूर करणाऱ्याला त्यापेक्षा मध्यमता असे समजावे.**३**-भिन्नचोद्य (दुसऱ्याकडून आलेले) संकट समानकांनी दूर केले असेल तर ते बहुशः कृत्रिम असते, क्वचित् नसते; आणि **४**- स्वचोद्य (स्वतःकडून) संकट दूर केले तर, ते शारीरिक असो किंवा मानस असो, त्याचे उपकार असतातच.

३८९. मंत्र तंत्र खरे मानावेत काय?

शकुनापशकुन-विचाराप्रमाणे ते खरे मानावेत.

३९०. कोणत्याही वस्तूची कोणाला भीती कोठपर्यंत घालता येते?

त्या भीषण वस्तूचे दुःख सहन करावयाला तो तयार होत नाही तेथपर्यंत!

३९१. भयंकर कोणास समजावे?

जीवावर उदार झालेले सर्वच कोणी भयंकर आहेत

त्यातही मंत्रभेद (गुप्त गोष्ट प्रगट) करणाऱ्यास फार भयंकर समजावे व डोळ्यात तेल घालून त्याचा नाश करावा.

धर्म विचार

३९२. पुरुष कर्मबद्ध कशाने होतो?

संकल्पाने!

३९३. मग संकल्प न करून जे होईल ते होऊ देणे चांगले?

होय, पण ते सिद्धाला! साधकांनी संकल्प केलाच पाहिजे.अलीकडील भित्रे लोक अशुभ संकल्प करून तो सिद्धीसही नेत असतात; पण शुभसंकल्प करण्यास मात्र ते कात्री दाखावतात.त्यांचे सर्व व्यर्थ होते. 'मी खरे बोलतो' असे म्हणून आपणास बांधून घेत नाही, पंरतु 'मी बोलतो मात्र' असे म्हणणे न्यायासनापुढे ज्याप्रमाणे चालत नाही; त्याप्रमाणे शुभसंकल्प-रहितावर शहाणे किंवा देवताही विश्वास ठेवीत नाहीत.

३९४. कर्मफलाचा नियम जर अनुमानाने समजतो, तर मध्ये शास्त्राचा गोंधळ कशाला पाहिजे?

संपूर्ण कर्माचा नियम अनुमानाने समजत नाहीच, तर एकदेशी अनुमानाभास मात्र होतो;

जसे, आपण जे खातो पितो त्यावर आपले जसे हक्क आहेत, तसेच किड्यामुंग्यांचेही आहे. कारण 'ज्याला जी वृत्ती सुलभ विहित आहे, तिच्यावर त्या प्राण्याचे स्वत्व सिद्ध होते.'

याचमुळे वृत्तीत जीवनार्थ कलह अवश्य होतो. तो टाळण्याकरिता दान देणे हाच उत्तम उपाय आहे, कारण दान घेतल्यास कोणाला काही वाटत नाही.

याप्रमाणे दान आनुमानिक ठरते; पण अशा अनुमानाने 'दानाचे फळ म्हणजे अदलाबदलीच ठरणार' आणि तसे मानले म्हणजे कन्यादान करणाऱ्याला पुढील जन्मी या जन्मातील जावयाचा जावई होण्याची पाळी निश्चयानेच येणार.एखाद्याला जीवदान दिले म्हणजे दुसऱ्या जन्मी त्याने जीवदान देण्याइतके संकट आपणावर आलेच पाहिजे असा निश्चय करणे भाग पडेल! – म्हणून दानाचे फळ जेथे शास्त्र अदलाबदल सांगेल, तेथे अदलाबदल समजावे; व जेथे शास्त्र अन्य प्रकाराने सांगेल, तेथे ते तसे समजावे.सारांश ''कर्मफळनियामक'' शास्त्रच आहे.

३९५. सत्कर्म कशास म्हणतात?

जे केले असता पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाही अशास!

३९६. पुण्य कशात असते?

जे ज्याचे परंपरागत सहज कर्म असेल त्यापासून होणाऱ्या परोपकारात!

३९७. कोणत्या कर्माचे फळ त्याच जन्मात मिळते?

निरपराधी सज्जनांच्या छळाचे !

३९८. परलोक आहे कशावरून?

सर्व कर्मांचा बदला येथेच भोगता येणे शक्य नाही यावरून!

३९९. कर्म आहे कशावरून?

इच्छा नसता दुःखे येतात यावरून !

४००. पुनर्जन्म आहे कशावरून?

परलोकातील भोगलेल्या कर्मांचा अनुशय असल्याशिवाय मनुष्य उत्पन्न होऊ शकत नाही, यावरून!

४०१. अनुशय असतो कशावरून?

जे एखाद्याला थोड्याच श्रमाने प्राप्त होते त्याच्याकरिता दुसऱ्याला अत्यंत श्रम करावे लागतात यावरून!

४०२. जगात सर्वांपेक्षा नीच व सर्वांपेक्षा ऊंच अशी कामे कोणती?

निजणे हे सर्वापेक्षा नीच असून, परमेश्वरावर प्रेम करणे हे सर्वापेक्षा उंच आहे.

एरव्ही जगात कोणतेही काम उंच किंवा नीच नाही.कारण सर्व कामांची सर्वास जरूर आहे.नुसत्या भंग्यावाचून देखील मोठ्या राजाचे अडते.

४०३. आपत्काली नीच कामे करण्याचा प्रसंग आल्यास कसे करावे?

परमेश्वराला स्मरून, मनात काही न आणता ते नीच काम करावे.आई आपल्या मुलाच मलमूत्र नेऊन टाकते म्हणून ती नीच समजली जाते काय?

४०४. आपत्काली धैर्य राखण्याला कोणती समजूत धरावी?

यापेक्षा अधिक आपत्ती दिली नाही, हाच परमेश्वराचा माझ्यावर मोठा उपकार आहे, अशी !

उदाहरणार्थ, मी आधंळा आहे, म्हणून परमेश्वराने माझे वाईट केले असा जर मी त्याला दोष देईन, तर उद्या हा दोष बोलून दाखविणारी वाणी त्याने मला दिली नाही तर मी त्याचे काय करू शकतो!

४०५. मोठी कामे केली असतानाही केव्हा शोभत नाहीत?

मनात अभिलाष असतो तेव्हा !

४०६. घडलेले दुष्कर्म कोणाजवळ, कसे व केव्हा सांगावे?

१- गुरुवृद्धांजवळ आधीच, न विचारतां सांगावे.

२- मित्राजवळ, निष्कृति झाल्यावर प्रसंगाने सांगावे.

३- शत्रूला, त्याच्याकरता केले असेल तर, चीत केल्यानंतर सांगावे.

४- बायकोला कधीच सांगू नये.

४०७. चित्रगुप्त कशास म्हणतात ?

झांकून ठेवलेल्या पापाने खात असलेल्या अंतःकरणास!

४०८. वेदवेत्ता कोण?

यथाशक्ती नित्यकर्म करतो तो!

४०९. वेदार्थवेत्ता कोण?

परिस्थितीने धर्मशैथिल्याची कृत्ये हातून घडतात म्हणून जो नित्य मनात उद्विग्न असतो तो!

४१०. वेदाची अक्षरेच पाठ म्हटली पाहिजे असा आग्रह कां? अर्थ आला म्हणजे झाले?

जशाचा तसा अर्थ येणे अक्षरांवरच अवलंबून आहे.त्यांची फाजील चिकित्सा करू नये. ही गोष्ट पाहिजे असल्यास नक्कलनवीसास जाऊन विचार.

४११. अहो, पण नक्कलनवीस अक्कल नदारद?

असो, पण त्याचे मन दुक्कल होऊन यमाच्या घावाने त्याच्या डोक्याला टक्कल पडत नाही.

४१२. कांही न झाले तरी रोज किती गोष्टी केल्या पाहिजेत?

१- विसर्ग,

२- गाईंना चारा घालणे,

३- यथाशक्ती अतिथिसत्कार किंवा दान,

४- स्नान,

५- देवार्चन,

६– गुरुवृद्धसन्मान,
७– भोजन,
८– ग्रंथावलोकन किंवा श्रवण,
९– व्यायाम व
१०– निद्रा
इतक्या गोष्टी काही न झाले तरी नित्य केल्याच पाहिजेत.

४१३. बेईमान कोण?
वडिलांच्या सेवेवाचून ज्याला इतर धर्म प्रिय वाटतो तो !

४१४. प्रामाणिक कोण?
सेव्य-सेवेवाचून ज्याला दुसरा धर्म ठाऊक नसतो तो!

४१५. शीलसंपन्न कोणाला म्हणतात ?
शास्त्रानुसार वागणाऱ्याला !

४१६. धार्मिक गोष्टी कोणत्या ?
पारलौकिक सुखाकरिता केल्या जाणाऱ्या नित्यनैमित्तिक सर्व !

४१७. सहाय कोण?
धर्म !

४१८. कसाई कोण?
पूज्यांचा अपमान करतो तो !

४१९. अहिंसाधर्म कोणाला घडतो?
जो शरणागताची उपेक्षा करीत नाही त्याला !

४२०. कपटी कोण?
वारंवार शरण येऊन चुकी करतो तो !

४२१. नास्तिक कोण?
दुसऱ्यास धर्म सांगून आपण वागत नाही तो !

४२२. धर्म कोणास कळतो ?
जो आपल्याविषयी निष्पाप असतो, व स्वतःच्या स्त्रीवर फार प्रेम करीत नाहीं व फार रागावतही नाही त्यास!

४२३. थोडक्यात यज्ञाचे पुण्य कशात आहे?
रोज द्वारावर उभे राहून शक्ती असेल तेवढ्या अतिथीस जेऊ घालण्यात!

४२४. कितीही सत्कर्म केले तरी कोण तेजस्वी होऊन कीर्तीला चढत नाही?
आईबापादिकांपासून स्त्रीने मिळवून आणलेल्या धनावर पोट भरतो तो!

४२५. कोणाचा सद्धर्म करीत असूनही निष्फल होतो?
जो गुरुवृद्धांना लाजेने नमस्कार करीत नाही, आणि अतिथी द्वारावर आला असता जेवूं घालीत नाही, त्याचे सर्व काही निष्फळ होते.

४२६. अतिथी संतापला असता आपले रक्षण कसे करून घ्यावे?
त्याला आणतानाच आपल्या शक्त्यनुसार प्रार्थना करावी.म्हणजे त्याच्या संतापापासून आपले रक्षण होते.

४२७. कलियुगात कोणाचा शाप फळतो?

१- अतिथी,

२- दुखविलेला निरपराधी, व

३- शिक्षणादिकेवरून योग्य पोषण करणारे वडील, यांचा शाप कलियुगादिकासारख्या कोणत्याही युगात नष्ट होत नाही.

४२८. शापाचे फळ केव्हा येऊ लागले म्हणून समजावे?

शास्त्रापासून बुद्धी च्युत होऊ लागली म्हणजे !

४२९. कलियुगात आशीर्वाद कोणाचा फळतो?

गाय, अतिथी व गुरु यांचा !

४३०. बधिर कोण?

हितैषी पुरुषाचे वाक्य ऐकत नाही तो !

४३१. अंध कोण?

शास्त्रासंस्कार ज्याला झाला नाही तो !

४३२. भित्रा कोण?

निरनिराळ्या कामांसाठी निरनिराळ्या देवांची उपासना करतो तो!

४३३. अतिथी किंवा ब्राह्मण कोणी न मिळाल्यास अन्न कोणास द्यावे?

गाईची तृप्ती होईल असे करावे.

४३४. मनुष्याने धर्म सोडून दिला असता तर तो कोठें राहातो?

धर्मात मनुष्यरहित पदार्थ जे पूज्य सांगितले असतील तेथे !

४३५. तेही पदार्थ दूषित होऊ लागले असता धर्म कोठे राहतो?

परमेश्वराच्या अवताराजवळ !

४३६. लंगडा कोण?

तीर्थास वाहनावर बसून जातो तो व देवद्वारात जोडा घालून जातो तो!

४३७. धर्माला अधर्माचे व अधर्माला धर्माचे स्वरूप केव्हा येते?

विकाराने केलेला धर्मही अधर्म होतो व उत्तम कार्याकरता केलेला अधर्मही धर्म होतो.

१- नदीत बुडत असलेल्या स्त्रीला कामाकरता वर काढल्याने धर्म घडत नाही.

२- क्रोधाने केलेल्या प्रयागस्थ देहपातापासून धर्मं घडत नाही.

३- लोभाने केलेल्या यज्ञापासूनही धर्म घडत नाही.

याचप्रमाणे

१. व्याघ्रादिक जीव सज्जनांस पीडा देऊ लागले असता त्यावेळी व्याघ्रादिकांच्या हिंसेनेही धर्म घडतो.

२. गाय, ब्राह्मण व साधू यांसाठी खोटे बोलल्यानेही धर्मं घडतो

३. सुसमयाकरता परस्त्रीगमनानेही धर्म घडतो;

४. भगवत्कार्याकरिता व संतसेवेकरिता केलेल्या चोरीनेही धर्म घडतो,

५. आणि स्वामीकार्यात परविश्वासघातानेही धर्म घडतो.

४३८. दांभिक, धर्मवेडा, खरा धार्मिक यांची ओळख कशी करून घ्यावी?

१. कोणतेही कार्य डोळ्यांपुढे न घेऊन व कोणतीही वाईट परिस्थिती नसून, वारा आला तिकडे पाठ फिरविण्याप्रमाणे जो ज्या समाजात जातो तसा वागतो, तो दांभिक समजावा.

२. ज्याचा धर्मावर विश्वास आहे, परंतु आपले मानसिक विकार शमवीत नाही, तो धर्मवेडा समजावा;

३. आणि ज्याच्यामध्ये धर्मश्रद्धा आहे व आत्मसंयमही आहे तो महात्मा धार्मिक समजावा.

४३९. कोण्या धर्मावर निष्ठा ठेवावी?

१- प्रथम संस्कार होईल त्यावर; किंवा **२**- दहा पांच धर्मांचे संस्कार होऊनही हिंपुटी होऊन शेवटच्यावर!

४४०. कोणता धर्म आपला समजावा?

जो आपण स्वीकारला नसून आपल्याला प्राप्त झाला आहे असे वाटेल तो!

४४१. विनाकारण धर्माधिकाराकरिता लागलेले भांडण कसे मिटवावे?

व्यावहारिक अपकर्षाची कारणे दाखवून !

४४२.कलियुगात सत्युगाचा पादशेष आहे असे भागवतात म्हटले हे कसे?

ते बरोबर आहे कारण कितीही असत्य वाटले तरी जोपर्यंत जगात कायदा आहे तोपर्यंत मी सत्य स्मरून सांगतो असे म्हणणे साक्षीला भागच आहे.नाहीतर मी खोटे बोलतो म्हटल्यावर मग त्याच्या खोटेपणाला शिक्षा देणे न्याय्य होणार नाही. कुत्रे कुत्र्यावर विश्वास टाकत नाहीत परंतु आपल्या मालकावर विश्वास टाकतात तेव्हा सत्यधर्म जागरूक आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

४४३. धर्मशास्त्राचा अर्थ समजणे चांगले की पाठ करणे चांगले?

१- शास्त्र नष्ट न होऊन शास्त्राच्या रक्षणाकरिता पाठ करणे उत्तम. २- ज्ञान होण्याकरिता अर्थ समजणे उत्तम.आणि

३- पुण्य उत्पन्न होण्याकरता दोन्ही उत्तम आहेत.

४- अर्थ न समजून पाठ करणारा मूर्ख असेल, पण अर्थही समजत नाही व पाठही करीत नाही तो मात्र पशु होय यात संशय नाही.

४४४. सर्व धर्म समान आहेत तर आपल्या धर्मांत कां रहावे?

सर्व धर्म समान आहेत तर मग आपल्याच धर्माला कां सोडावे!

४४५. एखाद्याचा धर्म सोपा असला तर तो आपल्याला सोपा पडेल की नाही?

नाही. आपला धर्मच असल्यास सोपा पडतो, कारण जन्मापासून ज्याची संवय लागली असते त्याला सोडून दुसरी संवय लावून घेणे योगियाशिवाय साधारण माणसाकडून होतच नाही. प्रत्यक्ष धन मिळत असून देखील दत्तक पुत्रांपैकी पूर्वीच्या आईबापापेक्षा दुसऱ्या आईबापावर कितीकांचा प्रेम जडतो बरे? – तर मग परोक्ष अशा धर्माकरता स्वतःची संवय सोडून दुसरी लावून घेणे, कितीतरी कठीण आहे.

शिवाय, असे करणाऱ्यांची इच्छा दोनही धर्मातून निराळे होऊन पशूप्रमाणे स्वैर वागण्याची आहे, हेच सिद्ध होते.

४४६. बरे, एका धर्मातच संप्रदायान्तर करावे किंवा नाही?

संप्रदाय-बंधन हे धर्मापेक्षा विशेष आहे; आणि विशेषाला विशेष नसतो. म्हणून सामान्यरूप धर्मांतून जसे सांप्रदायिक होता येते तसे संप्रदायातून संप्रदायान्तर करता येत नाही.याचा विशेष 'सुरतरू'त (ग्रंथ) पहावा.

४४७. शरीराला कष्ट दिल्याने तप होते काय?

नाही. शास्त्रात जितके कष्ट सांगितले असतील तितके दिल्यानेच तप होते. अति कष्टाने तप होईल, तर खांद्यावर जूं घेणाऱ्या बैलांनाही ते प्राप्त होईल.

४४८. केवळ समाजाच्या सोईकरिता धर्म आहे असे म्हणण्यास काय हरकत आहे?

तसे म्हटल्याने मृत्यूनंतरची आपली स्थिती कळत नाही व ती कळण्याला आपल्याला या जन्मातील कर्तव्यापेक्षा अन्य आधार नाही; म्हणून ''धर्माकरता समाज आहे. समाजाकरता धर्म नव्हे.''

४४९. कुटुंबात धर्माची योग्यता मोठी आहे की प्रेमाची योग्यता मोठी आहे?

धर्माची.प्रेमाची योग्यता मोठी झाली तर आईला सोडून बायकोला पोसणारे पुरुष व पतीला सोडून पुत्रावर प्रेम ठेवणाऱ्या बायकाच फार निघतील.

४५०. प्रेमावाचून धर्म कसा चालेल ?

धर्मावर प्रेम पाहिजेच व इतर गोष्टीवर प्रेम धर्माच्या द्वाराने पाहिजे.

४५१. एक प्रेम दोन ठिकाणी ठेवता येतो की नाही ?

स्वतंत्र ठेवता येत नाही पण धर्माची आज्ञा असेल तर हजार ठिकाणी ठेवता येतो.कारण तितकीही त्याला कर्तव्येच वाटतात; नाहीतर दहा यम व दहा नियमांचा एकदम अभ्यास कसा करता आला असता !

४५२. धर्मांत आज्ञा श्रेष्ठ आहे की प्रेम श्रेष्ठ आहे ?

भगवंताचे ठिकाणी प्रेम श्रेष्ठ आहे. इतरत्र आज्ञा श्रेष्ठ आहे.

४५३. सर्व लोकांचा व्यवहार हिंसेवर चालतो तर हिंसकांची निंदा कां करावी?

अरे! सर्व लोकांचे हिंसेशिवाय होत नाही म्हणून धर्मातही तिला घुसडावे हा कोठला न्याय? सर्व लोकांचे थुंकण्याशिवायही होत नाही म्हणून थुंकण्याचा होम करणे धर्मात प्रशंसनीय होईल काय?

जे जे लोकव्यवहारात आहे ते ते धर्मात असले म्हणजे धर्माची श्रेष्ठता कशी होणार? लोकव्यवहाराला आळा बसणे हे धर्माचे गौण लक्षण सर्वसामान्य आहे.

४५४. धर्माचे मुख्य लक्षण कोणते ?

शास्त्रचोदना! (शास्त्राज्ञा)

४५५. अहो पण तांत्रिक चोदनेत मलमूत्राचा देखील उपयोग सांगितला आहे?

तेथे देखील तो चोदनामूलक(आज्ञामूलक) आहे. लोकव्यवहारमूलक नाही. कारण नाखुशी असली तरी तोही धर्म पाळलाच पाहिजे असा त्याही चोदनेचा अर्थ आहे.म्हणून लोकव्यवहारावरून धर्म बसविणे फाजील खुशी बाळगणारांचे काम आहे.शहाण्याचे काम नाही.

४५६. धर्मात पाय वाजवूं नये, बांगड्या वाजवूं नये, जेवताना तोंड वाजवूं नये, डोळा उचलून वर पाहूं नये इत्यादि फाजील मर्यादा वडिलांपुढे ठेवण्यास सांगितले आहे असे वाटते?

'वाटणे' हे काही प्रमाण नव्हे.ज्या विकारांनी ज्या गोष्टी होतात, त्या गोष्टी पूज्यांसमोर केल्या असता ते विकार उत्पन्न होण्याचा सभंव असतो; म्हणून तशी मर्यादा सांगितली आहे.

पाय आपटणे, बांगड्या वाजविणे व डोळा उचलणे ही तिन्ही कामे क्रोधाने होत असतात; आणि मटकमटक तोंड वाजविणे, हे उताविळपणाचे व दुसरीकडे लक्ष असल्याने होत असते.

मूर्खांना भीती व शहाण्यांना पूज्यदृष्टी ह्या दोनच गोष्टी विकारांना प्रतिबंधक आहेत; नुस्ता प्रेम विकाराला प्रतिबंधक नाही. कारण त्यावाचून जो प्रेम तो राग समजला जातो; म्हणून पूज्यांसमोर वैकारिक चिन्हे प्रगट केली असता शहाणपणाचा विकारप्रतिबंधक भाग मनातून नष्ट होतो.**'घोडे को इषारा व गद्धेको फोक'** असे म्हटले आहे.

एवं स्वाभाविक मर्यादा जर पशूत आहे, तर मनुष्यांमध्येच ती विहित नसावी हे आश्चर्य होय. पशूंना जे 'स्वाभाविक सद्‌गुण' ते मनुष्यांना 'विहित' असतात, हे मागे सांगितलेच आहे.

४५७. पशूला स्वाभाविक जे सद्‌गुण असतात ते मनुष्याला चोदनाप्रेरितच असले पाहिजेत असा नियम आपण कां बांधता?

तसे न मानले तर सर्पालासुद्धा वाताहार-तपश्चर्येचे फळ मिळू लागेल, मासोळीलासुद्धा तीर्थस्थानाचे फळ मिळू लागेल आणि गाढवालासुद्धा समतेचे फळ मिळू लागेल!

४५८. अहो पण, या गोष्टीची उदाहरणे ज्ञानभिन्न प्रतिबंधाकरितां कपिलगीतेत दिली आहेत. तुम्ही ती धर्माकडे कशी लावता?

अरे! ही उदाहरणे धर्मपक्षाच्या बाजूने दिली तर अधर्म-प्रतिषेध करितात व ज्ञानपक्षाने दिली तर अज्ञानमूलक धर्माची व्यावृत्ति करितात.

४५९. धर्मशास्त्रात पढतमूर्ख कोण ?

समान स्वर्गीय उपाय चांगले उपलब्ध असता बुद्धिपुरःसर लोकांना क्षोभ करणारे विषम उपाय, धर्मात सांगितले म्हणूनच करतो तो !

४६०. प्रतिज्ञा भंग झाली असताही पत केव्हा जात नाही?

अधर्मावेश टाकून पुढे धर्म करण्यासाठी प्रतिज्ञाभंग केल्यास !

४६१. धर्मशास्त्रात वेश्यांसारख्या पापी लोकांनाही धर्म कां सांगितला आहे?

धर्माधर्माचा असा एक नियम आहे की, जबरदस्तीने अधर्म केल्यास त्याला गती नाही; पण अधर्माच्या परिस्थितीत जन्माला आल्यास त्याला मात्र धर्मांत येण्यास मार्ग आहे, कारण तो कर्मपरतंत्र होऊन जन्मास येत असतो; परंतु तो धर्ममार्ग शास्त्रावर अवलंबून असतो.

जी प्रत्यक्ष कुलटा असते तिला धर्म नाही परंतु वेश्येच्या पोटी जन्माला आलेल्या मुलीला धर्म आहे. ऐहिक कर्माचीच निंदा सांगितली आहे; पूर्वजन्मीच्या कर्मांचा द्वेष सांगितला नाही. म्हणून -

जन्मास आलेल्याला आपापला धर्म स्वतंत्र असला पाहिजे.

यामुळे जे तीव्र तप करीत नाहीत, त्यांच्याविषयी जन्मजातिवाद बरवा होय.

४६२. खोटे बोलणे, परस्त्रीगमन व हिंसा यात फार मोठे पाप कोणते?

ही पापे क्रमाने एकापेक्षा एक मोठी होत असा वाल्मिकी रामायणाचा अभिप्राय आहे, परंतु तिन्हीही एकाच तोडीची आहेत, असेही म्हणण्यास कांही प्रत्यवाय नाही.

४६३. काम उत्पन्न होणे हा भुकेप्रमाणे शरीराचा स्वभाव आहे मग व्यभिचाराविषयी इतका द्वेष लोक कां करतात?

शरीराचा स्वभाव भूकही आहे, पण अतिखादाडाचा लोक द्वेष करीत नाहीत काय? ज्याप्रमाणे आपल्याच घरचे अन्न खाणाराचा कोणी द्वेष करीत नाही, पण दुसऱ्याच्या दुरडीतून पोळ्या चोरून नेणाऱ्या कुत्र्याला पिटून घालवून देतात, त्याप्रमाणे स्वस्त्रीगमनाला कोणी दोष ठेवीत नाही, पण परदारागामी जे आहेत त्यांचा द्वेष करणे रास्तच आहे.

४६४. वैकारिक शास्त्रज्ञान कशाला म्हणतात ?

हे निराळे कशाला विचारावयाला पाहिजे? सध्या या भारतवर्षात याच ज्ञानाचा सुळसुळाट आहे.- 'एका शास्त्रीय गोष्टीवर जोर देऊन दुसऱ्या शास्त्रीय गोष्टीकडे दुर्लक्ष करणे' हेच या ज्ञानाचे स्वरूप आहे.

जुन्या व नव्या धार्मिक लोकांची स्थिती आज विलक्षणच आहे. जुन्या लोकांची स्थिती तर अशी आहे की,

केवळ दुसऱ्या लोकांच्या हातचे खाल्ले तर तो पतित होतो!

बाकी व्यभिचारी मनुष्याला कोणी जातीबाहेर टाकीत नाही.

खोटे बोलणे तर पापाच्या जमेतच धरले जात नाही.

चोराला दंड झाल्यावर जातीबाहेर टाकलेले माझ्या आढळण्यात नाही.

ही जुन्या लोकांची स्थिती झाली.

नव्या सुशिक्षित लोकात व्यभिचार न करणे, एवढीच काय ती नीती, असा बहुधा समज आहे. खून करणाऱ्यापेक्षाही व्यभिचार करणाऱ्याला ते लोक वाईट समजतात.

बरे, आमच्यातील काही भगवद्भक्तांची स्थिती अशी आहे की, ते क्रोध न करणारालाच साधू म्हणतात; मग त्याची कामवृत्ती कितीही बळकट असो. ही वैदिकांची स्थिती आहे. इतरांचे ज्यांच्या त्यांच्या धर्मांप्रमाणे आग्रह आहेत. हा जो समजुतीचा चिवडा, यालाच मी वैकारिक शास्त्रज्ञान म्हणतो.

४६५. यातून सुटण्याला कोणता उपाय आपल्याला बरा वाटतो?

१- लोकांच्या समजुतीकडे लक्ष न देऊन शास्त्राप्रमाणे वागणे; आणि २- रोगी, म्हातारा, नपुंसक व ज्याच्या घरी एकाही दिवसाचे खावयाला नाही तो, हे चौघे वर्ज्य करून बाकी सर्वांनी लग्न करणे,

हे दोनच उपाय मला श्रेष्ठ वाटतात.

४६६. कितीही नीच काम असो, आपण शिकावे म्हणता, पण धर्माची आज्ञा नसली तर?

आपत्काली धर्माचा निषेध नाही. आणि संपत्काली करू नये किंवा त्यावर उपजीविका करू नये.

४६७. खरे व खोटे शास्त्र कशावरून समजावे ?

१- सेश्वरक्रियातंत्रगोष्टी परंपरागत गळ्यात आल्या असता सर्व खऱ्या समजाव्या आणि **२**- बुद्धिपूर्वक रचल्या असता त्याच्यापुरत्या व पूर्वधर्मत्यागापुरत्या खोट्या समजाव्या.

४६८. व्यवहारात खऱ्याखोट्याचा झगडा होतो तर धर्मातील गोष्टी खऱ्याच आहेत असे कसे समजावे?

बाधक समजल्याशिवाय अमुक खोटे आहे असे कधीही म्हणता येत नाही.

व्यवहारात वादीप्रतिवादींचे पुरावे प्रत्यक्ष समोर येतात तथापि यथार्थ निवाडा फारच थोड्यांचा होतो.

धर्माविषयी तर केवळ शास्त्रच पुरावा आहे. त्याला बाधक असे दुसरे काहीच नाही. मग त्याला खोटे हा पक्षच उत्पन्न कसा होतो?

आता, प्रत्येक धर्मशास्त्रात झगडा असला तर आपल्या देशाच्या चालीरीतीप्रमाणेच जसे लोक कायद्याची इच्छा करीत असतात तसे आपलाच धर्म घेऊन बसावे.

४६९. चोराला जर आपला हक्कच उत्पन्न होत नाही तर 'गाय चोराची आहे' असे महाभारतात म्हटले आहे, त्याचा उद्देश कोणता?

धर्मकार्य करण्याला कोणालाही अधिकार आहे.

४७०. शुष्क धर्माग्रह कशास म्हणतात ?

काही लोक व काही विधवा स्त्रिया जे शास्त्रनिषिद्ध वर्तन आहे ते सुखाने करून 'असे कां करिता?' म्हणून कोणी विचारल्यास 'कलीमध्ये तंतोतंत वर्तन होणे शक्य नाही असे स्पष्ट उत्तर देतात' आणि

'ज्वरादिकांचे वेळी स्नान करू नये. रोग असता कर्म करू नये.' असे शास्त्र सांगत असताही तेथे मात्र संपत्कालीन शास्त्रैकदेशाचा आग्रह धरितात त्याचे नांव शुष्क धर्माग्रह! हा व्यर्थ आहे.

'शास्त्रातील विधी व निषेध जो सर्व प्रमाण मानतो त्यालाच धर्म फळतो.'

४७१. शास्त्राचे वादविवाद करीत बसणे आपल्याला पसंत आहे काय?

धर्मरक्षणाकरिता बुद्धिमानाने लेखी वादविवाद करावेत आणि सभा निःपक्षपाती असेल तर तोंडी करावेत; पण रिकामे त्यातच गढून बसूं नये, ज्यांना कोणतेही काम नाही अशा पंडितांनी भाषेच्या रक्षणाकरिता विजिगीषु (विजयासाठी) कथा केल्यास हरकत नाही; पण त्यात धर्माधर्मांची संप्राप्ति नसेल तर कोणी या वादाचा न्यायाधीश बनू नये व तिकडे लक्ष देऊ नये.

४७२. भगवद्गीतेविषयी आज सर्वांचेच उत्तम मत झाले आहे, तेव्हा तेच एक जगातील धर्मपुस्तक होणे बरे असे मला वाटते!

होय. सर्वांचे धर्मपुस्तक होण्याला जननी भगवद्गीताच योग्य आहे.
असे कोणीही म्हणेल व मीही तसेच म्हणतो. तथापि पाश्चिमात्यविद्याविभूषित टीकाकार (लो.टिळक) कर्मपर अर्थ लावून त्या साध्वीचा वाक्छल करीत आहेत. कर्म निष्काम करावे अशी काही वाक्ये घेऊन वाटेल ते कर्म निष्काम करावे असे ते म्हणत आहेत. 'शास्त्रीय कर्मच निष्काम करावे' असा वास्तविक गीतेचा अभिप्राय आहे.

परिणामाचा विचार करून त्याकडे लक्ष न देता विकाराच्या झपाट्यात वाटेल ते करून टाकावे असे ती म्हणत नाही. तसे मानले तर मुलांचे अद्वातद्वा खेळणे, वेड्यांचे दगड मारणे - ह्या सर्व गोष्टी निष्काम कर्तव्यातच येतील.

म्हणून कोण्याच अर्वाचीन टीकाकारांचा अर्थ मला संमत नाही. एक उठतो तो सरकारी नोकरी आपले निष्काम कर्तव्य आहे म्हणून गीतेचे उदाहरण देतो. तर दुसरा फाजील जहालपण करणेही आपले निष्काम कर्तव्य आहे म्हणून गीतेचे उदाहरण देतो !

पण 'ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि' ह्या गीतेच्या वचनाकडे मात्र सर्वच दुर्लक्ष करितात.

४७३. शास्त्रीय कर्म तरी निष्काम कां करावे ?

जीवाला काम स्वाभाविकच आहे. त्यामुळे तो काही तरी कर्म करणार हेही ठरलेलेच आहे. म्हणून स्वतःच्या उद्धाराचेच कर्म करणे त्याला श्रेयस्कर होय. त्यातही काम मिसळू दिला तर लोकांच्या प्रवृत्तिसारखेच शास्त्रालाही बनविणे होईल व मग शास्त्रे लोकांस अधिक ते काय सांगणार? म्हणून -

'निष्काम कर्तव्य सांगण्यातच त्यांचे शास्त्रत्व आहे.'

सूक्ष्म विचार केला असतां कर्तव्यशास्त्र नियमविधिरूप आहेच. तथापि अदृष्टार्थाने अपूर्वविधि दर्शविणारेही आहे कारण निष्काम कर्मातही सत्त्ववृध्दि व पुण्यप्राप्ति होतातच.

खरे शास्त्र तर ब्रह्मकांडच आहे असे सर्व भारतीय ऋषी म्हणतात.

४७४. आपत्काली अधर्माचा धर्म व धर्माचा अधर्म कां होतो?

आगम(शास्त्र) सांगतो म्हणून; कारण धर्मामध्ये शास्त्रच प्रमाण आहे.

राज्यव्यवस्थेत जसे प्रासंगिक कायदे असतात, तशीच ही आगमाची योजना आहे.

४७५. पापभीरू चांगला की वाईट ?

विवेकामुळे पापाला भिणारा चांगला व आळसामुळे पापाला भिणारा वाईट! आळसामुळे पापाला भिणारे नपुंसक समजले जातात.

४७६. मग पापी मनुष्यास झोपेतून उठवू नये असे कां सांगितले आहे?

शुभ लोकास तो पीडा देईल म्हणून ! पापी लोकांत पापी लोकांचे भांडण सुंदोपसुंद न्यायाने यशस्वी होऊ द्यावे.

४७७. नमूचि दैत्याचे अंग रत्नाचे असता देवांनी त्याला कापून दान कां मागितले? कारण देवांना असे करणे शोभत नाही.

एखाद्या महान् धर्माने बद्ध असून इतर वाईट कृत्ये असतील तर त्याचा तोच धर्म जोराने वाढवून इतर अधर्माचा क्षय करावा.

नमूचीचे प्राणदान देवांनी घेतले तर त्याला अक्षय्य स्वर्ग द्यावाच लागला. बलीचे सर्वस्वदान घेणाऱ्या विष्णूला त्याचे द्वारपाळ व्हावे लागले असून, शेवटी त्याच्याकरिता इंद्रपद राखून ठेवावे लागले आहे; तेव्हा हे देवांचे फसविणे नव्हे.

शिवाय देवांचा हा आपत्कालीन धर्म होता, आणि दैत्यांनी संपत्कालीच अधर्म केल्यामुळे त्यांचा नाश झाला.

४७८. देव व दैत्य सापत्न बंधू असल्यामुळे त्यांचे आपसातले भांडण तोडण्यास निःपक्षपाती अशा विष्णूने कां धावावे?

देवांच्या किंवा ऋषींच्या कैवारास्तव देव धावल्याचे उपलब्ध होत नाही तर -

'वैदिकधर्माच्या ऱ्हासामुळेच त्याचे स्थापन करण्याकरिता परमेश्वर अवतार घेतो.'

वेदप्रतिष्ठितच देव समजल्या गेले असून, तद्-अप्रतिष्ठित असुर समजल्या गेले आहेत.

काही असुरांनी वैदिक धर्माने कडक तप केले खरे; परंतु ईर्ष्यादिकांनी मिश्र असे ते असल्यामुळे त्याला धार्मिक महत्त्व आले नाही.

प्रल्हादादिक महात्मे तर देवमान्य झालेच आहेत.यावरून परमात्मा केवळ भक्तिवशच आहे असे सिद्ध होते.

४७९. धर्म, प्रेम, विश्वास व वर्तन या चार गोष्टीत वागताना मनुष्याचा घोटाळा होतो, तेव्हा कसे करावे?

धर्म सर्वकाळ सखा समजून त्याप्रमाणे वागावे.

प्रेमाचा व धर्माचा जेथे विरोध असेल तेथे धर्माप्रमाणेच वागावे, प्रेमाप्रमाणे वागू नये; आणि शास्त्रात ज्या प्रेमाची प्रशंसा केली असेल तेथे प्रेमाप्रमाणेच वागावे.

'प्रेम पाहिजे त्यावर करावा पण विश्वास गुरु, वृद्ध व हितकर्ते यांवरच ठेवावा.'

प्रेमाने कोणाचेही कल्याण करावे, पण त्यावर विश्वास टाकून आपले नुकसान करून घेऊ नये.

स्त्रिया विश्वासास पात्र नाहीत, असे सूज्ञांचे मत आहे, कारण त्यांची इच्छा नसली तरी त्यांच्या उतावीळपणाने पुरुषाचे नुकसान होते; तथापि वृद्धमाता पुष्कळ वेळी या नियमास अपवाद आहे, म्हणून तिच्याविषयी पूज्यता ढळूं देऊ नये.

४८०. मनाने चांगले करीत असूनही कोणाच्या हातून पाप घडते?

१- अतिशय प्रेमामुळे आईशी जो विनोद करतो;

२- ठाऊक असूनही संकटात पडलेला चोराला दान देतो,

३- जो दुर्जनाला झोपेतून उठवितो,

४- परस्त्रीगामी पुरुषाला जो फुकट वाजीकरण देतो.

५- दीनांना अतिशय दान देत असूनही जो मूर्ख मांगाप्रमाणे त्या महात्म्या पुरुषांचा अपमान करितो,

६- प्रत्यक्ष श्रुतिविरुद्ध जो अनुमान अवलंबन करितो,

७- विधींना जो निरोधबलाने शिथिल करितो;

हे सात मनाने उत्तम वागत असूनही अवश्य दुर्गतीला जातो.

४८१. मते बदलणारा शहाणा की मूर्ख ?

१. धर्मामध्ये आपली मते बदलतो तो मूर्ख आणि

२. व्यवहारामध्ये प्रसंगी मते बदलत नाही तो मूर्ख !

३. धार्मिक मते सर्वदा स्थिर आहेत, असे समजतो तो शहाणा; आणि

४. व्यवहारिक सिद्धान्त बहुधा चल आहेत असे समजतो तो शहाणा!

५. अंतःकरणात स्थिर व बाहेर जो चल असतो महाशहाणा होय.

४८२. धर्म कोणाच्या मुखाने ऐकावा ?

जो धर्म सांगावयाचा त्या धर्माचे संस्कार झालेले असून बुद्धिमान असेल त्याच्या !

ज्याला केवळ संस्कार झाले आहेत, त्याला दुसऱ्याचे समाधान करिता येत नाही, तरी तो धर्मनिष्ठ आहे, म्हणून नम्य आहे;

आणि जो केवळ बुद्धिमानच आहे त्याच्या मनात धर्माविषयी आदर नसल्यामुळे तो नम्य नाही.म्हणून दोन्ही लक्षणांनी युक्त धर्मोपदेशक पाहिजे.

४८३. धर्माचा समन्वय व धर्म घोटाळा एकच काय ?

नाही. स्व-तत्त्वाश्रयाने केलेला व ज्याच्या त्याच्या आचरणाप्रमाणे ज्याला त्याला सवड राहते आणि स्वशास्त्रात उणेपणा न राहून स्वशास्त्र बाह्य रीतीने भरून काढण्याची अपेक्षा लागत नाही याला 'धर्मसमन्वय' म्हणतात; व इतर सर्व धर्मघोटाळा होय.

रामानुजांनी जरी भिक्षुमताचा अनुवाद केला आहे, तथापि जैन- मतातून भेदाभेदवाद न घेता वैदिक मतातूनच घेतला आहे, हा समन्वय कनिष्ठ खरा. पण धर्मसंकरापेक्षा उ्रा आहे, कारण स्वशास्त्रबाह्य नाही.

थियॉसॉफिस्टांचा धर्मसंकर

४८४. मग धर्मसंकर कसा असतो?

सांगतो ऐक. पश्चिमेकडे ब्रह्माभासविद्यावादी (थियॉसॉफिस्ट) लोक आहेत. ते म्हणतात,'आम्ही पूर्वेकडील ज्ञानामध्ये निष्णात आहोत'. यांना सप्तलोक मान्य आहेत. पण ते सप्तलोक ना बुद्धाचे ना हिंदूंचे, असे त्यांनी मानले आहेत. स्थूल लोक म्हणजे आपले स्थूल शरीर व तसाच स्थूललोक याला ते भूर्लोक म्हणतात, हा हिंदूंचा भूर्लोक नव्हे. कामलोक आणि कामशरीर याला ते भुवर्लोक म्हणतात, पण तो हिंदूचा भुवर्लोक नव्हे, हे पुराणे वाचण्याने कळून येण्यासारखे आहे. महाविद्या नांवाच्या पुस्तकात या ब्रह्माभासविद्यावादी लोकांची माहिती दिली आहे ती पहावी, मानसलोक याला ते स्वर्लोक म्हणतात, पण हिंदूंचा स्वर्लोक हा नव्हे, कारण हिंदूंच्या स्वर्लोकात देवव्यवहार आहे व यांच्या मानसलोकात नाही असे म्हणतात. चवथा बुद्धिक लोक हा हिंदूंचा महर्लोक कधीच होणे शक्य नाही, हेही पुराणांवरून समजण्यासारखे आहे. निर्वाणलोक, परनिर्वाणलोक आणि महापरनिर्वाणलोक असे तीन लोक आणखी हे वादी मानतात तेही हिंदूंचे जन, तप, आणि सत्यलोक होत असे कधीही म्हणता येणार नाही; कारण तेथेही ऋषिब्रह्मादिकांचा व्यवहार आहे.

शिवाय हिंदुधर्मात निर्वाणशब्द परब्रह्मवाची आहे त्याच्या पलीकडे काही नाही. निर्वाण, परनिर्वाण, महानिर्वाण हे क्रमिक शब्द बुद्धधर्माचे आहेत, परंतु त्यांचाही अर्थ हे वादी करतात तसा लोकपर नाही; तर निर्वाण म्हणजे वासनाक्षय व त्याचा साक्षात्कार झाला म्हणजे मानसिक दुःखाचा क्षय होतो असे बुद्ध मानतात. परनिर्वाण म्हणजे अर्हताच्या मरणानंतर शारीरिक दुःखाचा क्षय होणे; आणि महापरनिर्वाण म्हणजे बुद्धाच्या शारीरिक दुःखाचा क्षय होणे किंवा उपदिष्ट जे निर्वाण त्याचा अर्हंताला साक्षात्कार झाला म्हणजे ते परनिर्वाण आणि बुद्धाला साक्षात्कार म्हणजे ते महापरनिर्वाण; अशा एकाच्याच या तीन संज्ञा आहेत, हाही अर्थ होतो. ज्याला दुसऱ्याच्या उपदेशाने निर्वाण मिळते तो बुद्ध ! याप्रमाणे बुद्धधर्माचा सिद्धांत आहे. याविषयी 'सूत्तपित्तक' ग्रंथ पहावा.

परंतु या आभासविद्यावादी लोकांनी त्याचा अर्थ मुद्दाम लोकपर केला आहे. त्यामुळे ना बुद्धधर्म ना, आर्यधर्म असे काही तरी नवचंद्री गोदडीप्रमाणे हे एक कोडबोळे झाले आहे. साता तत्त्वांची संख्या पुरी करण्याकरिता हे लोक आणून भरले आहेत. ईशपुत्र धर्मातील तत्त्वात देखील या आभासविद्यावादी लोकांच्या हाताने विपर्यास झाला आहे.- या सर्वात मजा ही आहे की, सर्वांचा अव्यापारेषु व्यापार 'निर्हेतुक' आहे. याला धर्मसंकर म्हणतात, धर्मसमन्वय नव्हे. असे अनेक प्रकार आहेत, त्यातून थोडे दाखविले.

४८५. धर्मगारुडी कोणास म्हणावे ?

जो एका धर्मातील शब्दाने दुसऱ्या धर्माचे मन मोहित करतो व दुसऱ्या धर्मातील शब्दाने तिसऱ्या धर्माचे मन मोहित करतो व आपली छाप बसवितो त्यास!

अशांची परीक्षा धर्मस्थापकाने करावी. बुद्धधर्मातील शब्दांचा विपर्यास आर्यधर्मीयांना व आर्यधर्मातील शब्दांचा विपर्यास बौद्धधर्मीयांना करून सांगणारे लोक मी पुष्कळ पाहिले आहेत 'स यत् प्रमाणं कुरुते' यावरूनच मुसलमानांतील सय्यदशब्द गीतेत आहे असे म्हणण्यासारखाच हा उपदेश आहे.

४८६. वाईट रूढ्या अतिशय वाढल्या तर कसे करावे ?

त्यांचा उपयोग करून घ्यावा.त्यांच्याशी टक्कर देऊन आपला नाश करून घेऊ नये. विषयुक्त देशात विषच औषधाच्या उपयोगी पडत नाही काय?

४८७. शरणागत कपटी असल्यास रक्षण करणाऱ्याने कसे करावे?

कपटी शरणागताच्या हातून अपाय झाल्यास धर्म तर आपल्यास घडतोच आणि आत्मरक्षणापुरती व्यवस्था केली तथापि पाप घडत नाही

शहाणे आपला एकट्याचाच नाश होण्याचा प्रसंग असल्यास धर्माप्रमाणेच वागतात व आपल्याबरोबर पुष्कळांचा नाश होण्याचा संभव असल्यास धर्मार्थाला अनुसरून वागतात.

साधारणपणे तर सर्वदाच धर्मार्थाला अनुसरून वागावे. त्यातही पाप नाही. आपत्काली तर शहाण्यानेसुद्धा असे वागावे.

४८८. धर्मात शंका घेऊ नये असे युधिष्ठिराने द्रौपदीला सांगितले आहे.पण शंका आल्यास कसे करावे?

गुरुदेवाजवळ शंकेची क्षमा मागावी.

४८९. महाकालाने, चांडाळाने मोठे तळे उत्पन्न करूनही त्यातील पाणी घेतले नाही, तेव्हा त्याचा फायदा झाला अशी कथा स्कंदपुराणात आहे; आणि उत्तंकाने चांडाळाच्या हातचे पाणी घेतले नाही म्हणून अमृत न मिळाल्याने त्याचा तोटा झाला, अशी कथा महाभारतात आहे; तेव्हा चमत्कार दिसल्याने धर्म सोडावा की न सोडावा?

भगवंताचे स्मरण केल्याबरोबर जो चांडाळ दिसला, त्याचा भगवंताशी संबंध असावा असा पूर्ववराला स्मरून उत्तंकाने विचार केला नाही व त्याचेच फळ अमृत मिळाले नाही हे झाले.महाकालाला भगवत्प्रत्यभिज्ञा नव्हती म्हणून त्याने चमत्कार पाहून धर्म सोडला नाही, हे ठीकच केले.

'चमत्कार पाहून धर्म सोडणे हे नीचाचे काम आहे'
आणि मनाच्या उतावळेपणामुळे चमत्कार पाहून धर्म सोडण्याचा प्रसंग आलाच, तर चमत्कार असे अचाट पहावेत की ज्यांचा धर्मात उपयोग होईल. जसे -

कोणी फार चमत्कार करून दाखवीत असेल तर 'हिन्दुस्थानात गाय मरूच नये, किंवा वेदावर कोणी शंका घेऊ नये म्हणून स्वर्गांतील देवांचे व आमचे दळणवळण रहावे, असे काही चमत्कार तरी करा' असे त्यास स्पष्ट म्हणावे.प्रिय धार्मिक असेल तर थोड्याही चमत्काराचे कौतुक लोक करीत असतात व ते काही वावगे नाही; पण मूर्खबुद्धीने चमत्कारावरूनच धर्म सोडण्याचा प्रसंग आल्यास असे अवाढव्य नित्य चमत्कार मागत जावे.

धार्मिक चांडाळ उत्तम, पण अधार्मिक ब्राह्मण नको.

४९०. रजकाच्या बोलण्यावर रामाने सीतेला टाकून दिले व द्रौपदीला कर्णादिक एवढे बोलले तरी पांडवांनी कां टाकून दिले नाही ?

सर्व अवतारांच्या कथा पुढील कार्यानुगामी असतात व कोठे उपासकांच्या इच्छानुगामी असतात, म्हणूनच त्या रूपक नव्हेत.परंतु या दोन्ही कथेपासून आपल्याला अनुकरण इतकेच घ्यावयाचे की - 'मनुष्याने संपत्प्रसंगी लोकाराधन करावे व आपत्प्रसंगी प्रसंगोचितच वर्तन करावे'.

४९१. संपत्काल आणि आपत्काल कशाला म्हणतात? आणि त्याचे किती प्रकार आहेत ?

सर्व काही अनुकूल असून धर्माप्रमाणे वागता येणे हा संपत्काल होय.तो एकच प्रकारचा आहे, आणि याच्या उलट आपत्काल आहे.तो तीन प्रकारचा आहे.दैविक, भौतिक आणि अपराधिक.

१- दुष्काळादिकाने प्राप्त झालेला दैविक होय,

२- शत्रूकडून प्राप्त झालेला भौतिक होय आणि

३- आपल्या चुकीमुळे गुरुजनांकडून प्राप्त झालेला दंड आपराधिक होय.

१- समयनिरीक्षण किंवा पूजाहोमादिकांनी पहिला नष्ट होतो. २- नीती व पराक्रमाच्या योगाने दुसऱ्यातून पार पडता येते, ३- तिसरा भयंकर व सर्वनाशक आहे; तथापि फलोन्मुख झाला नसेल तर सद्धर्माने व भक्तीने त्यातून पार पडता येते.

४९२. गुरु, देव, द्विज, धेनु यांच्या कार्याकरता खोटे बोलावे असे सांगितले पण त्यात जर दुसऱ्याचे नुकसान होईल तर कसे करावे?

'मी सत्कार्याकरता खोटे बोललो' असे एकदम कबूल करावे.

४९३. अमुक श्रद्धेने धर्म पाळतो व अमुक विकाराने पाळतो, असे कसे समजावे?

हे समजणे फारच सोपे आहे. एखाद्या घरातील बाईला नेमून दिलेले काम ती न करता दुसरेच करील, तर ती स्वतंत्र विकारी समजावी; आणि नेमून दिलेले काम करील, तर मालकाच्या आज्ञेवर विश्वास आहे असे समजावे.

तसा ज्याला जो धर्म भगवान् वेद सांगतो त्याचेच अनुष्ठान करणाऱ्याला श्रद्धावान् समजावे; आणि त्याहून कमी किंवा जास्त प्रतीच्या पाळणाऱ्याला विकारी समजावे.

बोडख्या बायकांचे विहिरीत पाणी टाकून घेण्याचे सोवळे, कित्येकांचे ज्वरातही केलेले स्नान, शूद्राने ब्राह्मणधर्म स्वीकारणे व ब्राह्मणाने म्लेंच्छ धर्म स्वीकारणे ही सर्व विकाराचीच उदाहरणे आहेत.

४९४. तर मग वैदिकेतर धर्म ऋषीनी कां स्थापन केले?

वेदमार्गापासून जे जबरदस्तीने च्युत झाले आहेत, त्यांना पाप भोगल्यानंतर वेदमार्गात येण्याकरिता ! पण भागवतधर्म मात्र वैदिकेतरांत येत नाही, कारण नामस्मरणादिकांना वेदही पुष्टि देतो म्हणून !

४९५. धर्माविषयी अनेक मते असल्यामुळे सर्वांची एकवाक्यता झाल्यावाचून खरा निश्चय कसा करावा? सर्वांची एकवाक्यता होणे तर अत्यंत कठिण आहे?

मला तुझा हा प्रश्न चमत्कारिक दिसतो, कल्पना कर की, जितक्या अन्नाचा आपण पाक तयार करतो, तितक्याचा काला करूनच खाईन म्हणेल तर त्यात विशेष काय आहे! ज्या गोष्टीच्या मिळणीची ज्याच्याशी जरूर आहे, तितकीच मिळणी करणे योग्य; अन्यथा मिळणी करण्यात फाजिलपणा होतो. एखादी गोष्ट सामान्य शब्दाने ज्ञात होत असली, तरी अधिकारार्थ विशेष शब्दावाचून तिची मिळणी करण्यात फार घोटाळा होतो. पहा, अन्न हा एक शब्द आहे, पण एवढ्यावरून सर्व अन्नाचा आपण काला करू लागलो तर त्यात मनुष्याची विष्ठाही टाकावी लागेल! कारण विष्ठा ही देखील कुत्र्याचे अन्नच होय. वायू हा देखील अन्नच आहे, पण ते सर्पाचे, आपले नव्हे. सडलेले प्रेताचे मांसही मोठे अन्न आहे, पण ते उदाचे! मीठ न घातलेले कढणही अन्न आहे पण ते रोग्याचे. चीज (Cheese) देखील कित्येक लोकांचे अन्न आहे, पण ते कित्येकास भावत नाही.चिनी लोकांचा बेडकाचा मुरब्बा ब्राह्मणाच्या काल्यात टाकला तर कसा शोभेल? बरे, शुद्ध अन्नात तरी पहा- अनरशासी कांदा खाणे शोभते काय? लसणाची पेंड घालून तळलेल्या करंज्या कोणाला गोड लागतात? आणि एखाद्याला लागत असल्या, तरी त्या तितक्यापुरत्याच झाल्या, सर्वार्थी उपयोगी पडत नाहीत. रोगी नसेल तर जेवताना षड्रसांच्या एकीकरणाची मात्र जरूरी असते, आणि रोगी असेल तर एक दोन रसांचीच जरूरी असते.

हाच न्याय शास्त्रसमन्वयास लागू आहे. वृत्तिसाधकता व ज्ञेयध्येयसाध्यता ज्यात उत्पन्न होईल तितक्याच्याच समन्वयाची आवश्यकता असते.

४९६. तर मग पूर्वापार ग्रंथ पाहण्याची जरूरी राहिली नाही? ज्याला जितके वाटेल तितके त्याने आपल्या बुद्धीने घ्यावे?

सत्य आहे. असेच मी म्हणतो.पूर्वापार ग्रंथ पाहण्याची काही जरूरी नाही; पण निवडताना बुद्धि मात्र निर्विकार पाहिजे, आणि निर्विकार बुद्धि तर उपदेशावाचून होत नाही.

जसे :- अन्नाचेच दूध होते, पण ते आईचे स्तनामध्ये जामीन असल्यावाचून होत नाही; त्याप्रमाणे सारसन्निवेश करता येतो पण तो उपदेशावाचून करता येत नाही, कारण सर्वांची बुद्धि विकारी आहे, म्हणून

'जेवढा गुरूने सारसन्निवेश आपल्या हाती दिला असेल तेवढ्याचाच समन्वय आपल्याला करता आला म्हणजे कृतकृत्यता झाली.'

क्षीर करणारी जी असेल तिच्यावर कढी करण्याची जबाबदारी कोणीही देत नाही.तिने आपली क्षीर अर्धी क्षी ठेवू नये म्हणजे झाले. त्याप्रमाणे ज्या वृत्तीत ज्ञेयध्येयविचारास्तव जितका सारसन्निवेश गुरूने हाती दिला असेल तितक्याचा समन्वय करता आला की, तो महापंडित झाला; नाहीतर ब्राह्मण सर्वाध्यापक म्हणून चांभाराला जोडे शिवणे देखील त्यांना शिकवावे लागेल! हा दृष्टांत जन्मजातिपक्षी दिला आहे.

४९७. ज्याचे अन्न खाल्ले त्याचा मनुष्य गुलाम होतो की नाही?

होतो, पण हा सामाजिक नसून वैयक्तिक नियम असल्यामुळे अपूर्व स्वभिन्नस्थानी !

४९८. विद्या शिकविणाऱ्याचा मनुष्य गुलाम होऊन राहतो की नाही?

पारलौकिक पद्धतीने गुलाम होऊन राहतोच, तथापि ब्रह्मविद्येतर विद्येत ऐहिक तारतम्य आहे.

४९९. अन्नाची फेड अन्नाने करावी की प्राणाने करावी?

लौकिक गोष्टीत अन्नाने करावी व धार्मिक गोष्टीत प्राणाने करावी; पण निमकहराम कधी होऊ नये! जो मनुष्य लौकिक गोष्टीत धर्माविरुद्ध अन्नाची फेड करितो, तो धर्माचा निमकहराम होय.

५००. फंदी कोणास म्हणावे ?

धर्माची पायमल्ली करुन लोकलालची असतो त्यास!

५०१. निमकहराम बरा की धर्महराम बरा ?

दुसऱ्यापेक्षा पहिला बरा!

५०२. सर्वच समाज धर्माविरुद्ध झाला असेल तर कसे करावे?

एकट्याने मृत्यूला तोंड देऊन असावे आणि अधार्मिक लोकांच्या वंचनभस्मातळी धर्माग्नी प्रज्वलित ठेवावा.

५०३. सामान्य मोठे शब्द ज्ञारून पुष्कळ लोक भुरळ घालीत असतात तेव्हा कसे करावे?

विकारी मनुष्य जर तसे सांगत असतील तर अत्युच्च, सत्य इत्यादी सामान्य शब्दांच्या भपक्यावर जाऊ नये. गुरुशास्त्रद्वारा विशेष शब्दाचा निश्चय करावा व नंतर वर्तन करावे.

५०४. गुरु, शास्त्र प्रत्येक धर्मात निरनिराळे आहेत?

त्यांच्याशी काही कर्तव्य नाही; त्यांचा द्वेष न केला म्हणजे झाले.

५०५. खुनाचा अपराध करणारा व फांशी देणारा दोघेही हिंसकच असतात, तेव्हा अपराधी कोण? (प्र.६५७)

गर्ह्य कर्माला जो आपल्याकडून प्रवृत्त होतो तो! निषिद्ध कामाला आपल्याकडून प्रवृत्त होणे हेच अपराधाचे लक्षण आहे.अपराध्याला शासन करावे लागते त्यात शासन करणारा अपराधी होत नाही.याहून अन्य जी या प्रश्नाची उत्तरे आहेत, ती सर्व स्वपक्षदूषित आहेत.

५०६. अती कष्टानेही बरोबर केलेल्या धर्माचे फळ कधी मिळत नाही?

मनात दंभ असतो तेव्हा!

५०७. उघड पाप करणारा चांगला, की चोरून पाप करून बाहेर लोकांना धर्म शिकविणारा चांगला?

दोघेही वाईट आहेत.

१- तथापि लोकांच्या दृष्टीने जेथे समाज उघड पाप करणाऱ्याला बाहेर टाकण्याला समर्थ आहे, तेथे उघड पाप करणारा बरा व

२- समाज तसा जेथे समर्थ नाही, तेथे ढोंगी बरा.

३- पण अनुकरण मात्र करण्याला कोणीच बरा नाही.

दान

५०८. थोरपणा कशास म्हणतात?

सदर्थ उचितस्वार्थत्याग हाच थोरपणा होय.

दुर्जनासाठी स्वार्थत्याग करणे काही थोरपणा नव्हे.

उचित शब्दाचा अर्थ शास्त्रानुसारी समयग्रहण आहे. अनुचित स्वार्थत्याग झाल्यास त्याची गणना वेडेपणातच होते.

५०९. दाता कोण ?

अभय देणारा!

५१०. सर्व दानात श्रेष्ठ दान कोणते ?

अभयदान व अन्नदान!

५११. या दोहोत कोणते श्रेष्ठ ?

अज्ञात याचकाविषयी अन्नदान व ज्ञात याचकाविषयी सर्वदा अभयदानच श्रेष्ठ आहे. कारण ही दोन्ही दाने प्राणदानाच्या तोडीचीच आहेत. शिवाय ती कोणालाही देता येतात.

अभयदान हे अन्नदानापेक्षा सुलभ आहे, परंतु त्यात मनोविकारांचे दमन फार मोठे लागते. म्हणून ते सर्वात श्रेष्ठ आहे. शिवाय इतर दानाने जसा अभिमान येतो, तसा अभयदानाने येत नाही व अभयदानाचा अभिमान असल्यास उलटा तो नरकनिवर्तकच होतो.

५१२. दान कशाकरिता करावे ?

आपले काहीच नाही अशी बुद्धी दृढ होण्याकरिता!

५१३. याचक फसविणारे पुष्कळ आहेत; मग दान द्यावे की नाही?

१- आपणही पुष्कळांना फसविले आहे व २- फसवित आहो व ३-पश्चादिकांनाही फसवितच असतो, असे समजून यथाशक्ती दान करावे.

५१४. कोणता उपकार कशाने फिटतो ?

१- पैशाचा उपकार दुप्पट दिल्याने फिटतो.

२- अन्नाचा उपकार देह दिल्याने फिटतो.

३- पितरांचा उपकार गयावर्जनादिकाने फिटतो. आणि

४- गुरूचा उपकार त्यांनी आज्ञा दिल्यावर, संप्रदाय वाढविल्याने फिटतो.

असे सूज्ञांचे मत आहे. पण असे करून देखील उपकारांची स्मृती जागृत ठेविली पाहिजे. नाहीतर तो उसने फेडणारा कृतघ्न समजला जातो.

५१५. अहो, अन्न देणाऱ्याचा उपकार देह दिल्याने जर फिटतो तर भिकाऱ्यांनी व महात्म्यांनी कसे करावे?

भिकारी आपन्न असतात, म्हणून त्यांना परान्नाचा दोष नाही आणि महात्मे परमेश्वरस्वरूप असल्यामुळे त्यांचेच सर्व आहे, म्हणून त्यांना परान्नाचा दोष नाही असे शास्त्र आहे.

५१६. ठक कोण?

दुसऱ्यास दान देण्यास सांगतो व आपणावर प्रसंग आला असता दान देण्याचे टाळतो तो, असे श्री तुकाराम सुचवितात -

वाघे उपदेशिला कोल्हा । सुखे खाऊ दे रे मला ।।१।।
देह जाणार जाणार । परी घडो परोपकार ।।२।।
सिंह म्हणे भला भला । तुझ्याच तोंडे निवाडा झाला ।।३।।
गांठ पडली ठका ठका । त्याचे वर्म बोले तुका ।।४।।

५१७. पृथ्वीतील धन वस्तुतः कोणाचे आहे ?

धार्मिकाचे ! त्याने धर्माकरिता त्याचा कसाही विनियोग करावा.

५१८. एखाद्या धनाविषयी दोन धर्मांचा परस्पर लढा असल्यास कसे करावे?

दोन्ही धर्मांतील विशेष भागाकरिता त्या धनाचा उपयोग करू नये, तर सामान्य भागाकरिता करावा. याच आशयाने अत्र्यादिस्मृतीत सर्व सृष्टीला पूर्त कर्माचा अधिकार दिला आहे.

५१९. इष्टकर्मे श्रेष्ठ की पूर्त ?

दोन्ही कर्माविषयी शास्त्र आहे म्हणून त्यात श्रेष्ठ कनिष्ट भाग नाही; तथापि इष्टकर्माने स्वर्ग व पूर्त कर्माने मोक्ष मिळतो असे स्मृतीत म्हटले आहे

५२०. पैसा जर आम्ही कमावतो तर दान कां करावे?

मूर्ख व नीच लोकांचा हा व्यर्थ अभिमान आहे.

सर्व लोक दानावरच पोट भरत असतात; कोणालाही स्वतंत्र पैसा मिळत नाही. निरपराधी पशूच्या प्राणावरच मनुष्यांचे सर्व चालते.- तेव्हा परस्पराला देणे हा काही मोठा उदारपणा नव्हे म्हणून दान करणे हा मनुष्याचा स्वभावच असला पाहिजे. सृष्टीत परस्पर उपकारकता आहे, म्हणून खरा उपकार करणारा एक परमात्माच आहे, असे मधुविद्येत सांगितले आहे.

५२१.अहो, जेऊ घालणाऱ्याच्या पंक्तीत एखादा कसाई येऊन बसला आणि त्याने ते अन्न खाल्यावर नव्या दमाने गाय मारली तर ते पाप कोणाला?

तुझ्या मनातील इंगित समजले. अन्नदान हे कलीमध्ये विशेषतः श्रेष्ठ सांगितले असून **'कलौ कर्ता च लिप्यते'** असे पातकाविषयी सांगितले आहे. तेव्हा धर्माच्या उद्देशाने अन्नदान करणाऱ्याला कसायाने गाय मारल्याचे पाप लागणे शक्य नाही. असा आक्षेप करणाऱ्या मूर्खानी आपल्या कुलात पुत्र व्यभिचारी निघेल म्हणून बायकांशी संबंध सोडले आहेत काय? कारण अशी पापांची परंपरा कितीही चांगल्या कर्माला लागू शकेल. संसारामध्ये अमुक चांगले व अमुक वाईट याचा निर्णय करणे शहाण्याचे काम नाही; कारण फसविण्यामध्ये कुशल अशा मायेनेच तो संसार निर्माण केला आहे म्हणून!

'शास्त्र जे सांगेल ते चांगले व नाही सांगणार ते वाईट'

इतकेच लक्षण समजावे.

५२२. अहो, सर्वांनाच भिक्षा मिळू लागली, तर लोक आळशी होणार नाहीत काय?

अरे, पण सर्वच कामे करू लागल्यास कामे सापडणार नाहीत ना? दारिद्र्य व श्रीमंती दैवानुसार सर्वांना आहे, इकडे लक्ष देऊन 'श्रद्धेने थोडक्यात थोडके कोणास काही द्यावे.'

सर्वांनी आमचे नोकर झाले पाहिजे म्हणून कोणास भिक्षा देऊ नये, हे पैशाने फुगलेल्यांचे नीच म्हणणे कोणीकडे! आणि सर्वांच्यावरच मी पोट भरले आहे, म्हणून माझ्या मिळकतीचे ते विभागी आहेत, ही जगन्मान्य उदार समजूत कोणीकडे! दानरहित भोग करणाऱ्यांची संपत्ती स्तेनांची(चोरांची) झाल्यास त्यांना पाप कशाचे!

५२३. स्वत्व कशाला म्हणतात ?

अमुक माझे आहे, असा अभिमान धरण्याला कोणाकडून हरकत येण्याला!

५२४.अहो पण, तसे स्वत्व माहीत नसलेल्या चोराच्याही पैशावर राहील?

राहतेच.म्हणूनच लुटारू लोक देखील वैशाखमासी पांथस्थाला दान करून स्वर्गी गेल्याच्या कथा पुराणात आहेत आणि महाभारतातही असा दंश आहे.

५२५. चोरापुढे पळून जाणाऱ्याला दानाचे फळ मिळते की नाही?

नाही.दान म्हणजे खुशीने देणे होय.

५२६. दान श्रेष्ठ की सत्य श्रेष्ठ ?

माझ्या मताने ते दोन्ही एक आहेत.जितके सत्यात त्यागाचे धैर्य दाखवावे लागते तितके दानातही त्यागाचे धैर्य दाखवावे लागते.पण सत्य कोणी विचारल्यास बोलावे लागते आणि दान 'न मागताही देणे' सांगितले आहे. हा सत्यापेक्षा दानात विशेष आहे.परंतु देईन म्हटल्यावर न देणे किंवा भलतेच देणे दात्याला धर्मसाधक होत नाही.म्हणून दानाला सत्याची अपेक्षा आहे.याप्रमाणे ते दोन्ही एकच होत असे माझे मत आहे.

५२७. ''दया दानाद् विशिष्यते'' असे कां म्हणतात?

दयेने केलेल्या दानात कोणतीही कामना नसते. म्हणून लोकव्यवहारही असा आहे की जे जे दयेने दिले जाते त्याचा बदला कोणी इच्छित नाही.यातच अहिंसाही गणली जाते.

५२८.जो तो आपल्या कर्माचे फळ भोगतो मग त्याला मदत कां करावी?

तूं आपल्या कर्माचे फळ भोगत असलास म्हणजे दुसऱ्यांनी आपल्यास मदत करावी असे तुला वाटत असते म्हणून! ''मी आपल्या कर्मांचे फळ भोगतो. मला साह्य कशाला करता?'' असे तूं कधी म्हणतोस काय?

शिवाय जीव कर्माचे फळ भोगतो असे शास्त्रच सांगते व दुसऱ्यास मदत करावी असेही शास्त्रच सांगते.**'श्रद्धया देयम्'** इत्यादी श्रुती शिक्षेतच आहेत,

शिवाय परमेश्वर त्याला कर्मांचे फळ भोगवितो, म्हणून आपण दिले असता परमेश्वराने ते त्याच्याजवळ राहू दिले तर तितके त्याच्या कर्माचे फळ परमेश्वराने संपविले, असे अनुमान होत नाही काय?

अथवा परमेश्वराने ते त्याच्या जवळून नेले असता आपणास त्याची काळजी काय? कारण श्रुतीप्रमाणे वागल्याने आपल्यास पुण्यच आहे.

५२९. एखादा कसाई ब्राह्मणाचे सोंग घेऊन येऊन दान घेऊन जाईल व भलतेच काम करील तर ते पाप कोणाला?

कसायाला. कारण 'वेषाला मान द्यावा' येवढेच शास्त्रात सांगितले आहे व तेवढेच मनुष्याला ओळखण्यासारखे आहे; म्हणूनच ब्राह्मणांची शिखासूत्रादिक चिन्हे सांगितली आहेत.प्रत्येकाच्या अंतःकरणाची पारख करू म्हटले तर बारा बारा वर्षे सहवास करावा लागेल, म्हणून -

उघडपणे दोष दिसला नाही तोपर्यंत यथाशक्ती कोणासही द्यावे.

शिवाय दुसऱ्याचे दोष पाहून नंतर देऊ असाच जर आग्रह असेल तर आपल्यात कोणताच दोष नाही, अशीही आपली खातरी असली पाहिजे.कारण ''दुष्टाला दान देऊ नये'' जसे शास्त्रात सांगितले आहे, तसा ''दुष्टाचा प्रतिग्रह घेऊ नये'' असेही शास्त्रात सांगितले आहे, बरे, सर्वच शिथिल असेल तर यथाशक्ती धर्म करावा हेच निघते.

५३०. दात्यात व याचकात सद्गुण व दुर्गुण कोणते समजले गेले आहेत?

जवळ असल्यास, कोणालाही नाही न म्हणता, 'साक्षात् किंवा परंपरेने यथाशक्ती देणे' हा दात्याचा मुख्य गुण होय; आणि

मिळेल तेवढ्यात संतुष्ट राहणे, हा याचकाचा मुख्य गुण होय.

५३१. क्रोधी व हटी याचकाला न दिल्यास पातक नाही, मग नृगराज ब्राह्मणाच्या हट्टामुळे सरडा कां झाला बरे?

तसा समर्थ भेटल्यास सर्वस्वही देऊन टाकावे. कारण शापाने सर्वस्व नेण्यास व वराने स्वर्गादिक सर्वस्व देण्यास तो समर्थ असतो. परंतु अशाचे तप उघड आपल्यास समजून आले पाहिजे. कलीमध्ये जर तप समजून येणार नाही तर यथाशक्तीच दान द्यावे. महौदार्याच्या भ्रांतीने फसून जाऊ नये.

यतये कांचनं दत्वा तांबूलं ब्रह्मचारिणे ।
चोरेभ्योऽप्यभयं दत्वा दातापि नरकं व्रजेत् ।

संन्याशाला सोने, ब्रह्मचाऱ्याला विडा व चोराला अभय देणारा दाता देखील नरकास जातो, अशी स्मृती आहे.

५३२. हित करावयाचे म्हणून लोकांच्या हातून जुलुमाची कृत्ये बऱ्याच ठिकाणी घडून येतात तेव्हा हित करण्यामध्ये काही बेतबात आहे काय?

अवश्य आहे. प्राणी जर आपल्या स्वभावाला अनुसरला तर त्याच्यापुढे माझा किंवा तुझा निग्रह काय करणार! असे भगवंताने गीतेत व आचार्यांनी त्यावरील भाष्यात म्हटले आहे. तेव्हा हित करण्यात बेत ठरलेलाच आहे. प्रापंचिक व पारमार्थिक अशा भेदाने हित दोन प्रकारचे आहे.

शिवाय हितात तीन प्रकार आहेत - पाशव, प्रापंचिक आणि पारमार्थिक. १- मूर्खांना किंवा वेड्यांना जबरदस्तीने जेवू घालणे पाशव हित होय. हे हित बलात्कारानेही करावे, परंतु त्यात त्यांना सुख होईल इतके तारतम्य पहावे. २- मित्रादिकांचे जे धन, सल्ला, औषध, आदिकांनी कल्याण करणे, याला प्रापंचिक हित म्हणतात. हे हित ज्याचे हित करावयाचे तो नको म्हणेल तर करू नये; अन्यथा लोभ व अपमान, करणाऱ्याच्या गळ्यात पडतात.

३- परब्रह्मतत्त्वाचे ज्ञान करून देणे, हे पारमार्थिक हित होय. अंगी दंड देण्याचे सामर्थ्य असेल तर, नको म्हणत असताही हे हित करावे.

परंतु स्वतःच्या सद्गुणांचे रक्षण करावयाचे असेल तर, अंगी दंड देण्याचे सामर्थ्य असले तरी अधिकाऱ्यावाचून हे हित करू नये; कारण तशाने तपःक्षय होतो.

अंगी दंड देण्याचे सामर्थ्य नसेल तर अनधिकाऱ्याशी भाषणच करू नये; कारण त्याने लोभाचा आरोप गळ्यात पडतो. **'बरे करता ब्रह्महत्या'** करून घेणे चांगले नव्हे.

५३३. एखाद्या चांगल्या कामाकरता तपःक्षय करून घेतला तर त्या चांगल्या कामाने तो तपःक्षय भरून निघणार नाही काय?

चांगले वाईट ठरविणे आपल्या बुद्धीवर अवलंबून नसून गुरुशास्त्रावर अवलंबून आहे. साधूला कोणीही जेवू घालेल, गाईला कोणीहि खाऊ घालेल म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करून - अनाथ समजून दयेने कुत्र्याचे व विंचवाचे पालन केले तर ते पाप कांही कुत्र्याच्या पुण्याने भरून निघणार नाही. याविषयी हेमांग राजाची गोष्ट पुराणात आहे, ती सांगतो.

हेमांग राजाची गोष्ट

हेमांग राजाने अनेक प्रकारची दाने अतोनात केली, परंतु ती सर्व अविद्वानांनाच केली, कारण विद्वानांचे कोणीही रक्षण करील, पण अनाथाला माझ्यावाचून कोणीही नाही, असा त्याचा समज होता. एके वेळी घरी

वसिष्ठ आले तरी हे सनाथ आहेत असे समजून त्याने त्यांचे पूजन केले नाही.

अशा त्याच्या विलक्षण भूतदयेमुळे त्याला अनेक प्रकारचे तिर्यक् जन्म घ्यावे लागले पुढे एका पालीच्या जन्मात एक ब्राह्मण विष्णुतीर्थ सिंचन करीत असतां त्याच्या अंगावर पडून त्याला आपल्या पूर्वजन्मांचे व पुढील जन्माचे ज्ञान झाले व नंतर तो ब्राह्मणास शरण जाऊन मुक्त झाला.

५३४. तुम्हां आम्हांस विष्णुतीर्थाने ज्ञान कां होत नाही?

घेणारा अती तप्त व श्रद्धालू नसतो व देणारा अधिकारी नसतो म्हणून!

५३५. नामदेव कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन धावले तेव्हा त्यापासून त्यांना पुण्य कसे झाले?

जो सर्व भूती परमेश्वराची उपासना करतो, त्याला तपःक्षयादिकांचे नियम लागू नाहीत. नामदेव गाईच्याही मागे तसेच धावले असते.गाय सनाथ म्हणून सोडून कुत्रे अनाथ म्हणून पालन करण्यामागे नामदेव लागले नव्हते. 'माझ्या भावाला जिवंत करण्याचे सामर्थ्य माझ्या हाती नाही.व मी काही त्यांना टाकून दिले नाही; परंतु हे कुत्रे जीव ठेवून माझ्याबरोबर आले आहे.म्हणून याला सोडून मरणेहि मला उचित नाही'- हे युधिष्ठिराचे स्वर्गारोहण-
पर्वातील उद्‌गार भूतसाम्यप्रेमाचेच द्योतक आहेत.विपरीत-दयाप्रवाहप्रेरित विषम प्रेमाचे द्योतक नाहीत; म्हणून नामदेव, युधिष्ठिरादिकांना हेमांगसाम्यता येत नाही.यामुळेच आमचे मागील विधान सम्यक् आहे.

कुलधर्म

५३६. कुलधर्म चांगले कोणते व वाईट कोणते ?

शास्त्रीय व सांप्रदायिक चांगले आणि नवसाने लावून घेतलेले सर्व वाईट!

५३७. मग नवसाने लागलेले कुलधर्म पाळावे की नाही?

धर्मात बाध येत नसेल आणि सत्कार्याकरता असतील तर पाळावेत व त्याच्या उलट असतील तर खुशाल टाकून द्यावेत; काही होत नाही.

वारकरी पंथ

५३८. आपण कोणत्या पंथाचे आहा असे लोकांना समजत नाही?

१- नाही तर मी सांगतो.मी कोणत्याही पंथाचा अभिमानी नाही तथापि शहाणा असा वारकरी पंथ मला मान्य आहे. इतका सुंदर पंथ मागे झाला नाही व पुढे होणार नाही. हा पंथ इतक्या शहाणपणाने स्थापिला गेला आहे की, त्याला पंथ न म्हणता धर्मच नांव शोभते.

२- आक्षेपार्ह अशी गुरुशिष्यपद्धति या पंथात नाही, तर ती शुद्ध आहे.

३- निरनिराळ्या देवतेंचे उपासक या पंथात होऊन गेले आहेत. नरहरी सोनार महाशैव, जनार्दन-एकनाथ दत्तभक्त, भानुदास सूर्योपासक, तात, तुकारामादि वैष्णव, हे सर्व या पंथाचे अध्वर्यु झाले आहेत. शिवाय नाथादि ब्राह्मण, तुकारामादि कुणबी, शेखमहम्मदादि मुसलमान, रोहिदासादि चांभार, चोखामेळादि महार, आणि कान्हुपात्रादि वेश्या सुद्धा या पंथाच्या अनुयायी झाल्या आहेत.मुक्ताबाईसारख्या ब्रह्मचारिणी आचार्या व जनाबाई सारख्या दासी या पंथात समत्वाला आलेल्या आहेत. नामदेवांची लालनभक्ती विश्वंभरादिकांचे वात्सल्य, आणि मुक्तकेशी आदि बायांचे माधुर्य या पंथात एकवटलेले आहे.

४- जितके म्हणून हिंदुस्थानात सत्पुरुष होऊन गेले त्या सर्वांचा एकवेळ या पंढरीशी परिचय झाला आहे.

५- द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत सर्व काही या पंथात संपादिले आहे.

६- शिवाय कबीर, नानक पंथाप्रमाणे कर्म सोडवायला लावून हा पंथ कोणाची मने दुखविणारा नव्हे, त्यामुळे -

हा पंथ खास विश्वधर्म होणार !

७- आता या पंथात कांही लोक आग्रही आहेत, मी नाही म्हणत नाही; तथापि इतर पंथाच्या आचार्यांतहि आग्रह वरवर पाहणारास दिसत होता. तो या पंथाच्या स्थापकांत दिसत नाही.

८- पुनः या पंथाने एखादी गादी स्थापन करून पैसे उपटण्याची व्यवस्था केली नसल्यामुळे व वैदिक चिन्हांचा त्याग न करता पौराणिक चिन्हांनीच हा पंथ अलंकृत असल्यामुळे, मी विठ्ठलउपासक जरी आपल्याला म्हणवून घेत नाही, तरी पण कायावाचामनेकरून या पंथाच्या ठिकाणी माझा अत्यंत आदर आहे.

''धर्मभेदांचा नाश करून सद्गती देणारा हाच एक पंथ होईल,''

- असे मी म्हणतो.

५३९. अहो, कलीमध्ये तर धर्मनाश होणार आहे ?

मनुष्यांचा धर्म कलीमध्ये नाश होईल असे सांगितले नाही.ज्यांच्यातील धर्म निघून जाईल ते किन्नरादी लोक कलीच्या शेवटी उत्पन्न होतील.मनुष्यांना तर, एक राजा सर्वांनाच ब्राह्मण करील असे भविष्यपुराणात म्हटले आहे.तेव्हा कलीला भिऊन घाबरून जाऊ नको आणि भागवतधर्माचे अवलंबन कर. भागवत धर्माचा विशेष विचार मी 'सुरतरूत' केला आहे.

हिंदु धर्म

५४०. हिंदू कोणास म्हणावे ?

१- वेद, वेदांग, पुराणे व तदनुकूल संप्रदाय हे ज्यास मान्य आहेत व जो परंपरागत हिंदूच्याच पोटी आला आहे त्यास !

२- परंतु हे ज्यास मनापासून प्रमाणच वाटतात त्यालाही **दीक्षाहिंदू** म्हणजे **दीक्षार्य** म्हणावे.

३- ज्याला हे मान्य नाहीत व केवळ हिंदूच्या पोटी आला आहे तो **जन्मार्य** म्हणजे **जन्महिंदू** होय.

४- **उभयार्य** सर्वथा श्रेष्ठ आहेत;

५- पण उभयार्य नसेल तर पूज्यतेच्या दृष्टीने दीक्षार्यच मी श्रेष्ठ मानतो;

६- तथापि लग्नाच्या कामात जन्मार्याचीच योजना करावी.

५४१. आर्य धर्मात कोणते ग्रंथ नेहमी वाचण्यासारखे आहेत व त्यात काय सांगितले आहे?

रामायण, भारत व भागवत हे आर्य धर्माचे तीन मुख्य ग्रंथ असून-

राम = परमात्मा, त्याचे अयन = स्थान, सर्वत्र राम आहे असा **रामायण** शब्दाचा अर्थ आहे.

आता तो राम मिळणार कसा? म्हणून भारत सांगितले आहे.

भा = ज्ञान त्याचे ठिकाणी रत होणे याचे नाव **भारत** आहे.

पण ज्ञानात रत कसे व्हावयाचे? एवढ्याकरता **भागवत** सांगितले आहे.''आपला उत्तम भाग निवडून घेणे'' हा त्याचा अर्थ आहे.

रामायणापासून **अनुकरण** शिकावे लागते म्हणजे डोळ्यापुढे ठेवण्याचे पुतळे रामायणात आहेत.

भारतात निरनिराळ्या प्रसंगी कसे वागावे हे **चातुर्यविशेष** आहे.

भगवंताच्या **प्रेमात वेडे** कसे व्हावे, ही गोष्ट भागवतात आहे.

५४२. परधर्मांची पुस्तके वाचावी की नाही?

आपल्या धर्माचा विसर पडेल अशा रीतीने ती वाचूं नयेत.

स्नेहाने जेवायला बोलाविले असता कोणाच्या येथे जाण्यास हरकत नाही, परंतु पराऱ्नाची रुचि लावून घेणे वाईट तसेच परधर्माची पुस्तके वाचण्याविषयी आहे.

५४३. सर्व धर्मात हिंदुधर्म सर्वांच्या पूर्वी होता हे जसे म्हणतात तसेच सर्वधर्मवेत्ते म्हणतात.तेव्हा खरे कोणते समजावे?

ज्या धर्मात ज्ञात गोष्टी अधिक आहेत व अदृष्ट कल्पना कमी आहेत तो तो धर्म जीवप्रणीत असे ठरलेले असून, ऐतिहासिक पुरातनत्व आर्यधर्माकडे येतही आहे.

५४४. पश्चिमेकडे एखादी गोष्ट निघाली की ती आपल्याकडे होती, असे दाखविण्याची पौरस्त्यांना संवय लागली असून त्याला ते वेदाचा आधार देत असतात, हे योग्य आहे काय?

वास्तविक रीतीने असे प्रयत्न सर्वाकडेच होत असतात.तथापि

'कोणत्याही देशातील कोणत्याही शास्त्राचे मूलतत्त्व आर्य शास्त्रातच आहे' असे माझे स्पष्ट मत असून 'प्रत्येकाचा प्रयोगातील अनुभव मात्र विशेष आहे'. तथापि जे लोक भौतिकशास्त्रालाही अलीकडे वेदाचाच आधार देतात, त्यामुळे दोन तोटे झाले आहेत.

१- एकतर,'ब्राह्मणांनी विद्या चोरून ठेविली व आम्हाला वेद म्हणू देत नाहीत' असा विवाद इतर जाती करू लागल्या आहेत.

२- दुसरा, ज्या मंत्राचा ते आधार देतात ते मंत्र देवतेच्या स्तुतिपर असतात, पण ते सर्व भौतिकपर लावल्यामुळे देवता मानण्याचे कारण राहत नाही व त्यामुळे भौतिक भागाची उन्नती तर एका मानसिक भागाची अनवती होऊ पाहते.

३- माझे मत तर असे आहे की,

'न्यायादि शास्त्रातून व देवताभंग होत नसल्यास,

''वेदातूनही भाषांतराच्या मूळाप्रमाणे, सर्वशास्त्रे आपल्याकडे दाखविले तर मोठा उपकार होईल!''

सर्व जगाचा धर्मग्रंथ

गीता

५४५.सर्व जगाचा धर्मग्रंथ होण्यास पात्र असे कोणी पुस्तक आहे काय?

होय.पात्र झालेच आहे.

ते पुस्तक ''गीतासंवलित महाभारत'' होय.

५४६. ब्राह्मण श्रेष्ठ की क्षत्रिय श्रेष्ठ?

शमदमादि गुणसंपन्न ब्राह्मणच क्षत्रियादिकांपेक्षा श्रेष्ठ आहेत, असे शास्त्र म्हणते.पण स्वर्गाकरता यज्ञात निरपराधी पशूंचा वध करणाऱ्या ब्राह्मणापेक्षा स्वतःच्या शरीराची आहुती देणारे क्षत्रियादिकच श्रेष्ठ होत; असाही शास्त्रांचा अभिप्राय आहे.

५४७. ब्राह्मणांनी इतर लोकास गुलाम केले, असा सर्वत्र ध्वनी आढळतो, याविषयी आपले काय मत आहे?

सत्पुरुष कोणत्याहि जातीचा असला तरी ब्राह्मणांनी त्याची सेवा करावी असे ज्या अर्थी आमच्या आर्यशास्त्रात सांगितले आहे, त्या अर्थी या ब्रह्मद्विड्ध्वनीत काही अर्थ नाही असे माझे मत आहे.

आर्यशास्त्र म्हणते ते इतकेच की, एक तर तुम्ही तपाने सर्व गुण मिळवून घेऊन ब्राह्मण व्हा, नाहीतर तपस्वी गुणी मनुष्याला मान तरी द्या.

तात्पर्य, राजकीय दृष्टीनेही सत्यपालनधर्माचे महत्त्व आहेच.

५४८. जाती जन्माने, की गुणकर्माने मानावयाची?

साधारणांची जन्माने व ऋषींची कर्माने !

५४९. आर्य धर्मात जन्मसिद्ध हक्क काय लावून ठेविले आहेत?

अरे, जन्मसिद्ध किंवा दीक्षासिद्ध हक्कानेच धर्म कायम राहत असतो.

आज या धर्मात तर उद्या त्या धर्मात अशी भुगारी करणाऱ्याच्या हातून कधी तरी धर्माची सेवा घडली आहे काय?

समाजात तरी आम्ही या देशी जन्मलो म्हणून आमचा हाच देश असे कां बरे लोकास वाटावे?

जो राहील त्याचा देश असे कोणासही कां वाटूं नये?

हिंदुस्थानात कर्माकरता वर्णभेद - तर इतरत्र तो ऐहिक सुखाकरता व मातीकरता आहे, हे पक्के लक्षात ठेविले पाहिजे.

५५०. आर्यधर्मात गुरुदक्षिणेचे हे काय बंड आहे?

असले तरी - आर्य देशात शिष्य आपल्या खुशीने गुरुदक्षिणा देतात व अन्य देशात गुरु शिष्यावर फिर्याद करून ती दक्षिणा घेतात; इतका फरक आहे.

५५१. मग आपला आर्यधर्म सनातन कशावरून ठरेल?

त्याला मुख्य कारण तर **१**- साक्षात्कार व **२**- शास्त्रसमावेश हे असून **३**- सर्व जगांतील इतिहासाच्या सामान्यसत्तेने तो पूर्वसिद्ध आहे, हेही एक गौण कारण आहे.

५५२. पण आपल्या धर्मात दुसरे लोक येऊ शकत नाहीत, असा हा तुसट व एकटकोंबडा आहे किंवा नाही?

छे, छे, तसा तर तो मुळीच नाही; परंतु -

१- तो परधर्माचा द्वेष करणारा नसल्यामुळे व ''कोणताही धर्म कधीना कधी तरी सनातन तत्त्वाला जाऊन मिळेल'' असा त्याचा निश्चय असल्यामुळे, धर्मातील भांडण मोडणारा हाच एक आहे.

२- परधर्मी लोकांना काफर समजून कापून टाकावे असे वेड वैदिक धर्मात कधीच उत्पन्न झाले नाही व होणार नाही.

३- आम्ही वैदिक लोक ज्या आर्ष इतिहासावर विश्वास ठेवतो, तो इतिहास असे सांगतो की, धार्मिक व अधार्मिक लोकात जरी युद्धे होत असतील तरी धार्मिक व परधार्मिक लोकात या भरतखंडात युद्ध मुळीच झाले नाही.

''या धर्मातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेत
उपदेशक आणि योद्धे निराळे ठरले गेले असल्यामुळे,
खऱ्या धर्मात विकारांची भेसळ झाली नाही.''

यामुळेच आमच्या ज्ञा धर्माला कित्येक लोक नेभळा धर्म म्हणतात. परंतु या धर्माचे क्षात्रतेज इतिहासप्रसिद्ध आहे.

तथापि त्याच्या अविकारी धर्मात मिसळा झाला नाही.

याचमुळे अविकारी उपदेशक वर्गाचे महत्त्व आमच्याकडे मोठे झाले आहे.

५५३. जसे इतर धर्मवादी दुसऱ्यांना आपल्या धर्मात घेतात तसे तुम्हीही तर म्लेच्छादिकांना आपल्या भक्तिमार्गात घेता?

पण त्यांची इच्छा असली तर आम्ही त्यांना घेतो, तरवारीने त्यांचा धर्मच्छेद करून आम्ही त्यांना घेत नाही.

५५४. राजाने तरवारीने अधर्मी लोकांना दंडावे असे तुमच्या पुराणात सांगितले आहेना?

सांगितले आहे, पण -

१- तो ज्या धर्माचा असेल त्या धर्मात त्याला स्थापावे, आपल्या धर्मात ओढून आणावे असे सांगितले नाही.

२- कोणत्याच धर्माचा नाही व जो भयंकर आहे अशालाच राजदंड सांगितले आहेत.

३- वैदिक असोत की तांत्रिक असोत, त्यांना त्यांच्या धर्मात स्थापिले पाहिजे, असे सूतसंहितेचे म्हणणे आहे.

५५५. हिंदुस्थानात धर्मासाठी युद्ध झाले नाही असे उद्घोष करणारे पुष्कळ आहेत. पण शांकरदिग्विजयात बौद्धांशी शंकराचार्यांनी युद्ध केले, असे मी ऐकतो हे कसे?

तुझ्या ऐकण्यात चूकही होण्याचा संभव आहे. शिवाय -

१- परधर्मी मनुष्य नको अशा द्वेषाने खरोखरच युद्ध झाले नाही व होणारही नाही पण हिंदुंची वाणी इतकीच आहे की,

२- परधर्माला आम्ही जसे प्रेमाने वागवितो त्याप्रमाणेच त्यांनीही आमच्या धर्मास प्रेमाने वागवावे.आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नये.

परधर्मात ढवळाढवळ करण्याचा स्वभाव हिंदूंचा जन्मलाच नाही.

स्वतःच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूनी उगे रहावे,
म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे,
असे का तुझे म्हणणे आहे?

हिंदूनी युक्तिवादच प्रथम केले.

मुसलमानांचा व हिंदूचा धर्मद्वेष तरी धर्मद्वेषाने पडलेला नसून हिंदूंना जीवापेक्षा पलीकडे वाटणारी जी बायकांची अब्रू ती घेतल्यामुळे पडला आहे, असे (Todd) टॉडकृत राजस्थानच्या इतिहासावरून दिसते.

५५६. बौद्ध, महम्मदी व ऐश या धर्मांनी देशचे देश आपल्याकडे ओढले असताही हा आर्यदेश कसा टिकला?

१- हे तिन्ही धर्म आपल्या धर्माचीच अधिकारानुसार स्वरूपे आहेत, हे भविष्य पुराणावरून आर्यास ठाऊक आहे.

२- इतर धर्मांत नाही ते आर्यधर्मात आहे व

३- इतर धर्मात आहे तेही आर्यधर्मात आहे आणि

४- आर्यधर्मात नाही ते इतर कोठेही नाही; हे आर्यांच्या सहवासामुळे इतर धर्मीयांना कळू लागले आहे.

५- पुनः इतर धर्मानी जरी आर्यधर्म मोडण्याची खटपट केली तरी आर्यधर्माने इतर धर्म मोडण्याची खटपट केली नाही.

६- याप्रमाणे या आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुतेमुळे आर्यांचा नायनाट करणे विचारी पुरुषांना बरे वाटले नाही.

जे जे धर्म हिंदुस्थानात आले त्यांनी त्यांनी शेवटी आपले आर्यांशी ऐक्यच करून घेतले.

१- बौद्धधर्माच्या महायानपंथाशी व शैवपंथाशी एकीकरण झाले होते. याविषयी **''बुद्धो वा च गिरीशोऽथवा''** इत्यादी श्लोक प्रमाण आहेत.

२- पार्शीधर्माचे ऐक्य त्याच्या झालेल्या संस्कृत भाषांतरावरूनच कळते

३- **''मस्नवी ए मानवी''** इत्यादी सूफी ग्रंथावरून मुसलमान इकडे येण्यापूर्वी सुद्धा त्याच्यात हिंदु ग्रंथाविषयी आदर होता असे दिसून येते. हिंदु व मुसलमानांचे ऐक्य करणारा **''दिन् इलाहि''** या नावाचा धर्म अकबराने काढला होता. असा इतिहास आहे; आणि

४- ऐश(ख्रिश्चन) व हिंदुंधर्माचे ऐक्य करण्याची खटपट आता चाललीच आहे.

५- तथापि ही खटपट हिंदूंनी आपल्याकडून करून घेतली असा कोठेही इतिहास नाही, तर दुसरीकडून येथे येवून राहणाऱ्यांनीच हिंदुधर्मालाच भाळून आपले ऐक्य करून घेतले, असाच इतिहास सापडतो.

दुसरीकडे कितीही जड सुधारणा झाली,
तथापि तिचा जेव्हा कंटाळा येईल,
तेव्हा सर्वांना शांती आर्यावर्तांतच मिळेल, व
याचमुळे आर्यदेश टिकला आहे व टिकणार आहे !

आर्य लोक इथले - भारतातलेच

५५७. आर्य लोक जेव्हा इकडे आले तेव्हा येथल्या लोकांना त्यांनी जिंकून आपले दास करून त्यांना दस्यू म्हटले, तेव्हा जातिभेद हा धर्मजुलूम नाही काय?

''आर्य लोक इकडे आले'' ही उपपत्ती अलीकडेच निघाली आहे. ''ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीनच वर्ण आर्यांचे असून शूद्रवर्ण हा येथील दस्यू लोकांचा आहे,'' असे म्हणणे, ही उपपत्ती मानणाऱ्यांचे आहे व ही उपपत्ती मानणारे देशाचे पुढारी म्हणवितात.

परंतु त्यांच्या या उपपत्तीमुळे शूद्रांचा व ब्राह्मणांचा कायमचाच द्वेष राहण्याची पाळी आली आहे.

''या लोकांनी कायमचेच आम्हांला गुलाम करून घेतले आहे'' असा समज या उपपत्तीमुळे शूद्रांच्या मनामधून कधीही नष्ट होणे शक्य नाही; व त्यामुळे कितीही सवलती दिल्या तरी कायमचा कलह राहतोच.

शिवाय, आम्हाला गुलाम करण्याकरताच वेदाचा अधिकार यांनी आम्हाला दिला नाही, ही समजूत या उपपत्तीमुळे दृढ होण्याचा संभव आहे.चातुर्वर्ण्य हे गुणकर्मसिद्ध किंवा जन्मसिद्ध याचा संशय व वरील प्रकारची भाषणे मी धर्मपरिषदेतून पुढाऱ्यांची ऐकली आहेत.

चातुर्वर्ण्य गुणकर्मसिद्ध असो की जन्मसिद्ध असो,
दोन्ही पक्षात शूद्रवर्ण हा गुलाम नसून आर्यांचाच एक भेद आहे,
हेच मला दाखवावयाचे आहे.

एका बेटांत मुसलमान धर्माचे लोक आहेत.त्यांच्यात जातिभेद इतका कडक आहे की, खालच्या जातीने छत्री घेणे हा सुद्धा गुन्हा आहे.''उन्ह व पावसाकरता छत्री घ्यावी, शोभेकरता घेऊ नये'' असा तेथील सरकारास कायदा करणे भाग पडले असे 'बालबोधात' मी वाचले आहे.

तसा गुलामी वर्णभेद आर्यांमध्ये नाही.

'विराट पुरुषाच्या मुखापासून झालेले ब्राह्मण, बाहूपासून झालेले क्षत्रिय, उरूपासून झालेले वैश्य व पायांपासून झालेले शूद्र' असे पुरुषसूक्तात म्हटले आहे; आणि सायणाचार्यांनी याचे भाष्य करताना तैत्तिरीय शाखेच्या सातव्या कांडातील याच अर्थाची श्रुती प्रमाण घेतली आहे.

महाभारत शांतिपर्व, अ.१८८ मोक्षधर्माच्या क्रमाने अ.१५,श्लोक १० ते १३ यांतही गुणकर्मपक्षी असे म्हटले आहे की,

न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् । ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥१०॥
कामभोगप्रियास्तीक्ष्णाः क्रोधनाः प्रियसाहसाः । त्यक्तस्वधर्मा रक्तांगाः ते द्विजाः क्षत्रतां गताः ॥११॥
गोभ्यो वृत्तिं समास्थाय पीता कृष्युपजीविनः । स्वधर्मान्नानुतिष्ठन्ति ते द्विजाः वैश्यतां गताः॥१२॥
हिंसाऽनृतप्रिया लुब्धाः सर्वकर्मोपजीविनः । कृष्णाः शौचपरिभ्रष्टाः ते द्विजाः शूद्रतां गताः॥१३॥

या श्लोकाचा अर्थ स्पष्टच आहे; व यावरून,

शूद्र हा द्विजांचाच भेद आहे, गुलाम नव्हे. हेही उघड होत आहे.

जन्मपक्षी व गुणकर्मपक्षी प्राचीन लोक शूद्राला गुलाम मानीत नव्हते.

वेद : अपौरुषेय

आता कोणी असे म्हणेल की, पुरुषसूक्त अलीकडे झाले; तर वेद जीवकृत आहेत असे म्हणणाऱ्यालाच ते शोभेल. वेद पौरुषेय आहेत असे मत अलीकडेच निघाले आहे, प्राचीन नव्हे.

वेदाचा अधिकार, जन्मपक्षी पायापासून झाले म्हणून व गुणकर्मपक्षी वाईट म्हणून, परमेश्वराने शूद्राला दिलेला नाही. त्याचमुळे ब्राह्मणांचा निरुपाय झाला.

गुलामगिरीमुळे शूद्रांचा अधिकार, ब्राह्मणांनी छिनून घेतला हे म्हणणे धाडसाचे आहे.

मनूने तर म्लेंच्छदेखील क्रियात्यागानेच झाले असे म्हटले आहे.- (अ.१०)

शनकैस्तु क्रियालोपात् इमा क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणाऽदर्शनेन च ॥४३॥
पौंड्रकाश्चौंड्रद्रविडाः कांबोजाः यवनाः शकाः ।
पारदाः पह्लवाश्चीनाः किराताः दरदाः खशाः ॥४४॥

याप्रमाणे म्लेच्छांची उत्पत्ती मनूने सांगितली असून क्रियालोपानेच त्यांना दस्यूपणा आला, हे पुढील श्लोकात सांगितले आहे.

मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।
म्लेच्छवाचश्च-आर्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ॥४५॥

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे जेव्हा क्रियाभ्रष्ट झाले तेव्हा ते दस्यू म्हटले गेले, असा या श्लोकांचा अर्थ कुल्लुकभट्टाने केला आहे. तेव्हा -

'शूद्र' हा आर्यां पैकी वर्ण नाही, हे म्हणणे ''देशक्षोभकारकच'' आहे..

संकरवर्णातील रथकाराला देखील अग्न्याधान आहे; तेव्हा असंकर अशा शूद्रांशी वेदाधिकार ब्राह्मणांनी मुद्दाम चोरून ठेवला असेल हे संभवत नाही.

रथकारापेक्षा स्वतःच्या बायकोची ब्राह्मणाला अधिक जरूर आहे, परंतु स्त्रियांला वेदाचा अधिकार नसल्यामुळे मातेलाही त्यांनी वेद शिकविले नाहीत. ब्राह्मणी धर्मात मातेची सेवा करण्याविषयी पुत्राला उत्तम शिक्षा दिलेली आहे.तेव्हा सर्वच ब्राह्मणपुत्र कृतघ्न आहेत असे म्हणता येत नाही.म्हणून ही 'आर्यागमनोपपत्ति' व्यर्थ भेदकारक असल्यामुळे मान्य करता येत नाही.

आता या उपपत्तीचे उत्पादक (लो.टिळक) राष्ट्रीयपक्षामुळे लोकांना मान्य झाले आहेत, म्हणून त्यांच्यावर टीका करणाऱ्या माझा बहुजन उपहास करणार आहेत, हे मी जाणून आहे; पण -

धार्मिक दृष्टीने माझे म्हणणे बरोबर आहे, हेही मी जाणून असल्यामुळे बहुजनमताला मी भीत नाही.

५५८. धर्मनिर्णय बहुजनमतावर अवलंबून नाही काय?

१- समान अधिकारात तो बहुजनमतावर अवलंबून आहे, आणि

२- वैराग्यादिकांचे न्यूनाधिक्य असले तर तो एकाच्या मतावरच अवलंबून आहे.केवळ बहुजनसंख्या ज्याला मानते तिकडे निर्णय द्यावयाचा म्हटले तर सध्याच्या शिरगणतीत बौद्धधर्मी लोकां इतकी संख्या कोणत्याच धर्मातील लोकांची नाही.तेव्हा सर्वांनी मिळून स्वतःच्या धर्माला लाथाडून त्याचाच तोंडपुंजेपणा करावा काय!

५५९. विद्वान खरा पराजय झाला असे केव्हा समजतात?

जय व पराजय, मान अपमान नसल्यामुळे विद्वानाला नसतात. हा विशेष जरी पारमार्थिक विद्वानालाच लागू आहे तरी तो थोडासा व्यावहारिक विद्वानालाही लागू आहेच.तथापि,

'स्वविद्येचे स्थान परत्र आहे' असे सिद्ध करणे, याला विद्वान खरा पराजय मानतात; कारण याच्या योगाने स्वबुद्धिच नामशेष होत असते.

५६०. तर मग सनातनधर्मी लोक परक्यांचे गुण घेतच नाहीत असे म्हणावयाचे?

भलतेच बोललास ! आधी तर आम्हाला परके म्हणून कोणी वाटत नाहीत; कारण सर्व लोक पूर्वी एका वर्णाचे असून पुढे ते आपापल्या कर्मांप्रमाणे भिन्न झाले असे महाभारतात सांगितले आहे; आणि एका वर्णाचे कां? - तर एका ईश्वराने उत्पन्न केले आहेत म्हणून! असाही तेथे अर्थ सांगितला आहे. शिवाय शुक्रापासून संजीवनीग्रहणादि गोष्टी आमच्या येथे इतिहासप्रसिद्ध आहेतच.

शिवाय आमच्या विद्येचा पारकीय विद्येने सर्वस्वी पराजय केला असे कोणाचे मत असले, तर हेव्हेल वगैरे आमच्या विद्येला चांगले म्हणणारे आहेत, इकडेही त्या मतवाद्यांनी लक्ष दिले पाहिजे.

पारकीय लोकांनी आमची असूया केली असलीच तर त्या असूयेचा निषेधही पारकीय लोकांनीच केला आहे.

आमच्या संगीताविषयी 'डे' साहेबानी वाईट उद्‌गार काढले आहेत, तर दुसऱ्या एका साहेबाने 'आपले संगीत फार स्वाभाविक व रोग दूर करणारे आहे' असे उद्‌गार काढलेले आहेत. आमच्या कलेविषयी काही साहेबांनी वाईट उद्‌गार काढले असतील, तर 'हेव्हेल' प्रभृती साहेबांनी त्यांचे खंडण करून चांगले उद्‌गारही काढले आहेत.

पारकीय लोकात शांतता इच्छिणारा पक्ष बहुधा सनातन धर्माचा अनुयायी होत चालला आहे.

परंतु आमच्यामध्येच विकाराच्या योगाने धर्माचा नाश करणारे, ब्राह्मणद्वेष करणारे, आपल्याला शर्मा वगैरे पदवी धारण करणारे काही लोक, पारकीयांनी काढलेले वाईट उद्‌गार तेवढे घेऊन व चांगल्या उद्‌गारांकडे दुर्लक्ष करून आमच्या विद्या कुचकामाच्या म्हणून ठरविण्याचा प्रयत्न करतात.

वास्तविक या लोकांना ब्राह्मण्य किंवा वैदिकत्व जर पाहिजे आहे, तर ते आमच्या प्राचीन विद्येचा धिक्कार केल्याने कधीच मिळणार नाही, कारण तशा धिक्काराने उलटे त्यांचे नवीनत्वच सिद्ध होणार आहे.

बरे, ब्राह्मणांनी विद्या चोरून ठेविली असा एक पक्ष घेऊन चालले तरी ब्राह्मणवर्गच पूर्वीचा सुधारलेला आहे असे ठरत नाही काय? कारण ज्याची विद्या त्यानेच चोरण्याचा संभव आहे. दुसऱ्याची विद्या चोरून ठेवण्याचा संभव नाही. ब्राह्मणद्वेष्ट्या व वर्णाश्रम न मानणाऱ्या या लोकांचे उद्‌गार विलक्षण परस्परविरोधी असतात.

१- बहुधा लोकप्रिय झालेला विवेकानंद म्हणतो, ''पूर्वी जाती नव्हत्या, नंतरच शंकराचार्याने आपल्या भट्टीतून त्यांची उत्पत्ती केली.''

२- दुसऱ्या ठिकाणी विवेकानंद म्हणतो की, ''जेव्हा जेव्हा ब्राह्मणांच्या हाती विद्या गेली तेव्हा तेव्हा त्यांनी ती दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला व क्षत्रियांच्या हाती गेली तेव्हा तेव्हा त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला, याविषयी उपनिषदात अनेक दाखले आहेत.''

- शंकराचार्यांच्या भट्टीतूनच जर जातीची उत्पत्ती आहे. तर त्यांच्या पूर्वी असेलल्या उपनिषदात क्षत्रिय, ब्राह्मण इत्यादि वर्ण कसे सांपडतात? या प्रश्नाचे उत्तर विवेकानंदांच्या मुखसिंधूत कोठे लिहिले आहे?

आता पूर्वी गुणकर्मानुसार ब्राह्मणादि वर्ण होते, असे विवेकानंदांचे म्हणणे आहे; पण असे घेऊन चालले तर सर्व गुणांचा खाणी ब्राह्मणच होऊ पाहतात. तेव्हा विद्या दाबून ठेवणे हा दुर्गुण उपनिषत्कालच्या ब्राह्मणात तरी विवेकानंदाच्या दृष्टीने असणे संभवनीय नाही. मग ब्राह्मणांनी विद्या दाबून ठेवली व क्षत्रियांनी ती प्रकट केली हे अनुमान उपनिषदावरून विवेकानंदाने कसे काढले? विवेकानंद आता मेला असला तरी त्याचे भूत येऊन या प्रश्नाचे उत्तर देईल तर बरे होईल!

५६१. मग आपले मत विवेकानंद ब्रह्मवेत्ता नव्हता असे आहे काय?

असले म्हणून काय झाले?

'विकाराने बोलणाऱ्या मनुष्याला ब्रह्मवेत्तृत्व नाही हे शास्त्रसिद्धच आहे.'

विशिष्ट वर्णत्वाकरता हपापलेला मनुष्य ब्रह्मवेत्ता कधीही होणार नाही. कारण परब्रह्म सर्व वर्णांच्या देहामध्ये असंग आहे.ब्राह्मणद्वेष करून जरी ब्राह्मण्य पाहिजे असले, तरी 'द्वेष्टृवर्गाला ब्राह्मणाच्या विद्येचा द्वेष केल्याने ते कधीच मिळणार नाही.याविषयी विद्यमान शर्म्मपद्धतीची संगीत पुस्तके आणि गुर्जर पद्धतीची इतिहास पुस्तके द्वेषपरिप्लुततेची उदाहरणे आहेत.

ज्या अर्थी शोधान्ती पारकीय लोकांचे आमच्या विद्येविषयी उद्‌गार चांगले निघतात, आणि तिकडे दुर्लक्ष करून आम्हीच आमच्या विद्येला वाईट म्हणतो, त्याअर्थी त्याला 'ब्राह्मणद्वेष' या विकाराशिवाय दुसरे काही कारण नाही असे मी स्पष्ट म्हणतो.

गुणकर्माने वर्णव्यवस्था मानली तर सर्व चांगल्या गुणांचा वर्ग ब्राह्मणच असल्यामुळे वाईट वर्गाने त्यांचा द्वेष करणे उचित होत नाही; आणि जन्मसिद्ध वर्ण मानले तर मग ईश्वरयोजनाच तशी असल्यामुळे कोणाचाही कोणालाही द्वेष करण्याचा अधिकार नाही.

गुणांनी चांगले असणाऱ्या ब्राह्मणांनी ग्रंथ लिहिले असतील, तर त्यात कमीपणा असूं शकत नाही; आणि वाईट लोकांनी लिहिले असतील, तर त्यांच्या वेदाकरताही हपापण्यात काही अर्थ नाही.

धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा,
शूद्रवर्गात,
सृष्टीमध्ये मी एकटाच आहे,
असे तूं पक्के समज !

माझे मत असे आहे की, अदृष्ट ज्या पद्धतीने उत्पन्न होईल त्या पद्धती अधिकारानुसार ज्याला त्याला सारख्याच आहेत.म्हणून ब्राह्मणांचा वैदिक धर्म व शूद्रांचा पौराणिक धर्म एकरूप असून समश्रेयस्कर आहे.

. **५६२. अहो पण,'विकारोऽपि श्लाघ्यो भुवन-भय-भंग-व्यसनिनः' असे महिम्नातच म्हटले आहे; मग इतका निर्विकारावर भर कां?**

अरे पण **भुवनभयभंगव्यसनिनः।** असे विशेषण तेथे आहे आणि ते खरेही आहे कारण श्वेतकेतूंनी जर शाप दिला नसता तर स्त्रियांचा व्यभिचार काही बंद पडला नसता.याचप्रमाणे आणखीही गोष्टी समजून घ्याव्यात आमचा विकार सर्व स्वार्थासाठी असतो आणि जगताचे भयभंग करणारे जे आहेत, त्यांच्या विकारांपासून तर धर्मस्थापन होत असते.

५६३. मला वाटते हिंदुस्थानात मोठ्या मोठ्या लोकातही द्वेष प्रचलित होता, कारण व्यासांनी आपल्या शिष्याचे म्हणजे जैमिनीचे भारत प्रत्यक्ष बुडवून टाकले?

आणि जैमिनीने बरे बुडवूं दिले? त्याला हात नव्हते वाटते? माझे मत असे आहे की १- जैमिनीचे भारत बुडाले नाही. ते एक तर कोठे उपलब्ध असेल. अशा प्रकारची एके ठिकाणी मला बातमीही कळली होती. २- दुसरी कल्पना अशीही आहे की, यवनांनी जे आमचे ग्रंथ जाळले त्यात जैमिनीचे भारत नाहीसे झाले असेल. ३- तिसरी अशी एक कथा आहे की-

व्यास-जैमिनींची कथा

मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥

असा एक व्यासांचा श्लोक पाहून जैमिनीने त्याविषयी वाद केला.त्याचे म्हणणे होते की -''विद्वानाला इंद्रिये ओढीत नाहीत.''

यावर भगवान् म्हणाले - ''तूं जर या कामात हारलास तर मी तुझे भारत बुडवीन.''

जैमिनीने ती गोष्ट कबूल केली, नंतर एक वेळ व्यास सुंदर स्त्रीचे रूप घेऊन आले.त्यावेळी जैमिनी कामातुर झाला.तेव्हा व्यासांनी तोंडात देऊन सांगितले की.''आता बोल.तूं आपले भारत बुडीव.''

तेव्हा ते भारत जैमिनीने बुडविले पण व्यासांनी कृपेने त्यातील अश्वमेधपर्व ठेवून घेतले.या कथेत तरी विकारीपणा जैमिनीकडे येतो.

५६४. आर्यधर्मात प्रत्येक गोष्टी अनादि सांगण्याचे कारण काय आहे?

जितकी गोष्ट व्यापक, तितका तिच्या उत्पत्तिविषयी शोध बरोबर लागत नसतो.

वैयक्तिक उत्पत्तिविषयीच तर रोगद्वेषादिकांमुळे ऐतिहासिक शोध बदलत असतात, हे आपण पहात आहो.

सध्या आमच्या लोकांचा अनिश्चित अशा उत्पत्तिवादावर विश्वास बसतो; पण निश्चित अनादिवादावर विश्वास बसत नाही.त्याचे कारण असे आहे की, काही तरी नवीन आपणापाशी आहे असे लोकांना ठाऊक व्हावे अशी प्रत्येकाची इच्छा असते; आणि त्याचमुळे जुन्या धर्मातील व जुन्या पुस्तकातील ज्ञान हिंदुधर्मियांना ठाऊक असले तर एखादे नवीन इंग्रजी किंवा दुसऱ्या धर्माचे पुस्तक वाचून नंतर त्या उसनवट कल्पनेने आपल्या ग्रंथावर व समाजावर टीका करण्यास आमचीच मंडळी तयार होत असते.

५६५. अहो पण, आपल्याला समजत नाही असे म्हणण्यापेक्षा अनादि म्हणण्यात दुसरे काही आहे काय?

हो, आहे तर! आपल्याला समजत नाही या गोष्टीत दुसऱ्याला समजत असेल असे गृहीत असते, पण अनादि म्हणण्यात कोणालाच त्याची उत्पत्ती समजत नाही असे असते.

५६६. देव जर निराकार आहे तर मूर्तिपूजेचे बंड आर्यधर्मात कां?

अरे, देव निराकार आहे म्हणूनच! कारण तो जर साकार असता तर त्याची मूर्ती एखाद्या मेलेल्या माणसाच्या पुतळ्या प्रमाणे स्मारक मात्र झाली असती.

पण परमात्मा निराकार आहे म्हणूनच कोणत्याही मूर्तीत शिरून, पाहिजेल त्या भक्ताला तो 'ओ' देण्यास तयार असतो.

''देवा, आमची भाकर आम्हाला असू दे.'' इत्यादिक काही(खिश्चन) लोकांच्या प्रार्थना निराकार देव कसा ऐकतो?

आर्यलोकांचा असा समज आहे की माता-पिता इत्यादिक नाते सर्व जीवांचे परमेश्वराशीच असून मनुष्याचे ठिकाणी सत्ताबलाने ते प्रतीत मात्र होते.

आम्ही पृथक् राहून आमची बुद्धि व्यापक होणे कधीच शक्य नाही.म्हणून तिच्यामध्ये येईल तशा सोपाधिक परमेश्वराचे ध्यान करण्याकरता मूर्तिपूजा आम्हाला इष्ट आहे.आता ही जी आमची उपपत्ती आहे, यापेक्षा नुस्ती निराकाराची प्रार्थना करणाऱ्यांजवळ निर्दोष उपपत्ती नाही.

आम्ही केले ते एवढेच की नुस्ती प्रार्थना करणारे आपल्या देवाला दूर आकाशात मानतात व आम्ही आपल्या परमेश्वराला जवळ मानतो.

शिवाय, प्रत्येक धर्मांत काहीना काही तरी साकार चिन्हे असतातच, पण ती कोण्या तरी मेल्याचे स्मारक समजल्या जातात व आम्ही मूर्ती नित्य अशा परमेश्वराचे प्रतीक म्हणतो एवढेच !

५६७. तुमच्या आर्यधर्मांतील लोक परमार्थ असा झांकून झाकून कां ठेवीत असतात? बोलून चार शंका समाधान करणे यातही झांकून ठेवणे कशाला पाहिजे?

वेदांतात ज्याला बोलण्यापेक्षा अधिक काही नाही असे वाटते, त्याचेच हे म्हणणे आहे.व्यापारामध्ये देखील 'क्रयरहस्य' (ट्रेड सिक्रेट) म्हणून जर काही आहे, तर ते परमार्थात नसावे, हे तुला कसे वाटते? शिवाय,

१- ग्रंथात कितीही लिहिले तरी कोणत्याच गोष्टी बरोबर समजत नसतात.

२- दुसरे, ग्रंथातील ज्ञान अनधिकारी लोकांच्या हाती जात असते; व त्यामुळे पुरे परमार्थी नसूनही पुस्तके वाचून नुसते लोकांना ज्ञान सांगणारे निपजत असतात. असे ज्ञान उघड होऊ लागले म्हणजे व्यवहाराचीच किंमत लोकांना जास्त वाटूं लागते.

३- शिवाय ग्रंथ म्हणजे नुसते लेख समजले तर औरंगजेबाने जाळले तसे त्यांचेही परिवर्तन होणे शक्य असते, म्हणून -

'अवधारणपूर्वक अध्यापकमुखाने पारंपारिक तत्त्वांचे सोपपत्तिक अध्ययन करणे' यालाच ग्रंथ म्हणणे शोभते आणि ते गुरु वाचून संभवत नाही.

५६८. तर मग शास्त्र व्यर्थच झाले म्हणावयाचे?

छे, तसे मुळीच नाही.भलतेच मत शिकवूं नये म्हणून शास्त्र आहेत.परंतु ते शास्त्रच अनधिकाऱ्याच्या हाती जाऊ द्यावयाचे नाही व गेले तरी त्याचा इष्ट परिणाम होत नाही, म्हणून आमच्या आर्य धर्मात परमार्थ झांकून सांगण्याची वहिवाट आहे.पण इतर लोकात तर खाण्यापिण्याचा व्यवहारसुद्धा झाकून सांगण्याची वहिवाट आहे. खेरसनीचे दुकान मांडले म्हणजे खेरसनी करणारा त्याची करणी सांगत नाही, हे आज प्रसिद्ध नाही काय?

बौद्धसंप्रदाय

५६९. वैदिकेतर धर्मवाद्यांना गती कशी मिळते?

वैदिकबाह्य लोकांना आश्वासन त्या त्या धर्मस्थापकांच्या रूपाने परमेश्वरानेच दिले असते, म्हणून त्यांना पुढे या लोकात अथवा परलोकात वैदिकधर्म मिळतो असे आम्ही म्हणतो. ते ते धर्मवादी आम्हांला साक्षात् मोक्ष मिळतो असे म्हणतात.

आता हा कदाचित् आमचा गौणपणा असला तरी वैदिकधर्मवाद्यांना या लोकात किंवा परलोकात आमचा धर्म मिळतो, असे इतर धर्मवादी म्हणतच नाहीत; आतांच वैदिकधर्माचा त्याग करून आमचा धर्म त्यांनी स्वीकारला पाहिजे असे ते म्हणतात.तेव्हा आम्हा आर्यांना धर्मभेदसहिष्णुता सत्याच्याच अधाराने आली आहे, असे कोण विचारी पुरुष म्हणणार नाही!

आम्ही तत्त्ववाद करूनच धर्मोपदेश करीत असतो.ज्याला रुचेल तो त्याचा स्वीकार करतो.

वैय्यक्तिक निंदेने किंवा लढाई करून धर्म स्थापण्याची आम्हा आर्यांना कालत्रयी संवय नाही.

धर्मद्वेषाचा विटाळ तर आम्हा आर्यांना माहीतच नाही, म्हणूनच अनेक इतर धर्मीलोकांना आमच्याकडे पाहून लाज वाटून घेऊन आमच्या धर्माशी आपल्या धर्माचे ऐक्य करावे लागले, असा इतिहास सांपडतो.

(१) बुद्धधर्मातून महायान व शैव पंथाचे ऐक्य,

(२) महम्मदी धर्मातून दिनइलाही सारखे पंथ,

(३) जैनधर्मातून समयसारासारखे ग्रंथ आणि

(४) ईशपुत्रधर्मातून ब्रह्माभासविद्येसारखी (थियॉसफी) मते, आम्हा आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुते मुळेच झाली आहेत.

५७०. हिंदुधर्मस्थापक ऐतिहासिक नाहीत, असे पुष्कळशा लोकांचे म्हणणे आहे?

असेना बापडे! (१) ईशपुत्रधर्मस्थापकही ऐतिहासिक नाही, असे कहानचंद्रवर्माने सिद्ध केले आहे. (२) तसेच ईशपुत्रचरित्र व महम्मद चरित्र ही रूपके आहेत, असे म्हणणारे लोक पश्चिमेकडे आहेत.(३) बुद्ध ही कोणी ऐतिहासिक व्यक्ती नव्हती; सूर्याच्या उपसनेपासून ती घेतली गेली असावी, असेही पाश्चिमात्य म्हणतात.

याप्रमाणे कोणताच धर्मस्थापक नव्हता, तर पृथ्वीतील सर्व लोक कल्पित कादंबरीचीच उपासना करतात काय? आणि तसे असेल तर हा स्वपक्षदोष आहे. जेथे शंका व परिहार सारखेच असतात, तेथे एकाने दुसऱ्यास विचारूं नये, असा तर्कनियम आहे.

५७१. बुद्धाला पुराणात अवतार म्हटले आहे व बुद्धजातकात तर त्याच्या पूर्वजन्मीच्या अनेक कथा सांगितल्या आहेत, तेव्हा हे कसे जुळणार? आणि त्या जातकातील काही कथा बुद्धांनी स्वतः सांगितल्या आहेत?

विभूतियोगाने या सर्वांचा समन्वय होतो. बुद्धजातकातील नायक विष्णूच्या विभूती असून, बुद्ध हा अवतार आहे असे आम्हाला म्हणता येते; हा धर्मसमन्वयच होय, धर्मसंकर नव्हे.

५७२. बुद्धाविषयी तुमची पूज्यबुद्धि आहे काय?

होय. बौद्धांपेक्षाही आहे. बौद्ध त्याला मनुष्य समजतात व आम्ही त्याला देव समजतो.

५७३. शंकराचार्यांनी बुद्धावतार कां मानला नाही?

बुद्धावतार शंकराचार्यांनी मानला आहे; कारण तसे नसते तर **''बौद्धावतारे श्रीरामक्षेत्रे''** इत्यादि संकल्पच त्यांनी बंद केले असते. मूर्ख बौद्धांच्या अधिप्रज्ञाशिक्षेचेच आचार्यांनी खंडन केले आहे.

शिवाय 'ईश्वर आहे की नाही, अशा गोष्टी मला नका विचारू' असे त्यांनी बौद्धांना उत्तर दिले आहे; आणि या प्रश्नाचे उत्तर त्यांनी शिष्यांवरच सोपविले आहे.

अधिचित्त-शिक्षेचे योगशास्त्राने खंडन केले आहे; तथापि ते अधिप्रज्ञा-शिक्षेला धरूनच आहे.

अधिशीलशिक्षेचे कुमारीलभट्टाने खंडन केले आहे; पण ते चमत्कार दाखवून केले आहे, वाद करून केले नाही.

शिवाय बुद्धांची अधिशीलशिक्षा आपल्या ग्रंथातीलच असल्यामुळे मला मान्य आहे.

बुद्धाची अधिप्रज्ञाशिक्षा मात्र जैन गुरूपासून घेतलेली आहे.बुद्धाचे गुरु ब्राह्मण होते असे अश्वघोषांनी म्हटले असून, बुद्धाचे गुरु जैन होते असाही ऐतिहासिक शोध आहे.

अधिशीलशिक्षा वैदिक सामान्यधर्मापेक्षा अधिक काही नाही. त्रिपित्तकापैकी सूत्तपित्तकातच बुद्धाचा जसाचा तसा उपदेश आहे. हिंदुधर्मात जे त्याचे खंडन सांपडते ते सूत्तपित्तकापैकी फारसे सांपडत नाही.

५७४. कुमारीलभट्टाने अधिशीलशिक्षेचे केलेले खंडन तुम्हास मान्य आहे की नाही?

मान्य आहेच; पण तिचे मंडनही पौराणिक प्रशंसेमुळे व अन्य लोकांकरता मला मान्य आहे.

५७५.बुद्धाला अवतार म्हटले आहे व वाल्मिकीरामायणात बौद्धमतानुयायी चोर समजला पाहिजे असे रामांनी जाबालीला म्हटले आहे हे कसे?

तेथे **बौद्ध** शब्दाचा अर्थ **'बुद्धीने बकणारा'** असा प्रकरणावरून घेतला पाहिजे, व तथागत म्हणजे बुद्धिवाद करणाऱ्याच्या मार्गाने जाणारा असा अर्थ टीकाकाराने केलेलाही आहे.

रामाला पसंत नसलेले जाबालीने जे मत प्रतिपादन केले होते ते वैराग्य सांगणाऱ्या बुद्धाचे नसून चार्वाकाचे होते.

बौद्ध शब्दाचा बुद्धमतानुयायी असा अर्थ कोणी राम नावाच्या टीकाकारानी द्वेषाने केला आहे, कारण वाल्मिकीरामायणातच एके ठिकाणी ''श्रमणाश्चैव भुज्यन्ते'' म्हणजे दशरथाच्या यज्ञात बौद्धसंन्याशी जेवीत

होते असे म्हटले आहे.त्याच्याशी या टीकाकाराचा विरोध येतो.शिवाय रामानीही वासिष्ठात शान्तीमध्ये बुद्धाचे उदाहरण दिलेले आहे.

५७६. मग कल्किपुराणात बौद्धलोकांशी कल्कीने युद्ध केले असे कां म्हटले आहे?

अरे, ज्यांनी युद्धाच्या भीतीने राज्य सोडून दिले त्या बुद्धाच्या धर्माला बरोबर अनुसरणारे असे ते लोक नव्हते म्हणून! विधर्मी लोकांशीच कल्कीने युद्ध केले.शिवाय भारतीय युद्ध तर वैदिक-वैदिकातच झाले आहे, म्हणून युद्धवरून मताचा निश्चय कसा होतो?

५७७. बुद्ध वैदिकमतानुयायी होता असे कोणी म्हणतात हे खरे आहे काय?

होय.'वेदाचा अर्थ जाणल्यानेच ब्राह्मण होतो' असे त्याने स्पष्ट म्हटले आहे.

बुद्धाने हिंसात्मक यज्ञमंत्रांचीच निंदा केली आहे, ज्ञानकांडात्मक वेदमंत्रांची निंदा केलेली नाही, असा गीतगोविंदाच्या टीकेचाही आशय आहे.

५७८. बुद्ध ईश्वर मानीत होता काय?

होय, परंतु त्याचे स्वरूप दुर्ज्ञेय आहे असे म्हणत होता.मांडुक्यपुत्ताला बुद्धाने असे सांगितले आहे की,'मी जे प्रगट केले आहे तेवढे प्रगट होऊ द्या; व जेवढे गुप्त ठेवले आहे तेवढे गुप्त राहू द्या.'

यावरूनही जगत्कर्ता कोणी नाही असे बुद्धाने स्पष्ट सांगितले नाही.

५७९. बुद्धाच्या शिष्यांना काही समजले नाही असे कसे म्हणता?

याचे कारण असे आहे की बुद्धाने १-''सर्व क्षणिकं क्षणिकम्, २- सर्व दुःखं दुःखम्, ३- सर्व स्वलक्षणं स्वलक्षणम्, ४- सर्व शून्यं शून्यम्,''

अशा चार भावना वैराग्याकरता सांगितल्या आहेत.

भावनेप्रमाणे वस्तू असतेच, हा काही नियम नाही.अशाच भावना पतंजलींनी जगाला स्वप्न समजावे किंवा स्वप्नाचे ध्यान करावे, म्हणून मनस्थिरतेकरता सांगितल्या आहेत.पण तेवढ्याने कोणीही त्यांचे अनुयायी जगन्मिथ्यात्व किंवा स्वप्नसत्यत्व समजत नाहीत.

बुद्धाने ज्या चार भावना सांगितल्या, त्या वस्तुत्वेकरून सांगितल्या नाही. **(१) सर्व क्षणिक** आहे ही भावना त्याने विषयांचा नाश होणार आहे अशा उद्देशाने सांगितली आहे.

(२) दुःखाची भावना त्याने वर्तमान विषयात दोष दिसण्याकरता सांगितली आहे.

(३) स्वलक्षणभावना शमाचा पुन्हा नाश होऊ नये म्हणून सांगितली आहे; व

(४) शून्यभावना निर्विकल्प समाधि साध्य होण्याकरता सांगितली आहे. 'अभावयोग' म्हणून कूर्मपुराणातील ईश्वगीतेतही अशी भावना सांगितली आहे. बुद्धदर्शनात हे शून्य सद्-असत्कोटीने रहित विद्यारण्यांनी दाखविले आहे.

ख्रिश्चन, मुसलमान, फ्रीमेसन

५८०. ईशपुत्रधर्म तुम्हास मान्य आहे काय ?

ईशपुत्रधर्म बौद्धधर्माचे रूपांतर आहे असे बौद्धजातकावरून तद्धर्मीच आता म्हणू लागले आहेत; आणि **'गुरुण्डाः बौद्धपंथिनः'** असे भविष्यपुराणात स्पष्ट म्हटले आहे. (गुरुण्ड - इंग्रज)

५८१. महम्मदी धर्म तुम्हास कसा वाटतो?

(१) महम्मदी धर्म ईशपुत्रधर्माचेच एक रूपांतर आहे, असे 'विभूतिपूजा' या पुस्तकाचा पाश्चिमात्य कर्ता म्हणतो, आणि (२) भविष्यपुराणातही तो एका आर्यधर्माचा मायाविशेष आहे, असा अभिप्राय आहे.

तेव्हा या धर्माचा द्वेष न करता आपल्या धर्मावर प्रीति ठेविली पाहिजे म्हणजे माझे भागते; आणि हिंदुधर्माचीच ही रूपे असल्यामुळे त्यांना मूळधर्म कळविण्यसही विशेष प्रत्यवाय वाटत नाही.

५८२. सर्व जगामध्ये फ्री मेसन (Free mason) **नावाची एक गुप्त सभा आहे, तीत काय आहे हे अजून कळले नाही, ते तुम्हाला माहीत आहे काय?**

तीत काही असले तरी मला त्याच्या माहितीची गरज नाही, कारण

(१) धार्मिक गौप्य असले तर ते आमच्या आर्ययोगापेक्षा अधिक गूढ कधीही ठरणार नाही.

(२) त्यात ख्रिस्ताचे दर्शन होत असले तरीही श्रीकृष्णाचे दर्शन इच्छिणाऱ्या आम्हाला त्याची काय गरज?

(३) ईश्वर निराकार आहे असा सर्व पाश्चात्य धर्मांचा समज असल्यामुळे त्याचेही दर्शन त्या सभेतील धार्मिक गूढ म्हणता येणार नाही.

(४) बरे, त्यात काही सामाजिक गूढ असले तर त्याचा राष्ट्राशी संबंध असल्यामुळे विरक्ताला त्याची काही गरज नाही, हे माझे म्हणणे बिनतोड आहे.

५८३. पूर्वेकडे व पाश्चिमेकडे ज्या अनेक गुप्त संस्था आहेत त्यांची तुम्हाला माहिती आहे काय?

(१) शिष्याचा अधिकार वाढविणे, आणि

(२) वाढलेला अधिकार असेल तर त्याच्या वृत्तीची सुधारणा करणे,

(३) त्याच्या निवर्त्य-उपाधीचा नाश करण्यामध्ये चतुराई दाखविणे, (४) आणि जन्ममृत्यूचे वैदिक कर्मान्वये रहस्य उलगडणे,

(५) अधिकारानुसार अभ्यास सांगणे;

यालाच मी गुह्य असे म्हणतो व आर्य शास्त्रेही असेच सांगतात.

परंतु आताच्या संस्थातील गुह्य निराळे आहे.

* लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन शपथा घेवविणे,

* कोणी अनुकूल बोलो की विरुद्ध बोलो, उत्तर देण्याच्या बाबतीत तटस्थ राहणे,

*व्याजाच्या धर्तीवर पैसा घेऊन तो गुंतवून टाकणे,

इत्यादी गोष्टींनी तर अतिशय हलक्या वस्तूला देखील गुप्तपण आणता येतो. म्हणूनच गुरुमुखजन्य योगचातुर्यावाचून इतर गूढांचे मला आश्चर्य वाटते.

धर्मस्थापक

५८४. धर्मस्थापक कसा असावा ?

१- शास्त्राधाराने त्याने रूढीची पर्वा करू नये; तशीच रूढीची फार पायमल्ली करू नये.

२- ज्ञानीचवर्गाकरिता शास्त्राधाराने ऐहिक व पारलौकिक सोय त्याला सांगता यावी.

३- पतिव्रता असो की वेश्या असो, ते शरण आल्यावर त्यांच्या त्यांच्या अधकिारानुसार त्याला मार्ग दाखविता आला पाहिजे.

४- अति शांत असणे व अति रागवणे त्याला कामाचे नाही.

५- एखाद्या व्यावहारिक नियमावर अति आग्रह धरणे त्याला उपयोगाचे नाही.

६- भिक्षा मागण्याची व पलंगावर निजण्याची, ह्या दोन्ही संवयी त्याला पाहिजेत.

७- फार कठीण व फार सोपी, अशा दोन्ही तऱ्हेच्या भाषा वापरणे त्याने सोडून दिले पाहिजे.

८- आळशी व लबाड असे विद्वान असले तरी ते टाळले पाहिजेत आणि प्रामाणिक मूर्ख असले तरी त्यांचा संग्रह केला पाहिजे.

९- कोणत्याच मतावर आरूढ नाहीत अशा कुतर्कियांशी संवाद टाळला पाहिजे.

१०- संघाला जपले पाहिजे. संघभंगकाची उपेक्षा केली पाहिजे, आणि संघभंगक शरण आल्यास

संघाधस्तर नियम सांगून त्याची परीक्षा पाहिली पाहिजे.

११- प्रत्येकाला बुद्धीने पटवून देण्याची आंगात धमक पाहिजे. संघभंगकाशी मात्र बुद्धिवाद टाळला पाहिजे.

१२- ज्या धर्माची स्थापना करावयाची असेल ते शास्त्र त्याला अवगत पाहिजे.

१३ - चालू भाषेत उपदेश केला पाहिजे आणि मूळ धर्मभाषा नष्ट होणार नाही अशी टीका वगैरे करून खबरदारी घेतली पाहिजे.

१४- चमत्कार होत असले तरी त्यांचा आपल्या हाताने निषेध केला पाहिजे. तसेच आपल्या गुरूचे व दुसऱ्याचे जे चमत्कार असतील त्यांचा निषेध न केला पाहिजे.

१५- अत्यंतच लोकविरुद्ध असल्याशिवाय त्याने एखाद्या चालीचा स्पष्ट निषेध करता कामा नये.

१६- कर्तव्य बुद्धीने पटवून देऊन, फल त्याने शास्त्राने दाखवून दिले पाहिजे.

१७- संपन्न लोकांना व आपन्न लोकांना त्यांच्या त्यांच्या परिस्थितिप्रमाणे तत्त्व न सोडता त्याने नियम घालून दिले पाहिजे.

१८- देशापन्न, कालापन्न व अवस्थापन्न, लोकांना निर्भीडपणे त्याने कर्तव्य सांगितले पाहिजे.करकाळ (थंडीच्या) देशांत राहणारे लोक देशापन्न समजले जातात.कलीने मारलेले कालापन्न होत.आणि रोगामुळे दीन झालेले अवस्थापन्न समजावेत; आणि याविरहित ते सर्व संपन्न होत.

१९- आपल्या आचरणावर, ध्यानावर व ज्ञानावर त्याचा दृढ विश्वास पाहिजे; आणि हे कार्य करण्यात कोणत्याही प्रकारचा विकार नसला पाहिजे.

२०- वडील विद्वानाला त्याने नम्रतेने वश केले पाहिजे, बरोबरीच्यांना वादाने जिंकले पाहिजे किंवा मैत्री केली पाहिजे, आणि कमी विद्वानांच्या विद्येची त्याने सुधारणा केली पाहिजे.

२१- पृथ्वी जरी आपल्यावर अवलंबून असली तरी त्याने तिच्यावर अवलंबून राहता कामा नये; आणि

२२- विघ्नाने मरण्याचा प्रसंग आल्यास स्मृति आहे तोपर्यंत धर्मवाक्येच तोंडातून काढली पाहिजेत.

२३- आपल्या उपदेशाप्रमाणे जेथे वर्तन होत नसेल, ते लोकांना स्पष्ट दाखवून दिले पाहिजे.

२४- जुना सिद्धान्तच कळण्यासाठी कोणताही नवीन सिद्धांत त्याने स्थापला न पाहिजे.

२५- जुन्या सिद्धान्तावर हजारो नव्या प्रकिया त्याला रचता आल्या पाहिजेत.

२६- 'मलाच भजा' असे म्हणण्याला त्याने तिलांजुली दिली पाहिजे.

२७- 'मी परमेश्वर तसे तुम्हीही आहात' असे त्याला ठासून सांगता आले पाहिजे, आणि

२८- जे जे धर्मकार्य होऊन गेले असेल, त्याविषयी त्याला विरक्त बनले पाहिजे.शिथिल पडूं लागल्यास सरसावले पाहिजे.

२९- मत्सरग्रस्त समाज फार असेल तर भाविक समाजालाच हाती धरले पाहिजे.

३०- सकाम लोकांना आपल्या उपास्याकडे बोट दाखविले पाहिजे.

३१- आणि ज्याच्या त्याच्या कर्तव्यावांचून इतर आपण काय करतो, हे कोणालाही कळू देता कामा नये.

३२- आपण मोठे कार्य केले, असे तर मनात देखील वाटले न पाहिजे.

३३- लीनतेचा व अभिमानाचा प्रसंगानुसार उपयोग केला पाहिजे.

३४- राजा शरण आला तरी त्याचा पैसा न घेता त्याला उपदेशच केला पाहिजे.

३५- मूर्खासमोर कूटार्ध बोलले पाहिजे.

३६- देवाला भजले पाहिजे.

३७- अतिथीला तोषविले पाहिजे.

३८- सद्‌गुरूला सेविले पाहिजे.

३९- सेवकांना पाळले पाहिजे.

४०- आणि कालिक जे धार्मिक उपाय समजले गेले असतील त्यांच्याशी उपदेशाचे ऐक्य केले पाहिजे.

४१- शिष्य करणे व न करणे हे प्रसंगावर अवलंबून ठेविले पाहिजे.

याप्रमाणे जो गुणसंपन्न आहे तोच **धर्मस्थापक** होतो;

इतर **पंथस्थापक** होत!

५८५. धर्मस्थापक शिष्य असा निघाल्यास, त्याने दुसरा धर्म स्थापन करावा की नाही?

गुरूच्या हातून चांगला धर्म स्थापन झाला असेल तर करूं नये, त्याचेच मंडन करावे, कारण धर्मस्थापन म्हणजे एखादा उपद्व्याप नव्हे, तर ते आवश्यकतेवर अवलंबून असते व ज्या मानाने ग्लानी असेल त्या मानाने आवश्यकता उत्पन्न होते.

५८६. धर्मस्थापकाने गादी स्थापन करावी की नाही?

उपास्याची गादी स्थापन करावी असे मला वाटते, उपासकाची गादी स्थापन करू नये; आणि वल्लभांप्रमाणे आनुवंशिक गादी तर कधीच स्थापन करू नये.

तथापि विद्वान शिष्याकरता व्यवस्था करून ठेवावी.

वारकरी धर्माने या बाबतीत शहाणपणा केला आहे.

५८७. भाषेत शब्द नसल्यास धर्मोपदेशकांनी तयार करावेत की नाही?

अवश्य करावेत! महात्मा बुद्धानेही असे शब्द तयार केले आहेत.'क्रकचोत्तमसूत्त' अशीच काही ग्रंथांना त्याने नावे दिली.आहेत. 'प्रतीत्यसमुत्पाद' हे नांवही तसेच आहे.क्षिप्त, मूढ व विक्षिप्त या भूमिकांच्या अभिप्रायाने त्याने रागचरित, द्वेषचरित व मोहचरित असे तीन प्रकारचे मनुष्य सांगितले आहेत.रूढ शब्दालाही त्याने सामासिक शब्दांची नांवे दिली आहेत.जशा भाषेने अर्थ समजेल तशी त्याने भाषा वापरली आहे.

एखाद्या शास्त्रातील परिभाषा आठवली नाही, म्हणून उपदेशकाने अडून बसणे ही चूक होय.

तथापि अशोधित पदार्थाला नवीन संज्ञा करीत बसणे मात्र त्याला योग्य नाही.शोधित पदार्थाविषयीही संज्ञा कराव्या व अभ्युपगत पदार्थाविषयीही कराव्या.

५८८. स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ यांना आपण धर्मस्थापक असे आचार्य समजतां की नाही?

समजत नाही! कारण विवेकानंदाने 'ब्राह्मणानेच सर्व जातींचा नाश केला.मांस खाण्यास कांही हरकत नाही. ब्रह्मचारी पुरुषाने लग्न न केले म्हणजे झाले. परस्त्रीगमन केले तरी त्याच्या ब्रह्मचर्याचा काही भंग होत नाही;'

असे जे म्हटले आहे ते देशकार्य हा विकार मनात धरून म्हटले आहे.केवळ धर्मासाठी धर्म करावा अशा दृष्टीने म्हटलेले नाही.

'जगत्कार्याकरता मांस खाण्यास हरकत नाही'.असे रामतीर्थानेही म्हटले आहे.

आमच्या इकडचे शास्त्र न वाचलेल्या लोकांमध्ये हे कितीही जरी प्रिय झाले तरी यांना काही येत नव्हते असे माझे मत आहे.

तत्त्वचर्चा

५८९. सत्य कशास म्हणतात ?

ज्याला जे टिकाऊ वाटते तेच त्याचे सत्य! त्यात कोणी विरोध दाखविल्यास तो दूर करण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे; पण तेवढ्याने सत्याच्या लक्षणात किंवा व्याप्तीत विरोध येत नाही.

५९०. निश्चयज्ञान अल्प आहे की संशयज्ञान?

संशयज्ञान! निश्चयज्ञान अनादि पूर्ण आहे. कारण लहान मुले बहुतकरून निश्चयात्मकच गोष्टी सांगत असतात; म्हणूनच त्यांच्या वाक्याची प्रशंसा वराहमिहिरानेही केली आहे.

५९१. तुमच्या परिभाषेत 'कल्पित तत्त्वज्ञान' म्हणून एक शब्द आहे, त्याचा अर्थ आम्हास समजला नाही?

'व्यावहारिक गोष्टींना हेत्वाभासाने तत्त्वज्ञानाचे स्वरूप देणे' हा त्याचा अर्थ आहे.

५९२. वादी आपल्याकडे चालून आला असता कसे वागावे?

प्रेमाने त्याचा सत्कार करावा; व नंतर तो वादी आहे की जिज्ञासू आहे, याची परीक्षा करावी.

भाषणामध्ये (१) सरळपणा, (२) नम्रता, (३) उत्तरास वेळ लागल्यास मनाचा उदासपणा, (४) मुख्य सिद्धांताची परीक्षक बुद्धी, (५) गौण सिद्धाताविषयी आक्षेप व (६) ससेवा परिप्रश्न इतके गुण जिज्ञासूमध्ये अवश्य असतातच. याहून अन्यथा प्रश्न करणारा वादी समजावा.त्यातही तो विरक्त असेल तर बोलावे, अविरक्त असेल तर खुशाल टाळावे; व माझ्याशी लेखी वाद कर म्हणून खुशाल सांगावे.

५९३. वाद भाषणाने बरा की लिहून बरा ?

समयबंधपूर्वक लिहून चांगला.

५९४. वाद्यांनी वादार्थ स्वभाषाभिन्न शब्द वापरावेत की नाही?

अनिष्टापादानासाठी वापरावेत. इष्टापत्तीसाठी वापरू नयेत.

५९५. मनुष्य परतंत्र आहे हे कशावरून?

तसा स्वभाव दिसतो म्हणून! नाही तर हलक्या कानाचे लोकच जगात उत्पन्न झाले नसते.

प्रत्येक मनुष्याचा शब्दावर प्रथम विश्वास बसतो व इतर प्रमाणाने ती गोष्ट खोटी ठरल्यास तो खोटी आहे म्हणतो.

५९६. मग शास्त्र प्रमाणांतराने खोटे ठरेल काय?

नाही. कारण * धर्म शास्त्रनिष्पन्न आहे. * ब्रह्म शास्त्रप्रकाश्य आहे.

५९७. आपण म्हणता की व्यवहारात तत्त्वज्ञात नाही, ते केवळ परमार्थातच आहे, मग शास्त्रांचे मूलतत्त्व आपल्याकडे कसे दाखविता येईल?

ज्या विशेष गोष्टी असतात, त्यात काही तरी सामान्य होत असते.जसे मातीचा घट व मातीचेच शराव केले की माती ही त्या दोहोंमध्ये सामान्य होऊन राहते. याप्रमाणे एकाचे प्रकार दहा व्हावयाला लागले की तो एक त्याचा सामान्य झालाच.

अशा सामान्यालाच मूलतत्त्व म्हणतात. या विशेष-सामान्यात बुद्धीची अपेक्षा असून परब्रह्म हे बुद्धिप्रकाशक असल्यामुळे विशेषही नव्हे व सामान्यही नव्हे.ते परमार्थातील खरे तत्त्व होय असे तातांचे म्हणणे आहे.

व्यवहारात आणि परमार्थात फरक इतकाच की *पहिल्यामध्ये तत्त्वाचे प्रकार करण्याकडे लक्ष असते व *दुसऱ्यामध्ये सर्व प्रकारांचा लय करून एकत्व ठेवण्याकडे लक्ष असते.

* पहिल्याविषयी अनुभव न घेता जो फाजील तत्त्वज्ञानातच गढलेला राहतो तो मूर्ख; आणि * दुसऱ्यामध्ये एकत्व सोडून जो नाना अनुभवांच्या मागे लागतो तो मूर्ख; असे माझे मत आहे.

५९८. सामान्य व विशेष कशाने कळते?

१- सामान्य बुद्धीने व अनुमानाने कळते.**२**- जवळचा विशेष प्रत्यक्षाने कळतो; **३**- दूरचा विशेष शब्दाने कळतो, **४**- कालिक विशेष इतिहासाने कळतो व **५**- सूक्ष्म आणि अनागत विशेष योगाने कळतो.

५९९. ज्ञान पुस्तकांवर अवलंबून आहे, की लोकनिरीक्षणावर?

पारमार्थिक ज्ञान गुरु व शास्त्रावर अवलंबून असून, व्यावहारिक ज्ञान लोकनिरीक्षणावर अवलंबून आहे.

''मी सर्वच तुला वेदाच्या आधाराने सांगत आहे असे समजू नकोस.तर याप्रमाणे न वागल्यास प्रसंगी महादोष दिसून आल्यामुळे शहाण्यानी मधाप्रमाणे गोळा करून ठेवलेला हा अनुभव आहे.एकपक्षीय धर्माचाच आश्रय करणे शक्य नाही'' असा महाभारतात भीष्मांचा युधिष्ठिराला सल्ला आहे.

'परमार्थात डोळे लावून शास्त्राच्याच मागे जावे.' असेही महाभारतात भीष्मांनी म्हटले आहे ह्या दोन्ही गोष्ठी लक्षात घे.

६००. वेदान्त व राजकीय तत्त्व एकच आहेत, असे लोक म्हणतात हे बरोबर आहे काय?

वेदान्त स्वर्गालाही भिकारडा समजतो, मग येथील राज्याची त्याच्यापुढे मातब्बरी काय? तथापि सूर्यप्रकाश सर्वत्र असल्यामुळे सर्वानाच मिळतो, त्याप्रमाणे वेदान्ताचा आधारही सर्वच घेतात.

अशी कल्पना करा की, भौतिकशास्त्राने हजार वर्षे मनुष्याचे आयुष्य करता आले, तरी वाटेल ते भोग भोगता येणे शक्य नाही.कारण भोगाने नेहमी तनमनाचा फाजील क्षय होत असतो; म्हणून प्रवृत्तीला आळा द्यावाच लागतो आणि ''विरक्तीत सुख आहे हेच वेदान्त शिकवितो.''

६०१.पण ज्या लोकांना रिकामे बसवत नाही ते वेदान्तास नावे ठेवतात ना?

ठेवोत बापडे! त्यांनाही दुसरे लोक नावे ठेवणारे आहेतच.

६०२. अत्यंत नव्या शोधाने जुना निश्चय कायम कसा राहत असतो?

सत्य हे त्रिकालाबाधित असल्यामुळे सत्याचा निश्चय झालेला असेल तर त्याच्यावर कोणत्याही नव्या शोधाचा हल्ला चालू शकणार नाही.याविषयी मी आपल्या लहानपणाची एक गोष्ट सांगतो.

गोष्ट - हरिभाऊ मराठे शिरसगावात शिक्षक असताना, मी काही वेदांताच्या गोष्टी करीत असे.त्यांच्या येथे मला इंग्रजी येत नसल्यामुळे अडवून, हांसण्याकरता एक कुत्सित मनुष्य माझी परीक्षा पाहू लागला. तो म्हणाला -

'आत्मा हा एक मेंदूचाच धर्म आहे, तो देहाहून निराळा नाही; कारण मेलेल्या मनुष्याच्या मेंदूवर काही परिणाम करून त्याला जिवंत करता येते, अशी आता एक युक्ती निघाली आहे.''

मी अत्यंत लहान पोर असल्यामुळे जड शास्त्र (Scince) वाचले नसेल हे त्याला ठाऊक होते. परंतु मी म्हटले की,

'जिवंत झालेल्या मनुष्याला कालच्या दिवसाची स्मृति असते की नसते?

१- पहिल्यापक्षी तो मेलाच नाही, असे आम्ही म्हणू; कारण नव्या जन्मास आलेल्या मनुष्याला पूर्वीच्या दिवसाची स्मृती आम्ही पहात नाही.मूर्च्छेत काही देहाहून अगदी पृथक आत्मा होत नसतो.

२- दुसऱ्या पक्षी आत्मा मेंदूचा धर्म होणे कधीच शक्य नाही, कारण अगदीच स्मृति पुसून जाण्याकरता मेंदू नवा पाहिजे; पण त्या प्रेतातील मेंदू तर जुनाच असतो.

३- नवा आत्मा शरीरात शिरतो असे म्हटले तरी मेंदूचा धर्म होत नाही; म्हणून कोणीकडूनही आम्हाला इष्टापत्तिच आहे.''

हे माझे उत्तर ऐकून तो फार चकित झाला आणि हरिभाऊ मराठ्यांना म्हणाला- ''या वयात जे शास्त्र माहीत असणे शक्य नाही, त्याही शास्त्रातील शंकांचे समाधान यांना करता येते, हे मोठे आश्चर्य आहे.एरव्ही

इंग्लिश भाषा वगैरेचे ज्ञान यांना शुद्ध दिसत नाही.''

पुढे तो मनुष्य आपल्याला माझा अनुयायी म्हणवून घेत असे. हा मनुष्य बी.ए.आहे.

संशयवाद

६०३. पश्चिमेकडे संशयवादी आहेत त्याविषयी आपले म्हणणे काय आहे?

याविषयी अनेक वेळ मी तुला सांगितले आहे; तथापि विचारले आहेस तर आणखी सांगतो. ''अमुक गोष्ट तिन्ही काली कशावरून राहील?'' असे त्यांचे म्हणणे असते.

विशेष गोष्ट तिन्ही काली राहील, असे आर्यांचेही म्हणणे नाही.

पण व्यावहारिक दृष्टीने 'चित्ता' व पारमार्थिक दृष्टीने 'सत्ता' तिन्ही काली असलीच पाहिजे, नाहीतर पुढे उत्पन्न होणाऱ्या पदार्थांची ओळखच राहणार नाही.एखादा नवीन मनुष्य जरी उत्पन्न झाला तरी त्याच्या सादृश्यावरून त्याचा कोण्यातरी पूर्वसिद्ध जातीत समावेश होणार.अत्यंत विसदृश पदार्थ उत्पन्न होईल तर मनुष्याला त्याची ओळखच पटणार नाही, आणि अत्यंत विसदृश पदार्थ उत्पन्न झाला असे घेऊन चालले, तथापि सत्ता जातीत त्याचा समावेश झालाच पाहिजे. म्हणजे असे त्या संशयवाद्याला म्हणावे लागेल की, 'पदार्थ असा होवो की तसा होवो, त्याला अस्तित्व राहील.' आणि सत् हेच त्रिकालाबाधित आहे; बाकी काहीच त्रिकालाबाधित नाही, असे आम्हां आर्यांचे म्हणणे आहे.

आता सत् कदाचित राहणार नाही असे तो म्हणेल, तर अभावनिश्चय तरी राहील आणि सर्वथा सत्तेचा अपलाप करील तर वर्तमानसंशयाला अस्तित्व नसल्यामुळे त्याचाही ह्याने अपलाप केला म्हणावयाचा!

शिवाय 'असेही होईल किंवा तसेही होईल' इत्यादि संशय विशेष संबंधातच येऊ शकतात - सामान्य संबंधात येऊ शकत नाहीत.कारण पदार्थांची यादी वाढली किंवा कमी झाली, तथापि सामान्याला धरून केलेल्या त्याच्या व्याख्येत फरक होत नाही.

हा नियम सर्व शास्त्रात व सर्वांच्या अनुभवात सारखा लागू आहे; म्हणून हा संशयवाद सर्वथा असंगत आहे.

स्वभाववाद

६०४.स्वभाववादाचा व ईश्वरवादाचा कधी तरी समन्वय होईल काय?

दिसते तितके तेही काही फार कठीण नाही.एका दृष्टीने ईश्वरवादीच खरे स्वभाववादी आहेत असे म्हणता येईल.

अमुक पदार्थाच्या उपयोगानुसार अमुक पदार्थ असावा अशा प्रकारचा सर्व सृष्टीचा स्वभाव असेल तर, तो ज्ञानरहित कधीच असूं शकणार नाही.त्याला जड मानून नास्तिक जे आपला पाया उभारतात, तो केवळ श्रद्धामूलक आहे.

सृष्टीतील अनेक पदार्थ अनादि आहेत म्हटले तर- विशिष्ट वस्तुनाश करणाऱ्या विशिष्ट वस्तु निपजूंच नयेत.

स्वभाव ज्ञानात्मक असणे

याचेच नांव ईश्वर आहे, दुसरे काही नाही.

सूक्ष्मदृष्टीने विचार केला असता स्वभाव म्हणजे एक प्रकारची सत्ता होय. ईश्वर नित्य आहे या ईश्वरवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे ईश्वराचे नित्यत्वादिक स्वभावच नाहीत काय?

आणि स्वभावानेच सर्व काही व्यवस्थित होते, या स्वभाववाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे सृष्टिकारणाचे बुद्धिमत्व म्हणजे ईश्वरत्व गृहित होत नाही काय?

तेव्हा नास्तिक जे होतात ते तात्त्विक पद्धतीने होत नसून केवळ विकारानेच होत असतात, असे म्हणावे लागते.

अज्ञेयवाद

६०५. अनंत हे अज्ञेय आहे की अभावरूप आहे? कारण सान्तामध्ये बुद्धि कुंठित होते म्हणूनच ते मानावे लागते,अशी पुष्कळांची समजूत आहे?

अनंत हे अभावरूप नाही किंवा अज्ञेयही नाही कारण ''इतकी सान्ताची किंवा इतकी ज्ञेयाची रेषा'' असे आपल्याला दाखविता येत नाही.

अडाणी माणसाची बुद्धि फारच थोड्या वस्तु जाणू शकते.त्याच्या पलीकडे जे काय आहे ते अनंत, असे तिला वाटत असते.

पण अनंत जर अभावरूप असेल तर अशा मर्यादेच्या पलीकडे सुसंस्कृत झाल्यावर मन गेल्यास तेथे त्याला काही सांपडूं नये, पण सापडते. अभावाला भाव तर कधीच उत्पन्न होत नाही.

अज्ञेयाचीही गोष्ट अशीच आहे.रानटी मनाला ज्या गोष्टी अज्ञेय वाटतात, त्या सुसंस्कृत मनाला ज्ञेय वाटतात.

बरे, विश्व अनंत व बुद्धि सान्त असेही म्हणता येत नाही.कारण बुद्धीच्या वृत्तीही अनंत आहेत, हे पश्चिमेकडे सिद्ध झालेच आहे.

अज्ञेयवाद्यांनी तर बाह्य व अध्यात्मिक सर्व अज्ञेयच ठरविल्यामुळे अज्ञेय म्हणणाराही अज्ञेयच होऊ पाहतो मग अज्ञेयाने अज्ञेयाचे आकलन ते कसे काय करावयाचे!

काही अज्ञेयवादी उत्क्रांति मानतात, पण तशाने उत्क्रांतीचा उद्देश काय हे गूढच राहते, म्हणून उपनिषद्गम्य सत्तांशाला धरून असलेलेच आनंत्य मान्य आहे.

सामान्यामध्ये विशेषाची जिज्ञासा प्रश्नप्रहसन होय.

जे मनुष्य आनंत्यावर कोट्या करतात ते प्रकारांशाची जिज्ञासा धरून करीत असतात, म्हणून त्या कोट्या व्यर्थ आहेत.

अनंताचे जाणणेही अनंतच होत असल्यामुळे **''सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म''** हा श्रुतिसिद्धान्तच शेष राहतो.

६०६. तर मग स्पेन्सर (Spencer) सारखे 'अज्ञेय' म्हणणेच बरे. अनादि म्हणण्यात काय अर्थ आहे?

छे, छे, अनादि म्हणण्यात उत्पत्ति नाहीच असा अर्थ आहे आणि अज्ञेय म्हणण्यात उत्पत्ति असेलही कदाचित् पण आम्हाला समजत नाही, असा अर्थ आहे.कोणालाही समजत नाही, तरी ती (उत्पत्ति) असेल अशा प्रकारच्या संशयाला पुरावा नसतो.

शिवाय अज्ञेयवादात वस्तु गोचर नसते.अनादिवादात वस्तु गोचर आहे.

'केवळ आपल्याला समजत नाही' एवढाच अनादि शब्दात अर्थ असता तर, आईला दिसणारा देवदत्त बापाला निराळ्या प्रकारचा दिसत असेल, अशा प्रकारची कोटीही प्रत्येकाला करता आली असती.दोषादिकाने विशेष विपरीत दिसणाऱ्या वस्तूचा सामान्य अनुभवाने बाध करावा लागतो तो व्यवहारच जगातून नष्ट झाला असता.

'आम्हाला समजले नाही म्हणून काय झाले? कोणाची तरी बुद्धी चालेल' असे म्हणणारे लोक आपणास आढळतात खरे.परंतु ''बुद्धि आपल्या सामान्यधर्माने कुंठित झाली म्हणजे तिला तसेच कबूल करावे लागते. विशेषधर्माने कुंठित झाली असताच दुसऱ्याच्या तीव्र बुद्धीची आपली बुद्धि अपेक्षा करीत असते'', हे अबाधित तत्त्व ते लोक विसरतात.

पुनः असे म्हणणाऱ्यांना असाही एक प्रश्न विचारावा की, सामान्य धर्मांतही जर तुम्ही बुद्धिभेद मानता तर प्रमाणसामुग्री समान असताना की विषम असताना? १- पहिला पक्ष म्हणेल तर अनुभवविरुद्ध आहे

आणि २- दुसरा पक्ष मानेल तर जडापेक्षा अलौकिकत्व त्याला कबूल करणे भागच आहे.

मग तशा प्रकारचे बुद्धिमान पुरुष पुष्कळ घेऊन त्यांच्या बुद्धीतील सामान्य व विशेषधर्माचा विचार केला पाहिजे म्हणजे आपल्या बुद्धीतील व त्यांच्या बुद्धीतील सामान्य धर्म एकच आहेत असे कळून येते.

आतां, **१**- ही अलौकिकता जर अमर्याद असेल, तर ती बुद्धीच्या एका सामन्य धर्मातच जाईल; आणि **२**- ही समर्याद असेल तर, जो कोणी अलौकिकतेत मुख्य होईल त्याच्या उपदेशावर हा निर्णय अवलंबून राहील आणि त्याच्या उपदेशात विवाद असला की, पुनः आपल्याला आपल्या बुद्धीचे साह्य घ्यावे लागेल. म्हणून 'बुद्धीच्या सामान्य धर्मात एकता व विशेष धर्मात अलौकिकता' इत्यादि भेद समजणेच सयुक्तिक आहे.

मुख्य महात्म्यांचा किंवा ईश्वराचा उपदेश विशेष धर्मविशिष्ट असतो; आणि तो सामान्य धर्माने आपल्याला स्वात्मानुभव करून देतो.

कोणत्याही पदार्थाचे रूपांतर झाल्याशिवाय आपल्याला आरंभही स्पष्ट दिसत नाही.अज्ञानाचा अनादि ज्ञाननाश्यत्व असा धर्मही आहे.

भूल व अज्ञान यातील फरक हाच आहे की 'मी विसरलो अशी प्रतीती होणे' ही भूल होय; व भूलीलाच विस्मृति म्हणतात; आणि 'मला ठाऊक नाही' अशी प्रतीती होणे, हे अज्ञान होय.हे अनादि व ज्ञाननाश्य असेच असते. म्हणून अज्ञानाचे मुख्य स्वरूप अभानापादनच आहे.असत्वापादन तर विशिष्ट ब्रह्माविषयीच असते. तसे नसेल तर वंध्यापुत्रादिकांचे खोटे ज्ञानही असत्वापादन ठरून वंध्यापुत्राचा कधी तरी खरे ठरण्याचा संभव राहील.शिवाय असत्वापादन जर सर्वदा असेल तर अभानापादन हा अंशच संभवणार नाही. म्हणून असत्वापादकावरण हे विशिष्ट गोष्टीविषयीचेच आहे; अथवा ते एक प्रकारचे विपरीत ज्ञान आहे.सर्वांचाच सदसद् ज्ञानाविषयी जर विवाद असेल तर त्याच्या प्रयोजनावरून निर्णय करावा. शशश्रृंगादिकाला सत् मानणारे पाणिन्यादिक त्याला बौद्धच (बुद्धीने निश्चित केलेला) मानतात, हे लक्षांत ठेवावे. त्याला संपादनसामुग्र्यादिक नाहीत.ब्रह्माला संपादनसामुग्री आहे म्हणून त्याचे असत्वापादन मिथ्या आहे; आणि शशश्रृंगाचे असत्वापादन अविद्याकल्पित आहे.तिलाही सदधिष्ठान असतेच.

६०७. अज्ञेयवाद आपणास मान्य आहे काय ?

मला मान्य असो की नसो, पण ज्याने अज्ञेयवाद काढला आहे त्यानेच उत्क्रांतिवादही काढला आहे. तेव्हा 'मला काही समजत नाही' इतकेच जर उत्क्रांतीचे संपाद्य असेल, तर हे पहिलेपासूनच सर्वांना ठाऊक आहे. मग उत्क्रांती होण्याचे प्रयोजन काय !

उत्क्रान्तिवाद

६०८. उत्क्रांति व पुनर्जन्मात फरक आहे किंवा नाही?

अर्थात आहे.एका देहातून आत्म्याचे दुसऱ्या देहात जाणे याचे नांव पुनर्जन्म असून, देह व आत्मा खास निराळा आहे अशा अंशाकडे तो झुकतो.

उत्क्रांतीची गोष्ट तशी नाही.उत्क्रान्ति म्हणजे एका विशिष्ट पदार्थाची शक्ती दुसऱ्या विशिष्ट पदार्थाला उत्पन्न करून त्यात आपले पुढचे गुणधर्म अधिक व्यक्त करीत असते; आणि पूर्वीचा स्वभाव अर्थातच तिचा नष्ट होत जात असतो. बाप पुत्रात व पुत्र नातवात अशाच रीतीने उतरत उतरत चढत असतो.

पण थिऑसफीचा उत्क्रान्तिवाद यापेक्षा काही निराळा आहे. त्यांच्या मते एका देहातील आत्मा दुसऱ्या देहात तर जातोच, परंतु त्याच्या त्याच्या गुणधर्मांचा तेथे अधिक विकास होत असतो. थिऑसफीचे लोक ''बापाचा आत्मा पुत्रातच उतरला पाहिजे'' असा विशेष मानीत नाहीत.

पुनर्जन्माची उपपत्ती

पुनर्जन्माची उपपत्ती अशी आहे :- अविद्या, काम व कर्म या तिहींच्या योगाने मनुष्य आपल्या खालच्या व वरच्या योनीतही जात असतो.

थिऑसफीमध्ये ''मनुष्य खालच्या योनीत जात नाही असे मानीत होते, पण आता, खालच्या योनीत जातात तरी त्यांचे मानुष ज्ञान नष्ट होत नाही- म्हणजे त्यांचे शरीर बदलते तरी मन मनुष्याचेच असते''- असे ते म्हणतात.

आर्यांनाही ही गोष्ट कबूल आहे पण सर्वच नाही.आर्यांचे शास्त्र वाचले असता असा नियम दृष्टीस पडतो की, पूर्वजन्माचे स्मरण मनुष्यजन्मातसुद्धा बहुतेकांना नसते.शिवाय कर्म भोगणारे लोक प्रथम वरच्या लोकांना भोगून नंतर अनुशयाने प्राणीकोटीत जन्म घेत असतात.पैकी देव हे अतिशय सुख भोगून अनुशयाने ब्राह्मणादि योनीत येतात, आणि नारकी अती दुःख भोगून अनुशयाने तिर्यगादि योनीत येतात.मृत्युरूपामधली विस्मृती बहुतेक सर्वांनाच असते; म्हणूनच खालच्या प्राण्यांमध्ये मानुष गुणधर्म दिसत नाहीत.

एकादा उपासक काही चुकीमुळे जर खालच्या योनीत गेला, तर त्याचे मात्र शरीर बदलून मनाचे पूर्व धर्म कायम राहतात; व त्याची त्याला स्मृतिही राहते.जडभरताची कथा हे त्याचे उदाहरण होय.त्याचप्रमाणे एखादा पुण्यलोकातील मनुष्य मनुष्यजन्मातील कर्माच्या योगाने बद्ध न होता व पुण्यप्रारब्धभोग न संपता- काही अपराधाच्या योगाने खालच्या योनीत आला तर- त्याचेही पूर्वज्ञान व स्मृतिही कायम असतात व तेथून मुक्त झाल्यावर तो आपल्या स्वर्गालाच जातो. महात्म्यांच्या अनुग्रहाने त्याला कधी कधी वाणी सुद्धा असते. सर्पयोनीत गेलेला नहुष, राक्षसयोनीत गेलेला कल्माषपाद, वृक्षयोनीत गेलेले नलकुबर इत्यादी त्याची उदाहरणे होत.

शिवाय योगी जर कधी कधी इच्छेने खालच्या योनीत गेले तर त्यांचेही ज्ञान कायम असते; परंतु त्यांना ती योनी आपल्या इच्छेने सोडून देता येते. आचार्यादिकांचा परकायाप्रवेश असाच आहे.

ओवीबद्ध विक्रमचरित्रातील गोष्टीही अशाच प्रकारच्या आहेत; परंतु त्या जादुरूपाच्या आहेत.जादूच्या योगाने खालच्या योनीत गेलेल्या मनुष्यालाही पूर्वज्ञान असते.कथासरित्सागरातील दोन मनुष्य वानर झाल्याची कथा अशाच प्रकारची आहे. पण जादू काढून घेतली म्हणजे त्यांचा पूर्व देह त्यांना प्राप्त होतो.

तात्पर्य, अमानुष प्रयत्नाशिवाय स्वाभाविक कर्मांच्या योगाने जो मनुष्य खालच्या योनीत जातो, त्याला अर्थातच पूर्वज्ञान नसते, आणि तो उत्क्रांतिवाद्यांप्रमाणे बापातून पुत्रातही उतरत नाही, तर एका देहातून दुसऱ्या देहात जात असतो.दुसरा देह जरी तेथेच घेत असला तरी तो दुसराच घेत असतो आणि त्याचाच विकास होतो असेही काही नाही; तर तो दैवपरतंत्र असतो.प्रयत्नाने सत्त्वगुण मिळविला तर मात्र त्याला वरच्या योनीत जन्म येतो. हा आर्यधर्मात व इतर लोकांच्या उत्क्रान्त्यादिवादांत फरक आहे; आणि हा सयुक्तिकही आहे.

शापादिकांच्या योगाने व जादूच्या योगाने अतिदीर्घ परिस्थितीत त्याला विस्मृति झाली, तर प्रतिबंधमुक्तीचे वेळी पूर्वीच त्याला स्मृति होते व नंतर त्याला पूर्वस्वरूप प्राप्त होते. कथासरित्सागराच्या विद्याधराच्या अनेक योनीवरून ही गोष्ट कळण्यासारखी आहे.याचा विशेष विचार मी 'सुरतरूत' करीन.

६०९. पाश्चात्य उत्क्रांतिवाद व पौरस्त्य परिणामवाद एकच आहे म्हणतात, ते आपणास मान्य आहे काय ?

नाही.परिणामवादात सत् वस्तूच उत्पन्न होते असे सांगितले असून त्याचा लय होतो असे सांगितले आहे.शिवाय पुरुषाचे मोक्ष हेच प्रयोजन सांगितले आहे.

पाश्चिमात्य उत्क्रांतिवाद त्याच्या उलट आहे; उत्क्रांत होणे हे पुरुषाचे प्रयोजनच त्यात सांगितले आहे, आणि उत्क्रांतीचा लयही मानला नाही.

कपिलांच्या परिणामवादात पुरुष नित्य आहे असे सांगितले आहे, पण पाश्चात्यांच्या उत्क्रांतिवादात उत्क्रांत झालेली जीवशक्ती मेल्यानंतर कशी नाश पावते हे गूढ कायम असून देखील जीवशक्ती नाश पावते असे स्पष्ट म्हटले आहे आणि काहींनी संशय दाखविला आहे.

६१०. जडापासून जंतू उत्पन्न करण्याची जी क्रिया पाश्चात्य लोकांस सापडली आहे, त्यावरून आत्मा उत्पन्न होतो व मरतो असे मानणे सयुक्तिक आहे किंवा नाही?

छे, मुळीच नाही, उलटे जडातच चैतन्य आहे असेच सिद्ध होते.

नसलेला पदार्थ कधीही उत्पन्न होत नाही यामुळे आम्हा आर्यांचा बाळकडू जो सत्कार्यवाद तोच त्यामध्ये दिसून येत आहे.

शिवाय, गवत वगैरे कितीही शिजवून टाकले तर त्यामध्ये एक प्रकारचा स्वेद उत्पन्न होऊन त्यामधून स्वेदजप्राणी उत्पन्न होतात अशी आमच्याकडे उपपत्ती आहे. बाहेरूनच जंतू येऊन पदार्थात शिरतो ही उपपत्ति पाश्चात्यांचीच होय. म्हणून 'आर्यांना' नवीन असे या जडशास्त्रीय शोधकांच्या म्हणण्यात काही नाही.

६११. एकूण उत्क्रान्तिवाद तुम्हाला मान्य नाही तर?

उत्क्रान्ती सान्त आहे की अनंत आहे? १- पहिल्या पक्षी, अनंत काल होऊन गेला असल्यामुळे उत्क्रान्तीची समाप्ती आतांपर्यंत कां होऊन गेली नाही? कालाला आरंभ काही कोणी दाखवित नाही.कालाचे स्वरूप अज्ञेय आहे.म्हणून स्पेन्सर पक्षाभिमानी पुढे येईल, तर उत्क्रान्तीचे स्वरूपही त्याबरोबरच अज्ञेय झाल्यामुळे उत्क्रान्ती व अपक्रांतीचा दुवा स्पष्ट दिसणार नाही; व त्यामुळे कर्मफळजन्य चक्रच मानणे भाग होईल.

२- उत्क्रांती अनंत आहे हा पक्ष घेऊन चालण्यात काही अर्थच नाही.कारण त्याच्या योगाने उद्देश हा सिद्ध न होता प्रत्येक दुवा सारख्याच रेषेवर दिसेल.

मला स्वाभाविक उत्क्रांतिवाद मान्य नाही; पण प्रायत्निक उत्क्रांतिवाद मान्य आहे.म्हणजे प्रयत्नाने मनुष्य देव होऊ शकतो असे मी म्हणेन.

६१२. उत्क्रांतिवाद तुम्हास मान्य आहे काय ?

मला उत्क्रांतिही मान्य आहे व अपक्रांतिही मान्य आहे कारण उत्क्रांति-वादाला संमती देणे व अपक्रांतिवादाला न देणे हे बुद्धीच्या दृष्टीने सभ्यपणाचे नाही. या दोन्ही वादांचा अंतर्भाव आमच्या **गमनागमनसिद्धान्तात** झाला आहे.

नीति शास्त्र

६१३. नीति कशाला म्हणतात ?

धर्माकरता समयानुसार सांगितल्या जाणाऱ्या व्यावहारिक नियमांना!

६१४. धर्मशास्त्र व नीतीशास्त्र कसे शिकावे ?

* धर्मशास्त्र अंतःस्फूर्तीचे असल्यामुळे गुरुशास्त्रापासून शिकावे आणि

* नीतिशास्त्र अनेक लहानसहान सुद्धा अनुभव गोळा करून शिकावे.

भीष्मांनी महाभारतात धर्माला म्हटले आहे की, 'हे मी सर्वच काही वेदाच्या आधाराने सांगत आहे असे तूं समजू नकोस शहाण्याच्या अनुभवातून गोळा केलेले हे मधू आहे असे समज.'

६१५. नीतीचा सरळपणा व कुटिलपणा हा भेद सर्वकाळ असतो काय?

नाही. आपत्काली कुटिलनीतीही सरळ होते. धृतराष्ट्राच्या संपत्कालात कणिकाने सांगितलेली नीती कुटिल समजल्या गेली.पण तशाच प्रकारची आपद्धर्मपर्वात भीष्माचार्यांनी युधिष्ठिराला नीती सांगितली आहे व ती प्रमाण समजल्या गेली आहे.

६१६. लोकांच्या टीकेला केव्हा भ्यावे व केव्हा भिऊ नये?

आपण वास्तविक १. वाईट कर्म करू नये व २. लोकांना धार्मिक उपसर्ग लागूं देऊ नये; या दोन गोष्टी पाळल्या गेल्या म्हणजे कोणत्याही लोकांच्या टीकेला भिऊ नये.

६१७. नीतिशास्त्राची कल्पना पाश्चिमात्यांप्रमाणे आपल्या इकडे निश्चित झाली आहे काय?

पाश्चिमात्यांमध्ये नीतिशास्त्राच्या मूलतत्त्वाविषयी ज्या अनेक कल्पना आहेत त्यांची समीक्षा मी आपल्या एका पत्रात केलीच आहे. १- 'आप्तवाक्य म्हणजे नीती' असे काही लोक म्हणणारे आहेत. या कल्पनेचा धर्मात समावेश असल्यामुळे तिचा नीतीशी काही संबंध नाही असे मला वाटते.शिवाय आपल्याकडे आप्तवाक्यांचे महत्त्व फारच आहे, म्हणून ही कल्पना जुनीच आहे व पाश्चिमेकडील नवी नव्हे.

२- आपली सद्असद्विचारशक्ति सांगेल तीच नीती असे काही म्हणतात पण हीही कल्पना आपलेकडील जुनीच आहे.

असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा यदार्यमस्यामभिलाषी मे मनः ।
सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ॥

असे शाकुंतलात कालिदासाने म्हटले आहे. 'माझे मन परस्त्रीकडे न पाहणारे असे श्रेष्ठ असून ज्या अर्थी ते हिच्याकडे जाते, त्या अर्थी ही क्षत्रियाला वरण्यालाच योग्य असावी ह्याविषयी संशय नाही'

'सत्पुरुषांना ज्या गोष्टीविषयी संशय असतो त्या गोष्टीसंबंधाने त्यांची मनोवृत्ती जिकडे धावेल तेच प्रमाण आहे असे समजावे,' असा या श्लोकाचा भावार्थ आहे.शकुंतलेला उद्देशून महाराज दुष्यंताची ही उक्ति आहे. श्लोकात जो 'सतां' शब्द आहे तो महत्वाचा आहे.

मनोवृत्ती जशी आसक्ती असेल तसे सांगत असते.सर्वांचीच मनोवृत्ती सर्वकाळ सत्याकडे धांवते हे म्हणणे बहुधा धाडसाचे आहे.'नीतिशास्त्र व्यावहारिक आहे, पारमार्थिक नव्हे.' शिवाय, नुसती मनोवृत्ती धांवल्यानेच अमुक गोष्ट सत्य आहे व अमुक गोष्ट सत्य नाही, हे मागील पुराव्यावाचून कळणे शक्य नाही. तसा पुरावा म्हणजे शास्त्र होय.तेव्हा याही नीतीचा धर्मामध्येच समावेश होत आहे; आणि आमच्याकडे तो तसाच झाला आहे.

३- 'पुष्कळ लोकांच्या उपयोगी पडेल ती नीती' असे काही लोक म्हणतात.चार्वाकादिकांची कल्पना आमच्याकडेही अशीच आहे; पण या नीतीत अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात.

प्रश्न १ ला - त्यात नीतीचे क्षेत्र सृष्टीएवढे आहे की मनुष्यापुरतेच आहे?

प्रश्न २ रा - प्रत्येक मनुष्याला आपले काही हक्क आहेत की नाही?

हे दोन प्रश्न मुख्य होत.पैकी

१- इतर प्राणी मनुष्यांना उपयोगी असल्यामुळे त्यांना उपयोगी पडतील अशा गोष्टी मनुष्यांनी केल्या पाहिजेत.इतर प्राण्यांपेक्षा मनुष्य बुद्धिमान आहे असे मनुष्यच म्हणतो, इतर प्राणी ही गोष्ट कबूल करतात हे कशावरून? पण मनुष्य दुसरे प्राणी आपल्या ताब्यात घेण्याचीच खटपट करतो.आपण त्यांच्या ताब्यात जाण्याची खटपट करीत नाही.

२- बरे, मनुष्यापुरतेच नीतीचे क्षेत्र मानावे.तर बुद्धिमान मनुष्याला ज्ञाता मुळीच राहत नाही, कारण ज्ञा ध्येये सर्वांनाच सारखी समजत नसतात. पुष्कळ मनुष्यांवर एक अधिकारी नेमण्याचे तरी कारण हेच असते.

३- दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देतानाही हाच घोटाळा येऊन पडतो.पुष्कळ लोकांच्या उपयोगी पडेल अशी आपली बुद्धि स्वार्थ सोडून बुद्धिमानांनी खर्च करावी, तर रानटी लोकांना फुकट पोसल्यासारखे होईल.

४- बरे, सर्वच बुद्धिमान आहेत असे धरून चालले तर सर्वच असे करू लागले म्हणजे बहूपयोगितेचा अर्थ काही उमगला न जाऊन आर्यांच्या वैराग्यात तिचा समावेश होऊ पाहील; त्यामुळे धर्मातच हिचाही समावेश

होतो म्हणावे लागेल.

५- बरे, मनुष्याला स्वार्थ आहे असे कबूल केले तर बहूपयोगिता नुसती तोंडाने बोलण्यापुरतीच झाली.

६- चवथी नीतीची कल्पना उत्क्रांतिवाद्यांची होय. ही कल्पना अद्यापि अपूर्णच आहे.

शिवाय उत्क्रांति समान दिशेने होते, की विषम दिशेने होते? हा तिच्यात प्रश्न उत्पन्न होतो. **१**- प्रथमपक्षी अमुक करणे नीतीचे व अमुक अनीतीचे हे ठरत नसल्यामुळे कायदे वगैरे व्यर्थच होतात. **२**- **'उचलली जीभ आणि लावली टाळूला'** आपला तळीराम गार करून घेण्यापलीकडे दुसरे काही नाही, अशी स्थिती द्वितीयपक्षीही होते.याप्रमाणे पाश्चिमात्य नीतीच्या मूलतत्त्वात मुख्य चार कल्पना असून यातच सर्वांचा अंतर्भाव आहे.

आर्यांची नीतिकल्पना

आता आर्यांकडील नीतीची कल्पना काय आहे ते सांगतो ऐक.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आर्यधर्मांत सांगितले आहेत. मोक्ष हा केवळ निवृत्तिलक्षण धर्मावरच अवलंबून असून, अर्थ व काम प्रवृत्तिलक्षण धर्मावर अवलंबून आहेत.निवृत्तिलक्षण धर्माचे फल दृष्ट आत्मसाक्षात्कार असून प्रवृत्तिलक्षणधर्माचे फल अदृष्ट स्वर्गरूप अभ्युदय आहे; व अधर्माचे फल अदृष्टरूप नरक आहे. थोडा धर्म व थोडा अधर्म राहिला म्हणजे या मृत्यूलोकात जन्म येतो, असे आर्यांचे म्हणणे आहे. 'अधर्मबाहुल्याने तिर्यक् आणि धर्मबाहुल्याने मनुष्य' अशी या लोकातील स्थिती आहे.मनुष्याला काही गोष्टी स्वबुद्धीच्या प्रयत्नाने व काही गोष्टी चोदनामूलक(आज्ञारूप) धर्माने याच लोकांत मिळविता येतात. पुत्रकामेष्टि करून पुत्र मिळविणे, हे दैवाने अर्थ साध्य करून घेणे आहे. यात अदृष्ट-कर्म उत्पन्न होते; म्हणून तो धर्ममूलक आहे; परंतु पैसा वगैरे मिळण्यासारख्या गोष्टी, स्वतःच्या बुद्धीने राखणे व त्यांचा योग्य व्यय करणे आणि त्यांचा योग्य उपभोग घेणे या गोष्टी जेव्हा चोदनेवाचून(शास्त्राज्ञेवाचून) होतात तेव्हा त्यांना नीतीचे स्वरूप येते. तात्पर्य,

'विधायक चोदनेला फारसे चिकटून न राहता आणि प्रतिषेधक चोदनेचे उल्लंघन न करता चोदना जेथे उदासीन असेल अशा ठिकाणी स्वप्रयत्नाने अर्थ व काम साध्य करून घेणे' याला आर्यशास्त्रवेत्ते नीती म्हणतात.

ही विहितचोदनेला अधिक चिकटून असल्यास **''सन्नीती''** होते, व प्रतिषेधक चोदनेला अधिक चिकटून असल्यास **''कुटिलनीती''** होते.

नीतिशास्त्राविषयी धर्मशास्त्र जसे साक्षी आहे म्हणजे त्यात ढवळाढवळ करण्याची त्याची इच्छा नाही; तसे धर्मशास्त्राच्या बाबतीत नीतिशास्त्रही साक्षी आहे.म्हणजे अमुक धर्माचे खंडण किंवा अमुक धर्माचे मंडण नीतिशास्त्रवेत्त्याला शोभत नाही. भयंकर प्रसंग असल्यास तडजोड करावी, किंवा प्राज्ञ प्रसंगच असेल तर वाद पाहात बसावेत, इतकेच त्याचे काम आहे.

याप्रमाणे धर्मशास्त्र व नीतिशास्त्र यांचा 'स्वपरनेत्र-निरीक्षणवत् साक्षिभास्यभाव आहे' असे मी म्हणतो.

६१८. नीतीचा व धर्माचा स्पष्ट भेद आर्य लोकांना ठाऊक नाही काय?

ठाऊक असला तरी धर्माच्या बाहेर कोणत्याही गोष्टीला आर्य लोक जाऊ देत नाहीत.म्हणूनच ते गौणप्राधान्याने महत्त्व देत असतात.**१**- नीति ही ऐहिकसुखफलप्रधान असून **२**- धर्म हा पारलौकिकफलप्रधान आहे.

'अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ नीतिवेत्ते मानीत असतात' असे सर्वदर्शनसंग्रहात स्वामी विद्यारण्यांनी सांगितले आहे.

चांगला असला तरी, 'बहुतांकरता एकाचा त्याग करणे आणि स्वार्थाकरता बहुतांचा त्याग करणे' हे आचरण नीतीतच मोडते.

आता नीतिवेत्ते कधीकधी स्वार्थाचा त्याग करतात, पण त्यातून दुसरा ऐहिक मोठा स्वार्थ पहात असतात.

आपद्धर्म हे नीतीच्या व धर्माच्या मिश्रणाने झाले आहेत तथापि त्यात वैदिक धर्माचे स्वरूप शुद्ध दृष्टीस पडते म्हणूनच त्यास आपद्धर्म म्हणावयाचे.

मोह करणारे पंथ उत्पन्न करणे इत्यादी गोष्टी नास्तिक नीतिवेत्त्यात मोडतात.

नीतिवेत्त्यामध्ये नास्तिक व आस्तिक यांचा भेद नाही, पण धार्मिक पुरुषाला मात्र आस्तिक असावेच लागते.

नीतिवेत्ते कधी कधी दुसऱ्याच्या धर्मात हात घालीत नाहीत, परंतु ते धर्माच्या प्रेमामुळे नसून धर्माच्या औदासीन्यामुळे असते आणि दुसरा ऐहिक स्वार्थ त्यांना त्यापासून मिळावावयाचा असतो. शिवाय,

नीतिवेत्ते हळुहळू प्रत्येकाची धर्मश्रद्धा क्षीण करीतच असतात.

नीतिवेत्त्यांचे पारडे कोण्या एकीकडे अधिक झुकले की ते नाश पावतात.

६१९. अहो, पण आत्मवेत्तेही धर्मात हात घालीत नाहीत असा आर्यधर्माचा सिद्धांत आहे ना?

ठीक आहे. धर्मात हात न घालणे हा गुण वैदिकांचे ठिकाणी व नास्तिकांचे ठिकाणी जरी समान असला, तरी -

कोणताही धर्म आपल्या अंतःकरणाच्या पक्वतेनुरूप जन्म-कर्म-संबंधाने आपल्या मूळ ठिकाणाला जाऊन मिळतोच असा वैदिकांचा विश्वास असतो व नास्तिकांचा तो नसतो. सर्वज्ञ व नास्तिक दोन्ही एकच गोष्ट बोलत असले, तरी एकान्तिक व लोकान्तिक आचरणावरून तरी त्यांचीही परीक्षा पारकीयानुभवदान व प्रारब्ध-भोग-सहिष्णुतादिकांवरून होते.

६२०. चांगले कार्य कोठे कसे समजले जाते?

१- धर्मात शास्त्रानुसार करणे चांगले समजल्या जाते.

२- धर्माला विरोध येणार नाही असे व्यावहारिक कार्य लोकांनुसार चांगले समजल्या जाते. आणि

३- शारीरिक कार्य ज्याच्या योगाने प्राण वाचेल असे चांगले समजल्या जाते.

६२१. उत्सर्ग व अपवाद याविषयी मनुष्याने कोणत्या प्रकारची मति ठेवावी? (उत्सर्ग - नियम)

सामान्य गोष्टीत उत्सर्गच प्रमाण मानावा आणि ज्ञा गोष्टी अपवादरूप असल्या तरी त्यांचा 'उत्सर्ग' (नियम) करण्याचा प्रयत्न करावा. कारण अपवादाचा समुदाय जरी लहान असला, तरी तो यदृच्छेने झाला असे म्हणता येत नाही. कारण कोणताही क्रमबद्ध समुदाय यदृच्छेने होणे शक्य नाही.

'पौनःपुन्य-अभावच पुन्हा पुन्हा घेणे यदृच्छेचे लक्षण आहे'.

६२२. मनुष्याची साधी परीक्षा कशावरून करावी?

लहानसहान संवयीतील त्याच्या वृत्तीवरून!

मोठे काम विकाराने किंवा लाजेने प्रसंगी कोणही करू शकतो.

६२३. लहानसहान वृत्तीत चांगली व मोठ्या कामात घाबरणारी अशी माणसे नसतात काय?

असतात, परंतु ते धैर्य धरितात किंवा पश्चात्ताप तरी करितात; म्हणून ते चांगलेच म्हणावयाचे !

६२४. अंगी चांगले गुण नसता चांगला प्रसंग सहज घडून आल्यामुळे चांगला म्हणवून घेण्याची संधी मिळून लोकांना फसविण्याचे ज्यास फावते, त्याच्याविषयी कसे करावे?

ज्या गुणाविषयी तो दंभ करीत असेल त्या गुणाविषयी नित्य व्यवहारात किंवा एखाद्या धैर्याच्या व्यवहारात त्याची परीक्षा करावी.

६२५. सुख पैशात आहे की गरिबीत आहे ?

गरिबीत आहे. कारण शरीराचा व मनाचा काटकपणा तिने वाढतो.

६२६. गुणदोष दाखविण्याला मर्यादा आहे काय ?

होय. कारण कोणत्याहि पदार्थाकडे चांगल्या व वाईट दोन्ही दृष्टीने पाहता येते.

६२७. दोष केव्हा गणावे व केव्हा गणूं नयेत ?

आपत्तीत गणू नयेत व संपत्तीत गणावे.

तुलसीदास :- ''दुखितदोखगुण गनहि न साधु''

६२८. कोणाच्या गुणाला दोषरूप समजावे ?

निस्पृह नसून जो उद्धट आहे त्याच्या !

६२९. मनुष्य देव आहे की पशू ?

'विचाराने तो देव आहे व शरीराने पशू आहे.'

म्हणूनच मांस न भक्षणाऱ्या पशुपक्ष्याप्रमाणे त्याची शारीरिक वागणूक प्रसंगी हिताची होते, व अत्यंत विचारामध्ये त्याची वागणूक देवाप्रमाणे हिताची होते.

'विचाराचा शरीरावर ताबा ठेवणे हे मनुष्यत्व होय.'

६३०. कार्यसाधू कोण ?

मिष्ट वक्ता !

६३१.कार्यविघाती कोण?

क्रूर वक्ता !

६३२. अपराधी कोण ?

आपल्याला ओळखत नाही तो !

६३३. न्यायी कोण ?

शरण येईपर्यंत चुकीविषयी ज्याची करडी नजर असते तो !

६३४. मुका कोण ?

सत्य न समजून उगेच बोलणे सोडतो तो !

६३५. बोलका कोण ?

विचार न करता प्रसंगी ज्याला चांगले सांगता येते तो !

६३६. दरिद्री कोण ?

ज्याच्या अंतःकरणात अतिशय तृष्णा आहे तो, असे आचार्य म्हणतात.

६३७. श्रीमंत कोण ?

संतुष्ट, असे आचार्य म्हणतात.

६३८. गुह्य कोणाजवळ झांकून राहते ?

जो कोणावर फार कृपाही करीत नाही व कोणावर फार रागावतही नाही त्याजवळ!

६३९. हितैषी कोण ?

जो अंधारात आपले दोष गोड शब्दाने दाखवितो तो!

६४०. चोरात व शूरात काय फरक आहे? कारण दोघेही खुनारीच असतात?

पहिल्याला वाचण्यात धन्यता वाटते व दुसऱ्याला मरण्यात धन्यता वाटते, हाच त्यांच्यामध्ये फरक आहे.

६४१. नित्य विलासी कोण ?

ज्याला योग्य वेळी सुखाने झोप येते व योग्य वेळी सुखाने जागतो तो!

६४२. धीर कोणास म्हणावे ?

लहानसहान गोष्टीतही जो मोठेपणाची कामे करतो त्यास! प्रसंगी मोठेपणाची कामे तर एखादा लहरीही करू शकतो.पण त्याचा तो उदारपणा सर्वकाळ नसतो. अतिदान करून अतिकृपणता असणाऱ्या व्यक्ती मी पाहिल्या आहेत.विकाराच्या झपाट्यात साधारण मनुष्यही हरिश्चंद्रासारखे बायकोचे दान करण्यास

उभा राहतो! परंतु ती त्याची उदारता सर्वत्र नसते.असे पाहणारे लोक सध्या असून ते माझे मित्रही आहेत.

६४३. क्षमेत व दयेत काय फरक आहे?

अपराध केला असता दंड न देणे याला क्षमा म्हणतात,

आणि अपराध न करणारा असून दुःखात पडलेला असेल तर त्याला काढणे याला दया म्हणतात.

६४४.ज्याच्यावर दया केली आहे त्यावर विश्वास टाकावा की नाही?

उदासीन असेल तर टाकण्यास हरकत नाही आणि परकुळीचा असेल तर टाकू नये.

६४५. ईर्ष्या कोठे, कशाविषयी धरावी व धरूं नये ?

हेतुविषयी ईर्ष्या धरावी, फलाविषयी धरू नये; तशीच -

लौकिकात ईर्ष्या धरावी - धर्माधर्मात धरू नये.

६४६. स्तुतिप्रियता हा गुण आहे की दोष आहे ?

वरिष्ठांच्या हातून स्तुती करून घेणे दोष असून,

लहानांच्या हातून स्तुती करून घेणे गुण आहे.

शिवाय स्तुतिप्रियता जरी दोष असला, तरी गरिबाजवळ देण्याला पैसा नसतो.त्याच्या जवळ चार स्तुतीचे गोड शब्दच असतात; पण त्या शब्दांनी ज्याचे मन द्रवत नाही, असा मनुष्य गरीबाच्या दृष्टीने अगदी कुचकामाचा आहे. गरीबाची स्तुती ऐकूनही त्याला द्रव येत नाही, तर कशाने यावा? दुसरे, त्या बिचाऱ्याजवळ आपले दुःख सांगण्याला काय असते?

तेव्हा अशा प्रकारचा स्तुतिप्रिय नसणारा निरभिमानी धनगराच्या झाडाप्रमाणे **'मेल्यात ना जित्यात'** समजावा.परंतु गरीबाची स्तुती ऐकून घेतल्यावर तिचा बदला मात्र आपण दिलाच पाहिजे. नाहीतर त्या गरीबांना नमस्कार करून उलटी स्तुती तरी केली पाहिजे.याविरुद्ध वागणाऱ्या स्तुतिप्रिय मनुष्यास निर्लज्ज समजून त्याचा सर्व धिक्कार करतात.

'तूं मोठा साधू असशील तर स्तुतीने फुगून जाऊ नको. पण आपले दुःख व्यक्त करण्याला गरिबाजवळ स्तुतिशिवाय दुसरे काही नसते, इतके लक्षात ठेवून त्याच्याशी वाग.'

६४७. महाभारतात 'ज्याच्या पुण्याची कीर्ती आहे तो स्वर्गाला जातो व ज्याची अपकीर्ती आहे तो नरकाला जातो' असे सांगितले आहे; आणि इतरत्र कीर्तीची निंदा केली आहे, हे कसे?

निंदा विरक्ताकरता असून, गृहस्थाकरिता कीर्ती आवश्यक आहे.

कपटाने कीर्ती करून घेणारे जे असतात त्यांचा निषेधच केला आहे.म्हणून तसे करू नये.हाही कीर्ति-निंदावचनांचा अभिप्राय आहे.

मुक्त तर मानापमानाचे ठिकाणी समान असतो, असे गीतेत सांगितले आहे.

६४८. आत्मस्तुति करून घेणे कोणास बाधक नाही व कोणास बाधक आहे?

१- शूर.**२**- बाहुबलाने तरून जाणारा.**३**- संकटात पडलेला असून मागे पाय घेण्याची इच्छा नसणारा. **४**- अनेक अधर्मी लोकांच्या टोळीमध्ये सांपडलेला एकटा धार्मिक. **५**- पाय घसरून पडलेला आणि **६**- पतिव्रता स्त्री. या सहांना खरी आत्मस्तुती करून घेणे बाधक नाही.बाकी सर्वांना बाधक आहे.

६४९. गर्व कोठे करावा व कोठे करू नये?

१- बुडणाऱ्याला वर काढताना, २- न्यायाने विजय मिळविताना.३- स्त्रीचे सांत्वन करताना, आणि ४- मुलाला उपदेश करताना गर्वोक्ति हिताच्या असतात व इतर सर्व वेळी त्या अहितकारक असतात.

६५०. ज्याच्या विषयी सावध राहावयाचे अशा गोष्टी खोट्या निघाल्यास काय करावे?

सावधच रहावे. कारण घोरत पडणाऱ्यावर अनेक संकटे येत असतात.

६५१. निरूपयोगी कोण ?

'पुष्कळ काम करीतच आहेत, मी एकट्याने नाही केले तर काय झाले?' असे मानणारा!

६५२. सदुपयोगी कोण ?

मी जर एखादे काम केले नाही, तर दुसऱ्याने ते केले असे तरी कां म्हणावे? माझ्या शुद्धतेवरच सर्व जगत्शुद्धता अवलंबून आहे असे ज्याला वाटते तो!

६५३. मोठ्या कार्यात प्रत्यक्ष विघ्न कोणते ?

पिशुनाचं वाईट बोलणे ऐकून मनास वाईट वाटून घेणे!

६५४. स्वार्थ कोणाचा शोभतो व कोणाचा शोभत नाही?

धर्मानुसार शिष्टांची सेवा करणाऱ्याचा स्वार्थही शोभतो.

जो निस्पृह नसून शास्त्राने सवलत दिलेली साधूची लौकिक लक्षणे आपल्या आंगी लावून घेतो त्याचा स्वार्थ शोभत नाही.

६५५. आपले दुर्गुण प्रगट करावयाचे असल्यास प्रथम जवळच्या लोकात करावे की दूरच्या?

खरा पश्चात्ताप झाला असेल तर प्रथम परक्या लोकात प्रगट करावे. कारण जवळचे लोक मूर्ख असल्यास,'आम्हाला हे पूर्वी माहीत होते म्हणून यांनी सांगितले' असे समजून पश्चात्ताप खरा असला तरी हांसतात.

६५६. खोटे बोलणे कधी तरी छपविता येते काय ?

सर्व प्रकारे कधीच व कोणालाच छपविता येत नाही. कारण ते अत्यंत अस्वाभाविक आहे. पापमय अशा तिर्यक् प्राण्याला देखील अत्यंत खोटे वागता येत नाही, देवांनाही येत नाही, तर मग तत्संधिगत मनुष्यांना कसे येईल!

६५७. खुनाचा अपराध करणारा व फांशी देणारा दोघेही हिंसकच असतात, तेव्हा अपराधी कोण ? (प्र. ५०५)

गर्ह्य कर्माला जो आपल्याकडून प्रवृत्त होतो तो! निषिद्ध कामाला आपल्याकडून प्रवृत्त होणे हेच अपराधाचे लक्षण आहे.

अपराध्याला शासन करावे लागते. त्यात शासन करणारा अपराधी होत नाही. याहून अन्य जी या प्रश्नाची उत्तरे आहेत, ती सर्व स्वपक्षदूषित आहेत.

६५८. श्रोत्याचे लक्ष एकाग्र नाही असे केव्हा समजावे?

झोप घेतानां, काडी मोडताना व जमीन उकरताना दिसल्यास !

६५९. मद्यपी कोण ?

नुस्ता नादिष्ट !

६६०. प्रापंचिक व पारमार्थिक फायदा काहीच न होता कोणाचा काळ फुकट जातो?

जो पणावाचून द्यूत खेळतो त्याचा !

६६१. मूषक कोणास म्हणावे ?

मसलत किंवा परमेश्वराचे ध्यान यातून काही एक न करता जो एकांती बसतो त्यास !

६६२. सर्प कोण ?

कृतघ्न !

६६३. दूर देशात जाताना कोणता दुर्गण असला तर चालतो ?

तंबाखू पिणे !

६६४. शास्त्रात विश्वासघाताला कां प्रायश्चित्त सांगितले नाही ?

प्रयश्चित्त घेतल्यावरही पुन्हा तो तसा वागणार नाही, असा विश्वास देण्याकरितां त्याच्याजवळ पुरावा नाही म्हणून !

६६५. अहेतुक चार कोण ? (चार = हेर, चारचक्षुस्)

कामासक्त होऊन जो आपल्या बायकोजवळ सर्व गुह्य सांगतो तो ! इच्छा नसूनही अशाला विश्वासघाताचे पातक लागत असते.

६६६. क्षयरोगी कोण ?

थोडक्या कारणाकरता जो चिंतेचे डोंगर मनात वाढवितो तो !

६६७. अधीर कोण ?

विद्याभ्यासाचे वेळी आयुष्य अल्प आहे, असा विचार करतो तो !

६६८. राक्षस कोण?

एकटाच मिष्टान्न भक्षण करतो तो !

६६९. पिशा्ा कोण ?

पूज्यांसमोर मर्यादारहित वागतो तो !

६७०. नीच कोण ?

पोटाकरता दुसऱ्याची स्तुति करतो तो !

६७१. वेडा कोण ?

हलक्या साधनांनी ज्ञा मनोरथ करतो तो !

६७२. दुर्दैवी कोण ?

ज्याचे मनोरथ नित्य भंग पावतात तो !

६७३. रडका कोण ?

साधने असता जो उगीच पश्चात्ताप करीत बसतो तो !

६७४. असहिष्णु कोण ?

चांगले बोलणे ज्याला वाईट लागते तो !

६७५. कावीळ कोणाला झाला आहे असे समजावे ?

पूज्यांच्या चांगल्या वाक्यांचा परिणाम वाईट होईल असे पाहतो त्यास!

६७६. क्लीब कोण ?

समोर न बोलता मागे निंदा करतो तो !

६७७. नित्य फसव्या कोण ?

हांसून नुकसान करणारा व केल्यावर हांसणारा !

६७८. तिरसट कोण ?

१- जो पडलेल्या ऊठ म्हणत नाही. २- जो शिंकणाराला 'शतं जीव' म्हणत नाही; ३- जो जांभई देणाराला चुटकी वाजवीत नाही आणि ४- जो भेटणाऱ्याला आपण होऊन कुशल विचारीत नाही, हे सर्व तिरसट समजावेत.

६७९. दुर्गंभीर कोणास म्हणतात ?

पानसुपारी खाण्यात, चिलीम ओढण्यात, प्रत्येकामध्ये जो तत्त्वमीमांसा करीत बसतो.जेवणातसुद्धा भात नरम कां? पोळी कठिण कां? इत्यादि प्रकाराने ज्याचे शास्त्रीय रीतीने हृदय हालत असते, त्यास दुर्गंभीर म्हणतात.

६८०. प्रत्येक पदार्थाचा उपयोग करून घेणे हे योग्य आहे की नाही?

वत्सा ! असा प्रश्न तुझ्यासारख्या आर्याला शोभत नाही, अनार्याला शोभतो.सर्व अनार्यांचे मत असेच आहे. आर्यांचे मत ह्याच्या उलट 'आपण सर्वांच्या उपयोगी पडावे' असे आहे.

शिवाय प्रत्येक पदार्थ देवाने आपल्याच उपयोगाकरता केला आहे, असे तरी देवाने आपले काय कर्ज घेतले होते? जो कोणास मारीत नाही, त्याच्यावर कुत्रेसुद्धा विश्वास टाकतात. पण सर्व आपल्याच उपयोगाकरता आहेत, अशा समजुतीच्या मनुष्यावरून प्राण्यांचा विश्वास नाहीसा होतो, त्यामुळे तेही त्याला खाण्याला टपून बसलेले असतात.पुष्कराच्या तळ्यातील ग्राह(मगर) चवताळत नाहीत आणि इतर ठिकाणचे चवताळतात या लोकांच्या म्हणण्यात काही अर्थ आहे एवढे लक्षात ठेव.

६८१. संकट आले असता कोण फार घाबरतो ?

ज्याचा परमेश्वरावर विश्वास नाही व

ज्याने आपले शरीर बळकट केले नाही तो !

६८२. प्रतिबंध कोण सहन करू शकतो?

कायावाचामनाने जो आद्य सामुग्री मिळवितो तो !

६८३. ज्याला आपल्या चुका कबूल करण्याची संवय आहे, व ज्याला लपवून ठेवण्याची संवय आहे, त्यापैकी कोण चांगला?

दोघेही सारखेच.

जो चुका कबूल करून अवश्य कमी करतो तो मात्र चांगला !

६८४. चांडाळ कोण ?

ज्याला आपल्या मदतीवाचून लोकांचे काहीच चालणार नाही असे वाटत असून अधर्माने वागतो तो!

६८५. कैदी कोणास म्हणावे ?

ज्याच्या गरजा वाढल्या आहेत त्यास! ज्याच्या गरजा वाढल्या नाहीत असा मनुष्य कैदेतही सुखी राहतो.

६८६. दुराराध्य कोणास म्हणावे ?

जो संपत्काली इच्छून आपत्कालीसुद्धा स्वकीयापासून मान इच्छितो त्यास !

६८७. कातर कोण ?

जो मनुष्य आपण होऊन दुसऱ्याचे दोष काढतो व तेच दोष दुसऱ्याने दाखविले म्हणजे दुसऱ्याची निंदा करू नये, असे प्रतिपादन करतो, तो !

६८८. कोणाचे गुप्त समजून घेण्यात दोष सांगितला आहे व तो कां?

गुह्य समजून घेणारा समर्थ नसला, तर आपले गुह्य ह्यास ठाऊक आहे असे समजून, ज्याचे गुह्य आहे तो, समजून घेणाऱ्याचा नाश करण्याचा केव्हा तरी प्रयत्न करतो.

पारमार्थिक गुह्य तर प्रपत्तित्रयीने समजून घ्यावेच, त्याविषयी हा नियम नाही (प्रणिपात, परिप्रश्न आणि सेवा याला प्रपत्तित्रयी म्हटले आहे.)

६८९. आपण होऊन आपणावर संकट कोण आणून घेतो ?

१- लोकांना ठावठिकाण सांगून गावाला जाणारा श्रीमंत. २- खाटेवाचून बाहेर निजणारा आळशी. ३- वर छत बांधल्यावाचून जेवणारा. ४- काही न येऊन आपली प्रशंसा करणारा. ५- ज्ञातीची मदत घेऊन त्यांना प्रसंगी मदत न करणारा ! हे पांच आपणावर संकट ओढून आणून घेतात.

६९०. सभेत किंवा समोर कोणास बसू देऊ नये ?

जो उगीच नाकातली मेकडे काढतो, किंवा थुंकतो, किंवा दाताने नखे छिलतो; या तिघास समोर किंवा सभेत बसू देऊ नये.

६९१. कोणाच्या हातून काही होत नाही हे समजावे?

जो कारणावाचून रात्रौ जागतो व दिवसा नेहमी निजतो, त्याच्या हातून कोणतेही कार्य होणार नाही असे समजावे.

६९२. कोणाचा व्यवहार कशावरून निश्चित करावा?

सहवासावरून !

६९३. सर्वथा तिरस्करणीय कोण ?

ज्याला आत्मविश्वास नाही तो! सर्व जातीतींल गालीकुमारीका त्यालाच माळ घालतात.'आतापर्यंत ठीक झाले, पुढे काय होईल हे सांगता येत नाही' असे जो म्हणणारा आहे, तो कोणी व कितीही जवळचा असला तरी कशाहीसंबंधी, कदापिही त्यावर विश्वास टाकू नये; कारण त्याच्या हातून कोणतेही घोर कृत्य होण्यास अडचण येणार नाही. नदीच्या अधोगमनाप्रमाणे घोर कृत्ये त्याच्या हातून स्वाभाविकच होत असतात. मग त्याविषयी निश्चय असो की नसो !

मन व इंद्रिये सर्वदा बहिर्मुख असल्यामुळे कोणावर दया न करता ती प्राण्यांना खाली पाडण्याचा प्रयत्न करीत असतात.सुसंस्कृत झालेला बुद्धिमान् जीवच मात्र त्यांच्या विरुद्ध जाण्याला समर्थ आहे.पण ते आत्मविश्वासावाचून होत नाही. म्हणून -

'ज्याला आत्मविश्वास नाही तो जिताच आत्मघातकी होय.'

६९४. आत्मविश्वास किती ठेवावा ?

घमेंडीने गुरु व शास्त्रांचे उल्लंघन होईल असे मात्र त्या आत्मविश्वासाने होऊ नये; मग तो कितीही ठेवावा.

६९५. घाणेरडे कोणास म्हणावे ?

मलमूत्रविसर्जनाचे वेळी जो तोंडास काही बांधत नाही त्यास आणि मातीने स्वच्छता करीत नाही त्यास ! स्मृतींत असे म्हटले आहे की- माती व पाणी या सोप्या रीतीने शुद्धी करण्यात जो आळस करतो, त्याचे चित्त किती शुद्ध आहे, त्याची परीक्षा झालीच आहे! - आपत्काली कोणी कोणास कशाचाच आग्रह करीत नसतो.

६९६. सर्वांतच दोष आहेत, म्हणून दोषी पुरुषाप्रमाणे दोषालाही सवड देण्याला काय हरकत आहे?

सर्वदोषरहित किंवा सर्वदोषसहित असा कोणीही जगात सांपडत नाही.सर्व मध्यम कोटीत असतात. आहे त्याच्याखाली न जाऊ देणे हे आपले कर्तव्य आहे.म्हणून दोषाला सवड देऊ नये.हा येथे संक्षेप सांगितला आहे.

६९७. सर्वदोषरहित कोणी न मिळो, पण सर्वदोषसहित कोणी कां मिळत नाही?

सर्वदोषरहित असणे हे जसे असंगाचे लक्षण आहे, तसेच सर्वदोषसहित असणे हे सर्वाधाराचे लक्षण होऊ शकेल.पण दोहोंचेही विशेष्य होण्याकरता ईश्वर पात्र आहे; जीव नाही. शिवाय दोष सर्वकाल दोषच असतो असे नाही; याही दृष्टीने सर्वदोषसहित कोणी सांपडणे दुर्घट आहे.

६९८. आंधळ्या पांगळ्यांना कसे वागवावे ?

त्यांचा प्रेम करून परामर्श घ्यावा पण विश्वास टाकू नये. कारण त्यांना एक इंद्रिय कमी असल्यामुळे दुसऱ्याला साह्य मागण्याकरता ते लबाड्या करीत असतात. तथापि सूरदासादि महात्मे यात येत नाहीत.

६९९. कित्येक पुरुष एखाद्या गोष्टीची प्रतिज्ञा करा म्हटल्यास भीतात व कित्येक विकाराच्या झपाट्यात प्रतिज्ञा करून टाकतात; यातील कोणाचे करणे योग्य?

जो प्रतिज्ञा करावयाला भितो त्याला चारी पायाने मोकळे वागावेसे वाटते.प्रथम आम्ही करून पहावे

व नंतर साधले म्हणजे प्रतिज्ञा करू असे त्यांचे म्हणणे असते. पण मी साक्ष देत नाही असे म्हणणाऱ्याला हल्लीच्या कायद्यात जी शिक्षा आहे, तिचा दार्ष्टान्त प्रतिज्ञारंभभीरूला मिळतो.

आता जे विकाराच्या तडाख्यात प्रतिज्ञा करून टाकतात ती मोडली असता थोडा दोष आहे, पण दुसऱ्याचे नुकसान करणारी असेल तर पूर्ण करण्यात फार दोष आहे. गंभीर स्थितीत केलेली प्रतिज्ञा मात्र मोडली असतांना आर्यशास्त्रात महादोष सांगितले आहेत.

मूर्खांच्या वैकारिक रक्तिमादिकांवरून प्रतिज्ञा करणारांची स्थिती कशी काय आहे, हे दुसऱ्यालाही दिसून येते.

७००. एखाद्या गोष्टीत प्रारब्धाने यश आले नाही व त्याने मनुष्याची अपकीर्ति झाली, तर त्याने कसे करावे ?

दुसरा एखादा गुण अंगात धरून त्या गुणाने यश मिळवावे. जोडे शिवता येणे सुद्धा प्रसंगी मोठे उपयोगाचे असते.

धनुर्धरश्रेष्ठ पार्थही विराटाच्या येथे स्त्रीरूप धरून महत्वास चढला. अप्सरेने दिलेला नपुंसक होण्याचा शाप त्याला त्या वेळी उपयोगी पडला. यावरून दैवाने आणलेल्या बिकट परिस्थितीचाही बुद्धिमान् उत्तम उपयोग करून घेतात. याविषयी मी स्वतः रचून तुला एक कल्पित कथा सांगतो.

बेडकाची कथा

एका सापाच्या तोंडी एक बेडूक सापडले होते. त्याला तो आपल्या कुटुंबाजवळ घेऊन जाऊन त्याची वाटणी कशी करावी या चिंतेत पडला.

तेव्हा ते बेडूक त्याला हळूच म्हणाले, 'परोपकाराकडे जीवित लावणे हा सर्वासच मोठा धर्म सांगितला आहे. त्यात बलवंताच्या स्वाधीन तर प्रथम होणे बरे. गरुडाला एक एक सर्प द्यावयाचा, असा संधी तुम्ही पूर्वी त्याच्याशी केला होता, असे माझ्या ऐकिवात आहे. त्यात आमच्यापेक्षा तुमची जाती बलवान असून आम्हाला खाण्याकरताच देवाने तुमच्या जातीला निर्माण केले आहे. म्हणून मी सांगतो की, आम्ही आपले शरीर तुम्हांला अर्पण करून धर्म करून घेणे बरे. तुलाही फार भूक लागली आहे, आणि तुझे कुटुंबही फार भुकेलेले आहे. तेव्हा मित्रा, माझ्याबरोबर चलशील तर मी पुष्कळ बेडूक तुला मिळवून देईन.'

हे बेडकाचे भाषण त्या सर्पाला खरे वाटले आणि बरे म्हणून तो त्याला समुद्राच्या कांठावर घेऊन गेला. तेव्हा 'या समुद्राच्या लाटामुळे माझी हांक कोणाला ऐकू जाणार नाही, म्हणून थोडा वेळ तूं मला मोकळा सोड म्हणजे मी पुष्कळ बेडकांना घेऊन येतो,' असे ते बेडूक म्हणाले.

तेव्हा त्या मूर्ख सर्पाने त्याला सोडून दिले. इतक्यात बेडकाने समुद्रात उडी घेऊन त्याला म्हटले की,

'जोपर्यंत एखाद्या मूर्खाला कुटुंबाची चिंता असते, तोपर्यंतच बुद्धिमानाने युक्तीने आपली सुटका करून घ्यावी. आता मी आपला जीव वाचविला आहे. परंतु तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ती ही की, तूं जमिनीवर राहणारा प्राणी असल्यामुळे तुला पाण्यात येता येणार नाही. म्हणून तूं आपल्या घरी परत जा'

हे त्याचे भाषण ऐकून सर्प लाजून आपल्या घरी गेला.

शत्रु - मित्र - शरणागत

७०१. मनुष्यातील वैर व मित्रता स्वाभाविक आहेत काय?

नाही, आपेक्षिक आहेत. व्याघ्र-मनुष्याप्रमाणे स्वाभाविक नाहीत.

७०२. कोणाला शरण जाण्याचा प्रसंग आला असतो वाईट वाटून घेऊ नये?

अती मूर्खाला! किंवा अती विद्वानाला!

७०३. शत्रूला शरण जाणे केव्हा चांगले?

आपले लोक आळशी असतील तेव्हा!

७०४. शरणागताला अभय कां द्यावे?

आपल्यालाही प्रसंगी शरणागत व्हावे लागेल म्हणून ! धन व अभिमान फारच थोडक्या दिवसांचे असून दरिद्र व दुःख जगात नित्य आहे.

७०५. ज्याच्या अपराधांची क्षमा करतो त्यावर विश्वास ठेवावा की नाही?

क्षमेचा विश्वासाशी काही संबंध नाही. क्षमा म्हणजे ''अपराधी मनुष्याचे आपण काही वाकडे करू नये, अशा अभिप्रायाची वृत्ती ठेवणे'' पण स्वकार्य बिघडविणे असा तिचा अर्थ नाही.

किंबहुना जितके क्षमा करण्याचे प्रसंग अधिक तितका अविश्वास अधिक, असा चित्तस्वभावच आहे. दंड देणे म्हणजे अपराधी पुरुषाला पीडा देणे व क्षमा करणे म्हणजे ती न देणे ! तेवढ्यावरून त्याच्या अपराधित्वाची निवृत्ति होत नाही तथापि क्षमाशीलाचे सुकृत वाढते.

अपराधित्वनिवृत्तिवाचून विश्वास ठेवणे योग्य नाही, पण निरपराधी क्षमाकाराविषयीच हा नियम लागू आहे. किंवा पारमार्थिक पुरुषाविषयीही लागू आहे. सापराध्याला क्षमा करण्याचा प्रसंग आल्यास क्षमा देणारा व क्षमा मागणारा हे दोघेही अपराधी असल्यामुळे कानकोंडे असतात, म्हणूनच ते परस्परांचे अपराध विसरून जाऊन चोरांच्या आपसातील मैत्रीप्रमाणे त्यांची विश्वासाविश्वासी होते. (केशाकेशीप्रमाणे हा शब्द झाला आहे.)

७०६. प्रथम विरोध असून नंतर शरण आल्यास त्यावर विश्वास ठेवावा की नाही?

शरणागत म्हणून त्याला क्षमा करावी, पण त्याने कितीही साह्य करतो म्हटल्यास त्याच्या ताब्यात जाऊ नये. गोड बोलूनच सर्व सर्वांना फसवितात. कडू बोलून कोणी कोणाला फसवूं शकत नाही.

एकांतात कडू बोलतो व सभेत गोड बोलतो तो श्रेष्ठ होय.

शरणागताला क्षमा केली नाही तर दुसरे लोकही फार भितात; व त्यामुळे एकटे राहण्याची पाळी येते.

शिवाय नुसता अधर्म पदरी पडतो. म्हणून व्यावहारिकाने आपले रक्षण करून शरणागताला अभय द्यावे.

७०७. पेचात सापडलेला दुष्ट शरण आल्यास कसे करावे?

पुनः लोकांना त्रास देणार नाही असे त्याच्याकडून कबूल करून घेऊन व त्याचे एखादे मर्म हातात ठेवून त्याला सोडून द्यावे.

दुसरे पुष्कळ लोक त्याच्याविरुद्ध शरणागत असतील व तोही शरणागत असेल, तर बजावून त्याची फजिती करूनच, त्याचा वध न करता सोडावे, असे नीतिवेत्त्यांचे मत आहे.

७०८. एखादा कपटी शरणागत आल्यास त्याविषयी कसे करावे?

अरे, शरणागताचे रक्षण करावे, एवढाच धर्म आहे. शरणागताला आपले गुह्य सांगावे. हा काही धर्म नाही. शरणागताविषयी संशय असेल तर त्याला अभय देऊन आपल्या रक्षणाचीही व्यवस्था करावी.

एखाद्या दीनाला आश्रय दिला म्हणून तो जर गुह्य सांगण्याविषयी आग्रह करील तर 'भलत्याच

गोष्टीत त्याचे लाड पुरविणे मोह समजल्या जातो. प्रेम समजल्या जात नाही.'

७०९. स्वभावबली कसा जिंकावा ?

प्रज्ञा व संघशक्तीच्या योगाने! याविषयी तुला एक रचून कल्पित गोष्ट सांगतो.

बहिरी ससाण्याची गोष्ट

एका अरण्यात मोठा पक्ष्यांचा समुदाय असून त्याच अरण्यात एक सहकुटुंब बहिरी ससाणा रहात होता. बहिरी ससाणा जेव्हा आपल्या मुलांना शिक्षण देतो. तेव्हा प्रथम त्यांना मेलेले पक्षी धरावयास लावतो. पुढे अर्धमेलेले पक्षी धरावयास लावतो व शेवटी जीवंत पक्षी आणून ते त्यांच्यापुढे टाकून त्यांच्याकडून उडी मारवून ते धरावयास लावतो. ही गोष्ट त्या सर्व पक्ष्यांना ठाऊक होती. म्हणून त्यांनी आपसात सभा भरवून असा विचार आरंभिला की, 'हा बहिरी ससाणा आपल्याला फार त्रास देतो आणि आता तर त्याला पिलेही झाली आहेत; तरी ती मोठी झाल्यावर आपणास अतिशयच त्रास होईल. आजपर्यंत आपल्या संघशक्तीमुळेच त्या एकट्याचे काही चालत नव्हते.'

तेव्हा एक पक्षी म्हणाला की, 'त्याला रोज एक एक पक्षी खाण्याला देण्याचे कबूल करून संधी करावा.'

तेव्हा सर्वपक्षी म्हणाले, 'हे शक्य नाही, कारण त्याची पिले मोठी झाल्यावर एका एका पक्ष्याच्याने त्याचे भागणार नाही व तो पिलांचा प्रेम सोडून आपला संधी पाळील असेही होणे शक्य नाही, कारण मनुष्य जातीत परस्पर वैर जसे कृत्रिम असते व ते जसे दानादिकाने शांत होते, तसे यांचे नसून यांचे आपले स्वाभाविक वैर आहे'

तेव्हा एक वृद्ध पक्षी म्हणाला, 'असा विचार करीत बसूं नका. मी एक सल्ला सांगतो ती ऐका. तुम्हाला अगदी मेल्याप्रमाणे होता येते ना?'

पक्षी म्हणाले,'नाही. आम्ही कितीही मेल्याचे सोंग घेतले तरी त्या ससाण्याला आमचे श्वासोच्छ्वास कळल्यावाचून राहणार नाहीत.'

त्यावर वृद्ध पक्षी म्हणला, तर मग मी तुम्हाला 'ही दुसरी सल्ला सांगतो. नंतर त्या पक्ष्याने सांगितलेली सल्ला ऐकून सर्व पक्षी अर्धमेलेले होऊन पडले; तेव्हा एक पक्षी त्यांना म्हणाला की, 'जर तो तुमचे पंख उपडूं लागेल तर एकदम तुम्ही सावध होऊन त्याला ठार मारा व एका एका पक्षाला घेऊन जाईल तर तुम्ही काही दूर पर्यंत त्याला घेऊन जाऊ द्या.'

तेव्हा तो वृद्ध पक्षी म्हणाला की, 'तो तुमचे पंख कधीच उपडणार नाही; कारण त्याला आपल्या पिलांना पक्ष असलेल्या पक्षांना मारण्याची कला शिकवावयाची आहे. म्हणून तुम्ही स्वस्थ पडून रहा व नेईल त्याला नेऊ द्या आणि मी सांगितल्याप्रमाणे करा.'

या वृद्धाचे भाषण सर्वांना पसंत पडून सर्व पक्षी स्वस्थ पडून राहिले. पुढे तो ससाणा येऊन एका एका पिलाकरता एक एक अर्धमेल्याचे सोंग घेतलेला पक्षी खेपा करून घेऊन गेला. याप्रमाणे कांही पक्षी त्याच्या घरट्यात जमल्यावर, दुसरे पक्षी आणण्याकरता ससाणा गेला असता पक्ष्यांनी सावध होऊन त्याच्या पिलांना खावून टाकले व घरट्याला आग लावून ते तेथून निघून गेले. - यावरून स्वाभाविक विरोध प्रज्ञेनेच शमत असतो.

७१०. स्वाभाविक व प्रासंगिक मित्र व शत्रू कसे ओळखावे?

हे तुला मागे सांगितलेच आहे.परंतु काही रहस्य सांगतो. पश्वादिकांमध्ये जसे भक्ष्यभक्षकत्वन्यायाने स्वाभाविक वैर आहे, तसे मनुष्यात स्वाभाविक वैर बहुधा नाही, ही मनुष्य जातीला परमेश्वराची देणगीच आहे.

७११. शत्रू होण्याचे मर्म कशात आहे व संबंधी असूनही लवकर कोण शत्रू होऊ शकतो? हे मला ऐकण्याची इच्छा आहे.

१- वडिलांच्या शत्रुत्वाचे मर्म आज्ञाभंगात आहे.

२- मित्रांच्या शत्रुत्वाचे मर्म त्यांचे वाकडे करण्यात आहे.

३- पुत्राच्या शत्रुत्वाचे मर्म त्याला योग्य शिक्षण न देण्यात आहे व

४- स्त्रीच्या शत्रुत्वाचे मर्म तिचा अतिशय लाड करण्यात आहे; असे समज.

१- गुरुजन जवकर शत्रु होत नाहीत, कारण त्यांना आपणाजवळून द्यावयाचे पुष्कळ असते व लहानाजवळून घ्यावयाचे थोडे असते.

२- पुत्र पैशाला मालक झाल्यावर त्याच्या मनात आल्यास तो लवकर शत्रू होऊ शकतो.

३- मित्राच्या स्त्रीशी मागे भाषण केले असता किंवा त्याच्याशी देवघेव करून व्याज लाविले असता तो पुत्रापेक्षा लवकर शत्रू होऊ शकतो.

४- पण **स्त्री** तर ज्या ज्या वेळेस पतीकडून इच्छा पूर्ण होणार नाही, त्या त्या वेळेस शत्रू होऊ शकते.

७१२. अतिप्रिय मित्रासह न करण्यासारख्या काही गोष्टी आहेत काय?

होय. **१-** एकान्ती त्याच्या स्त्रीशी भाषण करणे.**२-** आपत्काली त्याला मदत न करणे; या दोन गोष्टी कितीही प्रिय मित्र असला तरी त्याच्या बरोबर करू नयेत.

७१३. शत्रूला निश्चयाने पराजित करणारे बल कोणाकोणाजवळ कोठेकोठे असते?

१- गुरूच्या उपेक्षेत. २- साधूंच्या सहनशीलतेत. ३- तपोनिष्ठांच्या वाणीत. ४- राजांच्या न्यायात. ४- मंत्र्यांच्या बुद्धीत. ५- विद्वानांच्या काव्यात. ६- स्त्रियांच्या मोहात व ७- मुलांच्या रडण्यात शत्रूला खात्रीने पराजित करण्याचे सामर्थ्य असते. ही शस्त्रे फेकली असता कधीही परत जात नाहीत.

७१४. निंदकाचे तोंड कशाने बंद होते ?

त्याच्याकडे लक्ष न दिल्याने व मागे उलटून न बोलल्याने !

७१५. एखादे महत्कार्य व शत्रूचा नाश ही दोन कार्ये समोर आली असताना पहिले कोणते करावे?

पहिले मोठे कार्य करावे म्हणजे ते कार्य जितक्यांना हवे असेल ते सर्व आपले मित्र होतात व त्यामुळे शत्रू आपोआपच खाली पडतो.झालेले मित्र मोठ्या कार्यात शत्रूच्या हातून विघ्नही होऊ देत नाहीत म्हणून -

शत्रुनाशाच्या मागे न लागता महत्कार्याच्याच मागे लागावे कारण शत्रू जन्मोजन्मी उत्पन्न होतच असतात; पण महत्कार्य करण्याची संधी मनुष्यजन्मातच येते.

प्रेम

७१६. कोणाचा प्रेम कोण्या चिन्हांवरून ओळखावा ?

१- वडिलांचा प्रेम आपल्या कल्याणाच्या गोष्टी सांगण्यावरून ओळखावा.

२- मित्राचा प्रेम, त्याजजवळून आपण काही न घेतल्यास त्या किती वाईट वाटते, यावरून ओळखावा!

७१७. स्नेहात दोष कोटपर्यंत व किती पहावे ?

ही बाब थोडीशी बिकट आहे.कारण १- अत्यंत स्नेह असेल तर दोष धाब्यावर बसविले जातात. २- क्षुल्लक स्नेह असेल तर तो थोड्या दोषांनीही उडून जातो.म्हणून दोघांनाही हा प्रश्न उपस्थित होत नाही. ३- मध्यम स्नेह जेथे असतो तेथे दोष असल्यास असा विचार करावा -

निर्दोष अशी वस्तू जगात नाही. स्नेह हा सर्व गुणांमध्ये उत्तम गुण आहे.कारण त्याच्यायोगाने प्रसंगी क्षुल्लक माणसे देखील धीर होतात म्हणून महत्कार्यात अडथळा करणारा जर तो दोष नसेल तर तिकडे डोळेझांक करावी.

७१८. अशा प्रसंगी 'तुमच्या दोषाने आमच्या कार्यात अडथळा येतो' अशी परस्पराची तक्रार असल्यास कसे करावे?

दोषाविषयी डोळेझांक करणे हे मी स्नेहाविषयी सांगितले, या तक्रारीत स्नेह नसतो म्हणून संबंध तोडून टाकावा.

७१९. प्रेम हा शिकावा लागतो की नाही?

व्यवहारिक प्रेम शिकावा लागत नाही, तो उलटा शास्त्राने योग्य करावा लागतो.

७२०. प्रेमामध्ये अंध होणे चांगले की नाही?

व्यावहारिकांस व साधकास चांगले नाही.कारण प्रेमांधतेमुळे त्यांच्या कर्तव्यास अडथळा होतो, पण सिद्धांस काही कर्तव्य नसल्यामुळे प्रेमांध होणेही त्यांना शोभते व न होणेही शोभते; तथापि जगद्‌गुरु होऊ इच्छिणाऱ्या सिद्धाने प्रेमांध पाहिजे असल्यास व्हावे, पण विषयांध होऊं नये. ते गुरुपदास लांछन आहे.

७२१. तुझ्यावर प्रेम आहे म्हणून सांगावे की नाही ?

प्रेम सांगितल्याने काही कमी होत नाही.पण वारंवार शहाण्यापुढे प्रेम बोलून दाखविणे पांचटपणा आहे.

तथापि जो दीन आहे त्याला आधार देण्याकरता प्रेम सांगावा, असे ऋषींचे मत आहे; आणि आपल्या भोगाकरता प्रेमावर केवढेही लांबलचक व्याख्यान दिले तरी ते खोटे आहे.

७२२. सुंदर कोण ?

ज्याला जो आवडतो तो !

मूर्ख लक्षण

७२३. मूर्ख कोण ?

आपले दोष उघडकीस आल्यावर मग लोकात सांगत फिरतो तो!

७२४. चतुर कोण ?

घडलेले दोष, उघडकीस येण्यापूर्वीच, कबूल करून वरिष्ठांची कृपा संपादन करतो तो!

७२५. निष्काळजी कोणास म्हणावे ?

१- जो रात्री फिरताना दिवा घेत नाही व पायात जोडा घालीत नाही. २- जो खाताना अजीर्णाकडे पाहत नाही व ३- जो मनुष्यजन्मास येऊन सुखाने निजतो, हे तिघे निष्काळजी मूर्ख समजावे.

७२६. व्याकरणात पढतमूर्ख कोण ?

अर्थसौष्टवाकडे लक्ष न देता महात्म्यांच्या भाषणात शब्ददोष काढतो तो! कारण भागवतात 'भगवद्गुणवर्णन अशुद्धपदाने असले तरी साधु ग्रहण करतात' असे म्हटले आहे.

७२७. न्यायात पढतमूर्ख कोण ?

शब्दसाध्य वस्तूवर किंवा श्रुतीवर तर्क करतो तो! किंवा बुद्धीने धर्म मिळवून घेण्याची खटपट करतो तो!

७२८. सांख्यापैकी पढतमूर्ख कोण ?

सूत्रातील सांख्य तेवढेच प्रमाण मानतो व पुराणातील कपिलांचे म्हणणे अप्रमाण मानतो तो!

७२९. वेदान्तशास्त्रात पढतमूर्ख कोण ?

साधनचतुष्टय नसले तरी वेदान्त वाचून मला ब्रह्म समजले असे म्हणतो तो! आणि गुरुवाक्यरहस्य न समजता जैनांप्रमाणे नुसत्या विवेकावर भरंवसा ठेवतो तो! हे दोघे प्रस्थानत्रय पढूनही मूर्ख राहतात.

७३०. वेदात पढतमूर्ख कोण ?

दशग्रंथी असूनही गायत्रीचे पुरश्चरण करीत नाही तो!

७३१. स्वयंपाकशास्त्रात पढतमूर्ख कोण ?

पुस्तकाप्रमाणे तिखटमिठादी रस घालतो तो! कारण धर्मशास्त्र जसे मनुष्याला परतंत्र करते तसे व्यवहारशास्त्र अतिपरतंत्र करीत नाही.

७३२. स्वयंपाकातील मार्मिक ज्ञान येण्याचा सुलभ उपाय कोणता?

देवाकरता मुद्दाम नवीन पदार्थ रोजचा एक करून केवळ खाऊन पाहण्याकरताच त्याचा प्रसाद वाटणे व जो चुकेल त्याची दुरुस्ती करीत जाणे.

७३३. सर्व विद्या पढून मूर्ख राहिलेला मनुष्य न बोलता कशावरून ओळखावा?

वडील समोर आले असताना आपल्यापेक्षा त्यांना ज्ञान कमी आहे असे समजून तो त्यांना नमस्कार करीत नाही यावरून!

कारण, सर्वज्ञ आपल्याला समजणे हे सर्व मूर्खातील मूर्खचिन्ह आहे.

ब्रह्मज्ञानाची वस्तू एकच असल्यामुळे त्यात सर्वज्ञ कोणीही होऊ शकतो; परंतु इतर ज्ञानात ईश्वरावाचून कोणीच सर्वज्ञ होऊ शकत नाही. म्हणून कितीही विद्वान असला तरी वडिलांचा सल्ला घेणे शीलदायक आहे.

वडिलांचा सल्ला फारच विपरीत पडल्यास शास्त्रसंमती वडील आहेच.

७३४. एकदम पढतमूर्ख कसा ओळखता येतो?

लहान लेकरास आईने शहाणे म्हटले असता आनंद वाटतो आणि मूर्ख म्हटले असता राग येतो;

त्याप्रमाणे विद्वान असून देखील ज्याच्या मनावर आपल्या स्तुतीचा परिणाम होतो तो मूर्ख आहे असे समजावे.

यद्यपि विद्येला उत्तेजन हे मूळ आहे, तथापि ते मूर्खांनी विद्या शिकावी एतदर्थच आहे, विद्वानाला काही त्याचा उपयोग नाही.

आरोग्य

७३५. आयुष्य हे शक्तीवर अवलंबून असता, आयुष्य हे धर्माचरणावर अवलंबून आहे असे आर्यधर्मात कां सांगितले आहे?

याविषयी शास्त्रच प्रमाण आहे. परंतु शक्तीवर आयुष्य अवलंबून आहे ही गोष्ट मात्र खरी नाही.कारण हत्तीचे आयुष्य शंभर वर्षे असून हत्तीपेक्षा शक्तिमान् असणाऱ्या सिंहाचे आयुष्य सत्तर वर्षेच असते.याप्रमाणे मनुष्यापेक्षा भयंकर शक्तिमान् असणाऱ्या प्राण्यांचे आयुष्य फारच कमी असते, असे ज्योतिषग्रंथांतही लिहिले आहे.तेव्हा आयुष्याचा नियम सृष्टिस्वभावावर अवलंबून नसून अदृश्य अशा कोणत्या तरी गोष्टीवर अवलंबून धरला पाहिजे.त्यालाच आर्यधर्मात 'कर्म' म्हटले आहे.

७३६. वैद्यकीत पढतमूर्ख कोण ?

पूर्वीची आपली सहनशक्ति नाहीशी करून, आपल्याविषयी रोगांची फाजील शंका घेऊन, जो आपल्याला औषधीची संवय लावून घेतो तो!

७३७. पण व्याधीला भ्याले नाही तर प्रसंगी व्याधी दूर कशा होतील?

जीभ आवरण्याने व योग्य वागल्याने! औषधीची संवय लावून घेणे म्हणजे योग्य वागणे नव्हे; तर धर्मानुसार दिनचर्या व ऋतुचर्या बरोबर पाळणे हेच योग्य वागणे होय.

७३८.रोग असो किंवा नसो, कोणती औषधे सेवण्यायोग्य आहेत?

१.त्रिफळा, २.सुंठ, ३.सैंधव, ४.निंब, ५.लिंबू, ६.तुळसी, ७.सोने, ८.आले; या औषधातून एक किंवा अधिक नित्य घेतले असताही नफाच होतो, तोटा होत नाही.

७३९. विषादि रोगांची भीती कशी बाळगावी ?

वैद्यशास्त्रातून त्यांच्या प्रतिकाराचे रोगानुत्पादनीय उपचार करीत जावे पण फाजील चिंता करीत बसू नये.

७४०. तर मग रोगाला ताब्यात कसे आणावे ?

रोग होण्यापूर्वी स्वभावरक्षक चिकित्सा करण्याने व रोगनाशक चिकित्सा करण्याने!

७४१. अतिचिकित्सक कोण ?

बाळंतपणासारख्या स्वाभाविक विकारांनाही रोग मानून उगीच औषधे देत बसतो तो!

७४२.कोणाचा रोग साध्य असला तरी वैद्याच्या हातात येत नाही?

१- जो औषधी घेत नाही; २- जो औषधी घेतो पण पथ्य करीत नाही; व ३- जो औषधी घेतो, पथ्य करितो, पण मला मोठा रोग झाला आहे असे चिंतन करून नित्य भितो.

या तिघांचा रोग साध्य असला तरी राजवैद्याकडूनही दूर होत नाही.

७४३. कोणाचा रोग औषध न घेतले तरी वाढत नाही?

जो पथ्येने वागतो त्याचा!

७४४. अनेक प्रकारचे रोग सृष्टिस्वभावानेच दूर करण्याचे पश्चिमेकडे जे उपाय निघाले आहेत, ते योग्य आहेत की नाहीत ?

पश्चिमेकडे ते सर्व उपाय पाहिजेच आहेत आणि योग्यही आहेत; पण हिंदुस्थानने त्या उपायांचे गोडवेच गाईले पाहिजे असे नाही.

हिंदुस्थानात खाण्याला मिळत असल्यामुळे त्यांचे सर्व खाणे स्वाभाविकच आहे. पाश्चात्य जीवित सर्व विषमय झाले आहे.

नाकात धुराचे विष, पोटात दारूचे विष, खाण्यामध्ये 'चीझ' सारखे सडलेले पदार्थ, अस्वाभाविक जनावरांचे मांस, अजीर्णावर खाणे, स्नानादिकांनी स्वच्छ नसणे, सर्वदा क्रोधाच्या व असंतोषाच्या तावडीत सांपडणे, सर्वांना कारस्थानांत पडावे असे वाटत असल्यामुळे ऐहिक समाधानाला मुकणे, याप्रमाणे त्यांचे शारीरिक व मानसिक जीवित सर्वथाच विषमय झाले आहे म्हणून त्यांना स्वाभाविक चिकित्सा करणे हिताचेच आहे.

हिंदुस्थानातले जीवित एवढे विषमय झालेले नाही, म्हणूनच वैद्यकीतील औषधे सर्व खाण्यापिण्याच्या पदार्थांचीच बनलेली आहेत; कोण्या प्राण्याचे रक्तातील सत्त्व घेऊन किंवा कोण्या मांसातील सत्त्व काढून अशी बनलेली नाहीत.

परंतु चहा, कॉफी, वगैरे घेऊन ज्या हिंदूंनी आपले जीवित मुद्दाम विषमय करून घेतले आहे, त्यांना मात्र तिकडील स्वाभाविक चिकित्सा आपल्याकडील चिकित्सा चांगल्या रीतीने समजेपर्यंत उत्तम आहे.

शिवाय तिकडच्या जितक्या स्वाभाविक पद्धती आहेत, तेवढ्या सर्व आपल्याकडे हठप्रदीपिकादि ग्रंथांतून भाषांतराच्या मूळाप्रमाणे सापडतात.

तिकडच्या स्वाभाविक पद्धतीचा अभिमान धरून त्यांनी आपल्या औषधीवर टीका केली म्हणून आपणही आपल्याकडच्या औषधीवर टीका करणे मूर्खपणाचे आहे; कारण तिकडच्या औषधीच अशा काही विलक्षण आहेत की, पाश्चात्य दुराग्रह बुद्धीत शिरले नाहीत तर कोणत्याही बुद्धिमंताला ते पाहून हसूंच येईल!

पाश्चात्य वैद्यशास्त्रात बहुतक रोग स्पर्शजन्य मानले आहेत.स्पर्शजन्य रोग म्हणून एखाद्यास झाला म्हणजे त्याचे आईबाप, बंधु, बायको, मुले सर्व त्याचा जन्मभराचा प्रेम सारून दूर होतात; आणि तोच रोग आपणास होऊ नये म्हणून त्याच रोगाचे विष आपल्या अंगात टोचून घेण्याकरता दवाखान्यात जातात! आहे की नाही बियाबाण योजना! एकाने कुजलेल्या पदार्थाची घाण नाकात जाऊ देणे हेच क्षयावर औषध काढले आहे! अशा शोधांपुढे बिचाऱ्या माणसांनी स्वाभाविक चिकित्सेकडे न जावे तर काय करावे बरे? **'भीक नको पण कुत्रे आटोप'** असे युद्ध पाश्चात्य वैद्यात व सामान्य जनात चालले आहे. म्हणून स्वाभाविक चिकित्सावादी तिकडच्या वैद्यांवर सरसकट टीका करतात.

आपणास तसे करण्याची मात्र काही जरूर नाही; कारण ज्वरिताचे रक्त किंवा महामारीच्या रोगाचा मळ अंगात घालावा म्हणून कोठे आपल्या वैद्यशास्त्रात सांगितले नाही.पाश्चात्य वैद्यलोकांनी जसा पाणी न देऊन वॉशिंग्टन मारला, तसे आमच्याकडे कोण्याही वैद्याने केले नाही.तापात तहान_लागली म्हणजे पाणी द्यावे असे आमच्या वैद्यशास्त्रात स्पष्ट सांगितले आहे.

शिवाय रोगांच्या साथींप्रमाणे पश्चिमेकडे औषधींच्याही साथी येत असतात आणि त्या साथीला पुष्कळ माणसे बळी पडतात.एकाने उपवासाची पद्धत काढली म्हणजे पांच पन्नास हजार मनुष्ये तेच करू लागतात!

आमच्या वैद्यशास्त्रात जरूर पडेल तेव्हा लंघन व बृंहण दोन्ही सांगितले आहेत.क्षयावर आमच्याकडे कोठे लंघन सांगितले नाही. परंतु तिकडे लंघन चिकित्सावादी मंडळी क्षयावरही लंघन सांगतात व अजीर्णावरही लंघन सांगतात; व बृंहणचिकित्सावादी मंडळी क्षयावरही अतिशय जेवायला सांगतात.

एकाने रोग्यास त्याची इच्छा होईल तसे तसे करू देणे हीच चिकित्सा काढली आहे; पण अशा वैद्यांच्या हातून खरूज कशी बरी होईल हीच मला काळजी वाटते. कारण खरजेला खाजविण्याचीच इच्छा पुष्कळांना होते आणि खाजविले की खरूज वाढते.

रोग्याच्या इच्छेनुरूप चिकित्सा करणे हे आपल्याकडेही आहे, पण रोग्याचे मन तरी निरोगी स्थितीत पाहिजे. ज्या रोगात शारीरिक परिणाम मनावर प्रथमच होत नाही, त्या रोगात रोग्याच्या

इच्छेनुसार चिकित्सा आमच्याकडेही आहे; परंतु क्षयात स्त्रीसंगाची इच्छा, संग्रहणीत सर्व रस खाण्याची इच्छा इत्यादी व्याधिमहिमेने होतात. असे रोग्याला वागूं दिले तर रोग्याची उद्याच्या ऐवजी आजच गावाबाहेरची व्यवस्था करावी लागेल.एकाने तक्रचिकित्सा काढली आहे.पाच पन्नास हजार लोक त्याच्याच मागे लागले आहे; आणि हे सर्व म्हणतात की, आम्ही शंभराच्या वर वाचूं!

शिवाय एका रोगावर गुण आला म्हणजे सर्वच रोगावर ते औषध लागू करण्याची प्रवृत्ती तिकडे फारच आहे.याचे कारण आपल्या चैनीत खर्च होणारा पैसा औषधीकरता देखील बाहेर जाऊ नये हे आहे.

मला तिकडची शस्त्रक्रिया प्रत्यक्ष असल्यामुळे मान्य आहे; पण औषधिक्रिया 'अत्यंत' मान्य नाही. शिवाय तिकडे जसे होमिओपॅथी काढणाऱ्यांना आलोपॅथिक वैद्यांनी जाळून टाकले तसे आमच्याकडे झाले नाही.या भयंकर रीतीला त्रासून हिंदुग्रंथाच्या आधारे लोकांनी स्वाभाविक चिकित्सेचा आश्रय केला आहे.तो तिकडच्या लोकांकरता व आपल्याकडील पाश्चात्यविद्या-दुर्विदग्धांकरता समंजसपणाचाच आहे.

७४५. तिकडच्या पद्धतीत ईश्वरावर विश्वास ठेवून रोग बरे करण्याची एक रीती आहे, ती तरी तुम्हास मान्य आहे की नाही?

मान्य नसायला काय झाले कारण ती हिंदूंचीच आहे.पण 'केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवा' इतकेच जे तिकडे सांगितले आहे त्यापेक्षा आमच्याकडील रीती किती तरी पटीने उत्तम आहे.

पतंजलींनी ईश्वरप्रणिधानाचा फायदा कसा सांगितला आहे तो पहा. **''ततः प्रत्यक् चेतनाभिगमोऽप्यन्तराय-अभावश्च''**

त्या ईश्वर प्रणिधानापासून आत्मज्ञान व विघ्नांचा नाश होतो.व्याधि, स्त्यान, संशय, अविरति इत्यादि विघ्ने पुढील सूत्रात सांगितली आहेत.तेव्हा ईश्वरावर विश्वास ठेवल्याने व्याधींचा नाश होतो हे अर्थातच सिद्ध झाले.

शिवाय ईश्वरावर विश्वास ठेवून रोग बरा झाला म्हणजे ''देवा, आमची भाकर आम्हाला असू दे.मग तूं आकाशात व आम्ही पृथ्वीवर.येशू तुझा मुलगा होता म्हणून आम्हीही तुझे मुलगे!'' असा बादरायणसंबंध ईश्वराशी तिकडे जोडल्या जातो, तसे आमचेकडे होत नाही.

विश्वास ठेवून अनुभव आला की मग आम्हाला ईश्वरावाचून दुसरे काही नकोसे वाटते. उत्तम जे हिंदू आहेत ते तर अशा क्षुल्लक बाबतीत विश्वासाचा अनुभव घेणे अती गौण समजतात.कारण त्यांना ''देह मी आहे'' असे वाटतच नसते.ईश्वरावर विश्वास ठेवून रोग दूर होतात हे आमचे तत्त्व सर्वगत आहे.

१- दगडाची मूर्ति करून विश्वास ठेवला तरी त्यातून ईश्वरी अंश तरी रोग दूर करतोच.

२- त्यापेक्षा गाई वगैरे चेतन पदार्थातील ईश्वरी अंश अधिक रोग दूर करतो.

३- सर्वात साधुसंग व श्रीगुरु यांच्यातील ईश्वरी अंश विघ्ने दूर करण्याला अति समर्थ आहे.

काही लोक ईश्वरावर विश्वास ठेवितात व मग ''रात्री विश्वास ठेविला पण अझून रोग गेलाच नाही'' अशी दुसऱ्याच दिवशी काळजी करू लागतात! परमेश्वर कोणाचा चाकर आहे की अशा माणसांच्या पाठीमागे अमृत घेऊन धावेल?

परमेश्वराच्या प्रेमात जितके जितके लीन व्हावे तितके तितके रोगादिक भासतच नाहीत.

७४६. तुम्हाला औषध घेण्याचा एवढ्याचकरता कंटाळा आहे काय?

अर्थात! ''सद्वृत्तीचे रोग सद्वृत्तीनेच दूर होतात. असद्वृत्तीच्याच रोगांला औषध पाहिजे.'' असे नसते तर धर्मशास्त्राचा व वैद्यशास्त्राचा जो कोठे कोठे विरोध आहे, तो आला नसता.

लसूण हा धर्मशास्त्रात अत्यंत निषिद्ध सांगितला असून, वैद्यशास्त्रात वाग्भटाने मोठे रसायन सांगितले आहे. कोणी म्हणतील की, वैद्यशास्त्रात औषधावाचून लसूण खाण्याचा निषेध आहे, तर हे म्हणणे बरोबर नाही; कारण 'लसूण रसायन नित्य भक्षण करावे, लसुणाच्या टोप्या व आंगरखे नित्य करून घालावे' असे सांगितले आहे.

ज्याच्या हाताला काही विशेष घाण लागली आहे, ती घालविण्याकरता अत्तर पाहिजे असते, पण ज्याच्या हाताला केवळ अन्नाचीच घाण लागली आहे, ती पाण्याने धुतल्याने जाते. त्याप्रमाणे असद्वृत्तीच्या मनुष्याच्या रोगालाच औषध घ्यावे लागते. सद्वृत्तीच्या मनुष्याला बहुधा संसर्गानेच रोग होतात. 'तुम्ही परोपकारबुद्धीने केलेला ग्राम्यनिवासच तुमच्या व्याधीला कारण आहे.' असे देवाने ऋषींला म्हटलेले चरकादिकात सांगितले आहे. आवळ्या-सारखी स्वाभाविक व अन्नातच येणारी रसायने कोणी काही नको म्हणत नाही.

तथापि सद्वृत्तीचा रोग सद्वृत्तीने व योगक्रियेनेच दूर होतो, रोग दूर न झाला तरी, सद्वृत्तीने व योगाने ज्याने आपली मळशुद्धी केली आहे, तो मेला तरी सुखाने मरतो व अजीर्णरोगी बहुधा दुःखानेच मरतो.

उपवाशी मरणाऱ्याला अग्निबलाने अर्चिरादि मार्ग व अजीर्णाने मरणाऱ्याला धुपटाने धूममार्ग मिळतो हे युक्तिसिद्ध आहे.

लंघन करणाऱ्याचा कफ कमी होत असतो. निदान, साधकयोग्याला तरी भूक लागेपर्यंत लंघन, हे फार उपयोगाचे आहे.

७४७. दुसऱ्याचा रोग घेता येतो अशी लोकात समज आहे, ती योग्य आहे काय?

रोग कोणास घेता येवो की न येवो परंतु 'दुसऱ्याचा रोग घेता येतो' हा समज शास्त्रीय आहे; कारण महाभारतातील आदिपर्वान्तर्गत पूर्वध्यायातील पर्वात **१**- ययातीने आपल्या पुत्रापासून तारुण्य घेऊन त्याला आपले म्हातारपण दिले' अशी कथा आहे. **२**- बाबरने हुमायूनचा रोग घेतला' अशी कथा इतिहासप्रसिद्ध आहे. **३**- एका साधूने एकाचा गलितकुष्ट घेतल्याची कथा 'स्नारितमाले'तही आहे. **४**- रोग्याच्या भोवताली तीन प्रदक्षिणा करून तो मी घेतला, असा मुसलमानी शास्त्रात **'तसद्दक'** नांवाचा विधी आहे. आर्यधर्मात तर तंत्रशास्त्र व योगशास्त्र त्याविषयी प्रख्यात आहेत. परोपकृत संयमाने ही गोष्ट लवकर साध्य आहे. याला विपरिणत संचित किंवा सजातीय प्रारब्ध अपेक्षित असले पाहिजे असे मला वाटते.

७४८. मरणाच्या वेळी कोणाला तळमळ वाटत नाही?

ब्रह्मज्ञानी, भगवद्भक्त, पतिव्रता स्त्री व इमानी सेवक हे चौघे मऊ बिछान्यावर झोप घेणाऱ्याप्रमाणे मरतात.

फलज्योतिष

७४९. ज्योतिष पढून मूर्ख कोण राहतो ?

शुभकार्य करताना भविष्याचा विचार करतो तो! यद्यपि भावी गोष्ट चुकणारी नसली तथापि भावी गोष्ट घडून येईपर्यत जो शुभ प्रयत्न हातून होतो, तो कामास येतो.

७५०. ज्योतिष कोणाला कळते ?

हे जगत् कालचक्रात पडले आहे, म्हणून वेळीच सावध होवून जो सत्कर्म करतो त्याला!

७५१. ग्रहांचा व आपला काय संबंध आहे?

याविषयी तुला संभवप्रमाणाने विवेचन सांगतो. संभवप्रमाण मानणारे पूर्वी लोक होते, हे न्यायग्रंथ वाचल्यास कळून येईल. चंद्राचे समुद्रावर आकर्षण आहे हे सर्वास माहीत आहे. त्याप्रमाणेच ते सर्व पातळ पदार्थावर आहे. समुद्राच्या भरतीच्या वेळी घाव लागल्यास अंगातून रक्त अधिक निघते, हे आता शास्त्रीय रीतीने सिद्ध झाले आहे. पण रक्त निघाले असता चांदण्यात जाऊ नये, ही रीत आमच्याकडील जुन्या वैद्यांत व जुन्या दायांना देखील ठाऊक आहे.

सिरजगांव बंडचा भगवंतराव देशमुख ह्याच्या रोगाला जळवा लावून चांदण्यात जाऊ नका असे भंग्याने सांगितले होते परंतु तो चांदण्यात गेला व एकदम अशक्ती होऊन मरण पावला असे पत्र नुकतेच मजकडे आले आहे. त्यावरून इतर ग्रहांचेही सूक्ष्म आकर्षण रक्तावर आहे, असे अनुमान करतां मनाशी संबंध आहे म्हणून ग्रहांचे आकर्षण रक्ताच्या द्वाराने मनावरही आहेच. प्रत्येक मनुष्य जन्मकाली दुर्बल असतो, त्यामुळे त्यावेळी ग्रहांच्या आकर्षणाने तो तसा बद्ध होईल तशी त्याची स्थिती मरणापर्यंत होणे शक्य आहे.

अनुमानाने इतकेच कळण्यासारखे आहे. यातील ''विशेषाचा शोध'' सूक्ष्म अनुभवानेच केला पाहिजे. एखाद्या गोष्टीच्या बलामुळे एखाद्या गोष्टीचे फळ न झाले तर तेवढ्यानेच ती गोष्ट खोटी आहे असे म्हणता येत नाही.

एखादी गोष्ट खोटी सिद्ध करण्याला तिचा अभावच सिद्ध केला पाहिजे. आडपडद्याने न दिसलेली गोष्ट खोटी मानल्यास पेटीत असलेला पैसाही 'नाहीच' म्हणावा लागेल. शंका करणारा व उत्तर देणारा दोघांनीही बलाबलाचा शोध सर्वत्रच केला पाहिजे.

७५२. कपाळात लिहिले जाते ही कल्पना मुसलमानी आहे काय?

नाही; ती आपल्याही शास्त्रांमध्ये आहे. हाताकडे एकसारखी दृष्टी लावली तर हाताची बोटे मोठी दिसू लागतात, इत्यादि प्रकाराने वासनेचा सामुद्रिक चिन्हात्मक परिणाम शरीरावर होत असला पाहिजे. बुद्ध धर्मातही ही कल्पना आहे.

७५३. डोक्याची टोकळी पाहून मरताना त्याच्या वासना कोणत्या राहिल्या होत्या व त्यावरून तो कोण्या योनीत गेला, हे सांगणारा एक पुरुष बुद्धाला भेटला होता. बुद्धाने त्याला आपल्या शिष्याच्या डोक्याची टोकळी दाखविली तेव्हा त्याला कोणतीच वासना त्याच्यात आढळली नाही. यावरून बौद्धाला वासनेचा क्षयरूप वैदिक मोक्ष मिळतो असे म्हणावयाचे की नाही?

म्हणू नये. बौद्ध-मोक्ष मिळतो असेच म्हणावे; कारण जरी मनाच्या सामुद्रिक खुणा शरीरावर पडतात असे मी म्हटले आहे, तरी झोपेसारख्या अवस्थेतील लीन मनाच्या सामुद्रिक खुणा शरीरावर पडत नाहीत; उद्‌बुद्ध मनाच्याच पडतात.

लीन मनाच्या सामुद्रिक खुणा शरीरावर पडतात असे मानले तर अनंत जन्मांच्या संस्कारांमुळे त्या इतक्या पडतील की शरीर पुरणारच नाही. म्हणून मरताना, नुसत्या झोपेत जाणारा किंवा मूर्च्छेत जाणाऱ्याच्याही शरीरावर खुणा न सांपडणे शक्य आहे. जी वासना तीव्र असते तिच्याच खुणा शरीरावर पडतात. सर्वच वासनांच्या पडत नाहीत. कारण सर्व वासनांच्या खुणा शरीरावर पडूं लागल्यास एका दिवसालाही शरीर पुरणार नाही. म्हणूनच -

सामुद्रिकाने नशिबाची ठोकळाई समजते, बारकाई समजत नाही.

७५४. हातावरील रेषांचा व कर्मफळांचा काय संबंध आहे?

अमुकांचा काय संबंध आहे? असा प्रश्न करणे मला विचित्र वाटते. ज्या गोष्टीचा संबंध आपल्याला कळतो असे वाटते, त्यांचा देखील संबंध बरोबर कळलेला नसतो. याचे अति सोपे उदाहरण म्हणजे जेवणापासून तृप्ती कां होते? याचा तिचा काय संबंध आहे? अमुकाचा कां संबंध आहे? म्हणजे अमुक पदार्थ असा कां असावा? असा प्रश्न करण्यासारखेच आहे. कोणत्याही स्थितीत पदार्थ असला तरी तसा प्रश्न करताच येईल.

सामुद्रिक चिन्हांचा व कर्मफलांचा संबंध न दिसला तरी कर्मफलाने ती चिन्हे झाली असली पाहिजेत यात संशय नाही. कारण शरीराच्या सर्व ठेवणी कर्मांपासूनच होतात, असे सर्व कर्मवाद्यांचे म्हणणे आहे. कर्म व्यापक आहे व सामुद्रिक आदि रेषा व्याप्य आहेत इतकाच यात बुद्धीने शोध लागण्याजोगा आहे.

'महात्म्यांचा अनुभवावरून विशेष शोध लावून घ्यावा. आणि 'प्रतिविशेष' ऐतिहासिक अनुभवाने 'सामान्य' करून त्याचे शास्त्र करून ठेवावे.'

एवढेच मनुष्याच्या हाती आहे. जेथे फळ बरोबर उतरत नाही तेथे प्रबल प्रतिबंधक आचरणादिकांचा विचार करावा.

७५५. सर्व शास्त्रे ऋषिप्रणीत असतां वैद्यक व ज्योतिष या प्रत्यक्ष शास्त्रात देखील अपवाद दिसतो मग धर्मावर विश्वास कसा ठेवावा?

'कोणतेही शास्त्र समस्थितीत साधकबाधकतेचा बोध करीत असते. विषमस्थिति झाली की त्याला योजकाची अपेक्षा लागते.'

वात, कफ व पित्त सम स्थितीत असतील तरच औषधांच्या गुणदोषांचा विचार शास्त्राप्रमाणे सांपडतो. परंतु ज्या मूर्खांनी आपली विषमस्थिती करून घेतली असेल अशाला वैद्याच्या बुद्धिशिवाय शास्त्र काही करू शकत नाही. नित्य आंबट खाणाऱ्याला गंधर्व असला तरी गायन कसे शिकवूं शकेल?

याप्रमाणेच ज्योतिषाचीही गोष्ट आहे. कोणत्या काळी कोणता शकुन बलवान असतो व कोणता दुर्बल होतो हे अतिशय अनुभवावाचून समजत नाही. उदाहरण सामुद्रिकांतले पहा -

एखादे ध्वजचिन्ह एखाद्याच्या हातावर आहे म्हणून तो धनवान् होईल असे म्हणावे, तर दुसरे एखादे चिन्ह मस्तकावर असे आहे की तो दरिद्री व्हावा! तेव्हा या दोन चिन्हातील प्रबल कोणते व दुर्बल कोणते हे समजण्याला परमेश्वरावाचून दुसऱ्याला अतिशय अनुभवाची जरूर आहे.

पुन्हा, पाप-पुण्ये समान असतील तेव्हाच ग्रहांची व शकुनांची फळे बरोबर उतरतात. ती विषम असतील तर उतरत नाहीत.

तेव्हा प्रत्येक मनुष्याच्या हालचालीवर नजर ठेवून भयंकर ऐतिहासिक अनुभव कोणी घेत नाही व म्हणूनच ह्या चुक्या होतात. तेवढ्याने शास्त्र व्यर्थ होत नाही.

भाषाविषयक

बोलण्यातील दोष

७५६. बोलण्यात कोणते दोष आहेत व कोणते गुण आहेत?

सुलभेने जनकाला सांगितलेले सर्व बोलण्याचे दोष आहेत. तसेच,

१- पद्यातील प्रयोग गद्यात व गद्यातील प्रयोग पद्यात करणेही दोष आहे.

२- नाकात बोलणे इत्यादि **नाददोष** आहेत.

३- फार जलद व फार हळू बोलणे, **क्रमदोष** समजले जातात.

४- विभक्त्यादिकांचा अतिक्रम, **पददोष** होत.

५- आकांक्षा, योग्यता व सन्निधी याचा बरोबर उपयोग न करून दूरान्वय असणे **वाक्यदोष** होत.

६- शब्दाचे दोन अर्थ असून जो प्रसिद्ध अर्थ असेल त्याच्या ठिकाणी अभिप्राय न ठेवून अप्रसिद्ध अर्थाच्या ठिकाणी लक्ष ठेवणे हा **शक्तिदोष** होय.

७- समान श्लिष्टपदाचा उपयोग करणे **सामर्थ्यदोष** होय.

८- अनधिकाऱ्यालाही भाषण समजू देणे **गुणदोष** होय; आणि

९- अधिकाऱ्याला भाषण समजू न देणे **प्रसाददोष** होय.

१०- अतिशय मन आकर्षण करून अर्थाकडे लक्ष न जाऊ देणे **माधुर्य व ओजाचे दोष** आहेत.

११- निर्विशेष भाषण करणे **अर्थदोष** होय.

१२- अतिग्राम्य किंवा अतिमोठे शब्द घालणे **उपदेशदोष** आहे.

१३- अतिहळू किंवा अतिजोराने बोलणे हा **क्रियादोष** होय.

१४- मनातील अर्थ योग्य रीतीने व्यक्त न करता येणे **आकांक्षादोष** आहे.

याप्रमाणे अनेक दोष असून त्यांचे अलंकारशास्त्रात निरूपण केले आहे.तथापि रोजच्या बोलण्यातून इतके दोष टाळलेच पाहिजेत.

७५७. परमेश्वरास कोणती भाषा आवडते ?

ज्या भाषेत अनन्य प्रेमाने कोणी त्याचे नांव घेईल ती! मंत्रशक्तिविषयी संस्कृत भाषाच प्रख्यात आहे असे माझे मत आहे.

संस्कृतात झाला म्हणून चार्वाकाचा ग्रंथ काही प्रमाण होत नाही व प्राकृतात झाला म्हणून वेदान्तग्रंथ काही टाकाऊ होत नाही.

आर्यप्राकृत भाषा व संस्कृत भाषा वेदांताविषयी मी समानच समजतो; याचा विचार 'सुरतरू'त पहावा.

अनार्यभाषेचा मात्र व्यावहारिक संबंध मला संमत आहे.

७५८. जुन्याचे व नव्याचे रक्षण होईल असे शब्द प्रसंगी कसे तयार करावेत?

गीर्वाण [१] नामधात्वादिकेकरून योगरूढ !(१संस्कृत)

संस्कृतनिष्ठ भाषा

७५९. देशभाषा कशी असावी ?

माझ्यामते -

आर्यदेशभाषा संस्कृताशी जितकी जुळून असेल

तितकी चांगली !

आगम-लोप-विकारादिकांमुळे व प्रत्येक बाबतीत नियमाने बद्ध असल्यामुळे, शुद्ध संस्कृताचा सर्व

जातीत प्रचार होणे जरी तादृष दुर्घट असले तरी संस्कृताची अपभ्रष्ट रूपे मूळ संस्कृताचे स्मरण करवितात. अशा शब्दांचा आणखी अपभ्रंश करू नये. जसे 'गंगालय' या शब्दाचा हिंदीत 'गंगाल' व वऱ्हाडी भाषेत 'गंगाळ' हा शब्द झाला असून पुणेकरी व कोंकणी भाषेत त्याचा मुद्दाम 'घंगाळ' असा उच्चार करतात. याने अत्यंतच संस्कृताचे रूप बदलते.

वऱ्हाडातील महारांमध्ये 'नमस्ते' असा शब्द आहे. तो ते परस्पर उच्चारीत असतात; व उच्च जातीला मात्र 'जोहार' असा शब्द उच्चारीत असतात. तथापि 'नमस्ते हा शब्द 'नमोस्तु' या संस्कृत शब्दाला धरून आहे.

बंगाल्यात वडिलाने लहान्याला हाक मारली असतो, 'आज्ञा' म्हणण्याचा परिपाठ आहे तो फार चांगला आहे.

हर्दा प्रांतात मराठी भाषेत एखाद्या मोठ्याला काही करण्याला सुचवावयाचे असल्यास 'ते केले असते' असे म्हणण्याचा प्रघात आहे, तो फार मर्यादशील व चांगला आहे.

'प्रत्यक्ष आपली आज्ञा दिसून पडेल असे भाषण पूज्यांपुढे बोलणे चांगले नव्हे'

असे मराठी भाषेत जेथे असेल ते फार उपयोगाचे आहे.

जी रूपे संस्कृतातून मराठीत आली असतील व केवळ देशी म्हणूनच ज्या शब्दांचा उपयोग मराठीत तात- मुकुंदाराजादि समर्थ कवींनी आपल्या काव्यात केला असेल, त्या शब्दांची व्युत्पत्ती संस्कृतातून उकरून काढीत बसू नये. नाही तर 'कुपुत्र' शब्दातील 'पु' गळून जाऊन बाकी राहिलेल्या शब्दाचा 'कुत्र' शब्द श्वानाचा वाचक झाला आहे, अशा प्रकारची नसती ऐतिहासिक विधाने करावी लागतील!

'गांवाचे नांव मांजरखेड आहे म्हणून तेथे प्लेग कधी व्हावयाचा नाही' असे एका मोठ्याने विधान केले होते. कारण तेथे मांजरी पुष्कळ असल्यामुळे उंदीर रहावयाचे नाहीत असे त्याचे म्हणणे होते; आणि मजा ही की, तो थट्टेत देखील खोटे बोलत नव्हता. व्युत्पत्तीवर जोर असून शब्दाचा रूढ अर्थ समजून न घेतल्यामुळे अशा चुका होणे साहजिकच आहे.

तेव्हा **कात्यायनसूत्रा**च्या अपभ्रंशनियमाने जे शब्द संस्कृतातून आले असतील ते तसेच घेऊन देशीचे देशीच ठेवावेत. संस्कृतजन्य व देशी असे दोन भेद बालसंज्ञक प्राकृत भाषेतही आहेत.

तसेच संस्कृत भाषेत असमर्थ वाक्येही मिसळू नयेत.

७६०. इतर भाषेची संस्कृतात भाषान्तरे करावीत की नाही?

वैदिकबुद्धिवैशेष्य असेल तर करावीत आणि ताजकनीलकंठी आदिकांप्रमाणे व्यावहारिक शास्त्रांचीही करावीत; परंतु त्या व्यावहारिक संस्कृत भाषांतराला व्यवहारातच प्रामाण्य द्यावे, धर्मामध्ये विकल्प करू नये.

७६१. 'सारशब्द' नांवाच्या पुस्तकात चीनमधील चित्रात्मक लिपीसंबंधी कोणत्याही भाषेतल्या मनुष्याला समजण्यास सुलभ आहे असे म्हटले आहे; म्हणून अक्षरात्मक जी आपली आर्य-लिपी तीपेक्षा ती उत्तम समजावी की नाही?

चित्रात्मक लिपी कोणत्याही भाषेतील मनुष्याला समजण्याला सुलभ पडते हे खरे आहे; इतकेच नाही तर पशुपक्षी, किडे, माकोडे यांना देखील समजण्याला ती सुलभच पडेल. लहान मुले, पशुपक्षी, किडे व मूर्ख माणसेही सर्व चित्रावरूनच आकाराला ओळखत असतात. त्यात मानस संकेत मुळीच नसतात.

मानस संकेताचे चित्र काढणे अक्षराच्या खुणेपेक्षा हजारो पटीने कठिण आहे आणि ते कोणत्याही भाषेतील मनुष्याला सारखे समजणे शक्यही नाही; म्हणून जेवढे सन्निधानमात्र जगत् आहे व प्रत्यक्षप्रमाणाने जे नास्तिकालाच पटत असते, त्याविषयी चित्रात्मक लिपी कितीही चांगली असली तरी, त्याच्या पलीकडच्या

जगाकरता किंवा नीती इत्यादी मानसिक धर्माकरता संकेतरूपी अक्षरात्मक लिपीच आवश्यक आहे; आणि त्यातही 'आर्यलिपीच पूर्ण आहे हे पाश्चात्य व्युत्पत्तिशास्त्रानेच ठरलेले आहे.'

शिवाय ती अनादि आहे; कारण **'अर्धेन्दुलसितं तारेण रुद्धम्'** इत्यादी तिच्या आकारांशाविषयी गणेशाथर्वादि वैदिक स्तोत्रात वचने आहेत. चित्रात्मक लिपीचीही आमच्याकडे कल्पना नाही असे नाही; परंतु ती कल्पना, सदृश समजणाऱ्या चित्रासारखी नसून संकेतरूप चित्रासारखी असते. जसेः- कुमारिस्तनयुगुलाकृतिर्वर्णो विसर्गः। इत्यादि व्याकरणवचने आहेत.

७६२. अव्यक्तबोधात प्रणवाच्या अक्षराचे काही तुकडे करून त्या तुकड्यांचेच जनावरांचे व मनुष्यांचे सांगाडे बनविले आहेत. ही एक प्रकारची चित्रलिपी नव्हे काय?

पाश्चात्यशिक्षणविदग्धांना काही तरी नवे हवे असते; त्यांच्या करता ती चित्रलिपी होऊ शकेल, परंतु वेदान्तात तिचा तादृश उपयोग नाही.

जगाचे उपादान व निमित्त कारण परमात्मा केवळ निमित्त होऊन या प्रणवाच्या शाईच्या अक्षराचे तुकडे जुळवीत बसला असेल. हे संभवनीय नाही. स्वामी विद्यारण्यांनीही 'प्रणवाचे महत्त्व सर्वात्मकत्व ध्यानासाठी आहे वस्तुतः नाही' असे स्पष्ट म्हटले आहे. तेव्हा भावनेकरता अव्यक्तबोधातील प्रकार जठारसाहेबांनी कल्पिला असेल तर मात्र त्याचे ठिकाणी शोभाभास आल्यास आमची काही हरकत नाही. एरव्ही तो पोरखेळ आहे.

एकाने काही गणित करून भागाकाराने दोन उरविले व याप्रमाणे 'राम' ही दोनच अक्षरे सर्वत्र शेष राहतात. असे सिद्ध केले आहे. हा ध्यानाकरता शोभाभास असला तरी शुद्धपोरखेळ आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही.

तथापि आपदेवाच्या क्रीडनोद्यानादि खेळाप्रमाणे यांचा उपयोग केल्यास दहेल्या नहेल्यांच्या गंजिफ्यापेक्षा(पत्ते) पुष्कळ फायदा होतो. हंसस्वरूपाची व्याख्याने ज्यांनी वाचली असतील, त्यांना आमच्या म्हणण्यातील अर्थ कळेल. या गणिताचा एक दोहा आहे तो जर प्राचीन महासाधूचा असेल, तर मात्र त्याला श्रौतसाधर्म्यउपासनेत घेतल्याशिवाय गती नाही.

ग्रंथलेखन कसे असावे ?

७६३. ग्रंथ कसे लिहावेत?

* पद्यग्रंथ जुन्या धर्मपद्धत्यनुसार लिहावेत आणि
* गद्यग्रंथ वर्तमान परिस्थिती सुधरेल असे लिहावे. तथापि
* त्यातही कालत्रयाबाधित काही असावेच.

७६४. ग्रंथ कोणत्या भाषेत लिहावेत ?

धार्मिक ग्रंथ गुरुसंप्रदाय ज्या भाषेचा असेल त्या भाषेत लिहावेत आणि काव्ये कोणत्याही भाषेत लिहावीत. शास्त्रीय ग्रंथ आर्यवाक्संवलित असल्यास संस्कृत भाषेत लिहावेत व तसे नसल्यास देशी भाषेत लिहावेत.

७६५. स्वग्रंथात इतर धर्मांचा उल्लेख करावा की नाही?

धर्मग्रंथात करू नये. नीतिग्रंथात व काव्यग्रंथात करावा. पंचतंत्र व मालतीमाधव, या विषयीची उदाहरणे समज.

७६६. गद्यग्रंथाची भाषा शब्दार्थादि बिकट समयी कशी वापरावी?

वर्तमान विषय असेल तर संपादिल्यानंतर परिभाषा होईल अशी! किंवा विशिष्ट संज्ञा होईल अशी सांश-ज्ञापिका! जसे सौता-सवत इत्यादी.

७६७. गद्य ग्रंथ प्रमाण कसे मानावेत ?

त्रिकालाबाधित तत्त्व मान्य करावे व वर्तमानापुरते समजावे; पण गौरुंडविभूषित (इंग्रजी) गद्याविषयीच हा नियम लागू आहे.

तुकारामादि महात्म्यांनी कथित तर सर्वथा प्रमाण आहेच. कारण त्यात 'मांत्रिक नियतता' असते आणि पद्यग्रंथही वेदविरुद्ध असल्यास त्याज्य असतातच.

तथापि गद्य-पद्य-प्रामाण्याचा नियम मी आपल्या ग्रंथाविषयीच विशेषतः ठेविला आहे.

(य.१३, सुखवरसुधा)

(य.१३, सुखवरसुधा या श्री महाराजांच्या ग्रंथातून)

लेखनाचे प्रामाण्य कसे मानावे ?

(१) पद्यग्रंथ सब मान है गद्य सन्निहित मान ।
केवलगद्य मरेंठिसों पद अनुसार प्रमाण ॥८॥

(अर्थ :- माझे पद्यग्रंथ सर्व प्रमाण आहेत. पद्याबरोबर असलेली गद्यवचनेंही तशीच प्रमाण आहेत. अणि मराठी भाषेंत असलेले केवल गद्यग्रंथ माझ्या पद्यग्रंथांशी अविरुद्ध असतील तरच प्रमाण समजावे. ॥८॥)

जें गद्य पद्यानुसार असेल तेंच प्रमाण मानावें असा जरी वरील दोह्याचा अर्थ होतो तरी, जें गद्य पद्यसंन्निहित गद्यानुसार आहे, तें प्रमाण नाहीं, असें समजूं नये. कारण संन्निहित गद्य हें पद्यानुसार असल्यामुळें प्रमाण आहेच व पद्यसंन्निहित गद्यानुसार जे गद्य असेल तें अर्थात् पद्यानुसार असल्यामुळें तेंही प्रमाण होय.

हें गद्य दोन प्रकारचें - १- समयोपदेश व २- उद्धृतसमयोपदेश. उद्धृत समयोपदेशात मंडळीने वेळोवेळी टिप्पणे घेऊन केलेल्या विस्ताराचा समावेश होतो. योगसारादि ग्रंथ या प्रकारचे आहेत.

(२) आतां माझे ग्रंथ कसे मानावे या विषयीं सांगते - पद्य ग्रंथांत मी आपलें मत बरोबर लिहिलें आहे व त्याप्रमाणें पद्याचे संन्निहित असलेले गद्य (म्हणजे 'निदिध्यासन प्रकाशाच्या सहाव्या समुल्लासाचे आरंभीं - आठव्या समुल्लासामध्यें असणारें व प्रियसमागमादिकांत असणारे) तें अर्थ स्पष्ट करण्याकरितां असल्यामुळे (व पद्याच्या सन्निहित असल्यामुळे सन्निहित गद्य म्हटले आहे,) त्यांतही मी आपले मत बरोबर लिहिलें आहे.

केवळ गद्य जें अलोकव्याख्यानमालेंत लिहिलें आहें, तें पूर्व ग्रंथाशीं अविरुद्ध असतां प्रमाण समजावें. मराठी म्हटल्यावरून हिंदी 'स्वमतंव्यांश-सिद्धांत-तुषार, गद्यभक्तिभाष्य' इत्यादिकांची व्यावृत्ति झाली. अर्थातच त्यामध्येंही मी आपलें मत उत्तम लिहिलें आहे.

(३) पत्रे व एकाद्या ग्रंथावर व्याख्याने हा समयीं समयीं केलेला उपदेश समजावा. तो वरील ग्रंथाला अनुरूप असल्यास प्रमाण आहेच याविषयीं सांगणें नकोच. परंतु कोठें कोठें कोणत्या कोणत्या उद्देशानेंही केलेला आहे. तो उद्देश जवळील मंडळीला कळण्याचा संभव आहे व न कळल्यास त्या विषयीं उपेक्ष्य राहावें.

शिवाय समयीं केलेला उपदेश निरनिराळ्या लोकांना मार्गावर आणण्याकरितां असल्यामुळें तो एकसारखा प्रमाण होत नसतो. जे लोक ग्रंथ न करतां केवळ समयोपदेशावरच कार्य भागवितात त्यांच्या मताचा कित्ता घेणें फारच घोटाळ्याचें होते,)

---

७६८. ग्रंथ हे संग्रहरूप असावेत किंवा अत्यंत नवीन असावेत?

* ग्रंथातील सामान्य भाग संग्रहरूप असून विशेष भाग नवीन असावा. त्याचप्रमाणे * प्रमाण भाग संग्रहरूप असून युक्तिभाग नवीन असावा.

सर्वथा संग्रहरूप ग्रंथास फारसा मान मिळत नाही, आणि सर्वथा नवे तर वेड्याच्या कोटीत जाते, कारण त्याचे बडबडणे अती नवे असते! म्हणून मी सांगितले याच पद्धतीचे ग्रंथ असावेत.

७६९. ग्रंथातील ज्ञान सर्वदा पूर्ण असते की अपूर्ण?

'पारमार्थिक ग्रंथातील ज्ञान सर्वदां पूर्ण असते,
पण व्यावहारिक ग्रंथातील ज्ञान सर्वदांच अपूर्ण असते.'

पारमार्थिक ग्रंथात जरी प्रक्रियेची भर पडते, तरी त्या सर्व प्रक्रिया एकाच सिद्धान्ताकडे धाव घेत असतात; आणि नवीन प्रक्रिया न सांपडली तर पारमार्थिक व्यवहाराची असिद्धि विवक्षित उपाधिविशिष्ट जीवावांचून इतराला भोगावी लागत नाही; पण व्यावहारिक ज्ञानाची गोष्ट तशी नाही. अपूर्ण राहणे हे त्याचे भूषणच आहे.

व्यावहारिक ग्रंथ पूर्ण लिहून ठेवतो म्हणणे म्हणजे पारमार्थिक दृष्टीने जगताला सत्यत्व देण्यासारखेच आहे.

७७०. ग्रंथात अनार्य भाषेचा प्रसंग आल्यास शब्द तसेच घ्यावेत की नवीन बनवावेत?

जल्पकास नवीनच उपयोगी आहे; आणि पूर्वमीमांसा-शास्त्रात म्लेच्छ भाषेतील शब्द लौकिक व्यवहारात त्यांच्या रूढीनेच घ्यावेत, असे स्पष्ट सांगितले आहे. **अभियुक्तोक्ति** प्रमाण असते. तर लौकिक व्यवहारात अनार्यही अभियुक्ततर असल्यास त्यांच्या भाषेतील शब्द घेण्यास काही हरकत नाही, असेही शबरादिक म्हणतात. गारूडादि प्रत्यक्षफल देणारी विद्या कोठूनही घ्यावी असे मनु व त्यावरील टीकाकार कुल्लुक भट्टांनी म्हटले आहे. स्थान या ठिकाणी 'तिष्ठना' इत्यादि बौद्धांचारांचा आचार्यांनी जो निषेध केला आहे, तो तर स्वभाषेत शब्द असून 'बुद्धिपुरःसर अपभ्रंशाचा' केला आहे; व धर्माकडे दृष्टी देऊन केला आहे. शिवाय -

आर्य-अनार्यभाव धर्मात आहे, लौकिक व्यवहारांत नाही.

राजाने तर यवन मताचे अध्ययन करावे असे शुक्रनीतीत सांगितले आहे; आणि भविष्यपुराणातही अपभ्रष्ट भाषेची उदाहरणे दिली आहेत. तेव्हा लौकिक व्यवहाराशी त्या भाषांचा विरोध नाही.

तथापि गद्यावाचून धार्मिक पद्यग्रंथांत उगीच अनार्य भाषा घालणे योग्य नाही असे माझे मत आहे. नुसत्या मराठी गद्यग्रंथात अप्रजल्पनकाली भाषेचे कोडबोळे शोभते.

७७१. तर मग व्यावहारिक ग्रंथाला काही किंमत नाही काय?

किंमत अर्थातच आहे. आपल्या हयातीत आपल्याला पैसा मिळू लागला म्हणून, 'दरिद्री आईबापांनी आम्हाला दारिद्र्य स्थितीतच पोसले हे वाईट केले.' असे म्हणणाऱ्या कृतघ्न पुत्राप्रमाणे अपूर्णत्वामुळेच व्यावहारिक ग्रंथांचे उपकार न मानणारा कृतघ्न समजावा.

शिवाय जो दुसऱ्याच्या व्यावहारिक ग्रंथाचा उपकार मानीत नाही. त्याला स्वतःची व्यावहारिक सुधारणा पूर्ण वाटत असते, हा नियम आहे.

त्यामुळे व्यावहारिक बाबतीत विकाराच्या भरात त्याच्या हातून पुष्कळ चुका होत असतात. याविषयी आंधळ्या पांगळ्यांना ठार मारण्याची आज्ञा देणाऱ्या प्लेटोचे (Plato) ग्रंथ पहावेत.

७७२. तर मग पारमार्थिक ग्रंथात अभिमान चालतो काय?

छे, मुळीच नाही! परमार्थ हा अभिमानाच्या मुळी विरोधीच आहे.

* निरभिमानपूर्वक ग्रंथ पूर्ण असणे हे पारमार्थिक ग्रंथाचे लक्षण आहे आणि
* निरभिमानपूर्वक पूर्ण नसणे हे व्यावहारिक ग्रंथाचे लक्षण आहे.

याच अभिप्रायाने शिल्पशास्त्र जैमिनीने धर्मशास्त्राच्या बरोबरीचे ठरविले नाही.

७७३. तुमचे ग्रंथ लोकांना आवडण्याजोगे कां नसतात?

लोकांना आवडण्यासारखे काव्यग्रंथच लिहिता येतात; कारण त्यातील कल्पना बाधित असतात; पण * सिद्धांतग्रंथ लोकांना आवडण्यासारखे लिहिले तर विषयी लोकांच्या चावटीत भर टाकण्यासारखेच होते, म्हणून * मुमुक्षूला आवडतील तसे सिद्धांतग्रंथ लिहावेत, आणि * मुमुक्षू म्हणजे खरोखरच विरक्त

असून विकाराने तो परमार्थ मार्गात शिरला नसला पाहिजे. अशाच पद्धतीने मी आपल्या ग्रंथांची योजना करतो.

भाषांतरे

७७४. भाषांतरे वाचावीत की वाचूं नयेत ?

अन्वय लावण्याचे श्रम टाळण्याकरता भाषांतरे वाचावीत, परंतु त्यावरून मूळाविषयीचे आपले मत बनवून घेऊ नये.

मूळ समजण्याचे ज्ञान पाहिजेच; अथवा विद्वानाकडून भाषांतरही समजून घेतल्यास हरकत नाही. एकनाथी भागवतासारखे ग्रंथ भाषांतरे नव्हेत; म्हणून त्यावरून आपले मत बनविण्यास हरकत नाही.

७७५. भाषांतरे तुम्हास मान्य आहेत की नाहीत?

मान्य आहेत; परंतु एका भाषान्तरावरून दुसरे भाषान्तर जेथे होते व त्याला स्वतंत्र ग्रंथनांव दिले जाते. अशी भाषान्तरे मला मान्य नाहीत; कारण

'अविद्वानाला फसविणे किंवा पैसे काढणे हेच त्यांचे प्रयोजन असते.'

मराठीत वेदान्तग्रंथांची भाषान्तरे बहुतेक अशीच आहेत.त्यांची मी यादी केलेली आहे. येथे त्यांची नांवे लिहून लोकांचा क्षोभ करीत नाही.

७७६. कोणत्या ग्रंथांचे मूळ वाचावे व कोणत्या ग्रंथांची भाषांतरे वाचावी?

संस्कृत व प्राकृत कवींचे ग्रंथ मूळातूनच वाचावेत आणि भाषांतरावरूनही वाचावेत; पण आर्यभिन्न भाषेतील ग्रंथ मात्र, जडशास्त्रे सोडून, भाषांतरावरूनच वाचावेत असे माझे मत आहे जडशास्त्र मूळावरून व भाषान्तरावरूनही वाचावे. ग्रंथाचे भाषांतर करणारे, लोकांवर मोठाच उपकार करीत असतात, तथापि मूळाची किंमत कमी करणे हा दोषही त्यांच्या हातून घडतच असतो. संस्कृत केलेल्या जठारांच्या अव्यक्तबोधाची आणि वेदार्थयत्नकाराच्या वेदाच्या भाषांतराची किंमत मी सारखीच समजतो, परंतु मराठी वाचकांस वेदभाषान्तराचा काही तरी उपयोग आहे.

७७७. संस्कृत अनुभवामृताचीही किंमत तुम्ही तशीच समजतां काय?

नाही, कारण 'अनुभवामृतासारखा ग्रंथच संस्कृतात नाही.'

तात हे परमात्मा असल्यामुळे त्यांची वाणी आम्ही श्रुती समजतो, म्हणून त्यांच्या ग्रंथाची केलेली संस्कृत समश्लोकी फारच चांगली आहे, तथापि तिला मुळापेक्षा आम्ही मान कमी देतो.

७७८. आधुनिक ग्रंथही भाषांतरेच समजावीत की नाही?

काही आधुनिक ग्रंथांना भाषांतरापेक्षा किंमत जास्त आहे व काही आधुनिक ग्रंथांना कमी किंमत आहे. त्यात आंग्लसंस्कृत मिश्र जे मराठी किंवा हिंदी ग्रंथ आहेत ते सर्वथा त्याज्य आहेत, कारण दोहींचाही अनुभव ग्रंथकारांना नसतो.

इकडील प्राणायाम व तिकडील 'कंप्लीट ब्रीदींग' याचा मेळ घालून नवचंद्री योगाची पुस्तके तयार होत असतात.अशीच गोष्ट वेदान्ताची आहे.माझ्या म्हणण्याची साक्ष पटण्याकरता ब्रह्मविद्याप्रबोधरत्नातील परमार्थाध्याय व व्यावहारिक योग ही पुस्तके पहावीत.

याचप्रमाणे आर्य तत्त्वज्ञानावर जी इंग्रजी पुस्तके झाली आहेत, तीही अशाच आशयाची आहेत; कारण अलीकडे लोकांना माहीत नसलेली अशी जुळवाजुळवीची उपपत्ती देणे, याचेच नांव सद्युक्ती, असे रूढ झाले आहे. 'वृत्तीला यथार्थ स्वरूप प्राप्त करून देणे, हे सद्युक्तीचे स्वरूप' लोक विसरत चालले आहेत.

जसे, कल्याणराव म्हणतात :- 'सांख्यात इंद्रिय एक आहे असे सांगितले आहे, आणि पाश्चात्य मानसशास्त्रात सर्व इंद्रियाच्या शक्ती मेंदूत आहेत असे सांगितले आहे.त्यातील पहिल्याचे म्हणणे मानसिक

बाजूने व दुसऱ्याचे म्हणणे शारीरिक बाजूने आहे इतकेच; बाकी दोहोंचाही अर्थ एकच'

अहाहा! काय हे तत्त्वज्ञान! त्रिफला व खडीसाखर कुटून जसा समन्वय करावा, तसे येथे झाले आहे की नाही?

*विवेकानंदाच्या सर्व ग्रंथात बहुशः असेच आढळते. *स्वामी रामतीर्थाचे ग्रंथ, आणि इंग्रजीतील *सर्व थिऑसफीचे ग्रंथ, तसेच *भगवानदासाचे 'सायन्स ऑफ पीस' वगैरे ग्रंथ, सर्व याच तोडीचे आहेत.

हिंदी तत्त्वानुसंधान, हिंदी आत्मपुराणादि भाषान्तरे आणि परिभाषादि ग्रंथाची वृत्तिप्रभाकारादि सारान्तरे, अत्यंत मान्य आहेतच, पण याच ग्रंथांची जी मराठी भाषांतरे झाली आहेत, त्यात घोटाळअष्टमी दिसून येते.

कल्पित कथांचे लेखन

७७९. मनोरंजक कल्पित प्रकरणे कशी लिहावीत याजविषयी आपले काय मत आहे?

याविषयी प्रत्येकाची रुची निरनिराळी आहे. शिवाय हा काही धर्म नव्हे की, याविषयी कोणीही माझ्याच वचनावर अवलंबून राहील; तथापि माझे मत आहे ते मी सांगतो -

बाणभट्टाच्या कादंबरीवरून अलीकडच्या कल्पित गोष्टींना कादंबरी नांव आले आहे, व त्यावरून कादंबरी कल्पित आहे असाही समजून न समजून लोकध्वनि आहे; परंतु तो इतिहास आहे असे माझे बाळभाषेतील लेखांवरून मत झाले आहे.

ज्या धर्मात व ज्या देशात कल्पित गोष्टी लिहिल्या जातात त्या धर्मान्वये लोकस्थितीचा विश्वास व अविश्वास त्यांच्यामध्ये वर्णन केल्या गेला पाहिजे असे माझे मत आहे. शिवाय मुख्य नायक व नायिका यांचा नाश वर्णन न केला पाहिजे व इतर जे नीतिमान आहेत ते मेले तरी देवाच्या कृपेने जिवंत झाले असे दाखविले पाहिजे. अशाने कल्पित गोष्टीचे वैचित्र्य नाहीसे होईल हे भय मानावयास नको. कारण ते भगवत्कृपा सत्त्ववृत्तीने होते व त्या सत्त्ववृत्ती अनेक आहेत असे सांख्य, योग, वेदान्तमत आहे.

आर्यधर्मात लिहिल्या जाणाऱ्या कल्पित गोष्टी आर्यधर्माच्या अंगांची माहिती करून देणाऱ्या असल्या पाहिजेत. निरनिराळ्या सत्त्ववृत्तीने किंवा सत्त्वमिश्रवृत्तीने निरनिराळ्या गुणांच्या माणसांचा जयपराजय कसा झाला हे दाखविले पाहिजे.कल्पित गोष्टी काही इतिहास नव्हेत की भारतादिकांप्रमाणे त्यांच्या योगाने परलोकसाधन होईल. या लोकातच चांगल्या लोकांचा जय कसा झाला यावरूनच परलोकातील त्यांच्या चांगुलपणाचा ध्वनी दाखविला पाहिजे.

इतिहासातील गोष्टी प्रारब्धकर्मांवर अवलंबून असतात; पण कल्पित गोष्टी ईश्वरसहायक प्रयत्नावर अवलंबून असल्या पाहिजेत. कोणत्याही पदार्थाचे कंटाळवाणे वर्णन किंवा मानसशास्त्राचा अतिशय भरणा त्यात नसला पाहिजे तर रंगीत पात्रांवरून रसांची ओळख व थोडीशी वर्णने असली म्हणजे पुरे ! एकसारखे भरकटलेले किंवा अतिशय गुंतागुंतीचे कथानक नसले पाहिजे. तसेच योग्यकाळी समजावयाचा प्रसंग पूर्वीच समजेल असे होऊ नये. सर्व इतिहास काय व कल्पित गोष्टी काय, संकट व सुख या मिश्रणानेच भरल्या असतात व जगही तसेच आहे; म्हणून सत्त्ववैचित्र्याप्रमाणे संकटातही कल्पित गोष्टीत वैचित्र्य आणावे. अलौकिक अद्‌भुत रस वर्णन करू नये; परंतु धार्मिक अद्‌भुत रस आणल्यावाचून राहू नये.

साधारण माणसे ज्या कल्पित गोष्टी लिहीतात त्या त्यांच्या खऱ्या होत नाहीत; पण महात्म्यांच्या कल्पित गोष्टीही लिहलेल्या खऱ्या होतात. कारण

ईश्वराच्या ठिकाणी कल्पित-अकल्पित सारखेच आहे. म्हणून प्रकरणे मृदुमध्यसंवेग व इतिहास तीव्रसंवेग होत.

'मनोराज्यमपि प्राज्ञा लभन्ते व्यवसायिनः' असे योगवासिष्ठात म्हटले असून महात्म्यांचे मनोराज्य देखील खरे होते, असा त्याचा अर्थ आहे.

७८०. कल्पित गोष्टी लिहाव्या की नाही?

वेदान्ताच्या दृष्टीने अनिर्वचनीय मायेमध्ये कल्पित गोष्ट सत् किंवा असत् या दोन्ही कोटीत जात नाही. सत् म्हणजे तिन्ही काली ज्याचा नाश होत नाही ते! तसे एक परब्रह्म आहे. त्याची कल्पना करता येत नाही. सताची कल्पना करण्याला सताहून भिन्न असा असत् कोणी होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सशाचे शिंग इत्यादि ज्या असत् गोष्टी त्यांचीही कल्पना करता येत नाही, कारण जे अगदीच नाही ते मनातच येत नाही म्हणून 'जगाला जितके अस्तित्व आहे तितकेच अस्तित्व कल्पित गोष्टींना आहे' असे सिद्ध होते.

सृष्टिदृष्टिवादाच्या दृष्टीने कल्पित गोष्टीला स्वप्नाइतके अस्तित्व आहे, जगाइतके नाही असे जरी ठरत असले तरी, वेदान्तातील ज्ञा जो दृष्टिसृष्टिवाद त्याच्या दृष्टीने कल्पित गोष्टीला जगाइतकेच अस्तित्व आहे. योगवासिष्ठाच्या निर्वाण प्रकरणात जीवटाचे उपाख्यान आले आहे. ते आख्यान कल्पित आहे असे वसिष्ठांनी स्पष्ट सांगितले; पण रामाने आग्रह धरल्यामुळे वसिष्ठांनी शोध करून कल्पित आख्यान देखील खऱ्या जगात दाखवून दिले. म्हणून कल्पित गोष्ट कोठे तरी जगात असलीच पाहिजे असा सामान्य नियम निघतो.

अगदी अज्ञानदृष्टीने जरी पाहिले तरी जीवकल्पित गोष्ट भविष्यकाली व ईश्वरकल्पित गोष्ट वर्तमानकाली व्यवहारात येते, त्याला व्यभिचार नाही.

७८१. कल्पित आख्यायिका जीवटाख्यानाप्रमाणे कोठे तरी असतात असे जरी आहे, तरीही त्यांचा उपयोग काय?

ज्याच्यावर आपला स्नेह असेल त्या स्नेहानुसार त्या धार्मिक ध्यानाने उत्तरजन्मात त्याला मिळविणे हा आहे. इतिहासपुराणे लिहिणाऱ्या ऋषींच्या मनात सदर्थाचा मृदुसंवेग नसतो आणि कल्पित आख्यायिका लिहिणाऱ्यांच्या मनात तो असतो, इतकाच त्यात भेद आहे.

७८२. कल्पित गोष्टीत कोणता रस अधिक असावा?

सर्वच रस योग्य असावेत, तथापि जितके नायकाला संकट अधिक, त्या मानाने अद्भुत रस अधिक असावा; आणि **'प्रलयस्तु न वर्ण्यन्ते कविभिः'** या वचनान्वये नायकादिकांचा मृत्यू वर्णन करू नये.

७८३. कल्पित वृत्ताला प्रकरण म्हणतात, ते लौकिकच असले पाहिजे; मग त्यात अद्भुत रस अधिक कां असावा?

साहित्यशास्त्रांत तसे प्रकरणाचे लक्षण केले आहे खरे, परंतु योगसिष्ठातील जीवटोपाख्यान मालती-माधवादिकांपेक्षा अधिक प्रमाण आहे; म्हणून अद्भुत रस अधिक असावा असे मी म्हणतो.

७८४. बरे, त्या रसाची योजना कोठे कशी करावी हे थोडक्यात सांगता येईल काय?

होय. देवांच्या पात्रात शक्तीने, मुनींच्या पात्रात ध्यानाने, अघोरी व बौद्ध वगैरे साधूंच्या पात्रात मंत्राने, यक्ष पिशाच विद्याधरादिकांच्या पात्रात औषधीने, असुरादिकांच्या पात्रात यंत्राने आणि मनुष्यादिकांच्या पात्रात बुद्ध्यादिकाने विशेषेकरून अद्भुत रस दाखवावा; तथापि यथासंभव शक्त्यादिकांचा उपयोग केलाच पाहिजे.

अग्निपुराणावरून कल्पित कथेलाही मंगलामंगल विधी काढता येतो; आणि कल्पित गोष्ट रचणाऱ्यालाही स्वर्ग मिळतो, हे भविष्यपुराणावरून स्पष्ट होत आहे. मागे या विषयाचे स्पष्टीकरण पुष्कळ झाले आहे, तथापि रसविशेषास्तव पुनः तुला येथे सांगितले.

७८५. धार्मिक अद्भुत व अलौकिक अद्भुत कशाला म्हणावे?

ज्या धार्मिक अद्भुत गोष्टी झाल्याचा धर्मशास्त्रात आधार आहे, त्यांना धार्मिक अद्भुतरस म्हणावे.

जसे ऋग्वेदात मेलेल्या सुबंधूला मंत्राने परत आणले अशी कथा आहे व महाभारतात श्रीकृष्णाने मृतपुत्र जिवंत केले इत्यादि कथा आहेत. तेव्हा तसा कल्पित गोष्टीत रस आणणे, **धार्मिक अद्‌भुतरस** होय.

आता **अलौकिक अद्‌भुतरस** सांगतो. अलौकिक असे जगात काही नाही; कितीही कल्पित असले तरी जगात कोठे ना कोठे तरी असावयाचेच! जग अनंत आहे, तथापि जेथे जेथे ते अलौकिक असेल, तेथे तेथे ते सत्कर्मांचे किंवा दुष्कर्मांचे फळच आहे. असा धार्मिक सिद्धांत आहे, म्हणून अलौकिक अद्‌भुत रस देखील धार्मिक अद्‌भुतच आहे.

परंतु काही मूर्ख नास्तिक धर्माला न मानून मनोरंजानासाठी अद्‌भुतरसाचे वर्णन करतात. धार्मिक दृष्टीने असंभाव्य असे काही नाही, परंतु नास्तिकांची दृष्टी संकुचित असल्यामुळे त्यांचे, धर्म सोडून अद्‌भुत कल्पना करणे हास्यास्पद आहे. वाल्मिकादि अयोनिसंभव आहेत, हे कोणासही कबूल नाही असे नाही; पण कामचारी नास्तिक जर म्हणेल की, माझा बाप अयोनिसंभव होता, तर ते शब्दप्रमाण व धर्म न मानणाऱ्या त्याला सिद्ध करावे लागेल. आता अशा नास्तिकी अलौकिक अद्‌भुत रसाची थोडक्यात एक दंतकथा सांगतो :-

दंतकथा

एका राजाने रुप्याचे खोड, सोन्याच्या डांगा, नीलमण्याची पाने व मोत्याचे झोक असे झाड स्वप्नात पाहिले, व तसे आणून देण्याचे त्याने आपल्या मुलांना सांगितले. त्यातील एक मुलगा अनेक संकटे सोसून एका विहिरीजवळ गेला, व त्यातून निघालेल्या सर्पाला, धारेच्या पिंजऱ्याच्या युक्तीने मारून त्याचा मणी घेऊन तो विहिरीत शिरल्यावर, मण्याच्या सामर्थ्यामुळे पाण्याने त्याला वाट दिली. नंतर त्याला त्या विहिरीत रुप्याचा महाल लागला. तो उघडून पाहिला तर त्यात रुप्याची एक बायको दिसली. तिने वृत्त पुसून, सत्कार करून, त्याला काही फराळाचे देण्याकरता म्हणून बसवून ठेविले, परंतु तितक्यात त्याला सोन्याचे दार दिसले. ते उघडून तो आत गेला. तेथेही वरीलप्रमाणे प्रकार झाल्यावर नीलमण्याच्या द्वाराने तो आत गेला. तेथेही पूर्वीप्रमाणेच झाल्यावर तो मोत्याच्या द्वाराने आत गेला, तेथेही तसेच झाले; नंतर तो शिशाच्या महालात गेला. इतक्यात सर्वजणी मिळून आपली फराळाची ताटे जुळवून त्याला धुंडीत धुंडीत तेथे आल्या. त्याला त्या नागाच्या पलंगावर पाहून घाबरल्या, तेव्हा 'या नागाला मी मारले आहे. तुम्ही घाबरू नका' असे त्याने म्हटल्यावर 'त्या नागाच्या आम्ही कन्या आहोत, तूंच आमचा पती आहेस' असे त्यांनी म्हटले. नंतर तो तेथे राहिल्यावर त्या चारही जणी इंद्राच्या येथे जात असत. त्यांची पाळत ठेवून विमानाच्या मागच्या कडीला लोंबकळून तो इंद्राच्या येथे गेला व तबलजी बनला. पुढे त्या चौघींचा नाच झाल्यावर इंद्राच्या घरच्या देवांनी चौघींना कापले. त्यांचे रक्त एकत्र होऊन राजाने स्वप्नात पाहिले होते तसे झाड तयार झाले. अशी झाडे तेथे रोज तयार होत असत. ते झाड एकीकडे ठेवून दिल्यावर त्या चौघींना छडीचा स्पर्श करून जिवंत केले. नंतर इंद्र संतुष्ट होऊन म्हणाला, 'आता तुम्हाला कोणता वर पाहिजे ते सांगा.' तेव्हा त्यांनी तबलजी मागून घेतला; त्यामुळे इंद्राने 'आता तुमचे येथे राहणे होणार नाही' असा शाप दिला व 'तबलजीसवे रहा' असेही सांगितले. पुढे तबला उत्तम वाजविला म्हणून तबजलजीसही इंद्र, 'वर माग' म्हणाला; तेव्हा त्याने ती छडी मागून घेतली व मग सर्वांस पोहोचवून देण्यात आले, पुढे त्याने आपल्या येण्याचे कारण बायकांना सांगितले. तेव्हा त्या छडीला धूप द्या म्हणजे आपल्यासुद्धा व या विहिरीसुद्धा ही भूमीच तेथे उडून जाईल' असे बायंकांनी सांगितले व त्याने तसे केलेही. पुढे त्याच्या चार भावांकडून संकटे आली त्यातून त्याला त्या कन्यांनी सोडविले. पुढे तो बापाला भेटला व झाड दाखविले व सर्व काही ठीक झाले.

या कथेत अद्‌भुतरस जास्त असून कामाच्या दृष्टीने आहे व धर्म कमी आहे. शिवाय तीत बहुतेक छडी वगैरे जादूप्रमाणे असून सत्य वर्णिली आहे. स्वप्न व जागृतीचा मेळ घातला आहे. जरी लवण राजाचे स्वप्न जागृतीत सत्य झाले अशी कथा वासिष्ठात आहे, तरी तेथे वैदांतिक धार्मिक अद्‌भुत रस आहे.

पण वरील दंतकथा मुसलमानी पुस्तकातील आहे. यावनीधर्मांत पुनर्जन्मच नाही तेव्हा नागकन्यादी कोठले? म्हणून त्यांच्या दृष्टीने हा नास्तिकोक्त अलौकिक अद्‌भुत रस आहे; आणि -

आर्यांच्या दृष्टीने हा धर्मविपर्ययी अलौकिक अद्‌भुत रस आहे. वैदिक धर्माला अनुसरून जर ही दंतकथा असेल तर आमची ना नाही.

विषयवासनेचा पडदा कसा आहे पहा! फारशी व मुसलमानी धर्मात पुनर्जन्म मान्य नसूनही विषयाकरता अशा अद्‌भुतकथा लिहिल्या आहेत. किंबहुना फारशीधर्मापेक्षा या धर्मातच त्या अधिक आहेत. त्याविषयी **'अलिफलैला व किस्बरसिता'** वगैरे वाचून पहावी. अलिफलैलेतील तीन बहिणीच्या गोष्टीत बोलणारा पक्षी, गाणारे झाड व सोनेरी रंगाचे पाणी, पर्वतातून निघणारे शब्द व त्या शब्दाला भिऊन मागे परतणाराचे गोटा होऊन पडणे इत्यादि प्रकार धर्मावाचून, कर्मावाचून व जादूवांचून वर्णन केले आहेत. तेव्हा हा धर्मरहित अलौकिक रसच होय. वैदिक धर्माच्या दृष्टीने अलौकिक काही नाही; पण या तीन बहिणीच्या गोष्टीप्रमाणे अलौकिक लिहणे म्हणजे उगीच छाती फाडणे आहे.

आता सृष्टिस्वभावातही असे अलौकिक असूं शकते असे नास्तिक म्हणेल, तर त्याच्याशी चेतनाचा संबंध कर्मावाचून संभवत नाही; आणि ते कर्म आर्यधर्मातच सांगितले आहे. शिवाय धर्मरहित अलौकिक रसावाचून दुसरा काही फायदा होऊ शकत नाही; पण ईश्वरसहाय्यक प्रयत्नाने व प्रसंगी धार्मिक अद्‌भुत रसाने पुढील समाजाची सुधारणा होते. शृंगारात रंगार, वीरात चीर, रौद्रात भद्र, व शांतीत वांती वर्णन करणे व्यर्थ आहे, म्हणून मागे सांगितल्याप्रमाणेच कल्पित गोष्टी लिहाव्यात असे माझे मत आहे. त्यात वाईट मनुष्याचे मात्र चांगले मरण वर्णन करू नये. साक्षात् करुणाने येऊन येथेच काम करावे. वाईट मनुष्याला चांगले मरण अनायासे उदाराच्या हातून आले असता हरकत नाही. परंतु न्यायाधिशाच्या हाताने ते येईल असे वर्णन करू नये. बाकीचे विप्रलंभानेच करुण रसाचे काम करावे. साक्षात् करुण रसाने येऊ नये. अशाच कल्पित गोष्टींची मला रुची आहे. वैयक्तिक ऐतिहासिकांचे व कल्पितांचे मिश्रण करूच नये. बाकी जानपदिक इतिहास तर कल्पित गोष्टीलाही असतोच. वैयक्तिक इतिहासावर गद्यकाव्य करणे झाल्यास या लोकातील वत्सराजाप्रमाणे सुखपर्यवसायी पात्रांविषयीच करावे. - मला असे आवडते एवढेच मी धर्माला धरून सांगितले.

पुराणे

७८६. भारतामध्ये कोल्ह्याकुत्र्यांच्या ज्या गोष्टी आहेत, त्या खऱ्या आहेत किंवा खोट्या आहेत?

'कल्पित गोष्ट ही जातिपक्षाने खरी असते.' हे मागे मी तुला सांगितलेच आहे. शिवाय कल्पित सांगून खरे भासविण्याचे विरक्तांना काही प्रयोजन नाही; म्हणून त्या गोष्टी सत्यच असल्या पाहिजेत. सर्व प्राण्यांची भाषा ज्यांना समजत होती. अशा महात्म्यांनीच त्या लिहिल्या असल्यामुळे शंका घेण्याचे कारण नाही.

७८७. वाऱ्याचा व सावरीचा महाभारतात झगडा सांगितला आहे, तो आपण रचलेल्या कल्पित कथेप्रमाणेच आहे काय ?

नाही; कारण तसे असते तर त्या सत्यवक्त्यांनी ही कथा कल्पित आहे असे सांगितले असते. शिवाय कल्पित गोष्टीत व इतिहासात फारच थोडा फरक आहे. कल्पित गोष्टीतीलही इतिहास खराच असतो, परंतु त्यात स्थलकालाचा संयोग सापडत नाही व इतिहासात सापडतो.

७८८. मला तर वाटते की, सर्वच इतिहास कल्पित आहेत ?

सर्वच इतिहास कल्पित झाले तर आपल्या पितामहाचा बापही कल्पित होईल. अनुमानाने सामान्य गोष्ट समजत असते, विशेष समजत नाही; म्हणून अमुकच माझ्या पितामहाचा बाप आहे हे न समजल्यामुळे

दायविभाग पद्धती व्यर्थ होईल. मी अमुक कथा कल्पित सांगतो हे जसे सांगितले आहे तसे भागवतातील पुरंजनाख्यान कल्पित आहे व योगवासिष्ठातील काही कथा कल्पित आहेत असेही सांगितले आहे.

७८९. खऱ्या कथा जर आहेत तर कल्पित कथा सांगण्याचे प्रयोजन काय?

'कल्पित व्यक्तीवरील विशिष्ट संयमाने विशिष्ट पुरुष निर्माण करता येतो' असा दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धांत आहे. भीम व भास हे शंबरासुराने मायेचे उत्पन्न केले होते. परंतु त्यांच्याशी लढण्याकरता स्वतः विष्णूला यावे लागले, अशी वासिष्ठात कथा आहे.

परमेश्वराविषयी तर अशा हजारो कथा कल्पित असल्या तरी त्या खऱ्याच होतात; कारण त्याचे नांवच आहे भक्तकामकल्पद्रुम ! म्हणून 'कोणत्याही धर्मातील पारमेश्वरीय इतिहासात फाजीलपणा करणे शहाण्यास शोभत नाही.'

शिवाय, आज्ञेपेक्षा अशा कथा सुहृदुपदेशाप्रमाणे मुलांना गोडही वाटत असतात. परमात्मा पाहिजे तसा आपल्या मुलांचा हट्ट पुरवितो.

१- कोण्या एका राजाने रामायणातील सीता रावणाने चोरून नेली असे ऐकून समुद्रात लढाईच्या तयारीने निघाला. तेव्हा सीतेला कडेवर घेऊन रामाने त्याला दर्शन दिले.

२- एका राजाजवळ आमची पंढरी सोन्याची आहे म्हणून काही ब्राह्मणांनी प्रतिज्ञा केली. आणि त्यांना पंढरीला घेऊन जाण्याला निघाल्यावर राजा आपल्याला त्रास देईल म्हणून ते ब्राह्मण पंढरीनाथाला शरण गेले; परंतु राजाला सोन्याची पंढरी दिसलीच ! अद्भुतरामायण, आनंदरामायण यातील निरनिराळ्या कथांविषयी यामुळेच संशय घेण्याला जागा नाही.

७९०. पुराणामध्ये मेरु सोन्याचा म्हणून सांगितला आहे तो खोटा आहे की नाही? आहे तर दिसत कां नाही?

मला वाटते, यात खोटे काही नाही; कारण सोन्याच्या खाणीत जसे सोने पुरलेले असते तसा सोन्याचा मोठा ढीग एखाद्या ठिकाणी असणे म्हणजे काही अद्भुत नव्हे. अझूनही पृथ्वीवर अनेक चमत्कार आहेत. एका वाळूच्या मैदानातून कोणताही प्राणी चालत असता त्यातून स्वर निघतात असे मैदान अझून आहे. समजा, एखाद्याने बोलणारे मैदान म्हणून आज लिहून ठेविले व पुढे ते दिसेनासे झाले तर पुढील लोक या मैदानाच्या इतिहासलेखकाला काय म्हणतील बरे !

शिवाय कर्माच्या योगाने ज्यांची दृष्टी बद्ध झाली आहे अशांना सोन्याचा मेरु मातीचा दिसणे शक्य आहे. तेव्हा एकदम पुराणावर धाड घालण्यात काय अर्थ !

७९१. पुराणे कल्पित आहेत असे समजल्या गेले आहे कारण त्यात लोकांच्या दीर्घ आयुष्यादिकांच्या अद्भुत गोष्टी फार आहेत?

कल्पित गोष्टी लिहावयाच्या तर त्या वेळेच्या समाजस्थितीला अनुकूल लिहाव्या लागतात; नाहीपेक्षा त्या गोष्टी वाचण्याची कोणाची इच्छा होत नाही.

'सशाच्या शिंगाच्या गाढवी बायकोला लाकूड होऊन ते पृथ्वींत शिरले', अशा प्रकारच्या अद्भुत गोष्टी कोणी लिहील तर आताही ते लोकास खपणार नाही, हे सर्व प्रकरणकारांना माहीत आहे. तेव्हा त्यावेळी अशा अद्भुत गोष्टी पटूं शकतील इतकी तरी समाजस्थिती होती असे मानावे लागेल.

अशा प्रकारची कल्पित पुराणे सर्वच देशात व सर्वच धर्मांत आहेत; आणि ती इतिहास आहेत असा सर्व धार्मिक लोकांचा समज आहे. अलिकडील अश्रद्धालू लोकच मात्र त्यांना कल्पित म्हणतात.

तथापि इतर धर्मातील पुराणांपेक्षा आमची पुराणे आम्हांला शास्त्राने व इतिहासाने सिद्ध करता येतात हा विशेष आहे. मी **'सुरतरु'त** याचा विचार करणार असून, **'पुराणमीमांसा'** या नांवाचा ग्रंथही मला लिहावयाचा आहे. शिवाय पुराणातील कथा तशाच अद्भुत अंशाने वेदातही सापडतात.

७९२. पुराणांवर आता हिंदूंचा विश्वास कुंठित झाल्यासारखा कां झाला आहे ?

जे श्रद्धालू आहेत त्यांचा तर कुंठित झाला नाही किंवा जे आमच्याकडच्या शास्त्राचे विचारी आहेत त्यांचाही झाला नाही; परंतु मध्यम वर्गाचा मात्र - पूर्वी पाश्चात्यांना आमची पुराणे खरी वाटत नव्हती म्हणूनच कुंठित झाला आहे.

आता जडशास्त्रामध्ये विमानादिकांच्या कलांनी आणि मानसशास्त्रामध्ये टेलीपथी आदिक शोधांनी पाश्चात्त्यांचा विश्वास आमच्या पुराणांवर बसत आहे; परंतु आमचा मध्यम वर्ग इकडे व तिकडे दोन्हीकडे उद्योग करण्याला असमर्थ असल्यामुळे आळसाने अविश्वासीच रहात आहे हे दुर्दैवच होय.

७९३. आर्यपुराणात उत्तंकमेघ, गंधकोष्णजल आणि स्त्रियांचा उतावळेपणा इत्यादि स्वाभाविक गोष्टींचे कृष्ण-राम-युधिष्ठिरादि चेतन पुरुषांकडे कर्तृत्व कसे दिले आहे ?

स्वभावप्रवर्तक तदाधिकारिकत्वेकरून! सध्याचे वळविलेले कालवे आणि जळत असलेल्या कोळशाच्या खाणींचे कर्तृत्व माणसांकडे नाही काय?

विशेषता विशेषसामर्थ्यावर अवलंबून असते. परमेश्वरही उगीच प्राकृत गुणांचा नाश करून सांकल्पिक उत्पत्ती करीत नाही, म्हणून रामकृष्णादि कथा विरोधी नाहीत.

इतिहास लेखन

७९४. अलीकडे प्रत्येक गोष्टीकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याची लोकांची मनीषा योग्य आहे काय?

ही संवय पाश्चिमात्य उत्क्रांतिवादाने लागलेली आहे, व जुने तितके सर्व वाईट असा तिचा अभिप्राय निघत आहे. पण असे मानले तर -

१- एखाद्यावर आपला फार दिवसांचा स्नेह असल्यास तोही अगदी कुचकामाचा ठरणार!

२- नवे रोग जरी उत्पन्न झाले तरी ते सुधारलेले समजावयाचे व जुन्या निरोगी स्थिती जरी असल्या तरी त्या वाईट समजावयाच्या की काय?

३- नदीच्या उजळ पाण्यापेक्षा पुराने ओंगळ झालेले पाणीच पिण्याला चांगले समजावे काय?

तात्पर्य, ज्या गोष्टी नित्य आहेत अशा गोष्टीविषयी जुना इतिहासच बरा आहे; आणि ज्या गोष्टी बदलणाऱ्या आहेत अशा गोष्टीविषयी पाहिजे असल्यास नवेपणाची घमेंड मारावी.

७९५. एक पाश्चिमात्य भट्ट ऐतिहासिकविकासाने धर्मात अनंताची कल्पना आली म्हणतात, ते योग्य आहे काय ?

मला नाही वाटत योग्य ! कारण अशा प्रकारची कल्पना स्वप्नावरूनही येणे शक्य आहे; आणि ऐतिहासिक विकासवाद मला मान्य नाही.

७९६. ऐतिहासिक विकासवाद तुम्हांस मान्य आहे काय ?

नाही; कारण ऐतिहासिक विकासवाद मानल्यास सर्वदा विसदृश गोष्टीच घडत गेल्या पाहिजेत. सदृश गोष्टी घडतील तर कालाचा निर्णय होणार नाही;

पण हा विश्वप्रवाह सदृश व विसदृश घटकांशांनी बनलेला आहे व यावरूनच विश्व अनादि आहे असे आम्हा आर्यांचे सांगणे असते. सर्वथा वैसदृश्य कबूल केल्यावाचून कोणत्याही वस्तूचा आरंभ व ऐतिहासिक विकास मानणे शक्यच नाही. सादृश्याने आरंभाच्या पूर्वीही तसे असण्याचा संभव मानावा लागतो.

७९७. इतिहास कशाला म्हणतात आणि शास्त्र कशाला म्हणतात?

'आतापर्यंत असे झाले' हे सांगण्याचे नांव इतिहास आहे;

आणि 'असे असे मागे होते, आतां आहे व पुढेही राहील' हे सांगण्याचे नांव शास्त्र आहे.

जसे, तीस कोटी हिंदु आहेत, हा इतिहास होय.

माणसे पुनः पुनः उत्पन्न होत असतात व लयाला जात असतात, कारण ती अनंत आहेत. तीच गोष्ट हिंदूलाही लागू आहे - असे सांगणे हे शास्त्र होय.

एखाद्या गोष्टीचा कितीही शोध लावला तरी इतिहासातच भर पडते, शास्त्रात भर पडत नाही. 'वाचकरूपाने व्याख्यामय व वाच्यरूपाने अनंत तत्त्वमय' असे शास्त्र असते.

इतिहासकाराने कितीही नवे नवे शोध लावले, तरी त्यायोगाने शास्त्रकारांचा अधिकार कमी होत नाही.

जसे, आता अनेक बेटे सांपडली, अनेक वस्तूंचा शोध लावला तरी **'नानारत्ना वसुंधरा'** या वचनाचा अधिकार त्या शोधाने कमी झाला नसून उलटी त्याची सत्यताच अधिक पटत आहे.

७९८. शास्त्र येत असून त्यातील रहस्य कोणाला समजत नाही?

त्यांतील भाषेवर किंवा इतिहासावर ज्याचा भर दिसून येतो त्याला!

७९९. इतिहासाचा सगळीकडे संशयच आहे; तर मग विश्वास कोणावर ठेवावा?

महात्म्याने लिहिलेल्या इतिहासावर!

कारण संशयग्रस्ताला सहवासानेच निश्चय करावा लागतो.

८००. आर्यधर्मात इतिहास देखील मोठ्यांनीच लिहावा असे कां म्हटले आहे?

१- वचने, २- आचरण व ३- आचरणारी मनुष्ये ही त्रिपुटी आर्यधर्मात अनादि मानली असून धर्माला तिची जरूरीही आहे.

१- श्रुती वचनप्रमाण २- स्मृति आचरणप्रधान व ३- पुराणात आचरणाऱ्या मनुष्यांच्या कथा! असा हा एकंदर धार्मिक क्रम आहे. श्रुती, स्मृती व सदाचार ही तिन्हीही धर्माची लक्षणे होत, असे सर्वत्र सांगितले आहे.

आता, इतिहास जर सर्वज्ञप्रणीत नसला, तर कर्णाने प्रसंगी आपल्या आईचे ऐकले नाही हा त्याने धर्म केला की अधर्म? इत्यादी गोष्टींचा निर्णय कोण कसा करणार?

खाणे, पिणे, निजणे, बसणे, बाहेर जाणे इत्यादी सर्व गोष्टीत आम्हां आर्यांना धर्मावाचून दुसरे काही दिसत नाही.

अलिकडच्या इतिहासात तिथीसुद्धा विश्वसनीय सांपडत नाही, तर मग धर्माचा लाभ त्यापासून आम्हांला काय होणार !

म्हणून - सर्वज्ञप्रणीत असे रामायण व महाभारतच आम्ही इतिहास समजतो, आणि एवढ्याचकरता साधूंनी लिहलेले इतिहासच आम्हाला प्रमाण वाटतात.

८०१. रामायण-काव्य कल्पित आहे असे कोणी म्हणतात, याविषयी आपले काय मत आहे?

मालतीमाधव प्रकरणातील माधवाचा जन्म कोणी करीत नाही. परंतु चैत्र शुद्ध नवमीच्या दिवशी रामाचा जन्म सर्व लोक करतात म्हणून रामायण कल्पित नाही असे माझे मत आहे.

शिवाय 'बुद्ध चांगल्या गुणांचा नव्हता. ईशपुत्र म्हणून कोणी झालाच नाही.' इत्यादिक प्रलाप मूर्ख लोक सर्वच धर्मस्थापकांविषयी काढतात. परंतु काही नवे, प्रवासाला जाताना सूर्याला नमस्कार करतात; हा स्वाभाविक धर्म ते विसरतात.

८०२. स्तुती करणाऱ्यापेक्षा निंदा करणारांनी लिहिलेला इतिहास चांगला असतो असे कित्येकांचे मत आहे ते बरोबर आहे काय?

जगात राग मात्र आहे व द्वेष असा काही नाही, शिवाय चुका सर्व प्रेमातच होतात, द्वेषात मुळीच चूक होत नाही; हा सिद्धान्त ज्या दिवशी गणितातील सिद्धान्ताप्रमाणे सत्य होईल त्या दिवशी ह्या लोकांचे म्हणणेही खरे होईल.

स्वोत्कर्षबोधक इतिहास

८०३. इतिहासावर विश्वास कसा ठेवावा ?

माझे मत तर असे आहे की, दिव्यदृष्टी ज्याला आहे अशा पुरुषांनीच लिहिलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा;

आणि दिव्यदृष्टीचा प्रयत्न नसेल किंवा तीवर विश्वास नसेल तर स्वोत्कर्षबोधक लिहिलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा. कारण एकमेकांचे विरोधी एकमेकांच्या इतिहासाचा लोप नेहमी करीतच असतात;

हे प्रस्तुत परिस्थितीवरून आपल्याला कळण्यासारखे आहे.

८०४. तर मग इतिहासात शोध लागणे शक्यच नाही म्हणावयाचे?

होय, त्यातील खरा शोध लागणे जीवबुद्धीच्या आटोक्यात नाही, असे माझे मतच आहे.

प्रत्यक्ष लेखादिकांवरून जेवढा शोध लागला त्यावर कसा तरी विश्वास ठेवावा पण त्यावरून एखादे अनुमान काढले की बहुशः चुकीचे ठरते.

८०५. मग तुमच्या मताने ऐतिह्य प्रमाणच नाहीसे झाले?

तसे नव्हे; प्रमाणाला सामान्य सत्ता अपेक्षित आहे. इतिहासाची सामान्य सत्ता कोणीही नाकबूल करीत नाही. परंतु जेथे विकारात्मक लेख दृष्टीस पडतात, तेथे दिव्यदृष्टीवाचून कोणत्याही रीतीने इतिहास समजणे शक्य नाही; पण -

दिव्यदृष्टीचा आव घालून एखाद्याने तशा इतिहास लिहिला, तर तो इतिहास आपल्याला आपल्या जाग्याहून ओढणारा असल्यास, आपल्यातील दिव्यदृष्टी पुरुषाचा शोध करून किंवा आपण ती दिव्यदृष्टी संपादन करून खरेखोटेपणाचा निवाडा करून घ्यावा.

असे प्रत्यंतर पाहण्याला आपल्यामध्ये शक्ती नसली तर दुसऱ्याच्या दिव्यदृष्टीवर विश्वास ठेवू नये व तो इतिहासही खरा समजू नये.

स्वधर्मपोषक जर इतिहास असेल तर कोणीही सांगितल्यास विश्वास ठेवावयास हरकत नाही.

तसाच विकाररहित व अनिच्छित असेल तर विश्वास खुशाल ठेवावा.

इतिहासात शत्रूच्या तोंडची स्तुती व मित्रांच्या तोंडची निंदा नेहमी खऱ्या स्थितीची निदर्शक समजल्या जाते.

परंतु हा एकंदर संदिग्धपणा पुराणादि जे तात्त्विक इतिहास यांना लागू नाही, कारण त्यांची सृष्टीतील अंतर्बाह्य नियमांनी सिद्धी करता येते.

काव्य निर्मिती

८०६. परमेश्वरकविता प्रासादिक चांगल्या की श्रमाने केलेल्याही चांगल्या?

प्रासादिक तर चांगल्याच, त्याबद्दल कोणाचाही विवाद नाही पण श्रमाने केलेल्याही चांगल्याच; कारण अंतःकरण गढवून परमेश्वरी श्रम करणे काही सुलभ नाही. प्रसाद देखील पूर्व श्रमाचेच फल आहे, दुसरे काही नाही. नाहीतर दगड, झाडाला देखील प्रसादप्राप्ति झाली असती. कोणत्याही भगवन्निष्ठ उपायाने जर प्रसाद होतो तर भगवंताचे गुणगान करणे हाही प्रसादोपाय नव्हे काय! हे सर्व तुला वर सांगितलेच आहे.

भूतावेशनिवेशिताशय इव श्लोकं करोत्याशु यः ।
श्लाघ्यन्ते कविरद्भुतोऽयमिति तं मिथ्याजना विस्मितः।
द्वित्रिण्येव पुरःपदानि रचयन् पश्चात्समालोचयन् ।
दूरं यः कविता निनीषति कविः कामीव सः स्तूयताम् ।।

८०७. मग तुकारामहाराजांनी ''कवीश्वराचा तो आम्हासी विटाळ'' असे म्हटले आहे त्याची वाट काय ?

भगवद्भिन्न कवित्वाचा त्यांनी तेथे निषेध केला आहे. नाही तर सर्व ग्रंथारंभी संतांनी कविजनांना नमस्कार केले आहेत, त्याची वाट काय होईल? आणि तातांनीही

'वाचे बरवें कवित्व । कवित्वी बरवें रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शू जैसा' असे म्हटले आहे.

८०८. पण कवित्व करण्यामध्ये अभिमान उत्पन्नच होतो ना! आणि त्यामुळे मनुष्याला धुत्कारणेही होते?

परमेश्वरासाठी अभिमान झाल्यास काही हरकत नाही. कारण

'जे अभिमान वाहती आंगी । आम्ही हरीचे भूषावयालागीं'

असे तातांनी म्हटले आहे. अधर्मीपुरुषाला धुत्कारून देणे साधुपुरुषाला काही गैर नाही परंतु परमेश्वरीपुरुषास मात्र त्यांनी आपल्या कवित्वाच्या अभिमानाने धुत्कारू नये.

८०९. मग दुसऱ्याचे चोरून घेऊन त्यावर आपले नांव टाकावे याविषयी आपले काय मत आहे?

माझे मत असे आहे की, अत्यंत जुने किंवा अत्यंत नवे असे काव्य कधी उत्पन्न होत नसते. अत्यंत जुन्या काव्यास पाठांतर म्हणतात व अत्यंत नव्या काव्यास बडबडणे म्हणतात.

८१०. तर मग जुन्या नव्याची भेसळ करणे म्हणजे काव्य की नाही?

छे छे ! तसे मुळीच नाही. तसे मानले तर -

यस्य ज्ञानदयासिंधु लगा धक्का सो गिरपडा ।
सेव्यतामक्षयोधीराः सस्त्रीच्या मुतलास कसा ।।

यालाही काव्यच म्हणावे लागेल !

८११. तर मग तुमच्या मते काव्य म्हणजे काय ?

शब्दार्थ जरी जुने असले तरी रसानुकूल त्यांची योजना करणे हे नवीन असते म्हणून याला मी काव्य म्हणतो. याविषयी वचनही आहे ते असे

त एव पदविन्यासा ता एवार्थविभूतयः ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलम् ।।

परंतु दुसऱ्याचे चोरून घेऊन जे कविता करतात, त्यांत त्यांचे नांव फक्त नवे असते. त्यामुळे ती

कविता परमेश्वरासाठी केली असे होत नसून, आपली कीर्ती होण्यासाठी केली असा स्पष्ट ध्वनी निघत असतो. म्हणून तशी कविता करणे घातक आहे. त्याचप्रमाणे -

भगवद्व्यतिरिक्त माणसांची स्तुती करणेही घातकच आहे.

हरिगुणाविण जो यमका करी ।
धरि न दंड तरी यम कां करी ।।

असे वामन पंडिताने म्हटले आहे. आता प्रसादिक कवितेत आणि श्रमाच्या कवितेत नियमित फरक इतकाच ठेविला पाहिजे की -

श्रमाची कविता फक्त लालनपरच असली पाहिजे; आणि प्रासादिक कविता कोणत्याही रसात चालते. श्रमाची कविता इतर रसात करणे ती मोठी सांभाळून केली पाहिजे.

८१२. मग जगन्नाथपंडितादिकांनी लवंगीचे स्तवन केले आहे, तेव्हा ते कवि नव्हते काय ?

जगन्नाथपंडितांच्या गंगालहरीस्तवनापेक्षा लवंगीचे स्तवन कोणी काही अधिक मानीत नाहीत परंतु बायकोची जे प्रार्थना करतात, त्यापेक्षा त्या विषयात देखील त्यांचे प्रबल चातुर्य दिसून येते. हे त्यांचे अस्मद्विशिष्टत्व होय. कोणतेही काम एखाद्याला करता आले तर त्या गुणात त्याची तारीफ होणार नाही काय ?

८१३. आपण श्रमाच्याही कवितेला मान दिला आहे, पण असा कोणी कोठे मान दिला आहे काय ?

होय, दिला आहे, याविषयी तुला एक आख्यायिका सांगतो.

एक वेळ सरस्वती चालली असता दंडी व कालिदास या दोघांनी तिला पाहिले. तेव्हा दोघांनीही आपआपल्या काव्यांनी तिचे वर्णन केले. त्या वेळी सरस्वती म्हणाली :- **कविर्दण्डी कविर्दण्डी कविर्दण्डी न संशयः ।**

तेव्हा कालिदास म्हणाला, **''रंडे, कोऽहम्?''** - रंडे, मी कोण आहे?

सरस्वती म्हणाली, **''त्वं तु अहमेव ।''**

याचा ध्वनी असा की, कालिदासाला देवीचा वरच होता. तेव्हा सरस्वतीचे म्हणणे असे की, तुला माझे वर्णन करता आले यात आश्चर्य काय? पण दण्डी जीव असून त्याला वर्णन करता आले हे आश्चर्य आहे.

श्रमाच्या कवितेत मात्र भगवंतावाचून इतर विषय आणूच नयेत.

८१४. आपला कवितेविषयी इतका आग्रह कां असावा ?

मला कविता करता आल्यासारखे वाटते म्हणून! ज्याच्याजवळ जी शक्ती आहे, तिचा परमेश्वराकडे उपयोग करणे हे त्याचे कर्तव्य नाही काय? शंकराला बेलच आवडतो, म्हणून फुले त्याला वाहूच नयेत काय? भगवद्विषयक कवित्वाचा कोणी निषेध केला नाही, तर तातांनी उलटा विधी सांगितला आहे.

८१५. तुम्ही कविता प्रासादिक करता की श्रमाच्या करता?

हे तुला कशाला विचारावयास पाहिजे? मी दोन्ही प्रकारच्या करीत असेन, किंवा तुला वाटेल तशा करीत असेन.

बोधामध्ये सामान्य सिद्धांतच आला पाहिजे, जितका व्यक्तिविषयक न येईल तितका बरा!

८१६. भगवद्विषयक कविता कितीही अशुद्ध असली तरी साधू तिचे ग्रहण करतात, हे खरे ना?

हे खरे असले तरी त्यात एक रहस्य आहे. साधू ग्रहण करतीलच.

कविता करणयाऱ्यास असे न वाटले पाहिजे की, माझी अशुद्ध कविता असली तरी साधूंनी ग्रहण करावीच. कारण तशाने 'माझी कीर्ती साधूंनी करावी' असा आशय अंतःकरणात स्पष्ट होतो.

८१७. मग ज्याला व्याकरण येत नाही, अलंकारशास्त्र येत नाही, अशाने श्रमाची कविताच करू नये काय?

कवितेचा अभिमान असेल तरी करूच नये;

आणि भगवत्प्रेमाच्या भरात केल्या गेलीच, तर तिचा अभिमान धरू नये.

प्रासादिक कवितेवर या शंका अर्थातच येत नाहीत.

८१८. सुशिक्षित मंडळीत कोणाच्या कविता तुम्हांस पसंत आहेत?

फारशा माझ्या वाचण्यात आल्या नाहीत व आल्या त्यातील कोणतीच पसंत नाही.

८१९. यमकाविषयी वगैरे बंधने असू नयेत, याविषयी अलीकडे वाद निघाला आहे; याविषयी तुमचे काय म्हणणे आहे?

मला वाटते, हा वाद निरर्थक आहे. कारण, या फाजील मंडळीला असे वाटत असते की, कवितेशिवाय तर कीर्ती होत नाही; आणि यमकादिकांनी बद्ध कराव्या तर आपल्यास करता येत नाहीत! म्हणून तिच्या बंधनावरच टीका करून वाटेल तशा कविता समाजात घुसडून द्याव्या म्हणजे झाले!

८२०. तुकारामांच्या व एकनाथांच्या कवितेत काही ठिकाणी साम्य दिसते.यावरून एकनाथांच्या कविता तुकारामांनी चोरल्या आहेत की नाहीत?

कां? समान कल्पना प्रसादाने कोणास स्फुरू नयेत असे तुझे मत आहे काय?

८२१. नाही; पण मग तुम्ही आर्येतर ग्रंथकारांनी आर्यांच्याच ग्रंथांची भाषांतरे करून घेतली असे कां म्हणता?

कुराणातून अद्वैत तत्त्वज्ञान निघाले, बायबलवरून गीता झाली.होमरच्या इलियडवरून वाल्मीकिरामायण झाले; आणि ग्रीक ड्रामाजवरून संस्कृत नाटके झाली असे दुसरे म्हणतात म्हणून!

आणि आमचे म्हणणे आम्हाला तत्त्वतःही सिद्ध करता येते, कारण त्या शास्त्रांचे मूलतत्त्व भाषान्तराच्या मूळाप्रमाणे आमच्याकडे मिळते; हेही एक माझे तसे म्हणण्याचे कारण आहे.

संगीत

८२२. आपल्या इकडे संगीतात फरक झाला आहे तो मुसलमानांनी केला असे म्हणतात, ते खरे आहे काय?

मला तसे वाटत नाही; कारण रागात जरी फरक दिसत असला, तरी रागांची नांवे व स्वरांची नांवे सर्व संस्कृतच आहेत. जरी विवरणस्वरांमध्ये परिवर्तन होऊन ते पांचच मानल्या गेले आहेत, आणि जरी श्रुतीची जाती-ग्राम-मूर्च्छनाचा व्यवहार नष्ट झाला आहे, तरी विवरणस्वराला कोमल, तीव्र ही नांवे संस्कृतच आहेत. तसेच तालालाही बहुधा संस्कृतच नांवे आहेत.

आता हमीर, हिंडोल इत्यादि राग व फिरदोस्त इत्यादि ताल जरी यावनी आहेत, तरी त्यातील स्वरांचे नांव व तालांचे नांव हे संस्कृतातच आहेत.

पुनः ध्रुपदे गाणारी जी मुसलमानांची घराणी आहेत, त्यात अमुक खांसाहेबाचे घराण्याची अमुक वाणी, असे जे उर्दू ग्रंथात लिहिले आहे, त्या वाणीची नांवेही संस्कृतच आहेत.

सध्या गौरीहारी वाणीची ध्रुपदे चालू आहेत.गौरीहारी नांवही संस्कृतच आहे.हरगौरी असे तिचे मूळ रूप आहे. द्रुतविलम्बित मात्रांची नांवेही सध्या संस्कृतच चालू आहेत. देशी संगीत अधुना प्रसिद्ध म्हणून रत्नाकरातही निराळे दिले आहे; आणि देशी संगीत, आवडेल तसे देशातील लोक गात असतात, असे रत्नाकारात सांगितले आहे.

त्याप्रमाणेच ज्याला श्रुति, ग्राम व जाति इत्यादिकांचे नियम नसतात, त्याला देशी संगीत म्हणतात, असे हनुमंताचे म्हणणे कल्लिनाथाने आपल्या टीकेत दिले आहे म्हणून रंजकत्व एवढेच त्याचे लक्षण राहते; तथापि प्रत्येकाचे रंजकत्व निराळे व बहुरंजकत्व निराळे. बहुरंजकत्व ज्या ज्या गोष्टीला म्हणून असते, त्यात काही तरी सामान्य तत्त्वे असलीच पाहिजेत. कारण ''बहुग्राह्यत्व सामान्य तत्त्वानुसार असते'' हा नियम अबाधित आहे. म्हणून श्रीरागाला 'काफी थाटा'तून काढून 'पूर्वी थाटा'त घालणे रक्तिदृष्टीने देशी संगीताचार्यांच्या अधिकाराच्या बाहेर नाही.

''शास्त्र जर लक्ष्यविरुद्ध असले तर तेथे लक्ष्यसंगीतच अधिक प्रमाण आहे'' अशी रत्नाकराची आज्ञा आहे. शिवाय असे परिवर्तन करणाऱ्यात मुसलमानांची नांवे फारशी नाहीत. तानसेनाचे नांव प्रसिद्ध आहे; परंतु त्याचे नांव आमच्या भविष्य-पुराणात दानसेन असे आहे; आणि तानसेन म्हटले तरी ही पदवी आर्य क्षत्रियांनाच प्रसिद्ध आहे, आणि तान हा शब्दही ''तन्'' धातूपासून झालेला असून तो संगीतशास्त्रप्रसिद्ध आहे. तानसेन रजपुताचा मुसलमान झाला होता, असे संदिग्ध घेऊन चाललो तरी त्याने केलेले परिवर्तन हाडाच्या हिंदूनेच केलेले ठरेल.

'युक्लीड'च्या अकरा पुस्तकांची मूळ पुस्तके जयपूरच्या लायब्ररीत सांपडलेली प्रसिद्ध झाल्याचे मी वाचलेले आहे. तसे हिंदु संगीतही ग्रीकमध्ये आहे, असे माझ्या वाचण्यात आहे. ही पुस्तके काही इंग्रजी आहेत व काही मराठी आहेत. ग्रंथविस्तारभयास्तव पुस्तकांच्या नावांची यादी येथे लिहिली नाही.

शिवाय इतिहास संदिग्ध असल्यास स्वपोषक ग्रहण करणे योग्य असते.

यवनांनी आमच्या ग्रंथांचे भाषांतर करून नंतर ग्रंथ जाळले आहेत, अशा प्रकारची गोष्ट मी काही वैद्यक पुस्तकात वाचली आहे. मुसलमानी वैद्यकात केशराला जाफ्रान वगैरे नांवे जशी आहे, तशी संगीतातील स्वरांना पार्शी नावे नाहीत, तर ती संस्कृतच आहेत. म्हणून विश्वामित्री सृष्टीप्रमाणे जरी काही संगीतात यावनी फरक झाले असे मानले तरी पुष्कळ संगीतातील लक्ष्यानुसार परिवर्तन आर्यांनीच केले आहे व तेच आम्ही गात आहो याला गजल, रेख्ता वगैरे पार्शी नांवे संस्कृतभिन्न आहेत हा पुरावा आहे.

८२३. युरोपियन लोक नादशास्त्राच्या नियमाप्रमाणे आपले संगीत उभारतात व ते फार चांगले आहे असे आमच्याकडील काही संगीतज्ञ म्हणविणाऱ्यांचे मत आहे, ते योग्य आहे काय?

नुस्ते नादाच्या गणिताने स्वर बसविल्याने रक्ती येत नसते. रक्ती म्हणून काही निराळी आहे. म्हणूनच आमच्या इकडील संगीताचार्यांनी -

''रंजितस्वरसमुदायो रागः''

असे लक्षण केले आहे. हे रुचीच्या उदाहरणावरून फार सुलभ होईल. नुसते गहूं किंवा तांदूळ खाल्ल्याने काही रुचिकर लागत नाहीत, तर त्यांची पक्वान्नेच रुचिकर लागत असतात.

त्याप्रमाणे नुस्त्या नादशास्त्राच्या गणिताने सिद्ध झालेले खडे स्वर रक्ती आणीत नाहीत. त्याला रागस्वरूप करण्याची हातवटी पाहिजे. जरी पाश्चात्य संगीतात हार्मनी आहे तरी ती प्रा न्नावाचून गहूं-तांदूळ मिसळल्याप्रमाणे आहे. रक्ती म्हणून काही निराळी नसती तर कुत्रा-गाढवादिकांचे ओरडणेही संगीत झाले असते.

८२४. पण रक्ती संवयीवर अवलंबून आहे असे काही म्हणतात ना?

संवयीवर अवलंबून असली तर समाजाला जी संवय पडते ती काही नियमानुसार पडत असते. पुष्कळ संवयींचे कारण शिष्टस्वीकृतत्व हे आहे. आपण ज्यांना मोठे समजतो, त्यांचे अनुकरण करावेसे वाटते. साधे आंगरखे जाऊन कोट पटलोनाची तयारी तरी, आपण ज्यांना मोठे समजतो त्यांनी आपल्या वेषाला चांगले म्हणावे एवढ्याचकरता बहुधा असते.

आमच्या संगीताला नावे ठेवाणारे आम्हीच असून, आमचे ऋषी आम्हालाच श्रेष्ठ वाटत नाही. दुर्दैव आमचे

पुनः रुची दोनप्रकारची असते. पहिली स्वाभाविक व दुसरी कृत्रिम. यथा ऋतुकाली उत्पन्न होणाऱ्या मधुर फलाची रुची स्वाभाविक होय आणि निरनिराळ्या प्न्नांची रुची कृत्रिम होय; त्याप्रमाणे (१) मार्गी संगीतात स्वाभाविक रक्ती असून (२) देशी संगीतातील रक्ती कृत्रिम आहे; (३) आणि नुसत्या गणितजन्य खड्या स्वरात रक्तीच नाही असे माझे मत आहे.

शिवाय कृत्रिम पाकाचा जसा इष्टानिष्ट शरीरावर व मनावर परिणाम होतो, तसा तो स्वरसमुदायाचाही झालाच पाहिजे. म्हणूनच गाण्याने रोग दूर होतात, मुलाला झोप येते. गाण्याने जरा (वार्धक्य) लवकर येत नाही, हे आमच्या वायुपुराणात सांगितले आहे; आणि जर्मनीत गाण्यानेच क्षय होत नाही व गाण्यानेच रोग दूर होतात, हे पाश्चात्य पंडितही कबूल करू लागले आहेत.

युरोपियन संगीतापेक्षा हिंदु संगीतच स्वाभाविक आहे असे पाश्चात्य पंडित म्हणतात. हा लेखही एका मासिक पुस्तकात आला होता. यातील बरेचसे लेख मी उतरून घेतले आहेत.

सुधारणा

८२५. सुधारणा व दुर्धारणा कशाला म्हणतात ?

ज्याने आपली शारीरिक व मानसिक शक्ती कायम राहून, पैसा कमी लागून गरजा वाढणार नाहीत, अशा व्यावहारिक गोष्टी घडवून आणण्याला सुधारणा म्हणतात. बाकी सर्व दुर्धारणा समजावी.

८२६. भौतिक सुधारणा वाढली म्हणजे अनीती वाढते हे कशावरून?

तिचे क्षेत्रफळ संकोचित होण्याकरता कायदे होतात यावरून! विमान व उन्नदी वगैरे यंत्रांकडे पाहिले म्हणजे सहज समजेल. कारण त्याने चोरांना व सर्वांना सारखाच खुला मार्ग झाला आहे.

८२७. सर्व नवीन सुधारणा आपणास पसंत आहेत काय?

मला असे वाटते की, धर्म पुष्कळ सांगितला आहे पण त्यातून जसे आपल्याला सार निवडून घ्यावयाचे असते, तसे नवीन सुधारणेतून सार निवडून घेणे बरे.

मतलबासाठी धर्मातून सार निवडून घ्यावयाने व सुधारणेचे जूं बैलाप्रमाणे कसेही खांद्यावर घ्यावयाचे! याला मी 'सुधारणावेड' म्हणतो.

कितीही खटपट केली तरी, सर्व मनुष्यांच्या सुखाकरता सुधारणा होणे शक्यच नाही. कल्पना कर की, मनुष्याला मरण येणार नाही इतकी भौतिक शास्त्रांची सुधारणा झाली, तरी प्रजावृद्धी करावी की नाही? हा प्रश्न राहील. प्रजावृद्धी केली तर जीवनार्थ कलह वाढल्यावाचून राहणार नाही. आणि न केली तर मैथुनासक्ति सोडावी लागेल. तात्पर्य काय की -

वैराग्यरूप धर्माचेच कोणत्याही रीतीने अवलंबन करावे लागेल.

८२८. कां गर्भाशय काढून टाकणे हा एक उपाय आहे ना?

वाहवा रे वाहवा, काय म्हणावे या सुधारणेला! सुधारणा हा एक रोग लागला आहे असे एका पंडिताने म्हटले आहे, तेच बरोबर आहे म्हणावयाचे! अशा कृत्रिम उपायाने खरे व्यवहारसुखही होत नाही.

सुधारणादृष्ट्या आणखी धर्माचे महत्व आहे, ते असे की, सगळीकडे विमाने चालू लागल्यास प्रत्येकाचे जीवित संशयी होणार. कोणावर केव्हा कसा प्रसंग येईल हा नियम राहणार नाही. तेव्हा अमुक असे करणार नाही इतका विश्वासच केवळ आधार राहील.

'नको ही सुधारणा;
रानटी असतो तर सुखाने खावयाला तरी मिळाले असते.'
असे उद्‌गार ज्याच्या त्याच्या तोंडून बाहेर पडतील,
हे मी तातांची शपथ घेऊन सांगतो.

नवीन सुधारणेमुळे मनाची ज्ञा बाजू अगदी खाली पडत आहे.

प्रत्येक मनुष्याचे स्वास्थ्य नाहीसे होत आहे.

सुधारणेपासून श्रीमतांचा पैसा पाण्यासारखा खर्च होत असून गरीबांच्या मनात कलहाचे उमाळे येत आहेत.

आम्हाला गर्भदुःख परमेश्वराने कां द्यावे, असा प्रश्न स्त्रिया त्याला विचारू लागल्या आहेत. म्हणून-

जसे आपल्या अल्पज्ञतेमुळे धर्मातून सार निवडून घ्यावे लागते तसे आपल्या अल्पशक्तित्वामुळे सुधारणेतून सार निवडून घे.

८२९. सुधारणेचा मोठा दोष आपणाला कोणता वाटतो?

सुधारणेत मला मुळीच दोष वाटत नाही, सुधारकातच दोष वाटतो. सुधारणेने हळुहळू त्याचा माणूसपणा नाहीसा होत आहे.

जे गाणे माणसाला यावयाचे ते सवनीकने (रेकॉर्डरने) विकत घेतले आहे. माणसाची शक्ती यंत्राने घेतल्यामुळे व्यायामरहित अशी रोगी माणसे झाली आहेत. आणि हे असेच चालले तर यंत्रे फोडून टाकण्याबद्दल कायदा न होवो! म्हणून धर्माचे अवलंबन करून सुधारणेतील सार निवडून घे. ब्रह्मज्ञान व भगवद्भक्तीवाचून **'अति सर्वत्र वर्जयेत्'** या म्हणीचा उपयोग कर.

८३०. मनुष्यातील गुण कशाने नाहीसे होतात?

सर्वच कामे यंत्राकडून करवून घेतल्याची संवय लागल्याने !

यंत्राने, असलेल्या गोष्टीच जरी कायम राहत असल्या तरी नवीन शोधून काढणे मनुष्याच्या बुद्धीचेच काम आहे. यंत्रे देखील मनुष्याच्या बुद्धीचाच परिणाम होत. पण स्वतंत्र यंत्राच्या हाती गेले तर मनुष्याचा अभ्यास नाहीसा होऊन शोधही लागणे दुरापास्त! नन्नुकीने (फोनोग्राफने) हल्ली आर्यांमधील गाण्याचा नकाशा उतरला आहे, हेच याचे उदाहरण होय.

८३१. यंत्राने प्रत्येक काम घेतल्याने सुख होतेना?

होत असले तरी यंत्राबरोबर मनुष्याने आपल्या संवयी नाहीशा करणे योग्य नव्हे. कित्येकांना घड्याळावाचून दिवसच समजत नाही व रात्रही समजत नाही. अशांची मोठ्या कामाचे वेळी त्रेधा होते.

अडचणीच्या व्यवहारात यंत्राचा उपयोग केलेला चांगला !

८३२. अन्य देशातून नवे कलाज्ञान संपादावे की नाही?

निश्चयाने संपादावे परंतु जुन्याचा अभिमान मात्र सोडू नये. याचे कचगाथा उदाहरण आहे. खानदेशातील एका गावातील हालणारे दोन मनोरे, दिल्लीतील लोखंडाचा खांब, पुराणातील दैविक विमाने व बृहत्कथेतील यांत्रिक विमाने विसरून जाऊ नयेत.

पारमार्थिकाचार्य-सन्निविष्ट कलागुरुधृक् न व्हावे.

८३३. शास्त्रे जशीची तशीच ठेवावी की त्यात काही सुधारणा करावी, असे आपले मत आहे?

युक्तिदृष्टीने किंवा प्रमाणदृष्टीने शास्त्रात सुधारणा करण्याचे काही प्रयोजन नाही, असेच माझे मत आहे. पण आध्यात्मिक अनुभव जर अडत असेल तर तशा निरनिराळ्या शास्त्रात प्रक्रिया रचून सुधाराव्या असेही मी म्हणतो. लौकिक किंवा बौद्ध (बुद्धीच्या) अनुभवाच्या दृष्टीने जे शास्त्रावर टीका करतात ते चार्वाक मात्र मूर्ख होत.

८३४. जितके पदार्थविज्ञान आहे तितके तरी पूर्ण आहे, असे आपले मत आहे काय?

मुळीच नाही. मुंग्याइतकी बिनचूक वृष्टिपरीक्षा व वानराइतकी बिनचूक विषपरीक्षा देखील आम्हाला समजत नाही. म्हणून -

'नवीन सुधारणेतील सार निवडून घेऊन धर्माचे अवलंबन कर.'

८३५. आपल्या लोकांना सुधारण्याची आवश्कता किती आहे?

तत्त्वदृष्टीने सुधारणा आपण होऊनच आर्यांकडे धाव घेत आहे. अजीजनं (रेडीयम) यासारखे धातू सांपडून जड शास्त्रातील अनेक तत्त्वात्मक विवाद नाहीसे होऊन सांख्यैकदेशमताच्या प्रकृत्यैकवादाच्या आड ते लपू पहात आहेत. उपयोगदृष्टीने सुधारणेचे महत्त्व अजून चांगले तिकडेही ठरलेले नाही.

'कोणाला त्रास न देता,

सृष्टिमातेपासून मिळेल तितक्यात संतुष्ट राहून धर्माची वाढ करणे,

ही आम्हा आर्यांची मुख्य सुधारणा होय.

परंतु अशा स्थितीत दुसऱ्यापुढे आमचा निभाव लागणे कठिण आहे; म्हणून आपद्धर्मानुसार उपयोगदृष्टीने सुधारणा मला मान्य आहेच, परंतु तीत दोन गोष्टीची पथ्ये पाळल्या गेली पाहिजे. **(१)** जुन्याचा बीमोड न होऊ देणे, आणि **(२)** सर्वस्वी कृत्रिम जीविताच्या आधीन न होणे.

आनंदकुमारस्वामीने 'परिंदने कां नकोत?' (ग्रामोफोनस व्हाय नॉट?) या वरील आपल्या व्याख्यानात म्हटले आहे की, परिंदनाच्या योगाने मनुष्यातील गाणे अगदी बंद होत चालले आहे. यंत्र कितीही जरी चांगले निघाले, तरी मनुष्यासारखे काम ते करू शकणार नाही. हे त्यांचे म्हणणे बरोबरही आहे. कारण –

यंत्राला बुद्धी नसल्यामुळे यंत्रावर अवलंबून राहणाऱ्या मनुष्यांची बुद्धिहि कमी होत असते आणि त्यामुळे कलेला मर्यादित स्वरूप येते,

हे आम्ही मागे सांगितलेच आहे.

कृत्रिम राहाणीच्या (आर्टिफिशियल लिव्हींग) सुधारणेचा तर पाश्चात्य-वादीच आता जोराने निषेध करूं लागले आहेत. फलाहार करणे, उघडे बोडके राहणे इत्यादि त्यांना पसंत वाटूं लागले आहे.याविषयी खात्री करून घेण्याकरता स्वभाव-चिकित्सावादी (Natural healing) (नॅचरल हिलींग) जे अमेरिकेत आहेत, त्यांचे ग्रंथ वाचून पहावेत.

सुधारणेची चढाओढ काही विलक्षण प्रकारची आहे.आम्ही पाश्चात्यांचे अनुकरण करू पहात आहो आणि पाश्चात्य आमच्या जुन्या चालींचे अनुकरण करू पहात आहेत;

पण सुधारणा म्हणजे काही अनुकरण नव्हे किंवा ते नवसंवेदनहि (एन्थुझियाझम्) नव्हे.

पुत्राने वंशाची सुधारणा करावी असे बापाच्या मनात असते आणि सत्पुत्र ती करतोही! परंतु त्याच्या योगाने वंशाचे खंडन होत नाही, उलटी वंशाची कीर्तीच वाढते.अगदीच सुधारणा न करणारा किंवा वंशाला झुगारून देऊन भलतीच सुधारणा करणारा, दोघेही मुळाला सोडीत असतात.म्हणून उपयोगदृष्टीने बेताची सुधारणा काही वावगी नाही.

परंतु हल्ली आमच्यातील सुधारकांना जो अभिमान आहे.तो मुसलमानी धर्मवेडापेक्षाही भयंकर आहे.

कारण एखादा मनुष्य वसिष्ठांचा गौरव करू लागला म्हणजे हे त्याला अंधविश्वासी म्हणून हसत असतात. कां, तर अमका पाश्चात्य त्यांची चूक दाखवितो म्हणून! पण त्या चुकांवरही हे श्रद्धाच ठेवीत असतात. जुन्या लोकांची बुद्धी शास्त्रातून उसनी आणलेली असते, आणि या लोकांची बुद्धी दुसऱ्याच्या तोंडातून उसनी आणलेली असते, इतकाच फरक!

विवेकसिंधु आणि मुखसिंधु यातील फरक लक्षात ठेविला म्हणजे जुन्यानव्यांतील तुलना चांगली होते.

सामाजिक

(राजकीय - व्यापार - शेती)

८३६. समाजकार्य कोणाकडून होईल असे समजावे?

खरोखर निस्पृह असून, जो उगेच उपाधींचे आघात सहन करतो त्यांजकडून!

८३७. वतनाचा गांव कोणता?

जेथे राहून न्यायाने पोट भरता येईल तो!

८३८. निरनिराळ्या देशातील लोकांशी सख्य कशाने होते?

त्यांच्या चालीरीतींच्या विरुद्ध न बोलता आपली चालरीत कायम ठेवल्याने!

८३९. आम्ही धर्मकार्य करावे, की राष्ट्रकार्य?

धर्मकार्य! कारण जागा कोठेही मिळेल, पण गेलेल्या ज्ञा मनोवृत्ती मिळणार नाहीत.

८४०. धार्मिक लोकांना राष्ट्रीय पुढारी दीन समजत असतात?

समजू द्या. त्यांच्या त्या निरपराधी दीनपणातच शस्त्रांच्या धारा बोथट करण्याची शक्ती आहे. हांसण्यापेक्षा रडण्याची शक्ती फार मोठी आहे. रडण्यामध्ये जो हट्ट धरतो, त्याच्यावर शस्त्र धरणाऱ्याची मनोवृत्तीच त्याला स्वतःला खात असते.

ज्याला धड रडताही येत नाही व पुरे हांसताही येत नाही त्याला द्वाड म्हटले आहे. हांसण्यामध्येही क्षुधातृष्णा विसरले पाहिजे व रडण्यामध्येही विसरले पाहिजे, हे मात्र लक्ष्यात ठेव.

रडणाऱ्याला मदत न करणाराला फार मोठे भय आहे. परमेश्वराजवळ तर हासण्यापेक्षा रडण्याचा शतपट उपयोग होतो.

मृत्यूला ठाऊक आहे की, जो तो आपल्याकरता रडतो म्हणून; नाहीतर रडणाऱ्यापुढे मृत्यूची देखील मनुष्याला नेण्याची छाती नाही! नाहीतर त्याची पत जावयाची!

पण रडावे परमेश्वारापुढेच! कारण त्याच्यावाचून आपले रडणे ऐकून घेण्याइतके कोणाचे जीवित स्थिर नाही; अथवा आपल्या रडण्याप्रमाणे लौकर करून टाकावे असे कोणास वाटले, तरी त्याची तितकी शक्ती नसते. एका प्राकृत कवीने म्हटले आहे -

तूं सागर करुणेचा देवा तुजलाचि दुःख सांगावे ।
तुजवांचुनि इतरातें दिनमुख पसरोनि काय मागावे ॥

लेकरूं जितके जोराने रडते तितका तितका त्याचा आईवरचा विश्वास व्यक्त होतो. तशीच गोष्ट भगवद्भक्तांची आहे. परंतु आपण सर्व रडण्यामध्ये सुद्धा लुोपणा करतो.

'ऊठ; आपल्या बलाने परमेश्वराकडे उडून जा, किंवा येथेच बसून जोराने रडून रडून परमेश्वराला आपल्याकडे ओढून आण.'

जो रडण्याचा किंवा बलाचा नुस्ता देखावा दाखवितो त्याच्याकरता इहलोकात व परलोकात फटके ठेविले आहेत.

८४१. राजकीयदृष्ट्या धर्माचे महत्व आहे काय?

अवश्य आहे. पाश्चात्य राष्ट्रांकडे पाहिले तर प्रत्येकजण आपले लढाऊ सामान वाढवीत आहे व त्यामुळे आम्हा हिंदु गरीबांपेक्षा तिकडील श्रीमंतांचे जीवित फार संशयी झाले आहे. परस्पर राष्ट्रात करारमदार होत आहेत खरे, पण काही सामाजिक लोक त्याच्याही विरोधी आहेत.

हिंदुस्थानात धर्माच्या समजुतीवर ज्या जाती संतोषाने कामे करतात, तीच कामे इतर देशात

लोकांकडून जबरदस्तीने करविली जातात; कारण तेथे प्रत्येकाला बरोबरीचा हक्क आहे असे वाटते, म्हणून कलह होतो.

८४२. तर मग तुम्हांला गुलामगिरी पसंत आहे म्हणावयाची?

मला विकतची किंवा पैशाची गुलामगिरी पसंत नाही, पण गुणांची गुलामगिरी पसंत आहे.

'हिंदुस्थानात जी वर्णव्यवस्था गुलामगिरीसारखी भासते,

ती सद्गुण मिळविण्याकरता आहे, पोटाकरता नाही.'

आणि समाज कितीही सुधारणेच्या शिखरावर गेला तरी गुलामगिरी राहणारच! असे माझे स्पष्ट मत आहे.

लोकशाही

८४३. बहुमताने चालावे, की थोड्या मताने चालावे?

जी गोष्ट अधिक महत्त्वाची आहे ती गोष्ट थोड्यांनाच कळत असते, आणि जी गोष्ट व्यावहारिक आहे तिजविषयी बहुमताने चालावे.

ज्या गोष्टीविषयी उत्सर्ग (नियम) असेल त्या गोष्टी प्रमाण आहेतच. पण अपवाद देखील यादृच्छिक समजू नको. कारण अपवाद ज्या अर्थी कोण्या एका अपेक्षेने पुष्कळ होतात, त्या अर्थी त्यांचेही काही मूळ आहे असे ध्यानात धर. अपवाद म्हणून सोडून देणारे मूर्ख लोक शेवटी कांही महत्त्वाच्या सिद्धातांना विसरतात. शब्दावाचून बाकीचे अपवाद बहुधा प्रतिबंधाखाली दबलेले उत्सर्ग आहेत असे लक्षात ठेव.

८४४. बहुमताने निर्णय करावा की एकमताने करावा?

समानशीलव्यसनी पुरुषात परस्पर न्याय बहुमतानेच होतो;

पण विशिष्टशीलात एकमतानेच झाला पाहिजे.

याविषयी तुला एक कल्पित गोष्ट रचून सांगतो -

सिंह आणि कोल्हे

एक वेळ एक सिंह वनात फिरता फिरता कोल्ह्यांच्या कळपाकडे चालला. ते वासाने कोल्ह्यांनी ओळखून कुत्र्याने तोडलेले एक प्रेत घेऊन ते सर्व मिळून त्याच्याकडे गेले, आणि म्हणाले, 'देवा ! तूं आम्हांला खाऊ नको; हे भक्ष्य आम्ही तुझ्याकरता आणले आहे, ते घेऊन आमच्यावर कृपा कर.'

तेव्हा सिंह म्हणाला, - 'तुम्ही मला भ्यालात इतकेच पुरे आहे. मी तुम्हाला खात नाही व हे तुमचे कुत्र्याचे उष्टे चोरून आणलेले भक्ष्यही मला नको.'

कोल्हे म्हणाले, - 'तूं आमच्यापेक्षा थोर व शहाणा आहेस. शहाण्याने बहुमतानेच निर्णय केला पाहिजे. आम्ही सर्व पुष्कळ असून तुला एकट्याला आग्रह करीत आहो तेव्हा आमच्या पाहुणचाराचा स्वीकार कर.'

सिंह म्हणाला, - 'वय, विद्या, पैसा, शील, व्यसन व कुळ यांहीकरून समान असलेल्यांमध्येच बहुमताचा न्याय शोभतो, - यातून एक जर एखाद्याला जास्त असेल तर त्या संबंधात त्याचे एकट्याचेच मत प्रमाण धरले जाते.' 'तुम्हां सर्वांचा मी एकटा फडशा पाडू शकतो, इतके माझे बल असून, तुम्ही चोरून आणलेले प्रेत माझ्यापुढे केले, हा माझा अपमानच केला आहे. तथापि तुम्ही जीवाला भिऊन ही गोष्ट केलीत त्यामुळे मी तुम्हाला क्षमा करीत आहे.'

'मी तुमच्यापेक्षा बुद्धीनेही थोर आहे. म्हणून माझ्यापुढे तुमच्या बहुमताची किंमत काय असणार? दहा पाच लहान मुले ओरडावयास लागली म्हणजे आईबापांनीही त्यामध्ये जाऊन भुंकू लागावे काय?'

समान जातीत तरी बहुशः बलाचे काम बहुमताने व बुद्धीचे काम एका मतानेच होत असते, हे निर्विवाद आहे.

व्यापार

८४५. व्यापारात कशा प्रकारचे वर्तन ठेवावे?

भीड धरू नये, पत राखावी व परदेशात उधार देऊ नये.

८४६. व्यापारी दृष्टीने धर्माचे महत्त्व आहे काय?

अवश्य आहे; कारण व्यापार सचोटीने न केला तर सर्वांचेच जीवित संशयी होईल. प्रत्येक मनुष्य आपल्याच पोळीवर दाळ ओढू लागल्यास व्यापार कधीच सुरळीत चालणार नाही.

८४७. मग समाजाच्या सोईकरताच धर्म आहे म्हणावयाचा! पारलौकिक सुखाचे आमिष त्यात कशाला पाहिजे?

परलोक खरा आहे, हे तुला मागे सांगितलेच आहे, पण नुसत्या ऐहिक सुखाकरता धर्म मानला तर त्याला एक प्रकारचे अरेरावीचे स्वरूप येऊन, तो आम्ही कां पाळावा? असा प्रत्येक व्यक्ती आपल्या मनाला प्रश्न करील; आणि लोकात दिसू न द्यावे असे वाईट करण्याचा प्रत्येकजण यत्न करील; त्यामुळे प्रत्येकाच्या मनास गुप्त चोरीची संवय लागून सुंदोपसुंदन्याय प्राप्त होईल.

आपल्या मनाला काही बंधन असले पाहिजे असे वाटल्यावाचून कलहशांती कधीच होणार नाही, आणि ऐहिक सुखाच्या चढाओढीत हे बंधन राहणे कधीच शक्य नाही.

८४८. असे आपण अल्पज्ञ मनुष्याने ठाम भविष्य कसे सांगावे बरे?

सामान्यदृष्टीने प्रत्येक मनुष्य त्रिकालज्ञानी आहे असे माझे मत आहे. विशेष भविष्ये मात्र मनुष्याचे अज्ञानामुळे चुकतात.

त्रिकालाबाधित तत्त्वाविषयी जो संशय कित्येक लोकांनी काढला आहे तो यामुळेच मूर्खपणाचा आहे, असे मी म्हणतो.

शेती

८४९. कोणता शेतकरी उन्नतीस कधीच चढत नाही?

ज्याची शेती केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे तो!

८५०. पाण्याचा तोटा असल्यास शेती कशी वाढवावी?

तांत्रिक उपायाने थोडेसे पाणी पुरे होते.

८५१. व्यापारोपयोगी वस्तू शेतकऱ्यांनी अधिक पेराव्यात की दुष्काळ-नाशक अधिक पेराव्यात?

दुष्काळनाशक अधिक पेराव्यात. कारण व्यापाराचा भाव चढविणे, उतरविणे, सर्वदा आपल्याच आधीन नसते; त्यामुळे एखादे वेळी दोन्ही पक्षी पेचात येण्याचा संभव असतो.

बागाईत मात्र बहुधा व्यापारोपयोगी असावे आणि थोडे दुष्काळ-नाशकही असावे.

पीकसाम्य असेल अशा देशाशी स्पर्धा करताना मात्र शेतीत व व्यापारात नवीन सुधारणा केली पाहिजे.

अकालवनस्पत्युत्पादन हा तांत्रिक विधी ह्याच्या उपयोगी आहे. आणि तशीच यांत्रिक व ललितकलाही उपयोगी आहे; कारण,

'कौशल्य हेच कोणत्याही देशाची संपत्ती होय. इतर संपत्ती कौशल्याच्या पायावर लोळत असतात.

धर्म, कौशल्य व बुद्धी हे तिन्हीही ज्या देशात एकवटलेले असतात, त्याची अधोगती ब्रह्मदेवाच्यानेही होणे शक्य नसते, असा ऊशनादि (एक ऋषि) श्रेष्ठांचा अभिप्राय आहे.

कुटुंब विषयक

८५२. कुलवान् कोणास म्हणावे ?

जुने न सोडता, ज्याला नव्याला जुने करता येते त्यास !

८५३. कुळघाती कोण ?

याच्या उलट करतो तो !

माता-पिता

८५४. त्रिस्थळी तीर्थ कोणते ?

आई, बाप व गुरु !

८५५. आई कोण ?

व्याधीचे वेळी साह्य करणारे कोणीही !

८५६. बाप कोण ?

अन्नदाता !

८५७. आईबाप दोन्ही तीर्थे आहेत हे कळले; पण प्रसंगी कोणास श्रेष्ठ समजावे?

द्विजांनी बापाला, इतरांनी आईला ! कारण त्यांचा वेदाधिकारप्रद उपनयन-संस्कार बापावर अवलंबून आहे.

८५८. संकटात प्राण वाचविणारा व आईबाप यामध्ये तरतम भाव आहे काय?

संकटात प्राण वाचविणारा बापापेक्षा श्रेष्ठ व आईच्या तोडीचा आहे, पण आईची कडी कांकणभर वर आहेच.

८५९. पित्याच्या आज्ञेने आईला त्रास द्यावा काय? कारण भार्गवराम व रामाने तसेच केले !

अरे, चिरकारीने पित्याच्या आज्ञेवरून आईस मारले नाही; अशी महाभारतात कथा आहे. भार्गवराम व राम हे अवतार असल्यामुळे त्यांचे सर्वथा अनुकरण करणे जीवाच्या हातून शक्य नाही. म्हणून चिरकारीचरितच आपल्यासारख्या जीवांना अनुकरणीय आहे.अशा समयी पित्याचा शाप झाला तर मातेचा आशीर्वाद शास्त्रबल असल्यामुळे त्यापासून उद्धार करील.

८६०. वडिलांचा सल्ला झुगारून देण्याची पाळी केव्हा येते की नाही?

वडील मूर्खपणाने ईश्वरभक्तीत अडथळा करतील तर त्यांचा सल्ला झुगारून द्यावा. इतर कोणत्याही कामात झुगारून देऊ नये.

८६१. दुदैवाने वडील शत्रू झाल्यास वडीलरहित रहावे की नाही?

वृद्ध मित्र जोडून त्या वडिलांच्या सल्लेने चालावे.अत्यंत स्वतंत्र राहू नये.

८६२. तर मग आपली स्वतंत्रता कोठे आहे?

वडिलांची आज्ञा भंग न होईल अशा रीतीने कार्यव्यवस्था करण्यात!

८६३. परस्त्रीला आई समजावे असे म्हणतात, तेव्हा स्वतःच्या आईने व दुसऱ्या स्त्रीने आज्ञा केल्या असता त्या कशा पाळाव्यात?

अरे, परस्त्रीला आई समजणे हे रागनिवृत्तिकरता आहे, कुलसिद्धीकरता नाही; असे मानले नाही तर मनुष्याला कुतरीला पिंड देण्याची पाळी येणार! दत्तकपुत्राच्या कुलनिवृत्तिविषयी शास्त्रच प्रमाण आहे; आणि प्रेमाने आई समजण्यामध्येही न्यूनाधिक्य भाव आहे.

श्रीकृष्णाच्या बाळलीला यशोदेच्या घरी जितक्या होत असत, तितक्या सर्वच म्हताऱ्या बायांच्या घरी होत असत काय? आता भगवान् श्रीकृष्ण जरी भक्तीप्रमाणे पावणारे होते, तरी भक्तवैशेष्य त्यात आहेच.

८६४. जन्म देणारे आईबाप श्रेष्ठ की प्रेम करणारे?

दोन्हीही समान आहेत. कृपणांना जन्म देणारेच आईबाप श्रेष्ठ असून उदारांना प्रेम करणारेच आईबाप श्रेष्ठ वाटतात. कारण स्वार्थ सोडून निरपेक्ष प्रेमाचे उदारांच्या हातून उल्लंघन होत नाही; याविषयी महाभारतात कुंतीशी जे कर्णाचे भाषण आहे त्याचा विचार कर. सूर्यनारायणासारखा बाप व कुंतीसारखी आई यांनी 'पांडवपक्षाला येऊन मीळ' असे कर्णाला म्हटले असता, 'ज्या सूताने व त्याच्या स्त्रीने माझे बाळपणापासून पाळण केले, त्यांना मी पिंडाला कसा मुकवूं? तूं आपल्या स्वार्थाकरता माझा पूर्वी त्याग केलास व आता आईपणा दाखविण्याकरता आलीस !' असे कर्ण तिला म्हणून स्वर्गास गेला; परंतु विश्वासघात त्याने केला नाही.

तेव्हा सत्त्वशील पुरुषांच्या प्रेमाची लीला अगाध असते. युधिष्ठिराने कुत्र्याकरता स्वर्ग नाकारला.

स्वार्थी मनुष्याच्या हाताने प्राणाची परवा न करणारे धर्मोपदेशक कधी तयारच होत नाहीत, हे पक्के लक्षात ठेव.

८६५. गुरु मिळत नसेल तर कसे करावे?

परमेश्वरसाक्षित्वाने परस्परसंबद्ध होऊन सदाचरण करावे किंवा आईबापांची सेवा करावी.

८६६. गृहस्थाला व विरक्ताला काय काय श्रेष्ठ आहे?

आईबाप व अतिथीसेवा हे गृहस्थाचे मुख्य कर्तव्य आहे. त्यांच्या अभावी मूर्तिपूजा करावी.

८६७. असे आहे तर गृहांत मूर्ती पाहिजे कशाला?

मनुष्यत्वधर्मास्तव ! ज्यांना आईबाप, गुरु यांना देव समजण्याइतके सामर्थ्य नसते त्यांना दाखविण्यासाठी !

८६८. आईबापांची सेवा सोडून मूर्तिसेवा केली असता काही फळ होत नाही काय?

पूज्यबुद्धीचे फल झालेच पाहिजे; परंतु ते आडमार्गास्तव लवकर होत नाही व मध्ये नरकादि दुःखे भोगावी लागतात, एवढेच!

८६९. कधीही कोणाला उत्कर्षास न येऊ देणारे काय आहे?

भाऊबंदकी !

८७०. भाऊबंदास ताब्यात कोण ठेवतो?

ज्याचे विकारहि दुसऱ्यास चांगलाच मार्ग दाखवितात तो !

८७१. मोठ्यांचा कोप कशावरून समजावा?

उपेक्षेवरून !

८७२. कोण मुलगा उद्धट होईल हे कसे ओळखावे?

१. जो मुलगा वडिलासमोर जेवायला बसून जोराने तोंड वाजवितो व २. पाणी पिताना गळा वाजवितो आणि ३. बाप रागावला असतो आई ज्या मुलाचा पक्ष घेत असते, तो बहुशः उद्धट होईल असे समजावे.

८७३. कुटुंब कोणाची दुर्दशा करते?

कदर्युप्रमाणे कृपणाची !

८७४. शेजारी कोणावर संतुष्ट राहात नाहीत?

जो रोज गोड खातो असे त्यांना समजते आणि आपत्तीत अल्पही साहाय्य देत नाही, त्या एकट कोंबड्यावर शेजारी संतुष्ट रहात नाहीत.

८७५. गृहच्छिद्र गुप्त ठेवावे की प्रगट करावे?

गुप्त ठेवावे, पण नाहीसे करावे; प्रगट करू नये. कारण, गृहछिद्र कोणात नाही असे नाही; मग प्रगट करण्यात काय अर्थ !

८७६. स्वतःचे छिद्र प्रगट करावे की गुप्त ठेवावे?

१- दुसऱ्याला लाजविणारे असेल तर गुप्त ठेवावे व आपल्यालाच लाजविणारे असेल तर प्रगट करावे किंवा २- शत्रूपासून गुप्त ठेवावे व प्रायश्चित्तार्थ वडिलांकडे प्रगट करावे.

८७७. तोंडावर व मागे गोड व कडू बोलण्यावरून कोणाविषयी काय काय समजावे ?

१- तोंडावर गुरुजन गोड बोलले असता त्यांच्या अंतःकरणात आपल्याविषयी प्रेम नाही असे समजावे, मागे गोड बोलले असतां आपल्या सेवेपासून ते प्रसन्न अहेत असे समजावे.

२- वडील समोर कडू बोलले असता ते आपले कल्याण इच्छितात असे समजावे, वडील मागे कडू बोलत असता अनेक शत्रूंकडून आपला पराभव होण्याचा काल जवळ आला आहे असे समजावे.

३- मित्र तोंडावर गोड बोलले असता काहीच मनात समजूं नये, मागे गोड बोलले असता त्यांचे मनात प्रेम आहे असे समजावे.

४- मित्र तोंडावर कडू बोलले असता आपले अवगुण त्यांना दिसून आले आहेत असे समजावे, मागे कडू बोलले असता त्यांची मैत्री तुटली आहे असे समजावे.

५- स्त्रिया मागे व तोंडावर गोड बोलतील तर त्यांचे मनात प्रेम आहे असे समजावे व कडू बोलतील तर द्वेष आहे असे समजावे.

८७८. कोण कोण कडू बोलले असता काय काय करावे?

१- गुरु, वृद्ध कडू बोलले असता त्यांची क्षमा मागावी; व आनंदाने, ईर्षा मनात न धरता आपली सुधारणा करावी.

२- मित्र कडू बोलले असता ईर्षा मनात धरून आपल्या चुकीची सुधारणा करावी; अतिशय सावधगिरीने पुनः मित्रांडून शब्द ऐकावा लागणार नाही असे करावे.

३- बालकांच्या कडू बोलण्याची उपेक्षा करावी.

४- स्त्री कडू बोलली असता तिचा त्याग करावा व

५- सून कडू बोलली असता गृहत्याग करावा.

८७९. कोणाला म्हातारपणी रडत बसावे लागते?

१- जो गुरु द्रव्यलोभाने शिष्याच्या अधिकारापेक्षा अधिक ज्ञान सांगतो;

२- जो बाप मुलांना न देता त्यांच्या समक्ष गोड खातो;

३- आणि जी स्त्री आपल्या सुनेला मुलाच्या आज्ञेवाचून पीडा देते;

या तिघांना म्हातारपणी नित्य रडत बसण्याची पाळी येते.

८८०. यतीला देण्याला जवळ अन्न नसेल तर कसे करावे?

स्वतःच्या भागातील कांही द्यावे व कुटुंबाची प्रार्थना करून त्यांच्या भागातील कांही द्यावे. कारण कुटुंबावर आपली क्रिया अवलंबून असल्यास कुटुंबही आपले अतिथी होय.

८८१. अतिथीला आधी जेवूं घालावे की कुटुंबाला?

कुटुंब जर मुख्याच्या आज्ञेत असेल तर अतिथीला आधी जेऊ घालावे व आज्ञेत नसेल तर हा प्रश्नच उत्पन्न होत नाही.

८८२. पाहुण्यांचा सत्कार कसा करावा?

आपल्या सत्काराने आपणही असाच सत्कार केला पाहिजे असे ज्याला वाटेल त्याला पाहुणा समज व नंतर रीतीप्रमाणे थोडे दिवस त्याचा सत्कार कर; व तसे त्याला वाटणार नाही तर त्याला भिक्षुक समजून, नम्रतेने माझ्याजवळ इतकीच भिक्षा देण्याला आहे असे सांग.

८८३. मैत्री श्रेष्ठ की नाते?

१- मैत्री; कारण तिच्यामध्ये भांडण होणे शक्य नाही. अंतःकरणाच्या प्रेमावरच ती अवलंबून आहे. प्रेमात बिघाड आला की की मैत्रीच नाश पावते.

२- नात्याची गोष्ट तशी नाही. त्याचा संबंध केवळ देहाशी असल्यामुळे त्यापासून प्रसंगी अनेक प्रकारचे धोकेही होतात. म्हणूनच मैत्रीची प्रशंसा योगशास्त्रातही केली आहे.

३- मित्र प्रेमामुळे दुसऱ्या जन्मात उपयोगी पडतो, तसे नाते उपयोगी पडत नाही; कारण दुसऱ्या जन्मात उपयोगी पडण्याला प्रेममय वासना पाहिजे.

स्त्रीविषयक

८८४. तर मग स्त्रियांना पतीच्या आज्ञेत वागावे असे नात्यात कां बांधून टाकले आहे बरे?

अरे, पण स्त्रीच्या नात्यापेक्षाही साधूच्या मैत्रीची प्रशंसा अधिक केली आहे, इकडे लक्ष असू दे. शिवाय ''महात्मनां सप्तपदी मैत्री'' या न्यायाने लग्नातील सप्तपदी विधी हा स्त्रीला मित्र करण्याचाच आहे. शिवाय

१- स्त्री धर्माचे ठिकाणी वेद सांगतो म्हणून दासी आहे,

२- अर्थाचे ठिकाणी मैत्रिणी आहे आणि

३- कामपुरुषार्थाचे ठिकाणी स्वामिनी आहे.

४- मोक्ष तर ज्याला ज्ञान होईल त्याला स्वतंत्र होतो,

म्हणून नव्या लोकातील स्त्रीस्वातंत्र्याची ओरड तत्त्वतः खरी नाही, असे म्हणावे लागते.

भाऊबंदकी

८८५. संसारात घरातील फूट कशी नाहीशी करावी?

मुख्याने फुटीपासून तोटा आहे असे समजून काळजी घ्यावी. मतलबी कौटुंबिक फुटीचा फायदा घेऊन घराचा नाश करितात. या विषयी एक कल्पित कथा सांगतो :-

घोडे व खेचर यांची कथा

घोडे व खेचर मिळून एका अरण्यात एक टोळी करून रहात असत. खेचरांना आपला बाप गाढव आहे असे वाटल्यामुळे ते त्याच्या आश्रयाला राहिले व त्याचप्रमाणे घोडेही खेचरांच्या प्रेमामुळे राहिले. पुढे काही दिवसांनी त्या गाढवाची व एका कोल्ह्याची मैत्री जमली. म्हणून कुटुंबाची व्यवस्था कोल्ह्याला सांगून गाढव जंगलात चरावयाला जात असे. तेव्हा कोल्ह्याला मांसाची अपेक्षा असल्यामुळे, घोडे आपले ऐकणार नाहीत असे समजून खेचरांना त्याने घरचे कामकाज अधिक सांगितले.

इतक्यांत तेथे खेचरांची आई आली. तिने तो प्रकार पाहून कोल्ह्याशी सल्ला केला आणि ''हे माझ्यापासून झालेले तुमचे विदुर आहेत, यांना इतके उंच तुम्ही कसे चढूं दिले?'' असे ती घोड्यांना म्हणाली. यामुळे सर्व घोडे चवताळून जाऊन खेचरांशी लढू लागले. परंतु खेचर भार वाहण्याला जितके मजबूत तसे त्यांच्याकडून भांडण काही होईना.

इतक्यात धर्माने बाप मानलेला गाढव तेथे आला. तेव्हा त्याने गाढवीस हा काय प्रकार असे विचारिले.

ती म्हणाली, 'महाराज! मी आपल्या गाढव जातीतली खरी, पण पतीला सोडून कामामुळे घोड्याला वरिले आणि त्यामुळे मजपासून ही ख्वारे झाली. कोल्ह्याने फार चांगले केले. खेचरांना घरातील सर्व कामकाज देऊन घोड्यांना दूर ठेविले परंतु घोड्यांना अगदीच बाहेर घालण्याच्या इराद्याने त्याने मला असे सांगितले की तूं आपल्या मुलांत व घोड्यांत भांडण लावून दे.

या बोलण्याने कोल्ह्याचे कृत्य गाढवाच्या लक्षात येऊन, तिला म्हणाला,''तूं वेडी आहेस. मी या कोल्ह्याच्या भरंवशावर घर टाकले ही फार चूक झाली. तुझी मुले भार वाहण्याला कितीही हुशार असली, तरी घोड्यासारखे बुद्धिकौशल्य व चापल्य त्यांच्यात नाही, त्यामुळे तुझ्या मुलांचाच क्षय होईल.''

असे बोलून गाढव घोड्यांकडे जाऊन त्यांना म्हणाला, ''शांत व्हा. इतके दिवस एका ठिकाणी राहिलेल्या कुटुंबाशी भांडणे तुम्हाला योग्य नाही''.

तेव्हा घोडे तर समजले पण ख्वार ऐकेनात. तेव्हा गाढवीने तेथे येऊन सांगितले की, ''कोल्ह्याला मांस खाण्याची इच्छा असल्यामुळे तुमच्या दोघांमध्ये याने भांडण लावून दिले आहे.'' हे ऐकून कोल्हा तेथून पळून गेला.

महाभारतात अशी कथा आहे की, भंगास्वनाच्या पोटची काही मुले एकत्र राहत असतां, यज्ञविभागाच्या द्वेषाने इंद्राने त्यांच्यात फूट पाडली. म्हणून कौटुंबिक फुटीविषयी मुख्याने काळजी घेतली पाहिजे.

सेवक

८८६. संबंधी जनांपासून व परिजनांपासून कोणाला त्रास होत नाही?

१- जो निस्पृह असतो,
२- जो आपल्या पायावर उभा राहण्यास तयार असतो,
३- जो स्वजनपरिजनांची अती काळजी घेतो,
४- जो दुसरे जन मिळविण्याला समर्थ असतो,
५- जो मरणास तयार होतो, आणि
६- जो प्रसंग निभावून नेण्यास सिद्ध असतो;

या सहा जणांना संबंधी व परिजनांपासून त्रास होत नाही व ते त्याला त्रास देऊही शकत नाहीत.

८८७. तोंडपुजे सेवक कोण्या स्वामीजवळ जास्त राहतात?

जो अल्प अपराधाबद्दल कोप करतो व महदपराधाची क्षमा करतो त्याजवळ!

८८८. सर्वच अल्प अपराधांची क्षमा करावी की महदपराधाची क्षमा करावी?

महदपराधानुस्मरणपूर्वक कोणत्याच अल्प अपराधाची क्षमा करू नये आणि इतर सर्व अल्प अपराधांची क्षमा केल्यास स्वामीस भूषण आहे.

सेवक लाजाळू व निश्चयी असेल तर महदपराधाचीही क्षमा करावी व उद्धट व अनिश्चयी असेल तर अल्प अपराधाचीही क्षमा करू नये;
असा न्याय आहे.

८८९. अदत्त परिजनांना कसे वागवावे?

त्यांचे काम अटकले असताना रागावून आपले काम करून घ्यावे; व आपले काम बिघडत असता हात जोडून त्यांच्यापुढे नम्र व्हावे. दत्तपरिजनांविषयी असे पुष्कळ वेळ केल्यास स्वामीचे नुकसान होते.

८९०. सेवकाकडून जो वाईट करवितो त्याचे पातक स्वामीला की सेवकाला?

स्वामीला! कारण सेवक धनादिकांमुळे बांधलेला असतो; धनादिकाची ज्याला आशा नाही तो कोणाचा सेवकच नव्हे.तो प्रेम करीत असल्यास सुहृद्वत् समजावे. वाईट आज्ञा पाळणे हा सेवकाचा धर्म आहे पण मित्रासंबंधी देखील तो मोह समजल्या जातो.

स्त्री आणि पुरुष

८९१. स्त्री-पुरुषांपासून काय शिकावे ?

स्त्रीपासून प्रेम व पुरुषापासून धर्म !

८९२. स्त्री सर्वदा परतंत्र आहे की कधी स्वतंत्र असते?

या प्रश्नातच मला काही अर्थ वाटत नाही.जोपर्यंत ज्ञान होत नाही तोपर्यंत सर्वच स्त्रीपुरुष परतंत्र आहेत.

ज्याप्रमाणे नवऱ्याच्या आज्ञेवाचून स्त्रियांनी केलेला इतर धर्म व्यर्थ आहे, त्याप्रमाणे पतिव्रता स्त्रीने नको म्हटले असता तीर्थाला गेलेल्या ब्राह्मणाची यात्रा व्यर्थ झाली, अशी पुराणात कथा आहे.

१. धर्माचे ठिकाणी स्त्री दासी आहे,

२. अर्थाचे ठिकाणी मैत्रिणी आहे आणि

३. कामाचे ठिकाणी स्वामिनी आहे असे माझे मत आहे.

८९३. कोणत्या स्त्रिया सुनांना चांगल्या वागविणार नाहीत असे समजावे?

सुनांच्या हातचे जेवणाविषयी ज्यांना शंका वाटते त्या!

८९४. अवदसा स्त्री कोण समजावी?

जिला गृहकाम करण्याची हौस नाही ती!

८९५. कोणाचा अभ्युदय होत नाही?

लग्न करून स्त्रीच्या मदतीकरता ज्याला नोकर ठेवावे लागतात त्याचा!

८९६. नोकर कशाने वठणीस येतात?

घरच्या लहान मोठ्यांना काम करता आल्याने!

८९७. पतीचा दुष्टपणा स्पष्ट केव्हा ओळखता येतो?

स्त्री गर्भिणी असल्यावर तिला अतिशय काम सांगतो तेव्हा!

८९८. पतीचे केव्हा ऐकूं नये?

१- वैदिक धर्म सोडला असेल तेव्हा; आणि

२- रोगी असून अपथ्य मागेल तर पतीचेच काय, पण कोणाही वडिलांचे ऐकू नये.

८९९. लवकर दारिद्र्य आणणारे असे काय आहे?

घरातील स्त्रीची माहेरावर प्रीती असून तिला अलंकारांची फार इच्छा असणे!

९००. कोण्या स्त्रीच्या धर्मबुद्धिविषयी शंका घ्यावी?

जी आपल्यापेक्षा विद्येत व कलेत कुशल आहे तिच्या!

९०१. अमुक स्त्रीने आपल्या पातिव्रत्याला सोडले आहे हे कशावरून ओळखावे?

शहाणी असल्यास प्रथम ध्वनीच्या बाहेर जिचा शब्द जातो, आणि मूर्ख असल्यास मध्यम ध्वनीवर येतो, आणि दैवी ओज शून्य होते, त्या दोघींचेही पाऊल बाहेर पडले असण्याचा संभव आहे.

९०२. स्त्रीला देवदर्शनाला जाऊ द्यावे किंवा जाऊ देऊ नये?

स्त्रीला तीन समजुतीवर देवदर्शनास जाऊ द्यावे.

१- जेव्हा स्त्रीच्या मनात देवदर्शन घेण्याचे येते, तेव्हा पतीपेक्षा देव तिला वरिष्ठ वाटत आहे, ही पहिली समजूत.

२- पतिधर्मात ही राहिली नाही तर भागवत धर्मात तरी राहो ही दुसरी समजूत; आणि

३- ही निघूनच गेली तर आपण हिचे काय करू शकतो? मग देवदर्शनाकरता हिला अडवून धर्माचे तरी अपराधी आपण कां व्हावे? ही तिसरी समजूत!

९०३.. कोणाकोणाला भिऊन वागावे?(मागील आवृत्ती ९३७ वा प्रश्न)

१- सज्जनांचा कोप, २- दुर्जनांची स्तुती, ३- कन्येचे वाढणे व ४- स्त्रियांचे बाहेर फिरणे; या चार गोष्टीस भिऊन वागावे.

९०४. जी स्त्री अती पापी पतीलाही सोडीत नाही, तिची काय गती होते?

आत्मपुराणात सांगितले आहे की ती त्या पापाची विभागिनी होते; कारण ईश्वरावाचून कोणताही संबंध रागमात्राने झाला असता पापमूलक आहे.

पतिसेवा जरी मोठ्या प्रेमाने स्त्रीने केली, तरी त्यापासून पुण्य होत नाही तर ''स्त्रियांनी पतिसेवा करावी असे शास्त्र आहे, या समजुतीने पतिसेवा करणाऱ्यांनाच धर्म उत्पन्न होतो.''

नुस्त्या प्रेमानेच जर पतिसेवेचे पुण्य मिळेल तर विवाह न करता कुमार कुमारीच्या प्रेमानेही त्याची प्राप्ती होईल.

९०५. तर मग सर्वच प्रेम पतीवर ठेवावा असे शास्त्राने कां म्हटले आहे?

हा नियमविधी आहे.

९०६. पतीबरोबर ज्या स्त्रिया सती जातात, त्या प्रेमावाचून कशा जातात?

प्रेमाने सती जावोत, पण त्या सर्व नरकात जातात.

केवळ 'सहगमन करावे' या शास्त्रामुळे ज्या सती जातात त्या मात्र मुक्त होतात.

९०७. मग प्रेमाने केलेला धर्म काहीच उपयोगाचा नाही?

अर्थात नाही ! धर्मशास्त्र सांगेल तेथेच प्रेम ठेविला पाहिजे.

९०८. इतके वचनपरतंत्र मनुष्याने कां राहावे?

कोण म्हणतो ! वचनाचे फळ पाहिजे असेल तर राहावे !

९०९. अवश्य विश्वास न ठेवण्यासारख्या कोणत्या गोष्टी आहेत?

१- स्त्रियांच्या मनातील गौप्य, २- कामी पुरुषाची प्रतिज्ञा, ३- आयुष्य आणि ४- अभ्राची छाया; या चार गोष्टीवर विश्वासू नये .

९१०. स्त्री कोणास भीत नाही?

१- जो नित्य बाहेर राहतो, २- जो नित्य घरात राहतो, ३- जो आई बापाचे ऐकत नाही हे स्त्रीस ठाऊक असते, ४- जो थुंकून भिंती खराब करतो, ५- जो निजण्याशिवाय दुसरे काही करीत नाही, ६- ज्याची बाहेर जाण्याची व घरात येण्याची वेळ ठरलेली आहे, असे स्त्रीस ठाऊक असते;

या सहास स्त्री कधीही भीत नाही.

९११. स्त्रियांना कोणत्या गोष्टी कळविल्या असता हानी होते व कोणत्या गोष्टी कळविल्या असता हानी होत नाही?

लौकिक कार्ये स्त्रियांना कळविली असता हानी होते.

धर्मकार्ये कळविली असता हानी होत नाही.

९१२. कोणाजवळ खोटे बोलले असता गृहस्थास पाप लागत नाही?

स्वस्त्रीजवळ !

९१३. प्रत्यक्ष आईशीही खोटे बोलणे कोणते वेळी शोभते?

पित्याने नियुक्त केलेल्या महत्कार्यात आईचे अंग नसतांना!

९१४. व्यभिचार न करिता व्यभिचाराचे पातक कोणास लागते?

१- पैशाने हपापून जाऊन जे गरिबांच्या मुलींना लग्नाची सवड देत नाहीत त्यांना आणि २- कन्याविक्रय करतात त्यांना!

९१५. लवकर म्हातारा कोण होतो?

दुध व साखर न घेऊन जो स्त्रीसंभोग करतो तो!

९१६. नित्य संकटात कोण असतो?

ज्याला एकीपेक्षा अधिक लग्नाच्या बायका आहेत तो !

९१७. हिंदुस्थानात बहुपत्नीकत्व असून भोटादिदेशात बहुपतित्व आहे तेव्हा त्यातले खरे कोणते?

वैदिक व तांत्रिक धर्मान्वये कसेही धरून चालले तरी स्त्रियांचा गर्भाशी संबंध नऊ महिने येतो, यामुळे गर्भ बिघडण्याला किंवा स्त्रियांची प्रकृती बिघडण्याला, संतती न्यून होण्याला, अथवा पुष्कळ पण निःशक्त संतती होण्याला बहुपतित्व कारण होते, असे म्हणावे लागते. पाश्चात्य कामशास्त्रवेत्त्यांचेही असेच मत आहे.

९१८. तर मग आपल्याला अत्यंत एकपत्नीत्वच मान्य असले पाहिजे?

मानसिक गुणांच्या दृष्टीने अत्यंत एकपत्नीत्वच मला मान्य आहे. तथापि बहुपतीत्वाने जितकी शारीरिक दृष्ट्या स्त्रियांची हानी होण्याचा संभव आहे, तितकी बहुपत्नीत्वाने पुरुषाची शारीरिक हानी होत नाही म्हणूनच कामीपुरुषांना बहुपत्नीत्वाचा अधिकार आर्यशास्त्रात दिला आहे.

परंतु तो धर्म नव्हे. कारण धर्मात ज्येष्ठ पत्नीलाच सर्वत्र मान आहे.

आणि मद्रादिआर्यदेशात तर लोक ऐकत नाहीत म्हणून आपद्धर्माच्या भलत्याच सवडी आहेत; संपद्धधर्माच्या नव्हेत.

धर्मातील सर्व गोष्टी पापप्रतिप्रसव-निरोधाकरताच असतात.

९१९. एकापेक्षा अनेक बायका असल्यास पुरुषांनी त्यांच्याशी कसे वागावे?

सर्व एकदम गर्भिणी होणार नाहीत असे !

९२०. शुक्राचार्यांनी वेश्यांची ओळख अवश्य करून घ्यावी म्हणून सांगितले आहे, ती योग्य कशी होते?

वेश्या जवळ आल्या असता कुलांगनांना त्यांच्या भेटीची सवड देऊ नये. तसेच वेश्यांशी कधीही संग करू नये; कारण संग केलेल्या पुरुषाला कोणतीही स्त्री तुच्छ समजत असते. त्यात वेश्या तर अधिकच समजते. वेश्यांवर कधीही रागावू नये; कारण ज्यांना धर्मबंधन नाही त्यांच्यावर रागावण्याचा परिणाम होत नसतो. वाटेल तेवढी अनृतभाषणाची हौस वेश्यांशी गोड गोड बोलण्याने पुरवून घ्यावी. कुलटापरिणयाने देखील सापत्न वश होतात. ज्यांना शुक्राचार्यांप्रमाणे वागावयाचे आहे, त्यांनी वेश्याशी व्यवहार असा ठेवावा व त्यांचा कंटाळा कधीही करू नये. ज्याला वेश्यागमनाची शास्त्रात परवानगी आहे, त्याला देखील गमनापासून काही लाभ होत नाही, मग इतरांची गोष्ट निराळी !

९२१. स्त्रियांवर प्रेम कायम राहून त्या कस्पटाप्रमाणे समजणार नाहीत याला युक्ती कोणती?

आपल्या इच्छेने त्यांना संयोगयाचना न करणे व केवळ वैनोदिक व्यवहार ठेवणे !

९२२. स्त्रियांवरील सात्त्विक प्रेम कशाने कमी होतो?

एकवेळ देखील रतिसुख घेतल्याने; कारण कोणत्याही सात्त्विक गोष्टीवर प्रेम उपभोगान्तच असतो. उपभोग न घेता स्त्रियांच्या सात्त्विक प्रेमात मोठे माधूर्य आहे.याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे. एकमेकांचे प्राण दाव्याप्रमाणे या सात्त्विक प्रेमात गुंतून राहतात.अर्थात् स्त्रियाही थोड्या धार्मिक पाहिजेतच.

बहुतेक प्रसंगी या प्रेमात चावटपणा होतो व त्याचा परिणाम पुढे बराच भोगावा लागतो.अशा चावट प्रेमाने साधूस पूर्वजन्मीच्या बायका आपोआप भेटतात व या जन्मी विवाहावाचूनही त्या उपयोगी पडण्याला पुष्कळ सवड होते, याचाही थोडाबहुत अनुभव मला आहे. माझ्या जातीच्या एका स्त्रीवर मी आईप्रमाणे प्रेम करीत होतो. शेवटी तिने पतिप्रेमाचा आरंभ करीत करीत माझ्यावर गणिकाप्रेम दाखविला.त्यामुळे माझेही पावित्र्य फसले; पण ते आवरले. तथापि तेव्हापासून माझे एक नुकसान झाले की, स्त्रियांचे ठिकाणी दृढ मातृबुद्धी करणाराही मी योगभिन्नकाली मानसदुर्विकारसंपन्न होतो, अशी मला भीती व कधी कधी संशयही वाटतो; म्हणून यापुढे माझ्या वेडेपणाने ठरलेल्या समाधीत राहावेसे वाटते किंवा राजरोस लग्न करावे असाही विकार मनाला कधी कधी शिवतो. आता ही माझा पाट इच्छिणारी बाई कोण, तिचे नांव काय, हे मी तिची फजिती लोकात होईल म्हणून लिहीत नाही; पुष्कळांस ठाऊक असेलच !

९२३. परिणय कशा स्त्रीशी योग्य होतो?

कुल, शील, रूप व यौवन ह्या चार गोष्टी समान पाहिजेत; विषम असल्यास योग्य होत नाही.

१- पतीपेक्षा रूपवती असलेली स्त्री कधीच अनुरक्त असत नाही.लज्जेमुळे ती शुद्ध राहिली तरी तिचा लज्जेवर प्रेम असतो, पतीवर नसतो.त्यामुळे स्वभावतःच संतती बापाच्या पक्षाला प्रतिकूल व आईच्या पक्षाला अनुकूल होते.

२- कुलाने व शीलाने आपल्यापेक्षा उत्तम असल्यास स्त्री बहुधा बिघडत नाही; पण तिचे प्रेम आपल्या शीलरक्षणावर असते.

३- पतिपेक्षा स्त्री अधिक तरुण असल्यास ती वात्सायनोक्त अयत्नसाध्या आहे, असे निश्चयाने समजावे. आता हे गुण ज्या स्त्रियांमध्ये पतीपेक्षा कमी आहेत त्या पतीच्या भीतीने पळावयाला वाट पहात असतात.

४- आपल्यापेक्षा धनवंताची कन्या पर्णून आणणे म्हणजे आपल्या वडिलांना त्रास देणे होय; आणि

५- अती बुभुक्षिताची कन्या करणे म्हणजे रानशेळी घरात घालणे होय. म्हणून मध्यमाचीच कन्या करावी.

'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' असे स्मृतिकारांनी म्टले आहे खरे; पण त्याचा अर्थ असा आहे की, त्या आपल्या दुष्कुलावर छाप पाडून आपल्या दुष्कुलाचा कंटाळा आलेले असे ते स्त्रीरत्न असते.अशा उघड झालेल्या तेजाची परीक्षाच झाल्यामुळे ते घेण्याला कुणाचीही कुरकुर नसणे साहजिक आहे; पण अपरीक्षित स्त्रीविषयी मात्र मी सांगितलेलेच नियम योग्य आहेत असे मला वाटते.

आम्हां आर्यांना हे तत्त्व लक्षात ठेवण्याची अतिशय आवश्यकता आहे.जेथे पशुप्रमाणे स्त्रीपुरुषव्यवहार चालत असेल, त्या समाजाशी आम्हास काही कर्तव्य नाही.

९२४. स्त्रीसंग नखरादी जातींनी कामक्रीडा करून करावा की वृत्ति-संसाधनापुरताच करावा?

वृत्ति-संसाधना पुरताच करणे, शरीराला हितावह आहे.नखरदनक्षतादिक मनाला फाजीलपणाची संवय लाऊन नेहमी कामात गुंतविणारे आहेत म्हणून तिकडे लक्ष देऊ नये. प्रेमचुंबन मात्र पुत्रगर्भास आवश्यक आहे, असे सूज्ञ म्हणतात.

९२५. काही लोकांचे असे म्हणणे आहे की, स्त्रियांना जर पतिप्रेम समजलाच नाही तर विवाह करून काय अर्थ ? याविषयी आपले काय मत आहे ?

शारीरिक सुखाच्या दृष्टीने हे म्हणणे चांगले समजल्या गेले, तरी मानसिक सुखाच्या दृष्टीने यात काही तथ्य नाही; कारण -

अज्ञातयौवना मुग्धा नायिकाच नायकाबरोबर सुखदुःख सहन करण्याला समर्थ असते.

म्हणून बालविवाहच स्मृतिकारांनी पसंत केला आहे.

शिवाय केशग्रहणचुंबनालिंगनादिकांवाचून पतिप्रेम स्त्रियांना समजणेच शक्य नाही, असे पाश्चात्य कामशास्त्रवेत्ते म्हणतात. तेव्हा अशी व्यवस्था करून मग लग्न करावयाचे काय? उत्तम नायिका बनविण्याचे शिक्षण बाळपणात जितके सुरेख देता येते तितके प्रौढपणात देता येत नाही. मंदारमकरंदचंपू हातात घेऊन प्रौढविवाहितापरीक्षा केली तर शेकडा एक उत्तमा, पंचवीस मध्यमा व पाऊणशे कनिष्ठा नायिका सांपडतात.

शिवाय अशा स्त्रिया पतीचे लक्ष माझ्याकडे लागावे, दुसऱ्या कोणाकडे लागू नये एवढ्याकरता मानसिक रोग उत्पन्न करून घेत असतात व त्यामुळे कित्येकांच्या अंगात भूत येणे, कित्येकांना मानसोन्माद व कित्येकांना मरण येते व कित्येक आत्महत्याही करून घेतात. 'प्राणसख्या ! मी मेल्यावर पिशाच होऊन तुमच्या सभोवती राहून तुमचे रक्षण करीन' असे कित्येक स्त्रिया स्वप्नात बडबडतात. प्रत्यक्ष नाटकात व कित्येकांच्या घरात भेद राहिला नाही, हे मी स्वतः डोळ्याने पाहिले आहे. या सर्व अनर्थाला प्रतिबंध करणारा भगवान् धर्म आहे.

व्यक्तिगत प्रश्नोत्तरे

९२६. अहो, पण आपण इतके स्पष्ट लिहिता यावरून लोक आपल्यावर टीका करतील ना?

वत्सा, १- मूर्ख लोकांच्या मनाला रुचण्याइतके माझे भाषण हलकट नसते. मूर्ख लोकांकडून टीका ऐकली नाही म्हणजे आजच्या माझ्या भाषणात हलकटपणा झाला आहे असे मला खात्रीने वाटते.

२- आता सदाचारी विद्वान् लोकांच्या टीकेला भिण्याचे मला प्रयोजन नाही, कारण त्यांच्या हातून मला आपली सुधारणाच करून घ्यावयाची आहे. परमेश्वरावाचून दुसरा निर्मळ कोण बरे जगात सांपडणार !

३- आता तिसरा वर्ग दुराचारी विद्वान् लोकांचा ! या वर्गाच्या हातून मात्र माझा लेख डोळ्यानेही पाहणे होणार नाही, मग ''ब्र'' काढण्याची छाती कोठली !

४- शिवाय ब्रह्मविद्येवाचून बाकी सर्व विद्या आचारवर्जित असतील तर त्या सर्वांवर मी थुंकणारा आहे आणि व्यवहारविद्येचे मिश्रण झाल्यावाचून नुस्त्या ब्रह्मविद्येने कोणाला टीका करता यावयाची नाही म्हणून मी सर्वथा निर्भय आहे.

९२७. तुम्हाला कोणी देवाचा अवतार म्हणतात, हे खरे काय?

होय, अगदी खरे आहे. मी देवाचाच अवतार आहे व तूं माझा आहे.

ज्या कारणामुळे 'तुम्ही अवतार आहां काय?' असा प्रश्न तूं मला विचारलास, तोच प्रश्न तूं आपल्याविषयीही लोकांना विचारू दे.

तूं आपल्या कळकळीने व धैर्याने खांबाला देखील हा प्रश्न विचालास तर तो देखील 'होय; मी देवाचाच अवतार आहे' असेच तुला उत्तर देईल.

९२८. तुम्ही मतभेदसहिष्णु आहो असे दाखविता, परंतु तुमच्या मंडळीतच वेदांताच्या बाबतीत ज्यांचा तुमच्याशी मतभेद आहे, त्यांचे व तुमचे जुळत नाही असे मी ऐकिले आहे, हे खरे आहे काय?

वेदांताच्या बाबतीत कोणाचा कितीही मतभेद असला तरी माझा त्यांच्याशी विरोध येण्याचे काही कारण नाही. तो मतभेद मीच शिकविला असे जर कोणी म्हणेल, तर 'माझे (मत) तुमच्याशी योग्य जुळत नाही' असे मी म्हणत असता 'तुमचे मत आम्हास समजले' असे म्हणण्याचा हक्क कोणास कसा पोहोचतो? म्हणून तूं जसे ऐकिलेस तसेच ते खरे नाही.

'अवितर्की सारसंन्निवेश' माझ्या ग्रंथातून ज्याला मी दिला आहे, त्यालाच माझे ग्रंथ समजतात, असे मी म्हणतो.

युक्तीने पटवून देण्याचा बाणा

९२९. कोणी युक्तीने समाधान मागू लागल्यास तुम्ही रागावतां असे माझ्या ऐकण्यात आहे हे खरे आहे काय?

अत्यंत खोटे आहे.

युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणाच आहे,

परंतु जे विचारण्याला येतात त्यांच्या युक्ती नेहमी क्रमपूर्वक नसल्या तरी आमच्या युक्तीला वाईट म्हणू नये असे त्यांना वाटत असते. आणि त्यांच्या युक्तीच्या खंडणाचा शेवट देण्यास अनेक वृत्तीच्या पायऱ्या मध्ये असतात. तितका वेळ जवळ राहून धीर काढण्याचा त्यांना कंटाळा येतो, म्हणून हे सर्वकाही होते.

९३०. तुम्हाला इंग्रजी येत नाही हे खरे आहे काय?

इंग्रजीच काय कोणतीही भाषा मला पोपटपंचीप्रमाणे येत नाही. मराठी दादोकृत व्याकरण देखील मला येत नाही; परंतु -

मला समजणाऱ्या भाषेत कोणत्याही भाषेतील शास्त्राचा कितीही बिकट प्रश्न केला तरी, प्रयोजनानुसार त्याला उत्तर देण्याची माझी शक्ती आहे.

शिवाय मला अमुक भाषा येते किंवा येत नाही, त्या भाषा कोणी शिकविल्या किंवा आपोआप आल्या, याविषयी लोकांच्या जितक्या विलक्षण समजुती असतील तितक्या खुशाल असोत, मला त्यांच्याशी काही कर्तव्य नाही.

९३१. तुमची मते काही बदलत आली आहेत असे लोक सांगतात, हे खरे आहे काय?

माझी पारमार्थिक मते कधीच बदलली नाहीत व बदलणार नाहीत. व्यावहारिक मते बदलतात. परंतु त्या बदलण्याचे देखील तीन प्रकार आहेत; १- सामन्वयिक परिवर्तन, २- समसामन्वयिक परिवर्तन आणि ३- परार्थ परिवर्तन !

पहिल्या बदलेल्या मतावर माझा विश्वासच असतो. दुसऱ्या बदललेल्या मताचा मी जरूरीपुरता उपयोग करीत असतो पण तात्त्विक विश्वास ठेवीत नाही. तिसऱ्या बदललेल्या मतांचा मी दुसऱ्याकरता उपयोग करीत असतो. त्यांचा मी स्वतःकरता उपयोगही करीत नाही व त्यावर विश्वासही ठेवीत नाही. आता या प्रकारांची फोड करून सांगतो.

१- **सामन्वयिक परिवर्तन** म्हणजे एखादी नवीन गोष्ट निघाली की, मी तिचा एकदम स्वीकार करीत नाही; तर आपल्या शास्त्रात त्याला कोठे आधार आहे काय, असे पाहतो. जसे, जगदीशचंद्र बसू यांनी संवेदनोपपत्ती काढली आहे; परंतु जडाला चिदाभास नाही, असे पंचदशीकारानी म्हटले आहे, आणि **'तस्मात् पश्यन्ति पादपाः, तस्माच्छृण्वन्ति पादपाः'** या श्लोकामध्ये 'झाडे पाहतात व ऐकतात' व **'अंतःसंज्ञा भवन्त्येते'** - यांना अंतर्ज्ञान असते,' इत्यादि महाभारतात व मनूत सांगितले असून, 'नास्तिक जीव पाषाणादि योनीला जातात,' असे योगवासिष्ठादिकांत म्हटले आहे; म्हणून पंचदशीकारांपेक्षा सामन्वयिक

पद्धतीने हे मला पूर्वीच मान्य आहे. बसूच्या उपपत्तीने त्याला नवीन पुष्टी मात्र मिळाली. पण हा सामन्वयिक प्रकार तरी आमच्याकडे भाषांतराच्या मूळाप्रमाणे सापडला पाहिजे, आभास मात्र नको.

दयानंदाने आपल्या ऋग्वेदभाष्यभूमिकेत तारायंत्रादि वेदात आहे, असे दाखविले आहे ते भास होय; म्हणून निराभास सामन्वयिक नूतन परिवर्तित मतावर माझा विश्वास बसतो.

२- आता दुसरा प्रकार - **समसामन्वयिक परिवर्तन.** यातही आभास नसला पाहिजे; परंतु नवीन निघालेल्या गोष्टीची समान क्रिया आपल्याकडे सांपडली पाहिजे, जसे हिप्नॉटिझम् डोळ्याशी डोळा लावून करतात. सुलभेने जनकाला व विपुलाने आपल्या गुरुपत्नीला डोळ्यांशी डोळा लावूनच मोह पाडला होता, अशा कथा महाभारतात आहेत. तेव्हा हिप्नॉटिझमच्या सर्व उपपत्ती मला ग्राह्य असल्या, तरी दृष्टीच्या एकतानतेने अंतःकरणाची काही तरी क्रिया होते इतके समजून, 'घ्या लेकाचा जरूरीपुरता उपयोग करून! त्याच्या तात्त्विक उपपत्तीचा आपल्याला उपयोग नाही. काही त्याच्या आश्रयाने ब्रह्मज्ञान मिळवावयाचे नाही,' अशारीतीने समसामन्वयिक परिवर्तित मताशी माझी वागणूक असते.

३- आता तिसरे जे **परार्थ परिवर्तन,** त्यातील हेतु व साध्य दोन्ही मला मान्य नसले तरी, दुसऱ्याला फायदा करून देण्याकरता असे आपले मत कधी कधी बदलवीत असतो. याविषयी उदाहरण सांगतो :- शिरसगांवबंड मध्ये हरि अंताजी मराठे नावाचे हेडमास्तर होते. त्यांनी 'फर्स्ट प्रिन्सिपल्स ऑफ ऑकल्टिझम्' याविषयी काही गोष्टी सांगितल्या.

ते म्हणाले, ''नुसते मनाने ध्यान केले म्हणजे नाकाने काही वास येऊ लागतो, यावरून बाह्य वस्तू काही नाहीत असा नवा शोध आहे.''

मी म्हटले ''छे! हा नवा शोध मुळीच नाही. आमच्याकडील बौद्धांचा जो बाह्यशून्यवाद आहे तोच उतरून घेतला आहे.''

नंतर ते म्हणाले,''कोठे आहे तो?''

नेव्हा मराठी सूत्रभाष्यातून त्यांना बाह्यशून्यवाद काढून दिला; आणि त्यांना पटलाही ! वास्तविक बौद्धमत मला मान्य नाही परंतु संस्कृतेतर पक्षापेक्षा संस्कृतपक्ष धरणे बरे, असे मानूनच तेव्हा मी ते प्रतिपादन केले.

अशा प्रकारची जी माझी मते बदललेली असतात, ती बदललेली नव्हेत. या सर्वांपासून फायदाच होतो.

वेद, पुराण, तंत्रातील भागात काही नवीन वाक्ये सांपडली व त्याप्रमाणे प्रतिपादन केले तर ते मात्र या तीन प्रकारात येत नाही; कारण ते ग्रंथ पहिलेपासूनच मला प्रमाण असल्यामुळे त्यात मतपरिवर्तन नाही.

९३२. तुमची मते भक्तीतही बदलत गेली आहेत असे लोक म्हणतात ते कसे?

माझी वैदिक निष्ठा व शिवकृष्णभक्ती ही लहानपणापासून आहेत हे माझ्यासंबंधी बाळपणाची माहिती ज्याला आहे, त्यांना विचारावे.

आपत्काल संपल्यानंतर पुन्हा संपद्धर्मात यावे लागते म्हणून
आपद्धर्म हे मत बदलणे नव्हे.

९३३. तर मग तुम्ही आपले ज्ञान गुप्त कां ठेवू इच्छिता?

मुळीच इच्छित नाही. माझी सर्व मते ज्याला कबूल नाहीत त्याला मी सांगत नाही इतकेच! त्यात माझी खुषी आहे. कोणावर कोणाचीही जबरदस्ती नाही. मी व्रतावगैरेकरता पैसे मागितल्यास अशा लोकांनी कवडी मला काढून देऊ नये, त्यात त्यांचीही खुषी आहे. गुह्य सांगण्याचे मिष करून मला कोणाचा पैसा लुबाडायचा नाही; आणि ज्यास तसे वाटत असेल त्याने आपला पैसा मजजवळून परत घ्यावा. मी एका पायावर देण्यास तयार आहे. **''अविरक्त व अननुकूल यास गुह्य सांगू नये''** असे गीतेचेही म्हणणे आहे.

हल्लीच्या गुप्त सभा मात्र बहुधा अविरक्तांच्याच आहेत.

आता माझ्या मंडळीत जे विरक्त नाहीत त्यांना, रस्त्यावर फेकून दिले तरी, माझे म्हणणे समजावयाचे नाही.

त्यांचे ज्ञान केव्हाही वटवटच राहणार मग उगीच मर्यादा मी कशाला मोडूं ? योगाचे व वेदान्ताचे जे ग्रंथ छापल्या गेले; त्यामुळे लोकांचे शाब्दिक ज्ञान वाढले; तसे अभ्यास व वैराग्य वाढले असते, तर लोकांपुढे माझे ज्ञान उघड करण्याची मला उमेद आली असती.

''ग्रंथाप्रमाणे वागावे अशी हल्ली लोकांची प्रवृत्ती नसून वागण्याप्रमाणे ग्रंथ पहावेत'' अशी लोकांची प्रवृत्ती आहे.

९३४. मग तुम्ही ग्रंथ करण्याचे इतके श्रम कां करतां?

या प्रश्नाचे उत्तर भवभूतीचे व माझे एकच आहे. भवभूति म्हणतात,

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां, जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।
उत्पद्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा, कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥
बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवस्मयदूषिताः। अबोधोपहताश्च जीर्णमंगे सुभाषितम् ॥

भावार्थ :- जे कोणी आमचा अपमान करीत असतील त्यांच्याकरता हा आमचा यत्न नाही. माझ्या व ज्याच्या अंतःकरणाचे सारखे धर्म आहेत, असा कोणी आता असला पाहिजे व पुढेही उत्पन्न होईल; कारण काल अनंत आहे आणि पृथ्वीही पुष्कळ आहे. बहुधा स्थिती तर पंडितांमध्ये मत्सर, राजांमध्ये आश्चर्य आणि इतर लोकांमध्ये अज्ञान असल्यामुळे खरे बिचारे जागच्या जागीच राहिले आहे.- हेच माझे उत्तर आहे.

यौक्तिक समन्वय

९३५. अहो, या युक्तीने तर कोणीही आपले म्हणणे पुढे ढकलू शकेल. सर्व आचार्य निरनिराळे सांगतच आले आहेत?

अरे, 'सर्व आचार्यांची मते जरी निरनिराळी आहेत, तरी त्यात कांही ऐक्य आहे असे पक्के समज.'

जगात कोणतीही वस्तू निर्माण झाली म्हणजे ती अनेक वस्तूंशी सदृश व अनेक वस्तूंशी विसदृश अशी होत असते. एखाद्याचे अक्षर घ्या, किंवा एखाद्याचा शाईने उमटविलेला आंगठा घ्या, चेहरा घ्या किंवा केलेले घटपटादी पदार्थ घ्या; हे अगदी मागे गेलेल्या, आता असलेल्या व पुढे येणाऱ्या अशा तिन्ही कालांमध्ये कोणाशी सदृश नाहीत असे म्हणताच येणार नाही; व विसदृश नाहीत असेही म्हणता येणार नाही.

एखाद्याच्या मताचे जो खडंण करीत असतो, त्या खंडणात देखील त्याच्या मताशी ऐक्य पावलेले सिद्धांत येत असतात. म्हणून आचार्यांच्या म्हणण्यातील वैधर्म्य जरी त्याज्य असले, तरी साधर्म्य ग्राह्यच असले पाहिजे. एवढ्यामुळे संशय मात्र मानता येणार नाही. कारण तसे मानले तर आपल्या मताला मतत्वच येत नाही. शिवाय सादृश्यामध्ये संशय येणे दुरापास्त आहे. दोन कोटी अस्पष्ट असल्यास संशय येतो. स्पष्ट असतील तर संशय येत नाही; किंवा एक प्रबल व एक दुर्बल असेल तरी संशय येत नाही. उष्णता प्रबल व मृगजल दुर्बल असल्यामुळे एका ठिकाणी असूनही त्याबद्दल कोणास संशय येत नाही. मनुष्य व स्त्री दोन स्पष्ट पदार्थ असल्यासही संशय येत नाही. त्याचप्रमाणे विरोधी पदार्थसामुग्री होत नसल्यासही संशय येऊ शकत नाही. बौद्ध असत्कार्य आहे म्हणतात, व सांख्य कार्य सत् आहे म्हणतात; पण सदसत् कोणीच म्हणत नाही. कारण दोघांच्याही सामुग्री मिळून काही तयार होत नाही.

याप्रमाणेच आचार्यमतातील वैधर्म्य व साधर्म्य याविषयीही संशय नाही. वैधर्म्यातून प्रवेश करून साधर्म्यात शिरावे म्हणजे सर्व वैदिक आचार्यमतांचा एकतत्त्वाभ्यास कळतो आणि इतरांचही कळतो.

साधर्म्यातून प्रवेश करून वैधर्म्यात गेले तरीही इतरांच्या निषेधाने प्रत्येक आपले ऐक्य स्थापन करीत असतो.

इतरेतरनिषेधाने सर्वच निषेधभाग अप्रमाण झाल्यामुळे अदृश्यात्मक विधिभागच राहतो; आणि तो कोणासही नाकबूल करता येत नाही. याप्रमाणे हा **'यौक्तिक ऐक्यवाद'** आहे.

देहाच्या बाहेर होऊन ज्याचा ज्याला अनुभव आला असेल तसले अनुभव कितीही विसदृश असले तरी ते सत्यच आहेत.

या सर्व अनुभवांच्या पलीकडे देहादी उपाधींचा साक्षात् त्याग करून जर अनुभव येईल तर तो निर्बाध व ह्लनिर्मळच आहे, याबद्दल संशय नाही.

९३६. देहाच्या बाहेर जरी अनुभव आला तरी विसदृश येणे अंमळ चमत्कारिक वाटते?

कितीही विसदृश अनुभव देहाच्या बाहेर आला, तरी तीनच प्रकारचा येतो. १- स्वर्गरूप, २- भगवत्सांन्निध्यरूप आणि ३- निर्गुण ऐक्यरूप.

१- पैकी पहिल्या प्रकारचा अनुभव कर्मावर अवलंबून असल्यामुळे कर्म संपले की तो संपलाच पाहिजे; हे श्रुतियुक्तिसिद्धच आहे. सांठवून ठेवलेले धान्य खातच गेले तर ते कधी तरी संपणारच; असा अनुभवही आहे. कर्माविषयी युक्ती अंशतः प्रमाण आहे व श्रुती मुख्य प्रमाण आहे लौकिकशब्दप्रमाणगम्य वस्तूची देखील स्थिति अशीच आहे. स्वर्गात, सांठविलेल्या कर्मात पुन्हा भर टाकता येत नाही, असे शास्त्र म्हणत आहे. म्हणून स्वर्गरूप अनुभव क्षय पावतो. याविषयी आमच्या अनेक आचार्यांच्या मतातही विवाद नाही. जैमिनीने स्वर्गाला नित्य ठरविले आहे, परंतु तेथे कर्म उत्पन्न होण्याची सामुग्री त्याने दाखविली नाही. देवांना दुसरे देव नसल्यामुळे कर्म करता येत नाही, असे उत्तरमीमांसाकारांनी म्हटले आहे. त्याविषयी वैदिक प्रतिवादी नाही म्हणून विरोध नाही; आणि जैमिनीनेच आपल्या अन्य ग्रंथात 'स्वर्ग नित्य नाही' असे म्हटलेही आहे.

२-३. आतां निर्गुण व सगुण उपसकांचा वाद मात्र ईश्वरावर अवलंबून असल्यामुळे त्या अनुभवात बराच मतभेद दिसतो; परंतु तोही वरवरच आहे, कारण निर्गुणैक्य पावलेलेही मिळून जातात आणि सगुणसन्निध राहणाऱ्या भक्तांशीही परमेश्वराचे भांडण होणे शक्य नाही. असुरांना देखील परमेश्वराने सद्गतीच दिली आहे. 'मी आपल्या भक्तांचे सतत रक्षण करतो' ही प्रतिज्ञा मोडण्यासारखा परमेश्वर काही भांडकुदळ नाही किंवा लबाड नाही. काही भक्तांना परमेश्वराने शिक्षा दिली आहे अशा कथा आहेत. परंतु शेवटी परमेश्वराने त्यांना सांभाळून घेतले अशाही कथा तेथेच आहेत.

परमेश्वरात मिळालेल्या निर्गुण भक्तांची परमेश्वरावताररूप जशी सुखदुःखात्मक लीला होते, तशीच जवळच्या भक्तांचीही होते. त्यातील सात्त्विक प्रकार अनुकरणासाठी व असात्त्विकाभास दोषांच्या वैराग्यासाठी जीवांच्या उपयोगी आहे. असा ज्ञान्यांचा व भक्तांचा समज आहे म्हणून इतरांचे काहीही असो, पण आम्हां वैदिक आचार्यांमध्ये तरी तिरस्कार्य मतभेद नाही.

९३७. तुमच्याकडे कामे कोणती करावी हे समजत नाही असे पुष्कळ म्हणतात, ते कां ?

मजजवळ कामे पुष्कळ आहेत, पण 'आपल्याला जगात महत्त्व मिळावे असे काम सांगा' असे त्यांचे म्हणणे असते. पण तशी कामे सर्वदांच सर्वांना असतात असे नाही. शिवाय,

१- निष्काम कर्तव्यावाचून महत्वाकांक्षेने भरलेला मनुष्य काम करण्यास नालायकही असतो.

२- महत्त्वाकांक्षा व उत्तेजन ही मूर्ख लोकांनाच साजतात; समंजसांना साजत नाहीत.

३- निष्काम कर्तव्य करीत असतां आपोआपच महत्त्व मिळत असल्यास त्याविषयी राग किंवा द्वेष धरू नये.

॥ समाप्तोऽयं ग्रंथः ॥